V O L U M E 6 I S S U E 4 APRIL 2021

*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )**

**Shivajinagar, Pune-411005, Maharashtra.**

# *MODLIB* *E-Bulletin of Library and Information Centre*




**Published by :** Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal, MCASC (Autonomous) , Shivajinagar, Pune-05.

**Editor :** Dr. Shantashree Sengupta, Librarian.

**Editorial Assistant :** Mrs. Sarika Sable

**Website :** http://www.mcasclib.com/ ; **E-mail:** librarian@moderncollegepune.edu.in

# Table of Contents


| Sr. No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 1 | Article on Second Wave of Corona by Honorable Prof. Dr. Gajanan Ekbote Sir | 4 - 9 |
| 2 | कोरोना रुग्णांचा मृतयुदर दुसऱ्या लाटेत कमी (Published in Sakaal 5.4.2021) - By Honorable Prof. Dr. Gajanan Ekbote Sir | 10 |
| 3 | प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी - गौरव आणि यशोगाथा एका वैभवशाली ज्ञान परांपरेच्या संस्थेची | 11 |
| 4 | थोर राष्ट्रभक्त आणि समाजोध्दारक (Published in सामना 14.4.2021) - By Honourable Prof. Dr. Gajanan Ekbote Sir | 12 |
| 5 | Work of Appreciation by Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam | 13 - 16 |
| 6 | Work of Appreciation by Prof. Dr. Nivedita Ekbote Madam | 17 |
| 7 | Blood Donation Camp organised by Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam and Prof. Dr. Nivedita Ekbote Madam | 18 - 19 |
| 5 | Contribution of P.E.Society during Second Wave of Covid-19 Pandemic | 20 - 21 |
| 6 | देवमाणसांची प्रचिती - प्रा . समीर नेरलेकर | 22 |
| 7 | Workshop on NAAC Accreditation Process | 23 - 25 |
| 8 | Report of the Institutional Repository@MCASC : April 2021 | 26 |
| 9 | Events organised by Library during April 2021 | |
| | - *Mahatma Phule Jayanti* | 27 |
| | - *Bharat Ratna Dr. Babasaheb Ambedkar Jayanti* | 28 - 29 |
| | - *Rashtrasant Tukdoji Maharaj Jayanti* | 30 |

## Table of Contents


| Sr. No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 9 | Department of Hindi: Academic and Administrative Audit 2019-20 | 32 |
| 10 | Events organised by Department of Hindi during April 2021 | |
| | - *फिल्म स्क्रीनिंग व फिल्म समीक्षा* | 34 |
| | - *Alumni Meet* | 35 |
| | - *Career Opportunities in Hindi* | 36 |
| | - *Farewell to TYBA Hindi 2020-21 Batch* | 37– 38 |
| 11 | चाह न होती पूरी - डॉ . प्रेरणा उबाळे | 39 |
| 12 | Blood Donation Camp organised by NSS Unit of MCASC, Pune-5 | 40 |
| 13 | Donation of KIBO Scanner by BMC Software to MCASC, Pune-05 for Visually Challenged Students | 41 |
| 14 | Modern Achievements | |
| | - *Dr. Snehal Taware, Ex– Head, Department of Marathi* | 43 |
| | - *Prof. Renu Bhalerao, Department of Zoology* | 44 |
| | - *Sanika Bakre, Alumni of Department of Statistics* | 44 |
| 15 | Newspaper Clippings | |
| | - MCASC Related News | 46 - 50 |
| | - Education | 51 –108 |
| | - Work of appreciation by SPPU, Pune | 109 |
| | - Miscellaneous | 110 - 111 |
| 16 | Condolence Messages (Shraddhanjali) | |
| | - *Late R.P.Kale, Ex– Registrar, MCASC Pune-5* | 112 |
| | - *Late S.Y.Kulkarni , Ex– Registrar, MCASC Pune-5* | 113 |
| 17 | Upcoming Events | 114 |

# *Article on Second Wave of Corona by Honourable Prof. Dr. Gajanan Ekbtoe Sir , Chairman, Progressive Education Society*

## करोना : दुसरी लाट

भारतामध्ये करोनाची दुसरी लाट आलेली आहे. ज्या वेगाने नवीन रुग्ण संख्या वाढत आहे, त्याची तुलना मागील वर्षी आलेल्या पहिल्या लाटेबरोबर करावी लागेल.

महाराष्ट्रामध्ये सप्टेंबर २०२० मध्ये दररोज सुमारे २५,००० एवढी नवीन रुग्णाची संख्या होती. ती डिसेंबर २०२० पर्यंत कमी झाली. परंतु लोकांच्या निष्काळजीपणामुळे, बेजबाबदार वागणुकीमुळे आणि अति उत्साही वृत्तीमुळे दि. 2 एप्रिल 2021 रोजी महाराष्ट्रातील नवीन रुग्णांची संख्या 44००० एवढी होती. असे असले तरी पहिल्या लाटेपासून दुसरी लाट वेगळी आहे. दुसऱ्या लाटेचा विषाणू (Corona Virus) हा पहिल्या लाटेपेक्षा कमी धोकादायक आहे. त्याचप्रमाणे दुसऱ्या लाटेमुळे करोनाचा मृत्युदर पहिल्या लाटेपेक्षा कमी आहे. महाराष्ट्रातील ३-४ जिल्हे सोडता इतरत्र मृत्युदर कमी आहे.

महाराष्ट्रामध्ये अनेक गोष्टींमुळे दुसरी लाट आलेली आहे. त्यामध्ये वातावरणातील व हवामानातील बदल, महाराष्ट्राचा निरनिराळ्या देशांशी येणारा संपर्क (उदा. मुंबई ही महाराष्ट्राची आर्थिक राजधानी आहे. मुंबई हे शहर आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक देशांशी हवाईमार्गे जोडले गेले आहे.) महाराष्ट्रात अवकाळी पाऊस, थंडीचे वाढलेले प्रमाण यामुळेही दुसरी लाट आलेली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील जनतेची विशेषतः मोठमोठ्या शहरातील लोकांची बेजबाबदार वृत्तीसुद्धा या दुसऱ्या लाटेला कारणीभूत आहे.

टाळेबंदीमुळे (Lock Down) लाट तात्पुरत्या प्रमाणात थांबेल. टाळेबंदीचा (Lock Down) मुख्य उपयोग आरोग्यविषयक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी होतो. २०२१ साली, एका वर्षानंतर, आरोग्य विषयक पायाभूत सुविधांची प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे टाळेबंदीमुळे देशाच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर प्रचंड परिणाम होतो. हे गेल्यावर्षी सर्वांनी अनुभवले आहे. त्यामुळे दुसरी लाट थोपविण्यासाठी टाळेबंदी हा उपाय निश्चितच नाही. दुसरी लाट थोपवण्यासाठी खालील गोष्टींचा अवलंब करणे योग्य आहे.

१) समाजातील ज्या व्यक्तींमध्ये करोनाची लक्षणे दिसत नाहीत, अशा व्यक्तींना शोधून काढणे. २) त्याचप्रमाणे करोनामुळे आपल्या घरात विलगीकरण करुन उपचार घेत आहेत. त्या व्यक्तींची नियमित तपासणी करुन घेणे व चाचण्या करुन घेणे. ३) त्याचप्रमाणे देशामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी तापाबद्दल उपचार देणारी आरोग्य केंद्रे व सुविधा केंद्रे वाढवणे (Fever Clinics) ४) करोना रुग्णांच्या संपर्कात आलेल्या लोकांच्या चाचण्या करणे इत्यादी हे प्रभावी उपाय होऊ शकतात.

दुसरी लाट थोपविण्यासाठी लसीकरण (Vaccination) हा एक प्रभावी उपाय आहे. लसीकरणामुळे करोना विरुद्धची प्रतिकार शक्ती ज्यांच्या शरीरात निर्माण झाली आहे. अशा व्यक्तींची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे लसीकरण हे वेगाने केले पाहिजे. Indian Council Of Medical Research यांच्या संशोधनानुसार भारतात अनेक ठिकाणी २०% व्यक्ती करोना संक्रमित झालेल्या आहेत. यासर्व व्यक्तिंमध्ये करोना विरुद्धची प्रतिकार शक्ती निर्माण झालेली आहे. परंतु ही संख्या आणखी वाढवायची असेल तर, त्यासाठी लसीकरण (Vaccination) हा प्रभावी उपाय आहे.

आपला देश हा १३८ कोटी लोकसंख्या असलेला देश आहे. या रोगाचा अभ्यास केला तर असे आढळून आले आहे की वृद्ध व्यक्तिंमध्ये त्याचप्रमाणे कॅन्सर, मधुमेह, बी.पी., टी.बी. इत्यादी सारखे विकार यामुळे प्रतिकारशक्ती कमी होते. अशा व्यक्तिंमध्ये करोनाचा संसर्ग लवकर होता. त्याचप्रमाणे जे करोना योद्धा आहेत (डॉक्टर, नर्सेस , वॉर्डबॉय इ.) त्यांच्या मध्येही करोनाचे संक्रमण लवकर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लसीकरणाच्या पहिल्या टप्प्यामध्ये वरील सर्व व्यक्तींचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे लसीकरणानंतर प्रतिकारशक्ती किती प्रमाणात वाढते, लसीचे काही दुष्परिणाम होतात काय. लसीकरण कितपत सुरक्षित आहे, याबद्दलही अभ्यास चालू आहे. या सर्वांचा अहवाल पुढील १-२ महिन्यात येईल. त्याचप्रमाणे २ महिन्यात सर्वसामान्य जनतेला उपलब्ध होतील एवढे डोसेस (Doses) भारतामध्ये मोठ्या प्रमाणात तयार होतील, असा अंदाज आहे. त्यामुळे दोन महिन्यानंतर करोनाची लस ही भारतातील सर्वसामान्य जनतेला उपलब्ध होईल, असे वाटते.

कोणतीही लस ही १००% परिणामकारक नाही. लस घेतल्यानंतर करोना होण्याचे प्रमाण कमी असले तरी, त्यानंतर करोना होऊ शकतो. त्याचप्रमाणे लसीकरणामुळे प्रतिकार शक्ती किती प्रमाणात वाढलेली आहे, ती किती दिवस टिकणार आहे. याबद्दलचे संशोधन चालू आहे. याचा अहवाल अद्यापही झालेला नाही. त्यामुळे लस घेतल्यानंतरही सुरक्षित अंतर ठेवणे, मास्क वापरणे, साबणाने हात वारंवार धुणे, वैयक्तिक स्वच्छता राखणे बंधनकारक आहे.

अजून किती दिवस मास्क घालून बाहेर फिरावे लागेल याचे उत्तर देणे अवघड आहे. अनेक गोष्टींवर या प्रश्नाचे उत्तर अवलंबून आहे.

१) लसीकरणाचे प्रमाण,

२) करोना व्हायरसची नवीन आवृत्ती (Variant) कितपत उपद्रवी आहे,

३) लसीकरणामुळे प्रतिकार शक्ती किती प्रमाणात वाढली आहे, ती किती दिवस टिकणार आहे, इत्यादी.

सध्या मास्क वापरणे, सुरक्षित अंतर ठेवणे आणि इतर प्रतिबंधात्मक उपाय करणे हे प्रत्येक व्यक्तीला बंधनकारक आहे.

दुसरी लाट आलेली असताना शाळा-महाविद्यालये चालू करणे योग्य नाही. कारण शाळा-महाविद्यालये चालू केल्यास करोनाचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढणार आहे. शाळा-महाविद्यालयामध्ये शिक्षण ऑनलाईन पद्धतीने देण्याची आवश्यकता आहे. दहावी, बारावी या परीक्षांच्या निकालावर विद्यार्थ्यांचे भविष्य ठरत असल्यामुळे, ते वर्ग सर्व प्रतिबंधक उपायांचा अवलंब करुन चालू ठेवणे संयुक्तिक राहील. या काळामध्ये सर्व शिक्षक-शिक्षकेतरांची करोना विषयक चाचणी करुन घेणे अतिशय आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ज्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅन्सर, बी.पी, मधुमेह, टी.बी. इत्यादी विकार आहेत अशा कर्मचाऱ्यांचे लसीकरण प्राधान्याने करुन घेणे, अतिशय महत्त्वाचे आहे. एका वेळेस शाळा-महाविद्यालयांमध्ये गर्दी होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

लसीकरण -

सध्या देशामध्ये दोन प्रकारच्या लसी (Vaccine) उपलब्ध आहेत.

१) Covishield आणि

२) Covaccine

या दोन्हीही लसी (Vaccine) सुरक्षित आहेत. या दोन्हीही लसींचे दोन डोस घेणे प्रत्येक व्यक्तीला बंधनकारक आहे.

Covishield लसीचा दुसरा डोस हा पहिल्या डोसनंतर सुमारे ६ ते ८ आठवड्यांनी घेण्यात यावा. Covaccine ह्या दोन डोसांमधील अंतर किमान ४ आठवडे असावे. पहिले दोन डोस घेतल्यानंतर ज्या व्यक्तींना Comorbidities आहेत उदा. मधुमेह, बी.पी., कॅन्सर इत्यादी त्यांनी तिसरा डोस ६ महिन्यांच्या अंतराने घेण्यात यावा असे नुकतेच संशोधनाने सिद्ध झाले आहे.

लसीकरणानंतर बारीक ताप येणे, अंगदुखी होणे, सर्दीखोकला होणे इ. गोष्टी होण्याची शक्यता आहे. यासर्व गोष्टींना पूर्णपणे विश्रांती घेणे आणि डॉक्टर ज्या उपाययोजना सुचवतील त्यांचे पालन करणे हा उपाय आहे. ९९% व्यक्तींना करोनाच्या लसीकरणानंतर कोणताही मोठा त्रास होत नाही. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी (वय वर्षे ७२),

महाराष्ट्रातील नेते माननीय खासदार श्री शरद पवार साहेब (वय वर्षे ८०), भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ज्यांची Angio Plasty झालेली आहे इ. अशा सर्वांनी लसीकरण करुन घेतलेले आहे. यासर्व व्यक्तींना लसीकरणानंतर कोणताही त्रास झालेला नाही.

रक्त पातळ होण्यासाठी Aspirin किंवा Clopidogrel ही औषधे वापरली जातात हृदयविकार असलेल्या व्यक्तींना ही औषधे बंधनकारक आहेत . अशा व्यक्तींसाठी लसीकरण पूर्णपणे सुरक्षित आहे. अशा व्यक्तींचे Blood Pressure normal असेल तर लसीकरणानंतर कोणताही त्रास होत नाही.

'मधुमेह' असलेल्या व्यक्तींनी पुढील काळजी घ्यावी.

१) 'मधुमेह' पूर्णपणे नियंत्रित हवा

२) लसीकरण करण्याआधी मधुमेह असलेल्या व्यक्तींनी काहीतरी खाणे आवश्यक आहे.

देशातील एकूण रुग्णांच्या ६२% रुग्ण महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रात अवकाळी पाऊस, बदलते तापमान, लोकांची बेजबाबदार वृत्ती, मुंबई, पुणे इ . शहरांमध्ये येणारे परप्रांतीयांचे लोंढे, मुंबईमधील लोकलमधील प्रचंड गर्दी, महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांची संख्या इ. मुळे आपल्या देशात करोनाच्या बाततीत 'महाराष्ट्र' अग्रेसर आहे.

टाळेबंदी (Lock Down) -

टाळेबंदी (Lock Down) करण्यापेक्षा काही गोष्टींवर कडक निर्बंध आणले तर फायदा होऊ शकतो.

१) सभा संमेलने पूर्णपणे रद्द करावी.

२) लग्न समारंभास परवानगी देताना केवळ २५-३० व्यक्तींची उपस्थितीत हे समारंभ होतील. याविषयी निर्बंध घालणे.

३) शाळा-महाविद्यालये पूर्णपणे बंद ठेवणे.

४) वेगवेगळ्या ठिकाणे नोकरीस असलेल्या कर्मचाऱ्यांना २ पाळ्यांमध्ये नोकरीस बोलवणे.

५) सार्वजनिक स्वच्छतागृहे वारंवार साफ करणे.

६) ज्या व्यक्तींचे विलगीकरण केलेले आहे आणि जे घरीच उपचार घेता आहेत त्यांच्यावर कडक निर्बंध ठेवणे.

७) करोनाबाबत उपचार देणाऱ्या केंद्रांची संख्या वाढविणे.

८) अंत्यविधीच्या वेळेला केवळ १०-१५ व्यक्ती उपस्थित राहतील असे निर्बंध घालणे आवश्यक आहे.

९) शहरांतील सर्व आरोग्यसेवक, शाळा-महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, बॅंकांमधील कर्मचारी यांचे प्राधान्याने लसीकरण करून घेणे.

१०) ज्याठिकाणी गर्दी जमते उदा. भाजी मंडई, सिनेमाहॉल, मॉल्स, व्यायामशाळा इ. ठिकाणी ही गर्दी टाळण्यासाठी कडक निर्बंध घातले जाणे आवश्यक आहे. या उपायांचा शासनाने अवलंब केल्यास करोनाची ही दुसरी लाट लवकरच नियंत्रित होईल, असे वाटते.

एखाद्या व्यक्तीला करोना झाल्यानंतर समजा १०२ दिवसात करोना झाला तर त्यास COVID Reinfection असे म्हणतात. हा करोना परत होण्याची कारणे अनेक आहेत. पण त्यातील महत्त्वाचे कारण म्हणजे लोकांची बेजबाबदार वृत्ती, मास्क न घालणे, दोन व्यक्तींमधील अंतर न ठेवणे, वैयक्तिक स्वच्छतेचे पालन न करणे.

करोनाची दुसरी लाट थांबवण्यासाठी देशातील १८ वर्षांवरील सर्व लोकांचे लसीकरण वेगाने करण्याची आवश्यकता आहे. लसीकरणामध्ये सर्व राज्यांमध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. आपल्या देशामध्ये आजपर्यंत सुमारे साडे सहा कोटी जणांचे लसीकरण झालेले आहे. जेवढ्या वेगाने लसीकरण होईल आणि समाजातील व्यक्ती करोना विषयक नियमांचे पालन करतील तेवढ्या प्रमाणात करोनाची दुसरी लाट थांबण्यास मदत होईल. त्यामुळे करोनाची दुसरी लाट थोपवणे जसे सरकारचे कर्तव्य आहे तसेच ते लोकांच्या हातात देखील आहे.

प्रा.डॉ.गजानन रमाकांत एकबोटे
M.S., M.N.A.M.S
Professor of Surgery,
B.J.Medical College , Pune 411001.
कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी पुणे ५

# आदरणीय प्रा.डॉ.गजानन एकबोटे सर कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे यांचा दैनिक सकाळ मधील लेख

# कोरोना रुग्णांचा मृत्युदर दुसऱ्या लाटेत कमी

प्रा. डॉ. गजानन एकबोटे

भारतातील कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची तुलना मागील वर्षी आलेल्या पहिल्या लाटेबरोबर करावी लागेल. महाराष्ट्रामध्ये सप्टेंबर २०२० मध्ये दररोज सुमारे २५ हजार एवढी नवीन रुग्णाची संख्या होती. ती डिसेंबर २०२० पर्यंत कमी झाली. परंतु, लोकांच्या निष्काळजीपणामुळे २ एप्रिल २०२१ रोजी महाराष्ट्रातील नवीन रुग्णांची संख्या ४४ हजार एवढी होती. असे असले तरी पहिल्या लाटेपासून दुसरी लाट वेगळी आहे. दुसऱ्या लाटेचा विषाणू हा पहिल्या लाटेपेक्षा कमी धोकादायक आहे. त्याचप्रमाणे दुसऱ्या लाटेमुळे कोरोना रुग्णांचा मृत्युदर पहिल्या लाटेपेक्षा कमी आहे.

महाराष्ट्रातील ३-४ जिल्हे सोडता इतरत्र मृत्युदर कमी आहे. वातावरण व हवामानातील बदल, महाराष्ट्राचा निरनिराळ्या देशांशी येणारा संपर्क, त्याचप्रमाणे राज्यातील जनतेची विशेषत: मोठमोठ्या शहरांतील लोकांची बेजबाबदार वृत्ती दुसऱ्या लाटेला कारणीभूत आहे. टाळेबंदीमुळे लाट तात्पुरत्या प्रमाणात थांबेल. दुसरी लाट थोपविण्यासाठी टाळेबंदी हा उपाय निश्चितच नाही. त्यासाठी खालील गोष्टींचा अवलंब करणे योग्य आहे. १) समाजातील ज्या व्यक्तींमध्ये करोनाची लक्षणे दिसत नाहीत, अशा व्यक्तींना शोधून काढणे. २) त्याचप्रमाणे करोनामुळे आपल्या घरात विलगीकरण करून उपचार घेत आहेत, त्या व्यक्तींची नियमित तपासणी करून घेणे व चाचण्या करून घेणे. ३) त्याचप्रमाणे देशामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी तापाबद्दल उपचार देणारी आरोग्य केंद्रे व सुविधा केंद्रे वाढवणे ४) करोना रुग्णांच्या संपर्कात आलेल्या लोकांच्या चाचण्या करणे, हे प्रभावी उपाय होऊ शकतात.

### लसीकरणानंतर विश्रांती घ्या

लसीकरणानंतर बारीक ताप येणे, अंगदुखी होणे, सर्दी खोकला होणे इ. गोष्टी होण्याची शक्यता आहे. या सर्व गोष्टींना पूर्णपणे विश्रांती घेणे आणि डॉक्टर ज्या उपाययोजना सुचवतील त्यांचे पालन करणे हा उपाय आहे. ९९ टक्के व्यक्तींना कोरोनाच्या लसीकरणानंतर कोणताही मोठा त्रास होत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी (वय ७२), ज्येष्ठ नेते आणि खासदार शरद पवार (वय ८०), भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्यासह अँजिओ प्लॅस्टी झालेल्या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनीही लसीकरण करून घेतले आहे. लसीकरणानंतर त्यांना कोणताही त्रास झालेला नाही.



### ज्येष्ठांना लवकर संसर्ग

आपला देश हा १३८ कोटी लोकसंख्या असलेला देश आहे. या रोगाचा अभ्यास केला तर असे आढळून आले आहे की वृद्ध व्यक्तिंमध्ये त्याचप्रमाणे कॅन्सर, मधुमेह, बीपी, टीबी आदी विकारांमुळे प्रतिकारशक्ती कमी होते. अशा व्यक्तिंमध्ये कोरोनाचा संसर्ग लवकर होतो. त्याचप्रमाणे जे कोरोना योद्धा आहेत (डॉक्टर, परिचारिका, वॉर्डबॉय) त्यांच्यामध्येही कोरोनाचे संक्रमण लवकर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लसीकरणाच्या पहिल्या टप्प्यामध्ये वरील सर्व व्यक्तींचा समावेश केला आहे. लस घेतल्यानंतरही सुरक्षित अंतर ठेवणे, मास्क वापरणे, साबणाने हात वारंवार धुणे, वैयक्तिक स्वच्छता राखणे बंधनकारक आहे. दुसऱ्या लाटेत शाळा-महाविद्यालये चालू करणे योग्य नाही. कारण, ती सुरू केल्यास कोरोनाचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढणार आहे. दहावी, बारावी परीक्षांच्या निकालावर विद्यार्थ्यांचे भविष्य ठरत असल्यामुळे, ते वर्ग सर्व प्रतिबंधक उपायांचा अवलंब करून चालू ठेवणे संयुक्तिक राहील.

### असे घ्या डोस

सध्या देशामध्ये दोन प्रकारच्या लसी उपलब्ध आहेत. कोव्हिशिल्ड व कोव्हॅक्सिन या दोन्हीही लसी सुरक्षित आहेत. या दोन्हीही लसींचे दोन डोस घेणे प्रत्येक व्यक्तीला बंधनकारक आहे. कोव्हिशिल्ड लसीचा दुसरा डोस हा पहिल्या डोसनंतर सुमारे ६ ते ८ आठवड्यांनी घेण्यात यावा. कोव्हॅक्सिन या दोन डोसांमधील अंतर किमान ४ आठवडे असावे. पहिले दोन डोस घेतल्यानंतर ज्या व्यक्तींना सहव्याधी आहेत उदा. मधुमेह, बीपी, कॅन्सर इत्यादी त्यांनी तिसरा डोस सहा महिन्यांच्या अंतराने घ्यावा असे नुकतेच संशोधनाने सिद्ध झाले आहे.

### सर्वांचे लसीकरण करणे गरजेचे

कोरोनाची दुसरी लाट थांबवण्यासाठी देशातील १८ वर्षांवरील सर्व लोकांचे लसीकरण वेगाने करण्याची आवश्यकता आहे. लसीकरणामध्ये सर्व राज्यांमध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. आपल्या देशामध्ये आजपर्यंत सुमारे साडेसहा कोटी जणांचे लसीकरण झालेले आहे. जेवढ्या वेगाने लसीकरण होईल आणि समाजातील व्यक्ती कोरोनाविषयक नियमांचे पालन करतील, तेवढ्या प्रमाणात कोरोनाची दुसरी लाट थांबण्यास मदत होईल. त्यामुळे कोरोनाची दुसरी लाट थोपवणे जसे सरकारचे कर्तव्य आहे, तसेच ते लोकांच्या हातात आहे.

Sakaal 5.4.2021




# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी
## गौरव आणि यशोगाथा एका वैभवशाली ज्ञान परंपरेच्या संस्थेची..!



आपल्या भारत वर्षाच्या सर्वांगिण उन्नतीसाठी सुसंस्कृत, सुसंस्कारित, निष्ठावंत, कर्तव्यदक्ष आणि चारित्र्यसंपन्न नागरिक घडविणे, हा राष्ट्रभक्तीचा व राष्ट्रसेवेचा उत्कृष्ट मार्ग आहे. याच पवित्र आणि प्रांजल उद्देशाने पुण्यामध्ये माननीय गुरुवर्य शंकररावजी कानिटकर आणि त्यांच्या सहकारी शिक्षकांनी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५ या सर्वोत्तम शिक्षणसंस्थेची स्थापना दि. १६ मे १९३४ रोजी 'अक्षय्यतृतीयेच्या' मुहूर्तावर केली.

'प्रोग्रेसिव्ह' म्हणजे प्रगतीशील. प्रगतीशील म्हणजे काळाशी सुसंगत असे धोरण अवलंबणे. या प्रगतीशील शिक्षणामध्ये नवनवीन कल्पनांचा समावेश केला जावा या हेतूने संस्थेचे नाव 'प्रोग्रेसिव्ह' हे ठेवले. 'मॉडर्न' या शब्दाचा अर्थ आधुनिक असा आहे. कोणत्याही शिक्षणसंस्थेने 'मॉडर्न' असणे म्हणजे अद्ययावत तंत्रज्ञानाने समृद्ध होऊन, आधुनिक साधन सामग्रीचा उपयोग करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे होय. त्यामुळे संस्थेच्या पहिल्या शाळेचे नाव मॉडर्न हायस्कूल असे ठेवले. 'प्रोग्रेसिव्ह' आणि 'मॉडर्न' हे दोन शब्द आजही संस्थाचालकांच्या दृष्टीने परवलीचे आहेत. या दोन शब्दांमध्येच संस्थेच्या ध्येय धोरणांची संकल्पना स्पष्ट आहे.

'ज्ञानमयो भव !' हे संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. ज्ञानाची कास धरण्याचा संदेश देणारी त्यासाठी सुयोग्य मार्ग दाखविणारी 'प्रोग्रेसिव्ह' संस्था, एकविसाव्या शतकातील बदलत्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता आणि सक्षमता निर्माण करणारे एक समृद्ध व संपन्न 'ज्ञानकेंद्र' आहे.

'विद्यार्थी' हा केंद्रबिंदू मानून या शिक्षणसंस्थेत देण्यात येणाऱ्या शिक्षणाची, ज्ञानाची दिशा सातत्याने विद्यार्थीभिमुख ठेवलेली आहे. अध्ययन-अध्यापनाची ही शिक्षण प्रक्रिया संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानगर्भ तर आहेच, त्याबरोबरच ती **संस्कारगर्भ** असावी यासाठी संस्थाचालक, शिक्षक हे सारेजण सजग आणि प्रयत्नशील असतात.

आधुनिकतेबरोबरच गुरुजनांनी घालून दिलेले आदर्श, संस्कार, मूल्ये व परंपरा गेली ८६ वर्षे संस्थेने कसोशीने जपल्या आहेत. शैक्षणिक गुणवत्तेचा स्तर सदैव सातत्याने उंचावत ठेवला आहे.

या शिक्षणसंस्थेचे सर्व व्यवहार 'स्वच्छ' आणि 'पारदर्शक' आहेत. **कोणत्याही परिस्थितीत शिक्षणाचे बाजारीकरण किंवा व्यापारीकरण होऊ द्यायचे नाही, याकडे संस्थेचा नेहमीच कटाक्ष आहे.** गेली ८६ वर्षे ही महत्त्वपूर्ण तत्त्वे सर्वांनीच कसोशीने पाळली आहेत. ही शिक्षणसंस्था शिक्षकांनी स्थापन केलेली संस्था असून आज २०२१ मध्ये सुद्धा संस्थेचा कारभार शिक्षकांमार्फतच केला जातो. संस्थेच्या नियामक मंडळातही सर्व स्तरातील कर्तबगार व्यक्ती आहेत.

संस्थेचा भार १९६९ पर्यंत शालेय शिक्षणावर अधिक होता. या दरम्यान संस्थेच्या ५ शाळा सुरु झाल्या. १९७० मध्ये मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाची स्थापना झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेच्या दिवसापासून स्वतःच्या मालकीच्या इमारतीत सुरु झालेले हे एकमेव महाविद्यालय!

### प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांच्याकडे कार्याध्यक्षपदाची सूत्रे :

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संस्थेच्या प्रगतीस १९८६ पासून अधिक वेग आला. विशेषतः १ जानेवारी १९९४ पासून पुण्यातील सुप्रसिद्ध नामांकित शल्यचिकित्सक आणि मॉडर्न हायस्कूलचे माजी विद्यार्थी प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांनी संस्थेच्या नियामक मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यभार स्विकारला. प्रा. डॉ. एकबोटे यांना द्रष्टेपणाचे वरदान आहे. त्यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद, वैद्यक विद्याशाखेचे अधिष्ठाता, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे प्रकुलगुरु, व्यवस्थापन परिषदेवर माननीय राज्यपालांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली. पुण्याच्या बी.जे.मेडिकल कॉलेजमध्ये सर्जरी विषयाचे प्राध्यापक, भारतातील विविध विद्यापीठांच्या अधिकार मंडळांवर सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्र शासन आणि भारत सरकारच्या नियोजन मंडळाच्या अनेक समित्यांवर सन्माननीय सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. असे चतुरस्त्र व्यक्तिमत्व कार्याध्यक्षपदी असल्याने आणि नियामक मंडळाने त्यांना मोलाची साथ दिल्याने संस्थेचा विकास १९९४ पासून वेगाने झाला. संस्थेच्या प्रगतीत गुरुवर्य विष्णु त्रं. ताटके, गुरुवर्य मो.गो.चापेकर, डॉ. माधव नामजोशी, रवी निराड, बाळासाहेब झगवणे, ॲड. बाबासाहेब चव्हाण, श्री. सुरेश तोडकर, ॲड. दादासाहेब बेंद्रे, ॲड. माणिकराव पाटील, श्री. अरविंद पांडे, प्रा. श्री. प. स. चिरपुटकर, प्रा. सीताराम रायकर, श्री. शरद इनामदार, प्रा. शामकांत देशमुख, प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, श्री. मच्छिंद्र कांबळे, श्री. दिपक मराठे, प्रा. डॉ. प्रकाश दिक्षीत, माजी नगरसेवक श्री. मिलिंदभाऊ एकबोटे, माजी आमदार श्री. कृष्णाराव भेगडे, श्रीयुत. काकासाहेब देखणे, प्रा. अशोक मराठे, सौ. मोनिका वैद्य, श्री. दत्तात्रय पाटोळे, श्री. राजन देवकाते व संस्थेचे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी इत्यादींचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे.

दूरदृष्टी, कार्यकुशलता, अचूक निर्णयक्षमता ह्या अनेकविध गुणवैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेले, सर्वांगीण विकासाची सातत्याने स्वप्ने बघणारे आणि ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी कष्टांची तमा ना बाळगणारे, सर्वांना बरोबर घेऊन प्रगतीची शिखरे पादाक्रांत करणारे, ऊर्जास्रोत बनलेले बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे कार्याध्यक्ष डॉ. एकबोटे यांच्या मार्गदर्शनामुळे ज्ञान-विज्ञान क्षेत्रातील कर्तृत्व क्षितिजावर संस्थेच्या यशस्वितेचे इंद्रधनुष्य उमटले आहे, ही अभिमानाची, आदराची व आनंदाची बाब आहे.

### पुण्यात संस्थेच्या ६०पेक्षा अधिक शाखा :

आज संस्थेच्या ६० शाखा पुणे शहर आणि जिल्हा परिसरात कार्यरत आहेत. शिशु विद्या मंदिर ते पदवी-पदव्युत्तर म्हणजे कला, वाणिज्य, विज्ञान, संगणक, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र महाविद्यालय (केवळ महिलांसाठी), व्यवस्थापन, आरोग्यविज्ञान इत्यादी सर्व विद्याशाखांच्या महाविद्यालयांत सुमारे ६०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्था आता वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणार आहे. मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाला नुकतीच 'स्वायत्तता' मिळाली आहे. स्वायत्ततेतून 'स्वयंशासन' साधित संस्था आपल्या शैक्षणिक तत्त्वप्रणालीनुसार नाविन्यपूर्ण उपक्रम, अभ्यासक्रमाची रचना, अध्यापन, परीक्षा-पद्धती, मूल्यमापन याकडे विशेष लक्ष पुरवीत आहे. महाविद्यालयात चालविल्या जाणाऱ्या B.Sc. (Blended) या अभ्यासक्रमासाठी ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठाशी सुमारे ४ वर्षांपूर्वीच करार झाला आहे. अशाच अनेक परदेशी विद्यापीठांशी शैक्षणिक करार करण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. प्रतिवर्षी अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी-पदव्युत्तर परीक्षेच्या गुणवत्ता यादीत असतात. जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध क्रीडा प्रकारात संस्थेचे प्रतिनिधित्व करतात. अनेक सांस्कृतिक कलादर्शन स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवित आहेत.

संस्थेच्या अनेक माजी गुणवंत विद्यार्थ्यांना राजकीय, उद्योग, अर्थ, वैद्यकीय, क्रीडा, न्याय व विधी आदी क्षेत्रांत गौरवास्पद कामगिरी केली आहे. त्यामध्ये कै. बॅ. विठ्ठलराव गाडगीळ, माधुरी मिसाळ, कै. सुभाष कुल, जालिंधर कामठे (राजकीय), विजय केळकर (अर्थतज्ज्ञ), कै. अरविंद इनामदार, कै. एस.पी.पलांडे, श्रीमती शांता राव-शास्त्री, जयंत उमराणीकर, सुनील दाके, सुभाष देवरे, अविनाश धर्माधिकारी, सदानंद दाते, विनोद लोखंडे (आय.पी.एस.), अरुण फिरोदिया, बाबा शिंदे, सतीश पाषाणकर, कै. अविनाश वर्देकर (उद्योग), डॉ. गजानन एकबोटे, डॉ. जगदीश हिरेमठ, डॉ. शिरीष प्रयाग, डॉ. अशोक कानिटकर, डॉ. संजय कुलकर्णी, डॉ. सतीश कर्णिक, कै. डॉ. अजित गोळविलकर, डॉ. चारुदत्त आपटे (वैद्यकीय), सौदामिनी देशमुख (पहिल्या महिला वैमानिक), श्रीरंग इनामदार, अलका दिघे, निशा कुलकर्णी, साधना सहलेकर, अनिता पवार, उज्ज्वला निकम, दिपाली साळे, सुनीता देशपांडे, अतुल वाकणकर (क्रीडा), परेश मोकाशी, विभावरी आपटे-जोशी, त्यागराज खाडीलकर, सचिन जमिकर, गगनविहारी बोराटे, मृणालिनी कवळे, स्वरूपा खोपकर (कला) श्रीयुत संजय काटकर (आयटी) आदींचा समावेश आहे.

### 'प्रोग्रेसिव्ह' या ज्ञानकेंद्राची वैशिष्ट्ये :

काशी, तक्षशीला, अयोध्या, नालंदा इत्यादी अनेकविध वैशिष्ट्यपूर्ण प्राचीन विद्यापीठांच्या ज्ञानसंपन्न वारसाची अभिमानास्पद आठवण आपणां सर्व भारतीयांच्या मनात आहे. भारतीय शिक्षणपद्धतीच्या वैभवशाली संस्कृतीची वाटचाल डोळ्यांपुढे ठेवून संस्थाचालकांनी नव्या-जुन्या, प्राचीन व आधुनिक तत्त्वांची, जीवनमूल्यांची सांगड घालत संस्थेच्या प्रगतीचा आलेख उंचावत नेला आहे. एकविसाव्या शतकाची आव्हाने पेलताना चारित्र्यवान नागरिक घडविणे ह्याकडे संस्थेचे लक्ष आहे. त्यासाठी विविध उपक्रम व योजनांची कार्यवाही होते.

### संस्थेच्या सर्व प्रशाला व महाविद्यालयांमधून 'वाचनसंस्कृती' चे जाणीवपूर्वक संवर्धन :

आज २१ व्या शतकातील २१ व्या वर्षाला सामोरे जाताना दूरदर्शन, खाजगी वाहिन्या, समाजमाध्यमे, इत्यादींचा वाढत्या आक्रमणांना तोंड द्यावे लागते, हे वास्तव आहे. अशा वातावरणात सुयोग्य ज्ञानसंपादन व त्यायोगे संपूर्ण जीवन संस्कारित करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी संस्था जागरूक आहे. संस्थेच्या विविध प्रशाला व महाविद्यालयांची ग्रंथालये निरनिराळ्या विषयांची पुस्तके, शब्दकोश, संस्कृतीकोश, विज्ञान कोश, संदर्भ ग्रंथ इत्यादींनी समृद्ध व संपन्न आहेत. अभ्यास व संशोधनासाठी हजारो पुस्तके विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी उपलब्ध आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'वाचन हा माझा श्वासोच्छवास आहे' असे म्हटले आहे. या दिग्गज ज्ञानवंताने अधोरेखित केलेला वाचनाचा हा संस्कार दृढ व्हावा, म्हणून संस्थेतील विविध शाखांमध्ये दरवर्षी १४ एप्रिल रोजी '१४ तास अध्ययन अभियान' आयोजित करण्यात येते. विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापक सर्वजण मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडला जातो. ज्ञानसाधनेचे मौलिक संस्कार विद्यार्थ्यांचे व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्व अधिक सुजाण व संपन्न करतात यावर संस्थाचालकांचा आणि सर्व शिक्षकांचा मनोमन विश्वास आहे.

संस्थेच्या सर्व शाळा व महाविद्यालयांतून वार्षिक स्नेहसंमेलने आयोजित केली जातात. शिस्त आणि सहकार्य या दोहोंची सांगड घालून वैविध्यपूर्ण, कार्यक्रम सानंद साजरे केले जातात. या निमित्ताने गायन, वादन, नृत्य, वक्तृत्व, नाट्य इत्यादी. निरनिराळ्या स्पर्धांमधून जेव्हा विद्यार्थी भाग घेतात तेव्हा त्यांच्या ठायी उत्साह, प्रेरणा, सामंजस्य, सहिष्णुता, इत्यादी गुणांचा विकास होतो. कलाविष्काराच्या संधींमधून संमेलनात झालेल्या गुणगौरवातून त्यांच्या व्यक्तित्वाला सामाजिक मान्यता मिळते, त्यातून त्यांचा आत्मविश्वास वाढतो. आत्मविश्वासातून उत्कृष्टतेकडे त्यांची वाटचाल सुरु होते. विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाच्या घडणीत ज्या नेतृत्वगुणांची विशेष आवश्यकता असते, त्याचे पहिले पाठ यांचा संमेलनांमधून त्यांना मिळत असतात. लोकशाही जीवनपद्धतीचे संस्कार या संमेलनांतूनच विद्यार्थ्यांवर होत असतात. स्वयंशासनाचा श्रीगणेशा ते यातूनच गिरवितात. विद्यार्थ्यांचे भावजीवन संपन्न व्हावे यासाठी संमेलनांमधून हसत खेळत मनोविकास साधण्याचा प्रयत्न संस्थेकडून जाणीवपूर्वक करण्यात येतो.

### पर्यावरण विषयक जाणीव-जागृती :

शालेय पातळीवर, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरांवर समाविष्ट करण्यात आलेला पर्यावरण हा स्वतंत्र विषय संस्थेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा मानलेला आहे. हवा-भूमी-पाणी यांचे प्रदूषण, जैव विविधतेचा ऱ्हास, नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरिक्त वापर इत्यादींमुळे आज सर्वांपुढे नवी आव्हाने उभी आहेत. तंत्रज्ञानातील प्रगती, औद्योगिकरण व शहरीकरण यात सातत्याने होणारी वाढ आणि मानवाचे कालमानानुसार बदलत जाणारे जीवन यांचा एकत्रित परिणाम होऊन पर्यावरणाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. मनुष्य आणि पर्यावरण यांतील आंतरक्रियांमुळे निर्माण झालेल्या या समस्यांचे विद्यार्थ्यांना आकलन व्हावे त्या समस्यांचे निराकरण करण्यात त्यांचा सहभाग वाढावा व पर्यावरण संरक्षणाची वृत्ती विकसित व्हावी ही उद्दिष्टये साधण्यासाठी संस्थेकडून लक्ष दिले जाते. राष्ट्रीय सेवा योजने मार्फत वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, ग्रामस्वच्छता, श्रमप्रतिष्ठा इत्यादी उपक्रम विद्यार्थ्यांच्या सहभागाने यशस्वी केले जातात.

### स्वच्छ-सुंदर शाळा स्पर्धा :

प्रशालांमधील सर्व विद्यार्थ्यांवर स्वच्छतेचा संस्कार व्हावा या दृष्टिकोनातून संस्थेमार्फत दरवर्षी स्वच्छ सुंदर शाळा स्पर्धेचे आयोजन केले जाते. विविध शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर मंडळी मनापासून या स्पर्धेत सहभागी होतात. स्वच्छता, शिस्त, नियंत्रण या बाबी स्वाभाविकपणे अंमलात आणल्या जातात.

### नैतिक मूल्यांचे संस्कार :

शालेय जीवनात नैतिक मूल्यांचे संस्कार घडवून विद्यार्थ्यांना तयार करणे, ह्यासाठी संस्था नेहमीच प्रयत्नशील असते. सातत्याने होणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक बदलांना अनुलक्षून विद्यार्थ्यांना सुयोग्य वळण लावून सुसंस्कृत बनविण्याचे कार्य संस्था करीत आहे. बौद्धिक विकासाबरोबर विद्यार्थ्यांच्या भावनिक व मानसिक विकासावरही अधिक भर दिला आहे. नीतिमूल्ये शिक्षण हा एकूण शिक्षणाचा गाभाच मानला आहे. नामवंतांच्या, विद्वतजनांच्या जयंती दिन, स्मृतीदिन, दिनविशेष या निमित्ताने विचारवंतांची चरित्रे व कार्य विद्यार्थ्यांना समजावीत यासाठी निरनिराळे कार्यक्रम आयोजित केले जातात. स्वाभिमान, सतनिष्ठा, सचोटी, सहकार्य, सहनशीलता, समाजनिष्ठा, स्वकर्तव्य दक्षता, सामाजिक बांधिलकी, सामाजिक सामिलकी, समूहभावना, स्वावलंबन, स्वार्थत्याग इत्यादी विविध मूल्यांची मानवी जीवनातील आवश्यकता व महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविले जाते.

भारतीय संस्कृतीने नेहमीच कर्माने, सत्याचे महत्त्व सांगितले आहे. महाभारत, रामायण, गीता या सारख्या महाकाव्यांचे संस्कार भारतीयांवर झाले आहेत. अशा संस्कारांची बीजे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीत रुजली आहेत. या संस्थेत नेहमीच विचारांची पूजा केली जाते. पुस्तकी शिक्षणातून हुशार विद्यार्थी तयार होतो. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून शहाणा विद्यार्थी तयार होतो, तर रचनात्मक उपक्रमांतून चांगला माणूस तयार होतो. असेच शिक्षण संस्थेत दिले जाते. 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसी' - माता आणि मातृभूमी स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ आहेत. नवीन येणाऱ्या पिढ्यांना मातृभूमीविषयी प्रेम आणि अभिमान वाटेल असे संस्कार करणारे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. प्रभु श्री. रामचंद्रांनी आपल्या आयुष्यातून अंगिकारलेली जीवनतत्त्वे व मूल्ये सर्व भारतीयांना वंदनीय आहेत. या सत्त्वयुक्ततेने विद्यार्थ्यांचे जीवन यशोमय व मंगलमय व्हावे ही संस्थाचालकांची सात्विक मनीषा आहे. ह्या दृष्टिकोनातून राष्ट्रवैभवात भर घालणाऱ्या कलावंत, शिक्षणतज्ञ, वैज्ञानिक किंवा प्रशासकीय अधिकारी यांना निरनिराळे उपक्रम, परिषदा, संमेलने यासाठी प्रमुख पाहुणे या नात्याने खास पाचारण केले जाते. त्यांनी साधलेल्या संवादातून विद्यार्थ्यांना यशस्वीतेची गुरुकिल्ली प्राप्त होते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वाच्या समृद्धीचा आणि सर्वांगिण विकासाचा विचार संस्थाचालकांच्या मनात प्रत्येक क्षणाला जागता असतो.

### 'मॉडर्न' अभिमत विद्यापीठाचे स्वप्न :

संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांच्या मार्गदर्शनाने भावीकाळात 'मॉडर्न विद्यापीठ' स्थापन व्हावे असे स्वप्न संस्थेने उराशी बाळगले आहे. संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राध्यापक वर्ग, कार्यालयीन कर्मचारी आणि विद्यार्थी गण सारेजण यासाठी प्रयत्नशील व कृतीशील आहेत. 'प्रोग्रेसिव्ह' प्रगतीशील आहेच. त्याचप्रमाणे भविष्यकाळात वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय हे सुरु करण्याचा संस्थेचा विचार आहे.

### 'राजा कालस्य कारणम'

संस्थेला प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांच्या रुपाने चांगले नेतृत्व लाभले आहे. संतविचारांचा संस्कार घेऊन ही ज्ञानगंगा सर्व सामान्यांपर्यंत पोहचविण्याची धडपड करणारे निःस्वार्थ, अभ्यासू नेतृत्व संस्थेला लाभले. सर्वांना बरोबर घेऊन संस्थेचा हा जगन्नाथाचा रथ आज विकासाच्या मार्गाने मार्गस्थ आहे. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून सर्व उपक्रम संस्थेत घडत असतात. विज्ञानाच्या आकाशात भरारी मारत असताना संस्कृतीच्या उंबरठ्याची निष्ठा सोडू नका असे शिकविणारी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी ही संस्था! जेथे ऋजुता आहे, एकमेकांच्या वाटेत फुले पसरली जातात, सहकार्य केले जाते, त्या संस्थेच्या परिश्रमाच्या वेलीला यश, किर्ती यांची फळे लागतात.

**॥ म्हणौनी मने काया वाचा**
**जो सेवकु होईल इयेचा तो स्वानंद साम्राज्याचा चक्रवर्ती करी ॥**

माऊलींच्या या सिद्धांताप्रमाणे चक्षु पाहणारे अनेक कार्यकर्ते एकत्र आले आणि संस्थेच्या वेलीचा आज वटवृक्ष झाला. ही ज्ञानगंगेची कावड खांद्यावर घेऊन ही ज्ञानाची तीर्थयात्रा आज अविरत ८७ वर्षे चालू आहे आणि भविष्यातही चालत राहणार ...

### * शुभेच्छुक *

१) मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे ४११००५.
२) मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे ४११०१६.
३) मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ४११००५.
४) मॉडर्न कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, शिवाजीनगर, पुणे ४११००५.
५) पी. ई. एस. बी.एड. कॉलेज, शिवाजीनगर, पुणे ४११००५.
६) मॉडर्न इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, शिवाजीनगर, पुणे ४११००५.
७) मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय (बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन कॅम्पस), शिवाजीनगर, पुणे ४११००५.
८) मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, निगडी, पुणे ४११०४४.
९) मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी (महिलांसाठी), बोऱ्हाडेवाडी, मोशी.
१०) मॉडर्न विधी महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे ४११०१६.
११) मॉडर्न इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस स्टडीज, निगडी, पुणे ४११०४४
१२) मॉडर्न कॉलेज ऑफ कॉमर्स ॲंड कम्प्युटर स्टडीज, निगडी, पुणे ४११०४४
१३) मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वारजे, पुणे ४११०५८.
१४) मॉडर्न कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर बायोटेक्नॉलॉजी, कुळे-वडगांवे, ता. मुळशी, पुणे.



संस्थापक :
गुरुवर्य शंकरराव कानिटकर



प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे
(MBBS, MNAMS)
कार्याध्यक्ष : प्रो. ए. सोसायटी



ADVT

Sakaal 11.4.2021

# *Article by Honourable Prof.Dr.Gajanan R. Ekbote Sir on Bharat Ratna Dr. Bhimrao Ambedkar*



प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे

## थोर राष्ट्रभक्त आणि समाजोद्धारक

दलित-शोषितांचा उद्धार करणे हे तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवितकार्यच होते. ते दलितांच्या उद्धारात अखिल हिंदुस्थानी समाजाचा उद्धार पाहत होते आणि आपल्या देशाचाही उद्धार पाहत होते. म्हणून तर त्यांच्या मनात दलितांच्या उद्धाराबरोबरच आपल्या देशाच्या उद्धाराचे विचार येत होते. ते त्यांचे आद्य कर्तव्य होते. त्यांना पुढील परिस्थिती तीव्रतेने जाणवली होती.

▮ हिंदू समाज उच्च-नीचता आणि विषमता या दोन आधारांवर अनेक जातींमध्ये विभागलेला आहे. सर्वांत वरची जात सर्वाधिक मानाची. त्यानंतर एक-एक खालची जात कमी-कमी मानाची. ज्ञान आणि तत्संबंधी साधने सर्वांत वरच्या जातीच्या अधिकारात आहेत. ज्ञान, सत्ता व संपत्ती यांवर सर्वांत वरच्या जातीचा आणि आणखी काही वरच्या जातींच्या संगनमताचा एकाधिकार आहे. अशा वरच्या जातींच्या औदार्यावर खालच्या जातींचे जीवन अवलंबून आहे, पराधीन आहे.

▮ उच्च-नीचता विषमता आणि खालच्या जातींची पराधीनता ही हिंदू समाजाची भयानक वास्तविकता आहे. हिंदू समाजाची दुसरी भयानक वास्तविकता ही आहे, की हिंदू समाज सवर्ण आणि दलित अशा दोन वर्गांत विभागलेला आहे.

▮ स्पृश्य वर्गात येणाऱ्या वरच्या जातींना आपापसात स्पर्श चालतो, पण त्यांना दलित वर्गात येणाऱ्या खालच्या जातींचा स्पर्श चालत नाही. म्हणून सवर्ण वर्ग दलित वर्गाबरोबर 'अस्पृश्यता' पाळतो; त्याला ज्ञान, सत्ता व संपत्ती यांच्या अधिकारापासून वंचित ठेवतो आणि त्याच्यावर अन्याय-अत्याचार करून त्याच्याकडून वाट्टेल ती कामे कमी मोबदल्यात किंवा विना मोबदल्यात करून घेतो. त्याला आपल्या पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी पाणी भरू देत नाही आणि त्याला मंदिरातही येऊ देत नाही.

या सर्व दाहक वास्तवामुळेच दलितांना मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून आणि पिण्याच्या पाण्याच्या सार्वजनिक ठिकाणी पाणी भरता यावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या जीवितकार्याचा आरंभ सत्याग्रहापासून केला. त्या वेळी त्यांना जाणीव होती, की हिंदुस्थानवर ब्रिटिशांचे राज्य आहे आणि पारतंत्र्यातील हिंदुस्थानला स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य आंदोलनाने जोर पकडला आहे. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सवर्णांनी लादलेल्या जातीभेदापासून, विषमतेपासून, दारिद्र्यापासून आणि अत्याचारापासून दलित वर्गाला मुक्त करावयाचे होते आणि त्यासाठी त्यांनी हिंदू समाजातील अस्पृश्यता, जातीभेद आणि विषमता या तीन शत्रूंच्या विरुद्ध मुक्तीचा संघर्ष सुरू केला होता. त्यांना हिंदू समाजाला या तीन शत्रूंपासून मुक्त करून स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तीन जीवनमूल्यांवर आधारित समाजाचे पुनर्संघटन करावयाचे होते.

डॉ. आंबेडकरांची क्रांतिकारी, दूरदर्शी आणि विशाल दृष्टी एका अर्थाने जातीअंतावर केंद्रित झाली होती.



पहिल्या गोलमेज परिषदेत आणि दुसऱ्या गोलमेज परिषदेत डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या सामाजिक व राजकीय हितासाठी युक्तिवाद करून ब्रिटिश सरकारकडून अस्पृश्यांना निवडणूक लढविण्यासाठी स्वतंत्र मतदारसंघाची सुविधा मिळविली. त्या सोयीमुळे अस्पृश्य उमेदवार अस्पृश्य मतदारांच्याच मतांवर निवडून येऊ शकत होता. त्यासाठी त्याला स्पृश्यांच्या मतांवर अवलंबून राहण्याची आवश्यकता नव्हती. परंतु ही सोय रद्द करण्यात यावी आणि अस्पृश्य उमेदवारालाही स्पृश्यांच्या मतांवर अवलंबून राहून संयुक्त मतदारसंघाच्या सोयीतून निवडणूक लढविण्याचे मान्य करण्यात यावे, म्हणून म. गांधींनी आमरण उपोषण सुरू केले. उपोषणामुळे म. गांधींची प्रकृती खालावत चालली होती. त्या वेळी डॉ. आंबेडकरांनी देशहिताला प्राधान्य दिले. त्यांचा देशहिताचा म्हणजेच राष्ट्रहिताचा विचार नेहमीच प्रखर होता. त्यांच्या अस्पृश्योद्धाराच्या जीवितकार्याची अंतिम परिणती देशहितात म्हणजेच राष्ट्रहितात होत होती. म्हणूनच ते नेहमी आपल्या भाषणातून आपला देशहिताचा प्रखर विचार मोठ्या आवेशाने, गांभीर्याने आणि सडेतोडपणे व्यक्त करीत.

१७ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. आंबेडकरांनी घटना समितीच्या बैठकीत पं. नेहरूंच्या ठरावावर देशभक्तीने परिपूर्ण भाषण करताना सर्वांच्या हितासाठी अखंड हिंदुस्थानचे जोरदार समर्थन केले आणि हिंदुस्थानची फाळणी करून पाकिस्तानची निर्मिती करू पाहणाऱ्या मुस्लिमांना उद्देशून ते म्हणाले, की एखाद्या दिवशी तेही विचार करतील, की संयुक्त हिंदुस्थानच म्हणजे अखंड हिंदुस्थानच त्यांच्यासाठीही अधिक चांगला आहे. "... they too will begin to think that a united India is better for them."

२५ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीच्या बैठकीत राज्यघटनेशी संबंधित अखेरचे भाषण करताना घटनाकार डॉ. आंबेडकर यांनी त्यांच्या मनात येणारा पहिला महत्त्वाचा विचार भाषणाच्या सुरुवातीलाच सांगितला - '२६ जानेवारी १९५० रोजी हिंदुस्थान खऱ्या अर्थाने स्वतंत्र देश होईल, पण स्वातंत्र्याचे काय होईल? तो आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवील की तो पुन्हा आपले स्वातंत्र्य गमावून बसेल? माझ्या मनात येणारा हा पहिला विचार आहे.' स्वतंत्र हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची काळजी करणारे आणि स्वतंत्र हिंदुस्थानचा राज्य कारभार लोकहितार्थ सुव्यवस्थित चालण्यासाठी घटनाकार म्हणून स्वतंत्र हिंदुस्थानच्या राज्यघटनेची निर्मिती करणारे डॉ. आंबेडकर एक थोर देशभक्त म्हणून स्वतंत्र हिंदुस्थानच्या हिताविषयी अत्यंत जागरुकतेने आणि दूरदर्शीपणाने काळजी व विचार करीत होते.

*(लेखक प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणेचे कार्याध्यक्ष आहेत.)*

Saamana 14.4.2021

# *Work of Appreciation: Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam*

## लसीकरण

शिवाजीनगर गावठाण भागात लसीकरण केंद्र लाल बहादूर शास्त्री विद्यालय(१४ नं) शाळा येथे आज पासून सुरू झाले. या लसीकरण केंद्रास स्थानिक ***नगरसेविका प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे*** यांनी भेट देवून तेथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, नागरिक यांच्याशी संवाद साधला.तरी सर्व ज्येष्ठ नागरीक आणि आपल्या परिवारातील वय वर्षे ४५ वरील सदस्यांनी लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे.

नोंदणी करीता आवश्यक कागदपत्रे

आधारकार्ड /पॅनकार्ड /निवडणूक मतदान ओळख पत्र

Dt.26.4.2021









# *Work of Appreciation: Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam*

लोकमत




कोविड केअर सेंटरच्या उद्घाटनाला उपस्थित महापौर मुरलीधर मोहोळ यांच्यासह जितोचे पदाधिकारी.

## 'जितो' कोविड सेंटर रेव्हेन्यू कॉलनीत सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** जैन इंटरनॅशनल ऑर्गनायजेशन (जितो)च्या पदाधिकाऱ्यांनी रेव्हेन्यू कॉलनीतील रहिवाशांच्या शंकांचे समाधान केल्यानंतर 'जितो कोविड सेंटर' रविवारी दुपारी कार्यान्वित झाले. महापौर मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते लोकार्पण झाले.

जितो या सेवाभावी संस्थेच्या वतीने गतवर्षी कोरोना रुग्णांच्या शुश्रुषेसाठी कोविड केअर सेंटर ठिकठिकाणी सुरू करण्यात आले होते.

काही दिवसांपासून कोरोनाने पुन्हा उचल खाल्ल्यानंतर आता पुन्हा 'जितो'ने सेंटर सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कॉलनीतील स्पॅन एक्झेक्युटीव या हॉटेलमध्ये रविवारपासुन सेंटर सुरू करण्याची तयारी सुरू होती. मात्र, शनिवारी दुपारी अचानक काही रहिवाशांकडून विरोध सुरू झाल्याने याबाबत अनिश्चितता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर, रविवारी सकाळी जितोचे पदाधिकारी ओमप्रकाश रांका, विजय भंडारी, लखीचंद खिवंसरा, कांतीलाल ओसवाल, मनोज छाजेड, आदेश खिवंसरा, पंकज कर्नावट आदींनी नगरसेविका ज्योत्स्नाताई एकबोटे, डॉ. सुकुमार सरदेशमुख यांच्याबरोबर सविस्तर चर्चा करीत त्यांच्या प्रत्येक शंकेचे समाधान केले. त्यानंतर कॉलनीतील रहिवाशांची स्वतंत्र बैठक झाली आणि काही मिनिटांतच विरोध मावळत बहुसंख्य सदस्यांनी सक्रिय मदत करण्याचा निर्णय एकमताने जाहीर केला. सायंकाळी साडेचार वाजता महापौर मोहोळ, ज्योत्स्नाताई एकबोटे, ॲड. एस. के. जैन, ॲड. अभय छाजेड आणि जितो पदाधिकारी यांच्या उपस्थितीत सेंटरचे उद्घाटन पार पडले.

मोहोळ म्हणाले, कोरोना महामारीच्या काळात जैन समाजाने केलाल्या कार्याची इतिहासात दखल घेतली जाईल. महापालिका आवश्यक ती सर्व मदत करेल. तर ॲड. जैन म्हणाले, रहिवाशांचे असे सहकार्य मिळत गेल्यास कोरोनाला अटकाव करण्यास मोठी मदत होईल. ज्योत्स्ना एकबोटे, यांनी आवश्यक सहकार्याचे आश्वासन दिले तर अभय छाजेड यांनी ऑक्सिजन कमतरतेबाबत एकजुटीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

राजेश सांकला, ओमप्रकाश रांका, अचल जैन आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला, डॉ. गजानन एकबोटे, विजयकांत कोठारी, डॉ. संचेती दांपत्य, विक्रम गौड, सुहास बोरा, इंदर जैन, राजेंद्र बांठीया, इंदर छाजेड, हॉटेलचे मालक नाईक आदी उपस्थित होते.

### अजित पवार, चंद्रकांत पाटील यांचे सहकार्य

▪ लखीचंद खिवंसरा म्हणाले, यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचे सहकार्य मिळाले. जिल्हाधिकारी राजेश देशमुख, आयुक्त विक्रम कुमार यांनी तातडीने परवानग्या दिल्यामुळेच आम्ही अल्पावधीत सेंटरचे लोकार्पण करू शकलो.

Hello Pune
Page No. 3 Apr 05, 2021
Powered by: erelego.com

पुढारी



कोविड सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

## जितो कोविड सेंटर पुन्हा सेवेत

### प्लाझ्मा दानासाठी पुढे या : छाजेड

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना संसर्गाचा फैलाव शहरात झपाट्याने होतो आहे. रुग्णांची विक्रमी वाढ होते आहे. आरोग्य यंत्रणेवरदेखील मोठा ताण येतो आहे. त्यामुळे सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून जितो पुणे या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून डेक्कन परिसरातली रेव्हेन्यू कॉलनीतील हॉटेल स्पॅन एक्झिक्युटिव्ह येथे कोविड सेंटर सुरू केले आहे. ७५ बेडची सोय या ठिकाणी करण्यात आली आहे. तसेच ए.सी.टी.व्ही., तज्ज्ञ डॉक्टरांची टीम, रुग्णवाहिका, ऑक्सिजन अशा सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

महापौर मुरलीधर मोहळ, काँग्रेसचे सचिव अभय छाजेड, नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे, डॉ. अशोक संचेती, डॉ. तातेड, सरदेसाई आदी मान्यवरांच्या उपस्थितीत कोविड सेंटरचे उद्घाटन करण्यात आले आहे. कोरोना संसर्ग वाढू लागल्यामुळे अनेक नागरिकांनी जितो कोविड सेंटर पुन्हा सुरू व्हावे ही भावना व्यक्त केली होती. जितोचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विजय भंडारी, रेस्ट ऑफ महाराष्ट्र अध्यक्ष कांतिलाल ओसवाल, शहर प्रमुख ओमप्रकाश रांका, मनोज छाजेड यांनी बैठक घेऊन तत्काळ कोविड सेंटर सुरू करण्याचा निर्णय घेतला.

ओमप्रकाश रांका म्हणाले की, कोरोना ही महामारी आहे. प्रत्येकाने स्वत:ची काळजी घ्यावी. या सेंटरचा जास्तीत जास्त रुग्णांना फायदा होईल. येथे येणाऱ्या प्रत्येकाला चांगली सुविधा देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. सिद्धी ग्रुपचे प्रमुख व कोविड सेंटरमध्ये महत्त्वाची भूमिक निभावणारे मनोज छाजेड यांनी सांगितले की, शहरात रक्ताचा, प्लाझ्माचा तुटवडा आहे. अनेक रुग्णांना प्लाझ्मा मिळत नाही. ज्यांची तब्येत चांगली आहे व जे कोरोनातून मुक्त झाले आहेत त्यांनी प्लाझ्मा दान करावा.

महापौर मोहोळ यांनी जितोच्या कार्याचे कौतुक करत समाजसेवी संस्थांनी जितोप्रमाणे वेळेला मदतीचा हात पुढे करावा, असे आवाहन केले.

Pune Edition
Apr 6, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *Work of Appreciation: Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam*

## 'जीतो कोविड केअर सेंटर'चे उद्घाटन

**पुणे :** कोरोनाचा सामना करण्यासाठी 'जीतो पुणे'तर्फे शिवाजीनगरमधील रेव्हेन्यू कॉलनीमध्ये सुरू करण्यात आलेल्या कोविड केअर सेंटरचे उद्घाटन महापौर मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते रविवारी झाले. या सेंटरची ७५ बेडची क्षमता असून, त्यात २० ऑक्सिजन बेडचा समावेश आहे. हे सेंटर सर्वांसाठी खुले आहे. उद्घाटनप्रसंगी जीतो ॲपेक्सचे उपाध्यक्ष विजय भंडारी, 'जीतो पुणे'चे अध्यक्ष ओमप्रकाश रांका, डॉ. अशोक संचेती, ॲड. एस. के. जैन, विजयकांत कोठारी, काँग्रेसचे नेते ॲड. अभय छाजेड, नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे, डॉ. गजानन एकबोटे, मुख्य सचिव पंकज कर्नावट, राजेश सांकला, कांतिलाल ओसवाल, इंदर जैन, इंद्रकुमार छाजेड, जीतो पुणे लेडीज विंगच्या मुख्य सचिव लकीशा आदी उपस्थित होते. पालकमंत्री अजित पवार यांनीही या सेंटरला मोलाचे सहकार्य केल्याचे जितोतर्फे सांगण्यात आले. डॉ. अशोक संचेती यांच्या मार्गदर्शनाखाली हे कोविड सेंटर सुरू झाले आहे, असे आदेश खिंवसरा यांनी सांगितले.

Sakaal 7.4.2021

## दिव्यांग आणि गरजूंना फूड पॅकेट्सचे वाटप

**पुणे :** अन्नसुरक्षा विमा योजनेच्या फूड बँकेच्या माध्यमातून कोरोना साथीच्या काळात दिव्यांग, गरीब व गरजू व्यक्तींना प्रसादम् फूड पॅकेट्सचे वाटप करण्यात आले. महापालिकेच्या आवारात महापौर मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. या प्रसंगी महापालिका सभागृह नेते गणेश बिडकर, रघुनाथ येमुल गुरुजी, उद्योजक दानेश शाह, नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे व उपायुक्त माधव जगताप, अवनी संस्थेच्या डॉ. निवेदिता एकबोटे उपस्थित होत्या. उद्योजक शाह व परिवार यांच्या माध्यमातून पाचशे गरजूंना पोळी-भाजी व मसाले भाताचे वाटप करण्यात आले. फूड पॅकेट्स बरोबर व्हिटॅमिनची गोळ्या-औषधे ज्यामध्ये एक महिना पुरेल एवढे व्हिटॅमिन डी-३, व्हिटॅमिन सी, झिंक तसेच कोरोनापासून संरक्षणासाठी मास्क असे कीटदेखील देण्यात आले आहे. फूड पॅकेट्सचे वाटप फिरत्या टेंपोद्वारे स्वारगेट, भवानी पेठ परिसर व शिवाजीनगर भागात मॉडर्न इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, मॉडर्न कॉलेज रस्ता, शिवाजीनगर या ठिकाणी करण्यात येणार आहे.

Sakaal 17.4.2021

**लोकमत**

येमुल गुरुजींची संकल्पना : कोरोना सुरक्षा साधनांचाही लाभ

## फूड बँकेद्वारे दिव्यांग, गरजूंना 'प्रसादम' फूड पॅकेट्सचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

**धनकवडी :** ध्यानगुरू रघुनाथ येमुल गुरुजींच्या संकल्पनेतील अन्नसुरक्षा विमा योजनेअंतर्गत फूड बँकेच्या माध्यमातून दिव्यांग, गरीब व गरजू व्यक्तींना 'प्रसादम फूड पॅकेट्स' चे वाटप महापौर मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते महापालिकेच्या आवारात करण्यात आले.

येमुल गुरुजींच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या अन्न व अन्नधान्य वाटपाचा हा ६ वा टप्पा होता. याप्रसंगी सभागृह नेते गणेश बिडकर, उद्योजक दानेश शाह, नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, उपायुक्त माधव जगताप, अवनी संस्थेच्या प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे उपस्थित होत्या.

हे अन्नदान दानशूर उद्योजक दानेश शाह व परिवार यांच्या माध्यमातून करण्यात आले. यावेळी पाचशे गरजूंना पोळी-भाजी व मसाले भाताचे वाटप करण्यात आले.

फूड पॅकेट्स सोबतच जीवनसत्त्वाच्या गोळ्या-औषधे ज्यामध्ये एक महिना पुरेल एवढे व्हिटॅमिन डी ३, व्हिटॅमिन सी, झिंक तसेच कोरोनापासून संरक्षणासाठी मास्क, असे किटदेखील देण्यात आले.

याप्रसंगी रघुनाथ येमुल गुरुजी म्हणाले, कोरोनानंतर अत्यंत हालाखीत जगणा-या दिव्यांगांच्या कुटुंबांना हातभार लागावा.

निराधारांची उपासमार होऊ नये, गरीब व गरजू नागरिक रिकाम्या पोटी झोपू नयेत, "मानवतेवर आलेल्या या संकटाच्या काळात लोकांनी अन्नदानासाठी पुढे यावे.

गरजूंना आणखी फूड पॅकेट्सचे वाटप फिरत्या टेम्पोद्वारे स्वारगेट, भवानी पेठ परिसर व शिवाजीनगर भागात मॉडर्न इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, मॉडर्न कॉलेज रोड, शिवाजीनगर, पुणे या ठिकाणी करण्यात येणार आहे.

या उपक्रमासाठी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे व दिव्यांग इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष रघुनाथ येमुल गुरूजी यांचे विशेष सहकार्य लाभले.



'प्रसादम फूड पॅकेट्स' चे वाटप करताना महापौर मुरलीधर मोहोळ.

Hello Pune
Page No. 3 Apr 19, 2021
Powered by: erelego.com

# *Work of Appreciation: Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam*

## नवभारत

### दानेश शाह व परिवार का उपक्रम

## जरूरतमंदों को फूड किट का वितरण



नवभारत न्यूज नेटवर्क

**पुणे.** कोरोना (कोविड़) महामारी के दौरान विकलांगों, गरीबों और जरूरतमंद व्यक्तियों को खाद्य पैकेटों का वितरण, खाद्य सुरक्षा योजना के माध्यम से प्रायोगिक आधार पर किया जा रहा है. महापालिका भवन में इसका प्रारंभ महापौर मुरलीधर मोहोल के हाथों किया गया. इस अवसर पर सभागृह नेता गणेश बिड़कर, नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे, उपायुक्त माधव जगताप उपस्थित थे.

### कीट में दवाओं का भी समावेश

उद्यमी दानेश शाह और उनके परिवार के माध्यम से, कोरोना महामारी के दौरान, विकलांगों, गरीबों और जरूरतमंदों को भोजन प्रदान करने के लिए पांच सौ जरूरतमंदों को पोली-भाजी और मसाला चावल प्रदान किए गए. भोजन के पैकेट के साथ, एक महीने के लिए विटामिन की गोलियां भी होती हैं, जिसमें विटामिन डी -3 (टैब कैल्जेन), विटामिन सी (टैब सेलिन), जिंक (जिंककोविट) और मास्क का समावेश है. मॉडर्न इंस्टीट्यूट ऑफ बिजनेस मैनेजमेंट, मॉडर्न कॉलेज रोड, शिवाजी नगर, पुणे में स्वरगेट, भवानी पेठ और शिवाजी नगर क्षेत्र में मोबाइल टेम्पो द्वारा भोजन के पैकेट वितरित किए जाएंगे. संकट के इस समय में, हम सभी से अपील करते हैं कि वे इस खाद्य दान सेवा के लिए आगे आएं, ताकि भोजन अधिक से अधिक लोगों को वितरित किया जा सके. उपरोक्त कार्य के लिए, डॉ. गजानन एकबोटे, कार्यकारी अध्यक्ष, प्रोग्रेसिव शिक्षा सोसाइटी और रघुनाथ येमुल गुरुजी, दिव्यांग इंडियन चैंबर ऑफ कॉमर्स एंड इंडस्ट्रीज का सहयोग मिला.

Pune Edition
18-April-2021 Page No. 3
epaper.enavabharat.com

## पुढारी

## 'अन्नसुरक्षा'तून गरजूंना अन्नाचे वाटप

### रोज पाचशे जणांना मिळतेय धान्य



आर्थिक मदत उभी राहिली आणि कोसो दूर असणाऱ्या गडचिरोलीतील आई-वडिलांचे छत्र हरपलेल्या पाच निराधार लेकींना आधार मिळाला. गडचिरोली जिल्ह्यातील छल्लेवाडा (ता. अहेरी) या अतिदुर्गम गावातील राणी, नुशा, कावेरी, लक्ष्मी आणि जमुना या पाच मुलींचे मातृछत्र २०१३मध्ये हरपले. त्यानंतर वडील तिरुपती दुर्गे मुलांचा सांभाळ करायचे. मात्र, डिसेंबर २०२०मध्ये वडिलांनी साथ सोडली आणि या मुलींवर दुःखाचा डोंगर कोसळला. एवढेच नव्हे, तर एक वेळचे जेवण मिळणेही शक्य नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. हे उपपोलिस स्टेशन रेपनपल्ली येथील प्रभारी अधिकारी विश्वास शिंगाडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ मुलांना जीवनावश्यक वस्तू पुरविल्या. परंतु एवढे करून प्रश्न सुटणार नाही, हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी लगेचच आपल्या पोलिस अधिकाऱ्यांच्या ग्रुपवर या मुलींना निवारा मिळावा, यासाठी मदतीचे आवाहन करणारा संदेश पाठविला. हा संदेश शहरी भागातील अधिकाऱ्यांच्या ग्रुपवर फॉरवर्ड होताच त्या ग्रुपमध्ये असणाऱ्या नांदेड येथील पोलिस निरीक्षक प्रशांत पवार यांनी आपल्या वर्गमित्रांच्या ग्रुपवर तो संदेश फॉरवर्ड केला. तो ग्रुप होता शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयातील (वाणिज्य शाखा) १९९२च्या बॅचचा.

Sakaal 6.4.2021

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# Five girls get a home in Gadchiroli thanks to Modern College alumni

## WhatsApp message alerted group members to the siblings' plight; ₹75K collected to help build 750-sq-ft house at remote Challewada

Archana.More@timesgroup.com

TWEET @Archana_Mirror

Five sisters who lost their father a month ago and their mother a few years ago were beginning to lose all hope when life took an unexpected turn. Left to fend for themselves and with no one to turn to only recently... the family of siblings now has a 750-square-foot house all to themselves in Gadchiroli due to the efforts of the Modern College's alumni group.

Living in a remote naxal-affected village almost 900 km from Pune, life was bleak for the girls. One lone WhatsApp forward changed that.

Police sub-inspector Vishwas Shingade witnessed their plight when he visited the village recently and immediately posted about them on social media appealing for help. Police inspector Prashant Pawar serving with Nanded City police and Datta Bhapkar attached with the Economic Offences Wing (EOW) of Pune crime branch forwarded the message to their Modern College of Arts, Commerce and Science alumni group, who decided to come forward and help. The group comprises lawyers, judges, police officers, academicians, doctors and software engineers — all of whom decided to come together and contribute money to gift the girls a 750-square-foot house.



**The money was used to fund the concrete house, utensils and clothes**

The eldest girl, Kaveri Durge, told *Mirror* from Challewada, "We were struggling after the death of my parents. I got married last year but my husband abandoned me. My mother died 10 years ago. Our father was our only support and we lost him to an illness last month. I have the responsibility of my sisters now, but we did not have a house to live in. That has changed now. I am grateful to all the people who stepped ahead to help us."

The girls' father Tirupati Durge and his wife lived in the Challewada village. The couple has five daughters — Rani, Nusha, Kaveri, Laxmi and Jamuna. Durge shouldered their responsibility till his death last month after which the relatives were unable to support the girls.

Bhapkar said, "I have seen the life of people in Gadchiroli. When I received the message, I reached out to the girls' relatives. We discussed a budget and the money was sent to Shingade, who oversaw the construction and bought the girls some utensils and clothes." Pawar said, "We collected Rs 75,000 for the concrete house."

Advocate Shivraj Kadam Jagirdar said, "I suggested that the girls be called to Pune for education. Their guardians were unwilling thus the alumni group decided to send financial aid for a house that the local police helped house construct."

Pune Mirror 7.4.2021

## News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

# Educators hint at pitfalls for SSC students in top colleges

## High Cut-Offs May Reduce Their Chances

Ardhra.Nair@timesgroup.com

**SEATS ALLOTTED IN 2020-21 FOR FYJC**

**PMC AND PCMC COLLEGES**

| Board | Applied | Admitted |
|---|---|---|
| SSC | 75,944 | 62,298 |
| CBSE | 7,973 | 6,507 |
| CICSE | 2,547 | 2,169 |
| IB | 24 | 20 |
| IGCSE | 90 | 76 |
| NIOS | 618 | 490 |
| Other Boards | 218 | 162 |

**2020 CBSE RESULTS**

| Name | Registered | Appeared | Passed | Pass % |
|---|---|---|---|---|
| Pune region | 76,080 | 75,970 | 74,485 | 98.05 |
| Maharashtra | 73,582 | 73,484 | 72,131 | 98.16 |

CBSE schools in Pune region up to Standard X | 902

Pune region consists of Maharashtra, Goa, Daman & Diu, Dadra & Nagar Haveli



"Students assessed internally would get better marks because no school would want to give bad marks to its own students. But, if the state decides to go ahead with board exams, then it may not be fair play for students when they apply for FYJC. They will get admission in a course of their choice, but not the college as it may not be possible due to higher competition in the handful of colleges where all students apply

**Chandrakant Rawal** | FORMER PRINCIPAL OF BRIHAN MAHARASHTRA COLLEGE OF COMMERCE

**Pune:** After the central and international education boards' decisions on standard XII and standard X exams, educators fear that SSC students from the state board will be at a disadvantage during the first-year junior college admissions in top city colleges.

The central and international boards have cancelled standard X examinations and are opting for internal assessments.

### FYJC ADMISSIONS

In the admission season, there is a mad rush to get into some colleges in the city and cut-off marks in all three faculties are over 90%. Since the state education minister has maintained that SSC students will compulsorily appear for a board examinations, educators fear that the internal marking system by other boards will favour their students to get better marks and given them an edge over state board students.

Rajendra Zunjarrao, principal of Modern College of Arts Science and Commerce, felt the state board also needs to come up with a formula to promote the students.

Since hardly any classes were held and not all have access to online education, there are no ways that students can be given marks on anything that happened during the academic year.

Hence, the only other option remaining is coming up with a formula where marks are given after taking into account the performance of students in previous three or five classes, Zunjarrao said.

"Another option is that wherever online admissions are done, the Centralised Admission Process committees can devise a way to conduct city-wise online entrance exams. This will again bring a level playing field for all students. But, a statewide entrance may not be possible as the numbers are large," he added.

Chandrakant Rawal, former principal of Brihan Maharashtra College of Commerce, said the competition is highest in the top 10 colleges in the city, and if the state decides to go ahead with board exams while others go forward with internal assessment, the scales would be tipped in favour of students from other boards.

Vasant Kalpande, member of the expert committee set up by the state education ministry for suggesting an action plan on smooth conduct of board examination in the state, said discussions are still on and he would not like to comment on the matter.

The Times of India 17.4.2021

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुढारी

# ऑनलाइन शिक्षणात आमूलाग्र बदलांची गरज!

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनानंतर ऑफलाइन शिक्षण ऑनलाईन करण्याशिवाय पर्याय राहिला नाही.परंतु ऑनलाईन शिक्षण नावालाच सुरु आहे. त्यामुळे ऑनलाइन शिक्षणात आमूलाग्र बदलांची गरज निर्माण झाली आहे. यामध्ये पर्यायी प्रश्नांबरोबरच दीर्घोत्तरी प्रश्न सोडविण्याची सोय करणे, दर्जेदार ईकंटेंटची निर्मिती करणे, विद्यार्थ्यांना ऑनलाइन असाइनमेंट सोडवण्याचा पर्याय असणे आदी गोष्टींवर भर द्यावा लागणार आहे. त्यासाठी उपलब्ध पायाभूत सुविधा वाढविण्यावर भर द्यावा लागणार असल्याची माहिती काही महाविद्यालयातील प्राचार्यांनी दिली आहे.



- **पर्यायी प्रश्नांबरोबरच दीर्घोत्तरी प्रश्न सोडविण्याची हवी सोय**
- **पायाभूत सुविधांवर भर हवा**
- **दर्जेदार ई-कंटेंटची निर्मिती करावी लागणार**

कोरोनानंतर गेल्या वर्षी १५ मार्चला शाळा, महाविद्यालयांना टाळे लागले आणि ऑनलाईन शिक्षणाला सुरूवात झाली. परदेशात घट्ट पाळेमुळे रुजलेले ऑनलाइन शिक्षण आपल्याकडे पर्याय नसल्यामुळे नाइलाजाने सुरू झाले. परंतु विद्यार्थी आणि प्राध्यापकांना याची सवय नसल्यामूळे ते केवळ औपचारिकता म्हणूनच सुरु आहे. झूम सारख्या काही अन्य अॅपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकवण्यात येत आहे आणि त्यांची केवळ बहुपर्यायी प्रश्नांच्या माध्यमातून परीक्षा घेण्यात येत आहे. कोणता तरी एक पर्याय निवडून विद्यार्थ्यांना उत्तरे द्यायची असल्यामुळे प्रश्नांची उत्तरे लिहिताना विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीला चालनाच मिळत नसल्याचे चित्र आहे. तर बहुपर्यायी प्रश्न असल्याने समूहाने कॉपी करणे, गुगलचा वापर करून प्रश्न लिहणे असले प्रकार सर्रास होताना दिसत आहे.

कोरोनाचे संकट आणखी किती काळ राहील हे अद्यापही कोणाला सांगता येत नाही. त्यामुळे आहे त्या परिस्थितीत काळाबरोबर पुढे जायचे असेल तर ऑनलाईन शिक्षणाशिवाय कोणताही पर्याय उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही. त्यासाठीच ऑनलाईन शिक्षण प्रणाली बळकट करण्याची गरज निर्माण झाली आहे. ऑनलाइन शिक्षण झाले म्हणून कोणत्याही महाविद्यालयाने शुल्क कमी केल्याचे चित्र दिसून येत नाही. त्यामुळे महाविद्यालयांनाच आता ऑनलाइन शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा वाढविण्यावर भर द्यावा लागणार आहे. तरच शिक्षणाचा दर्जा टिकून राहण्यास मदत होईल.

यासंदर्भात मॉडर्न कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव म्हणाले, कोरोनासारख्या जगतिक महामारीतसुद्धा शिक्षण संस्थांनी ऑनलाईन शिक्षण सुरू करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्यापासून वाचवले आहे.

ऑनलाइन शिक्षणाचे जसे काही फायदे आहेत तशा काही उणिवा देखील आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वर्गात शिकता किंवा प्रॅक्टिकल करता येत नाही, परीक्षा काळात विद्यार्थ्यांना दीर्घोत्तरी प्रश्न सोडविण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे येत्या काळात यावर तोडगा काढावा लागणार आहे. ऑनलाईन शिक्षण दर्जेदार करायचे असेल तर यामध्ये आमूलाग्र बदल करणे गरजेचे असल्याचे दिसून येत आहे.

Pune Edition
Apr 12, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# बारावीचे विद्यार्थी, पालक संभ्रमात

## परीक्षा होणार की नाही हा प्रश्न; राज्य सरकारच्या निर्णयाची प्रतीक्षा

**पुणे, ता. २३ :** दहावीच्या परीक्षा रद्द झाल्या आणि बारावीच्या परीक्षा होणार असे सांगण्यात आले; परंतु बारावीची परीक्षा कधी होणार, कशा पद्धतीने होणार याबाबत राज्य सरकारने कोणतीही स्पष्टता अद्याप केलेली नाही. त्यामुळे बारावीच्या जवळपास १३ लाख विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर टांगती तलवार असल्याचे चित्र आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे २०२१मध्ये घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेसाठी १२ लाख ७३ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. कोरोनाच्या वाढत्या संसर्गामुळे राज्य सरकारने दहावी आणि बारावीची बोर्डाची परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय १२ एप्रिल रोजी जाहीर केला होता. मात्र त्यानंतर राज्य सरकारने दहावी-बारावीच्या परीक्षेबाबतचा महत्त्वपूर्ण निर्णय २० एप्रिल रोजी जाहीर केला. तर बारावीची परीक्षा होणार असल्याचे सांगण्यात आले. सरकारने १२ एप्रिल रोजी घेतलेल्या निर्णयात बारावीच्या परीक्षा मे महिन्याच्या अखेरीस होतील, असे सांगितले होते. मात्र, या परीक्षेबाबत अद्याप ठोस माहिती दिलेली नाही. एप्रिल महिना संपत आला असतानाही परीक्षा कधी होणार, परीक्षेचे वेळापत्रक, परीक्षा पद्धती याबाबत कोणतीही सूचना सरकार किंवा राज्य शिक्षण मंडळाकडून न आल्याने विद्यार्थी, पालक आणि शिक्षकही संभ्रमात आहेत.

### विद्यार्थ्यांचा वाढतोय ताण

परीक्षेबाबत ठोस निर्णय हाती येत नसल्याने विद्यार्थ्यांचा ताण दिवसागणिक वाढत असल्याचे निरीक्षण पालक आणि शिक्षक नोंदवीत आहेत. सध्या विद्यार्थ्यांचा अभ्यास, उजळणी अंतिम टप्प्यात आहे. असे असताना परीक्षेचे वेळापत्रक हाती असल्यास नियोजनबद्ध अभ्यास आणि अभ्यासातील सातत्य राखण्यास मदत होते.

सकाळ २४/४/२०२१

**“ बारावीचे विद्यार्थी पारंपरिक पदवी अभ्यासक्रमाबरोबरच औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय, अभियांत्रिकी, आर्किटेक्चर, विधी अशा विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशपरीक्षांची तयारी करत असतात. त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या प्रवेशपरीक्षा, पुढील शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू होण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने बारावीच्या परीक्षेचे नियोजन वेळेत करणे गरजेचे आहे.**

**– डॉ. राजेंद्र झुंजारराव,**
प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

Sakaal 24.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

# भावविश्व घडण्यासाठी पुस्तकेच उपयुक्त

म. टा. प्रतिनिधी, पुणे

करोनामुळे मुले वर्षभर घरात असल्याने त्यांच्या मानसिक विकासाची प्रक्रिया मंदावली आहे. संपूर्ण दिवस तंत्रज्ञानाच्या सोबतीने जात असल्याने भावनिक विकास ठप्प झाला आहे. अशा वेळी पुस्तके त्यांचे भावविश्व घडवू शकतात. त्यासाठी मुलांना पुन्हा पुस्तकांकडे वळवावे लागेल, असे निरीक्षण लेखनातून मुलांचे भावविश्व घडवणाऱ्या लेखकांनी गुरुवारी व्यक्त केले.

'जागतिक बाल पुस्तक दिन' आज, शुक्रवारी (२ एप्रिल) असून, या पार्श्वभूमीवर विविध लेखकांनी 'मटा'शी बोलताना मुलांचा 'स्क्रीन टाइम' वाढल्याने व्यक्तिमत्त्व विकासात अडथळे निर्माण होत असल्याकडे लक्ष वेधले. जगातील पहिला परिकथाकार असा लौकिक मिळविणारे डॅनिश कवी व लेखक हॅन्स ख्रिस्तियन अँडरसन यांनी कल्पक व आकर्षक भाषाशैलीतून गोष्टी सांगून मुलांचे भावविश्व समृद्ध केले. पानाफुलांच्या, प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या; तसेच राजाराणी व परिकथांच्या जादुई गोष्टीतून त्यांनी आयुष्यभर मुलांचे रंजन केले; म्हणून त्यांचा जन्मदिन (२ एप्रिल) 'जागतिक बाल पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. शाळा बंद असल्याने तेथील शिक्षण व सहजीवन; तसेच मित्रमैत्रिणींची सोबत, खेळ हा सगळा जीवनानुभव दुरापस्त झाला असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

> “ चित्रपट कदाचित एकाच प्रकारचे चित्र डोळ्यांसमोर ठेवेल; पण पुस्तकामुळे प्रत्येकाच्या मनात तयार होणारे चित्र वेगळे असेल; म्हणून आजच्या कठीण काळात मुलांच्या भावनिक जडणघडणीच्या दृष्टीने त्यांना वाचनाची गोडी लावणे गरजेचे आहे.
>
> – राजीव तांबे, बालसाहित्यकार




**जागतिक बाल पुस्तक दिन**

'बालवयात मुलांना वाचनाची खरी गोडी लागणे अपेक्षित आहे; पण त्यांना सकस वाचनसाहित्य उपलब्ध करून देण्यात शाळा-शिक्षक-व्यवस्थापन; तसेच पालकांचे दुर्लक्ष होत आहे. चांगली पुस्तके वाचायला मिळणे हा मुलांचा मूलभूत अधिकार असताना गॅझेट, गेम, संगणक, मोबाइल यातून मनोरंजनासाठीचे केवळ आभासी जग त्यांच्या हाताशी येते. यात गुरफटलेली मुले संतुलन गमावून बसलेली दिसून येतात,' असे निरीक्षण संदर्भ ग्रंथपाल प्रसाद भडसावळे यांनी नोंदवले.

'शाळा बंद असल्याने मित्रमैत्रिणींसोबतच्या गमतीजमती, गप्पा, आनंद, एकमेकांसोबत जेवण, विश्वासाचा स्पर्श या संवेदना थांबल्या आहेत. स्पर्श वाईट आहे, अशी मानसिकता करोना विषाणूमुळे दृढ झाली आहे. हे विचार पुसण्यासाठी; तसेच मुलांची जडणघडण करताना जीवनाचा सर्व प्रकारे आनंद देण्यासाठी वाचन व श्रवण संस्कृतीतून संस्काराची नव्याने सुरुवात करावी लागणार आहे,' असे लेखिका स्वाती राजे यांनी सांगितले.

**'मुलांना गोष्टीतून शिक्षण'**

सध्या भाषाविकास ही तातडीची गरज आहे. त्यातून 'प्रथम बुक्स'चे स्टोरीवीव्हर, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, एकात्मिक बालविकास सेवा आणि युनिसेफ यांच्या वतीने गोष्टींतून शिक्षणाला चालना देणारी 'गोष्टींचा शनिवार' ही चळवळ २५ लाख मुलांपर्यंत पोहोचली. मुलांना दर शनिवारी गोष्टी ऐकवल्या आणि त्यावर आधारित कृती-उपक्रम केले. पाठ्यपुस्तकाच्या रचनेऐवजी गोष्टीरूपातून शिक्षण दिले, तर मुले ते लगेच आत्मसात करताना दिसतात,' असे 'प्रथम बुक्स'च्या संपादक संध्या टाकसाळे यांनी सांगितले.

Maharashtra Times 2.4.2021

# पुणे विद्यापीठात आता संकुल प्रणाली

## अर्थसंकल्पात प्रथमच ८० लाखांची तरतूद : संशोधनास चालना



प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३** - विद्यापीठ व महाविद्यालयात संशोधनाची संस्कृती रूजविण्याच्या दृष्टीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संकुल (स्कूल) प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. याला चालना देण्यासाठी विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात प्रथमच ८० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे संकल्पनेला गती मिळणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे 'नॅक' मूल्यांकन करण्यात आले. त्यावेळी 'संकुल प्रणाली' सुरू करण्याची सूचना 'नॅक' समितीने केली होती. विद्यापीठात संकुल प्रणाली नसल्याचे मूल्यांकन सदस्यांनी निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर विद्यापीठाने गतवर्षी ५२ शैक्षणिक विभागांचे मिळून १८ संकुल स्थापन करण्यात येणार आहेत. दरम्यान, काही दिवसांपूर्वी विद्यापीठाच्या ५२ कोटी तुटीच्या अर्थसंकल्पास अधिसभा सदस्यांनी तत्वत: मान्यता दिली. त्यात यंदा उत्पन्न घटल्याने अनेक विकास कामाच्या निधीत विद्यापीठाने कपात केली. मात्र, संशोधनाला प्राधान्य देत विद्यापीठाने प्रथमच संकुल प्रणालीसाठी तरतूद केली आहे. हे संकुल स्थापताना त्यात सहभागी विभागांचे अस्तित्व कायम ठेवत स्वतंत्र तरतूदही करण्यात आलेली आहे. संकुल प्रणालीअंतर्गत घेण्यात येणारे कार्यक्रम, परिषदा, बैठका यांच्यासाठी ही तीन लाखांची तरतूदही महत्त्वाची ठरणार आहे.

**स्कूल ऑफ फिजिकल सायन्सेससाठी केली सर्वाधिक तरतूद**

पुणे विद्यापीठातील १८ पैकी १७ संकुलास प्रत्येकी ३ लाखांची तरतूद आहे. मात्र, स्कूल ऑफ फिजिकल सायन्सेससाठी सर्वाधिक २८ लाखांची तरतूद आहे. त्यात ३ लाख देखभाल दुरुस्तीसाठी आणि २५ लाख रुपये सोलार थर्मल प्लँटलाठी देण्यात आले आहेत, असे अर्थसंकल्पाच्या आकडेवारीतून स्पष्ट होत आहे.

**स्कूल संकल्पना ठरणार महत्त्वाची**

जैविक, व्यावहारिक व तंत्रज्ञानात्मक पातळीवर एकत्र येऊ शकणाऱ्या विभागांची एक संकुल तयार झाले, तर प्रशासन आणि शैक्षणिक धोरणांची अंमलबजाणी करणे सोयीस्कर होणार आहे. आंतरविद्याशाखीय किंवा अध्ययन-अध्यापन व संशोधनवृत्ती रुजविण्यासाठी विद्यापीठातील स्कूल प्रणाली महत्त्वाची ठरणार आहे.

प्रभात Sun, 04 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/59546024

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## विद्यार्थ्यांना परीक्षेबाबत तक्रारी स्टुडंट प्रोफाइलमध्ये नोंदविता येणार

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे येत्या १० एप्रिलपासून घेतल्या जाणाऱ्या प्रथम ते अंतिम वर्षाच्या परीक्षांसाठी मार्गदर्शक सूचना विद्यापीठातर्फे जाहीर करण्यात आल्या आहेत. ही परीक्षा झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना संबंधित विषयात मिळालेले गुण ४८ तासांत स्टुडंट प्रोफाइल सिस्टीममध्ये दिसतील. त्यानंतर पुढील ४८ तासांत विद्यार्थ्यांना अडचणी, शंका व तक्रारी त्याच ठिकाणी नोंदवता येतील. स्टुडंट प्रोफाइल सिस्टीममध्ये नोंदविलेल्या तक्रारींशिवाय अन्य कोणत्याही तक्रारी स्वीकारल्या जाणार नाहीत, असे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे स्पष्ट केले आहे.

विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षेचा सराव करता यावा, यासाठी विद्यापीठाच्या वतीने येत्या ५ ते ९ एप्रिलपर्यंत सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत मॉक टेस्ट घेतली जाणार आहे. तसेच ऑनलाइन परीक्षेत काही तांत्रिक अडचणीने खंड पडल्यास तेवढाच वेळ संबंधित विद्यार्थ्याला संगणकीय प्रणालीत वाढून दिला जाईल. परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्याला परीक्षेसंदर्भातील माहिती एसएमएस आणि इ-मेलद्वारे दिली जाणार आहे. मात्र त्यासाठी विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत इ-मेल आयडी, तसेच मोबाईल क्रमांक कार्यान्वित असणे गरजेचे आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार परीक्षेसाठी २० मिनिटांचा कालावधी अधिक दिला जाईल. विद्यापीठाने यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार अभियांत्रिकी २०१५ पॅटर्नच्या प्रथम वर्षाच्या प्रथम सत्रातील अनुशेष (बॅकलॉग) विद्यार्थ्यांच्या परीक्षा शंभर टक्के अभ्यासक्रमावर असणार आहेत. गणित आणि संख्याशास्त्र अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन प्रॉक्टर पद्धतीने बहुपर्यायी पद्धतीने ५० गुणांकरिता ३० प्रश्न प्रत्येक २ गुणांसाठी या पद्धतीने विचारण्यात येतील. विद्यार्थ्यांनी दिलेली २५ प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राह्य धरण्यात येतील, असे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे सांगण्यात आले आहे.

परीक्षा देणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने ऑनलाईन परीक्षा पूर्ण केल्याची पोहोच दिसेल. त्याचा स्क्रीन शॉट, फोटो, प्रिंट जतन करून ठेवावेत. विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी केवळ sppuexam.in या संकेतस्थळाचा वापर करावा. याच संकेतस्थळावर परीक्षेसंदर्भातील आवश्यक माहिती असेल. तसेच परीक्षेदरम्यान काही अडचण आल्यास ०२०- ७१५३०२०२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे विद्यापीठाने परिपत्रकात म्हटले आहे.

Kesari 4.4.2021

## 'प्रशालां'च्या कामकाजाला येणार गती

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंदाजपत्रकामध्ये ८० लाखांची आर्थिक तरतूद

पुणे, ता. ३ : राष्ट्रीय विद्यापीठांप्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'प्रशाला' (स्कूल सिस्टिम) स्थापन करण्यात आल्यानंतर आता त्याच्या कामाला गती देण्यासाठी विद्यापीठाच्या अंदाजपत्रकात ८० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक प्रशालेसाठी तीन लाख रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

पुणे विद्यापीठाच्या उत्पन्नाला घरघर लागली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कपात करत ५९३ कोटी ५४ लाख १५ हजार रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आला आहे.

> **प्रशाला स्थापन केल्याने विद्यापीठातील प्रयोगशाळा व इतर सुविधा यांचा प्राध्यापक, विद्यार्थी यांना उपयोग येईल. वैचारिक देवाणघेवाण वाढणार असल्याने त्याचा फायदा संशोधन वाढविण्यासाठी होईल. स्कूल सिस्टिमसाठी निधी उपलब्ध केला तरी प्रत्येक विभागाचे अधिकार, स्वातंत्र्य कायम आहे. स्कूलचे संचालक हे दुवा म्हणून कार्यरत असणार आहेत.**
> **- डॉ. एन. एस. उमराणी, प्र-कुलगुरू, पुणे विद्यापीठ**

हा अर्थसंकल्प ५२ कोटी रुपयांचा तुटीचा असल्याने उत्पन्न घटल्याने अनेक योजना, संशोधन प्रकल्प, विकास कामे यांच्या निधीत मोठी कपात करण्यात आली आहे. मात्र, 'प्रशालां'साठी अर्थसंकल्पात प्रथमच तरतूद करण्यात आली आहे.

पुणे विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन करण्यात आले त्यावेळी 'प्रशाला पद्धती' सुरू करण्याची सूचना नॅक समितीने केलेली आहे, त्यामुळे गतवर्षी ५२ शैक्षणिक विभागांची मिळून १८ प्रशाला स्थापन करण्यात आल्या आहेत.

#### प्रशाला म्हणजे काय?

प्रशाला म्हणजे विद्यापीठात काही प्रमाणात समान अभ्यासक्रम शिकविणाऱ्या विभागांना एकत्र करून त्या माध्यमातून शैक्षणिक दर्जा वाढविला जातो. उदाहरणार्थ- मराठी, हिंदी, पाली या विभागांसाठी स्कूल ऑफ इंडियन लँग्वेज स्थापन केले आहे, तर स्कूल ऑफ सोशल सायन्सेसमध्ये मानवशास्त्र विभाग, संरक्षण व सामरिक अभ्यास विभाग, अर्थशास्त्र, इतिहास यासह आठ विभाग एकत्र आहेत. या विभागांतील प्राध्यापक, विद्यार्थी यांना एकमेकांना माहिती देता येईल, नवा अभ्यासक्रम शिकता येईल.

#### प्रत्येक विभागाची स्वतंत्र तरतूद

प्रशाला स्थापन करताना त्यात सहभागी असणाऱ्या विभागाचे अस्तित्व कायम ठेवत स्वतंत्र तरतूद ही करण्यात आलेली आहे. प्रशाले अंतर्गत घेण्यात येणारे कार्यक्रम, परिषदा, बैठका यांच्यासाठी ही तीन लाखाची तरतूद उपयुक्त ठरणार आहे.

#### फिजिकल सायन्ससाठी निधी

विद्यापीठातील १८ पैकी १७ प्रशालांसाठी प्रत्येकी ३ लाखांची तरतूद आहे. मात्र स्कूल ऑफ फिजिकल सायन्सेससाठी सर्वाधिक २८ लाखाची तरतूद आहे. त्यात ३ लाख देखभाल दुरुस्तीसाठी आणि २५ लाख रुपये सोलार थर्मल प्लांटसाठी देण्यात आले आहेत. तर दुसऱ्या एका हेडखाली याच प्लांटसाठी ७५ लाख अशा प्रकारे एकाच प्रकल्पासाठी १ कोटीची तरतूद उपलब्ध करून दिली आहे.

Sakaal 4.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## पदवी प्रमाणपत्रातील मजकुराची विद्यार्थ्यांकडूनच खातरजमा

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. ४** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागामार्फत पदवी प्रमाणपत्रात चुका राहू नये, यासाठी विद्यार्थ्यांकडूनच ई-मेलद्वारे मजकुराची खातरजमा करण्यात येत आहे. त्यामुळे आता पदवी प्रमाणपत्रात काहीच चुका राहणार नसल्याची चिन्हे आहेत. पदवीपदान समारंभापूर्वीच विद्यार्थ्यांकडून प्रमाणपत्रावर चुका दुरुस्त केल्या जाणार आहेत. त्यामुळे सुधारित प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची वेळ विद्यार्थ्यांवर येणार नसल्याचे दिसून येत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पदवीप्रदान समारंभ येत्या महिनाभरात होण्याची शक्यता आहे. वाढत्या करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर हा समारंभ ऑनलाइन होण्याची शक्यता आहे. विद्यापीठाने पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज मागविले होते. त्यात १ लाख ६७ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. पुणे विद्यापीठात पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या माहितीमध्ये किंवा विद्यापीठाने प्रमाणपत्र तयार करताना काही त्रुटी राहू शकतात. मात्र, यापूर्वी त्याची खातरजमा केली जात नव्हती.

पदवी प्रदान समारंभ झाल्यानंतर विद्यार्थ्यांना थेट विद्यापीठात किंवा पोस्टाने प्रमाणपत्र पाठविली जात. प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्यामध्ये पदवीचे नाव, वर्ष, विद्यार्थ्याचे नाव, अडनाव यासह इतर चुका आढळून येत. त्यामुळे सुधारित पदवी प्रमाणपत्र मिळावे यासाठी विद्यार्थी परीक्षा मंडळाकडे अर्ज करतात. यात परीक्षा विभागाचा

प्रभात Mon, 05 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/59576302

## 'पीएचडी' प्रवेश लवकरच होणार सुरू

### मार्गदर्शकांकडून मागविली रिक्त जागांची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पीएचडी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याची तयारी केली आहे. त्यासाठी मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडून पीएचडीच्या रिक्त जागांची माहिती ऑनलाइन पद्धतीने मागविण्यात आली आहे. विद्यापीठाच्या मार्गदर्शकांनी रिक्त जागांची माहिती अपडेट करावी, अशा सूचना विद्यापीठाने दिल्या आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी 'पेट' प्रवेश परीक्षा घेण्यात येते. या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी उपलब्ध प्रवेशक्षमतेची माहिती होणे आवश्यक आहे. 'विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथील मार्गदर्शकांनी आपल्याकडे संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती येत्या १५ एप्रिलपर्यंत संशोधन केंद्रामार्फत सादर करायची आहे. ही माहिती मार्गदर्शकांनी स्वतःच्या टीचर लॉगइनवरून ऑनलाइन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे,' असे विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेशाचे उपकुलसचिव उत्तम चव्हाण यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर अद्ययावत करणे बंधनकारक आहे. त्यामुळे ज्या मार्गदर्शकांना २०२१ मध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायचे नसल्यास, त्यांनीही नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. मार्गदर्शकांनी वेळेत माहिती सादर न केल्यास पीएचडी प्रवेश प्रक्रियेसाठी रिक्त जागा विचारात घेतली जाणार नाही, असेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे मार्गदर्शकांनी पीएचडीच्या रिक्त जागांची माहिती वेळेत पाठविल्यास, त्या प्रमाणात या जागा प्रवेशासाठी उपलब्ध होतील.

Maharashtra Times 5.4.2021

## इयत्ता नववी, अकरावीच्या विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला



### परीक्षा, मूल्यमापनाबाबत शासन निर्णयाची प्रतीक्षा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ४** - पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण केले जाणार आहे. पण, इयत्ता नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा व वार्षिक मूल्यमापनाबाबत शासनाने अजूनही काहीच मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या नाहीत. त्यामुळे शासन काय निर्णय घेणार याकडे शिक्षक, विद्यार्थी, पालकांचे लक्ष लागले आहे.

दहावी, बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या परीक्षा एप्रिल-मेमध्ये ऑफलाइन होणार आहेत. मात्र, आता करोनाच्या आणखी वाढलेल्या संकटामुळे या परीक्षांबाबतच्या निर्णयात शासन काही बदल करणार का, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

नववीचे विद्यार्थी दहावीला आणि अकरावीचे विद्यार्थी बारावीला जाणार असल्याने त्यांच्यासाठी हा शैक्षणिक पाया महत्त्वाचा ठरणार आहे. मागील वर्षी अंतर्गत मूल्यमापनानुसार नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांचे निकाल लावण्यात आले होते. यंदा मात्र पूर्ण वर्षच ऑनलाइन शिक्षणात गेले आहे. बहुसंख्य शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी नववी, अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या चाचणी, सत्र या ऑनलाइन परीक्षा घेतल्या आहेत. काहींच्या परीक्षा आता सुरू आहेत. विद्यार्थ्यांचे निकाल कसे लावायचे, असा प्रश्न शिक्षकांपुढे उभा राहिला आहे.

प्रभात Mon, 05 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/59576182

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

लोकमत

## दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना क्रीडा गुणांचा लाभ मिळणार का?

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या आता दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा गुणांचा लाभ दिला जातो. मात्र, गेल्या वर्षभरात कोरोनामुळे विद्यार्थ्यांना विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागीच होता आले नाही. त्यामुळे यंदा विद्यार्थ्यांना क्रीडा गुण मिळणार की नाही याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शिक्षण मंडळाकडे क्रीडा गुणांचा लाभ मिळावा म्हणून विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पाठविले. तसेच मागील वर्षी झालेल्या क्रीडा स्पर्धांच्या कामगिरीचा विचार करून विद्यार्थ्यांना क्रीडा गुण द्यावेत, असा पत्रव्यवहार राज्याच्या क्रीडा विभागाकडे व शिक्षण मंडळाकडे काही क्रीडा शिक्षकांनी केला आहे. कोरोना नसता तर आम्ही विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन पारितोषिक पटकाविले असती. स्पर्धा झाल्या नाहीत; त्यात आमचा काहीही दोष नाही. त्यामुळे शासनाने विद्यार्थ्यांना क्रीडा गुण देण्याबाबत सकारात्मक विचार करावा.

### मागील वर्षी क्रीडा गुणांचा लाभ मिळालेल्या विद्यार्थ्यांची आकडेवारी

| विभाग | विद्यार्थी |
|---|---|
| पुणे | ४,९६३ |
| नागपूर | १,८६३ |
| औरंगाबाद | २,६२३ |
| मुंबई | ४,२३५ |
| कोल्हापूर | ३,३७७ |
| अमरावती | २,९३४ |
| नाशिक | ३,१३० |
| लातूर | ३,११४ |
| कोकण | १,१६१ |
| एकूण | २७,४०० |



हॉकी या खेळात मी विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके पटकाविली आहेत. कोरोनामुळे वर्षभर स्पर्धाच होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे आम्हाला क्रीडा गुण मिळणार की नाही? याबाबत संभ्रमाचे वातावरण आहे. शासनाने याबाबत स्पष्टता आणावी.

- **धैर्य शर्मा**, विद्यार्थी,

इयत्ता दहावी-बारावीची परीक्षा देणारे अनेक विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय पातळीवर खेळले आहेत. तसेच त्यांनी चमकदार कामगिरी दाखविली आहे. कोरोनामुळे स्पर्धा होऊ शकले नाहीत यात विद्यार्थ्यांना दोषी धरता येणार नाही. त्यामुळे कोरोना पूर्वी झालेल्या स्पर्धांमधील विद्यार्थ्यांची कामगिरी विचारात घेऊन त्यांना क्रीडा गुणांचा लाभ द्यावा ,अशी मागणी शिक्षण मंडळाकडे केली आहे.

- **फिरोज शेख**, क्रीडा शिक्षक, एसएनबीपी स्कूल

हॉकी , कबड्डीच्या स्पर्धांमध्ये सहभागी होऊन मी राष्ट्रीय स्तरावरपर्यंत गेले आहे. कोरोना नसता तर आम्ही सर्व विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालो असतो आणि आम्हाला क्रीडा गुणांचा लाभ राज्य मंडळाकडून मिळाला असता. त्यामुळे यात विद्यार्थ्यांची कोणतीही चूक नाही शासनाने क्रीडा गुण देण्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करावा.

- **सिद्धी पिसे**, विद्यार्थी



Hello Pune
Page No. 8 Apr 05, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

## 'मॉक टेस्ट'कडे विद्यार्थ्यांची पाठ

### परीक्षा सुरळीतचा दावा : विद्यार्थ्यांना येतात तांत्रिक अडचणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या प्रथम सत्राच्या परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांची सराव परीक्षा (मॉक टेस्ट) घेतली जात आहे. परंतु, अनेक विद्यार्थ्यांनी या मॉक टेस्टकडे पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे. सोमवारी १ लाख १० हजार १७ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा देणे अपेक्षित होते. मात्र, केवळ ६८ हजार ४७० विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली आहे.

पुणे विद्यापीठातर्फे पुणे, अहमदनगर व नाशिक या तिन्ही जिल्ह्यांमधील सुमारे साडेसहा लाख विद्यार्थ्यांची प्रथम सत्राची परीक्षा १० एप्रिलपासून घेतली जाणार आहे. ऑनलाइन परीक्षा देण्यापूर्वी विविध विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवस परीक्षेच्या सरावाची संधी उपलब्ध करून दिली. त्यामुळे प्रत्यक्ष परीक्षा देताना कोणत्या अडचणी येऊ शकतात याची माहिती विद्यार्थ्यांना होणार आहे. मात्र, ४० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली नसल्याची माहिती समोर आले आहे. सोमवारी विज्ञान आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची सराव परीक्षा झाली. त्यात पदवी अभ्यासक्रमाच्या ८८, हजार ८६६, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या १८ हजार २३५ आणि पदविका अभ्यासक्रमाच्या २ हजार ९१६ विद्यार्थ्यांनी परीक्षा देणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात पदवीच्या ५४ हजार १०७ पदव्युत्तर पदवीच्या १२ हजार ५२७ आणि पदविका अभ्यासक्रमाच्या १ हजार ८३६ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली. सोमवारी १ लाख १० हजार १७ विद्यार्थ्यांमधील केवळ ६८ हजार ४७० विद्यार्थ्यांनी परीक्षेचा सराव केला आहे. सुमारे ३५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना सराव परीक्षेचा पासवर्ड न मिळणे, ई-मेल आयडी व मोबाईल रजिस्टर्ड न होणे अशा अडचणींचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या ऑनलाइन परीक्षा सुरळीतपणे पार पडणार का? हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

#### उत्तरे सेव्ह होत नाही

सराव परीक्षा सुरळीतपणे घेतली, असा दावा विद्यापीठातर्फे केला जात आहे. परंतु, या परीक्षेत दरम्यान सोडवलेल्या प्रश्नांची उत्तरे सेव्ह होत नसल्याचे काही विद्यार्थ्यांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे विद्यापीठाने या प्रक्रियेत सुधारणा करावी, अशी मागणी विद्यार्थी संघटनांकडून केली जात आहे.

#### इंटरनेटबाबत अडचणी; टाइमर मात्र चालूच

सोमवारी विद्यापीठाची सराव परीक्षा सुरु झालेली.मात्र, हेल्पलाईन क्रमांकावर कॉल केल्यावर कॉल उचलला गेला नाही. उत्तर देताना पुढील प्रश्नावर क्लिक केल्यावर वेळ लागत आहे. इंटरनेटबाबत अडचणी आली तरीही टाइमर चालूच राहत आहे.

- **मधुकर कुलकर्णी**, विद्यार्थी



Pune Main
Page No. 2 Apr 06, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

## मॉक टेस्टच्या पहिल्या दिवशी गोंधळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या ऑनलाईन परीक्षेचा सराव करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला एक दिवस दिला आहे. मात्र, सोमवारी पहिल्याच दिवशी सुमारे साडेपाच लाख विद्यार्थ्यांनी लॉगीन करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली.

कला, विज्ञान, वाणिज्य, अभियांत्रिकी फार्मसी व्यवस्थापन शास्त्र आदी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना येत्या १ एप्रिलपर्यंत सकाळी १० ते दुपारी ३ या कालावधीत वेळ दिला आहे. सर्व विद्यार्थी एकाच दिवशी एकाच वेळी ऑनलाइन परीक्षेचा सराव करू शकत नाहीत. मात्र, अनेक विद्यार्थ्यांना याबाबत कल्पना नसल्याने सोमवारी सुमारे साडेपाच लाख विद्यार्थ्यांनी लॉगिन करून परीक्षा देण्याचा प्रयत्न केला. परंतु, लॉगिन होत नसल्याने विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने दिलेले हेल्पलाइन क्रमांकावर फोन करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या लक्षात ही बाब आली नाही. विद्यार्थी कोणत्या अभ्यासक्रमाचा आहे. हे विचारले असता याबाबत खुलासा झाला.

Pune Main
Page No. 2 Apr 06, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## ४२ हजार विद्यार्थ्यांची सराव परीक्षेकडे पाठ

### १ लाख १० हजार १७ परीक्षार्थ्यांपैकी ६८ हजार ४७० जणच उपस्थित

**पुणे विद्यापीठाकडून ऑनलाइन परीक्षा देण्यापूर्वी सरावाची संधी**



**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ५** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या प्रथम सत्राच्या परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांची सराव परीक्षा घेतली जात आहे. सोमवारी १ लाख १० हजार १७ विद्यार्थ्यांनी ती देणे अपेक्षित होते. मात्र, केवळ ६८ हजार ४७० जणांनीच दिल्याचे समोर आले आहे. जवळपास ४१ हजार ५४७ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षेकडे पाठ फिरवली आहे.

पुणे विद्यापीठातर्फे पुणे, अहमदनगर व नाशिक या तिन्ही जिल्ह्यांमधील सुमारे साडेसहा लाख विद्यार्थ्यांची प्रथम सत्राची परीक्षा १० एप्रिलपासून घेतली जाणार आहे. ऑनलाइन परीक्षा देण्यापूर्वी विविध विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवस परीक्षेच्या सरावाची संधी उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे प्रत्यक्ष परीक्षा देताना कोणत्या अडचणी येऊ शकतात याची माहिती विद्यार्थ्यांना होणार आहे. पहिल्याच सराव परीक्षेत जवळपास ४० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली नसल्याचे दिसून येत आहे.

सोमवारी विज्ञान आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची सराव परीक्षा झाली. त्यात पदवी अभ्यासक्रमाच्या ८८ हजार ८६६, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या १८ हजार २३५ आणि पदविका अभ्यासक्रमाच्या २ हजार ९१६ विद्यार्थ्यांनी परीक्षा देणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात पदवीच्या ५४ हजार १०७, पदव्युत्तर पदवीच्या १२ हजार ५२७ आणि पदविका अभ्यासक्रमाच्या १ हजार ८३६ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून देण्यात आली.

**परीक्षा प्रक्रियेत सुधारणा करण्याची मागणी**

सुमारे ३५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना सराव परीक्षेचा पासवर्ड न मिळणे, ई-मेल आयडी व मोबाइल रजिस्टर्ड न होणे अशा अडचणींचा सामना करावा लागला. काही विद्यार्थ्यांची उत्तरे सेव्ह होत नव्हती. त्यामुळे या परीक्षा प्रक्रियेत सुधारणा करावी, अशी मागणी काही विद्यार्थ्यांकडून होत आहे. तसेच हेल्पलाइन क्रमांकावर कोणीच कॉल उचलत नसल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

प्रभात Tue, 06 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/59598687

## विद्यापीठाच्या सराव परीक्षा आजपासून

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ४** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पहिल्या सेमिस्टरची ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणारी परीक्षा करोनाच्या पार्श्वभूमीवर येत्या १० तारखेपासून सुरू होणार आहेत. त्यापूर्वी या ऑनलाइन परीक्षेची माहिती होण्यासाठी विद्यापीठामार्फत दि. ५ ते ९ एप्रिल रोजी सराव परीक्षा घेण्यात येणार आहे.

गतवर्षीही करोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या अंतिम सत्राची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आली. आता मात्र प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाइनद्वारे होत आहे. विशेष म्हणजे मागील ऑनलाइन परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांवर अंकुश ठेवण्याची कोणतीच यंत्रणा नव्हती. आताच्या परीक्षेत मात्र कॅमेऱ्याद्वारे विद्यार्थ्यांच्या परीक्षेवर लक्ष राहणार आहे. त्यासाठीच विद्यापीठाने ही परीक्षा 'मॉक्टर्ड' पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे.

ऑनलाइन परीक्षेची संपूर्ण माहिती व्हावी, यासाठी परीक्षेमधील नमुना प्रश्नांवर आधारित सराव परीक्षा सोमवारपासून (दि.५) घेतले जाणार आहे. ही परीक्षा सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत होणार आहे. या सराव परीक्षेची माहिती विद्यार्थ्यांना ई-मेल व मोबाइलद्वारे कळविण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत ई-मेल आयडी व मोबाइल क्रमांक कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

**संपूर्ण परीक्षांच्या वेळापत्रकाची प्रतीक्षा**

विद्यापीठाची परीक्षा पाच दिवसांवर येऊन ठेपली आहे. मात्र विद्यापीठाने केवळ ७५ टक्के अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. उर्वरित अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक अद्याप प्रसिद्ध झालेले नाही. त्यामुळे विद्यार्थी संपूर्ण परीक्षांच्या वेळापत्रकाच्या प्रतीक्षेत आहे. वेळापत्रक लवकरात लवकर प्रसिद्ध झाल्यास, त्यानुसार अभ्यासाचे नियोजन करणे शक्य होणार असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. परंतु विद्यापीठाने उर्वरित अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक टप्प्याटप्प्यानुसार प्रसिद्ध होणार असल्याचे म्हटले आहे.



**वेळापत्रकानुसार परीक्षा**

विद्यापीठाची सराव परीक्षेसाठी वेळापत्रक सोमवारी सकाळी प्रसिद्ध करण्यात येणार असून, शाखांनिहाय कालावधी निश्चित करण्यात आला आहे. एकाच वेळी सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांना परीक्षा देता येणार नाही. त्यासाठी वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांची सराव परीक्षा घेतली जाणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून देण्यात आली.



परीक्षेसाठी www.sppuexam.in या संकेतस्थळाचा वापर करावा, असेही विद्यापीठाने सूचित केले आहे.

प्रभात Mon, 05 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/59576089

## अडतीस टक्के विद्यार्थ्यांची सराव परीक्षेला दांडी

### ई-मेल, पासवर्डसाठी ३५० जणांच्या तक्रारी

**पुणे, ता. ५** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रथम सत्र परीक्षेपूर्वी सॉफ्टवेअरची माहिती होण्यासाठी सराव परीक्षा घेण्यास सुरुवात केली आहे. पहिल्या दिवशी ३८ टक्के विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली नसल्याचे समोर आले आहे.

विद्यापीठाने ५ ते ९ एप्रिल या काळात सराव परीक्षा घेण्याचे नियोजन केले आहे. अभ्यासक्रम निहाय वेळापत्रक जाहीर केले आहे. सोमवारी विज्ञान पदव्युत्तर पदवीचे १८ हजार २३५, पदवीचे ८८ हजार ८६६ आणि पदव्युत्तर पदविका २ हजार ९१६ असे एकूण एक लाख १० हजार १६ जणांची सराव परीक्षा घेतली गेली.

त्यापैकी आज प्रत्यक्ष पदवीचे ५४ हजार १०७, पदव्युत्तर पदवीचे १२ हजार ५२७ आणि पदविकेचे एक हजार ८३६ जणांनी परीक्षा दिली. एकूण विद्यार्थ्यांपैकी ६२ टक्के जणांनी परीक्षा दिली तर ३८ टक्के विद्यार्थ्यांनी पाठ फिरवली. सराव परीक्षेसाठी ई-मेल आयडी रजिस्टर न होणे, लॉगईनसाठी पासवर्ड न मिळणे अशा ३५० तक्रारी विद्यापीठाकडे आल्या आहेत. त्या सोडविल्याचे परीक्षा संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

Sakaal 6.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

शालेय शिक्षण विभागाची महत्त्वाची बैठक

## नववी आणि अकरावीच्या परीक्षेचा निर्णय आज होणार

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) – नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेसंदर्भात निर्णय घेण्यासाठी शालेय शिक्षण विभागाची उद्या महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांना प्रमोट करण्यासोबतच दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी काही उपायोजना अथवा त्यांच्या वेळापत्रकात काही बदल करण्यासंदर्भातही चर्चा होण्याची शक्यता आहे.

शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडणार असून परीक्षांसोबत २० टक्के अनुदानाचा विषयही प्रामुख्याने बैठकीत घेतला जाणार असल्याने शिक्षक संघटनांच्या प्रतिनिधींसोबतच शिक्षक आमदारही या बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे शालेय शिक्षण विभागाने याआधीच पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेशिवायच पास करण्याचा निर्णय घेतला. मात्र नववी आणि अकरावीच्या परीक्षांबाबत अद्याप निर्णय घेतलेला नाही. कोरोनामुळे राज्यात शाळा आणि महाविद्यालये बंद असून परीक्षा कशा घ्यायच्या हा प्रश्न आहे.

### दहावी-बारावीची परीक्षा ऑफलाइनच

■ दहावी आणि बारावीची परीक्षा ऑनलाइन घेण्याच्या मागणीसाठी काही विद्यार्थ्यांनी मुंबईत दोन दिवसांपूर्वी जोरदार आंदोलन करून सरकारचे लक्ष वेधले. मात्र राज्यातील भोगोलिक परिस्थिती लक्षात घेता या परीक्षा ऑनलाइन घेणे शक्य नसल्याचे याविषयी नेमण्यात आलेल्या सल्लागार समितीच्या प्रमुखांनी स्पष्ट केले आहे. याच पार्श्वभूमीवर उद्याच्या बैठकीत या परीक्षेच्या संदर्भात आणखी काही उपाययोजना अथवा या परीक्षांच्या तारखां मध्ये काही बदल जाहीर केल्या जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

Kesari 6.4.2021

## श्रेणीसुधार योजनेंतर्गत विकल्पासाठी मुदतवाढ

पुणे, ता. ५ : कोरोनाच्या वाढत्या संसर्गामुळे फेब्रुवारी-मार्च २०२०मध्ये बारावीची परीक्षा दिलेल्या आणि श्रेणीसुधार योजनेंतर्गत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना काही अपरिहार्य कारणास्तव सहा महिन्याच्या कालावधीत विकल्प सादर करता आला नसल्यास, अशा विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने आता दिलासा दिला आहे.

राज्य मंडळाने अशा विद्यार्थ्यांना केवळ २०२०-२१ या वर्षासाठी खास बाब म्हणून विकल्प सादर करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी ६ मे २०१३च्या सरकारी पत्रानुसार निकाल जाहीर झाल्यानंतर श्रेणीसुधार योजनेंतर्गत प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना विकल्प सादर करून सुधारित गुणपत्रिकेची मागणी केल्यास सुधारित गुणपत्रिका बदलून देण्याची कालावधी एक महिन्याऐवजी सहा महिन्यांपर्यंत वाढविण्यात आलेला होता. मात्र, फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये बारावीच्या परीक्षेस श्रेणीसुधार योजनेंतर्गत प्रविष्ट झालेल्या विद्यार्थी काही अपरिहार्य कारणास्तव सहा महिन्याच्या कालावधीत विकल्प सादर करू शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी केवळ २०२०-२१ या वर्षासाठी खास बाब म्हणून मुदतवाढ दिली आहे.

त्यामुळे फेब्रुवारी-मार्च २०२०मध्ये बारावीच्या परीक्षेसाठी श्रेणीसुधार योजनेंतर्गत प्रविष्ट झालेले विद्यार्थ्यांनी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयांशी आणि विभागीय मंडळांशी संपर्क साधावा, असे आवाहन राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी केले आहे.

Sakaal 6.4.2021

मटा अँकर कडक निर्बंध व लॉकडाउनचा फारसा परिणाम न होण्याची शक्यता

## दहावी–बारावीच्या ऑफलाइन परीक्षांची तयारी

म. टा. प्रतिनिधी, पुणे



### नववी, अकरावीबाबत आज बैठक

पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करण्याच्या निर्णयानंतर, आज मंगळवारी ६ एप्रिल रोजी इयत्ता नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे; तसेच याच बैठकीत दहावी आणि बारावीच्या परीक्षांबाबत चर्चा होऊन त्या संदर्भातील मार्गदर्शक सूचनांना अंतिम स्वरूप दिले जाईल, अशी शक्यता वर्तविली जात आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून इयत्ता दहावी आणि बारावीच्या लेखी परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्याचीच तयारी सुरू आहे. त्याचप्रमाणे ३० एप्रिलपर्यंत शनिवारी बारावीचा केवळ एकच पेपर येत आहे; तसेच परीक्षार्थींना सूट दिल्याच्या पार्श्वभूमीवर या परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणे घेण्यासाठी राज्य मंडळाकडून प्रयत्न सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

राज्य मंडळाने दहावी आणि बारावीच्या लेखी परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय जाहीर केला. मात्र, राज्यात करोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, पालकांकडून ऑनलाइन परीक्षेची मागणी करण्यात आली. दहावीची लेखी परीक्षा २९ एप्रिल ते २० मे, तर बारावीची लेखी परीक्षा २३ एप्रिल ते २१ मे या कालावधीत होणार आहे. त्यामुळे ऑनलाइन परीक्षा घ्यायच्या झाल्यास, सुमारे ३२ लाख विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यावी लागेल. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा नाहीत. त्यामुळे ऑफलाइन पद्धतीने वेळापत्रकानुसार परीक्षा घेण्याची तयारी सुरू आहे. ऑफलाइन परीक्षा व्यवस्थित होण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याची कार्यवाही देखील विभागीय मंडळाकडून होत आहे. सध्याच्या स्थितीत ऑनलाइन परीक्षा घेण्याचे नियोजन नाही.

राज्यात ३० एप्रिलपर्यंत कडक निर्बंध; तसेच शनिवारी-रविवारी लॉकडाउन राहणार आहे. परीक्षा सकाळ आणि दुपार अशा दोन्ही संत्रात होणार असल्याने, परीक्षेच्या कामकाजावर थोडा परिणाम होऊ शकतो. दहावीची परीक्षा गुरुवार २९ एप्रिलपासून सुरू होणार असून, शनिवारी कोणत्याच विषयाचा पेपर नाही. बारावीची परीक्षा शुक्रवारी २३ एप्रिलपासून सुरू होणार असून, शनिवारी २४ एप्रिल रोजी सकाळच्या सत्रात हिंदी, तर दुपारच्या सत्रात इतर पर्यायी भाषांचे पेपर आहेत. त्यामुळे एका पेपरला लॉकडाउनची अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे.

Maharashtra Times 6.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

पुढारी

## बारावी पुरवणी परीक्षा प्रमाणपत्रे शुक्रवारी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने नोव्हेंबर २०२० मध्ये घेण्यात आलेल्या पुरवणी परीक्षेतील इयत्ता बारावीच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे येत्या शुक्रवारी, दि. ९ एप्रिल रोजी महाविद्यालयांना वाटप होणार आहेत.

एप्रिल-मे २०२१ मध्ये होणाऱ्या बारावीच्या परीक्षेला प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांची ओएमआर गुणतक्ता व प्रात्यक्षिक साहित्यही वाटप होणार आहे. यासाठी जिल्हानिहाय वितरण केंद्राची व्यवस्था केली आहे. कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी निर्धारित वेळेत प्रमाणपत्रे व साहित्य स्वीकारणे आवश्यक आहे.

याबाबतच्या सूचना पुणे विभागीय मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी पुणे, अहमदनगर, सोलापूर या जिल्ह्यांतील कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना दिल्या आहेत.

पुणे शहर, हवेली, शिरूर, खेड, पुरंदर या तालुक्यांसाठी शिवाजीनगर येथील पुणे विभागीय मंडळ हे वाटप केंद्र असणार आहे.

पिंपरी-चिंचवड, मावळ, मुळशी या तालुक्यांसाठी पिंपरीतील जयहिंद हायस्कूल, भोर व वेल्ह्यासाठी भोरमधील राजा रघुनाथराव विद्यालय, बारामती, दौंड, इंदापूर तालुक्यांसाठी बारामतीतील एम. ई. हायस्कूल, आंबेगाव व जुन्नर तालुक्यांसाठी नारायणगाव येथील गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यामंदिर या ठिकाणी वाटप केंद्र सज्ज ठेवण्यात येणार आहे.

Pune Edition
Apr 6, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

पुढारी

## सराव परीक्षेलाही लागले तांत्रिक अडचणींचे ग्रहण

### पहिल्याच दिवशी ३५० तक्रारींची विद्यापीठाकडे नोंद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाइन सराव परीक्षेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचणी आल्या. उत्तर सेव्ह न होणे, प्रश्न दिसण्यास वेळ लागणे, मदत केंद्रांवर दूरध्वनी न उचलणे, पासवर्ड न मिळणे, ईमेल आयडी व मोबाईल रजिस्टर्ड न होणे असे प्रकार झाले. दिवसभरात यासाठी ३५० विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे तक्रार नोंदवली आहे. त्यामुळे सराव परीक्षेलाही तांत्रिक अडचणींचे ग्रहण लागल्याचे चित्र दिसून आले आहे.



विद्यापीठाकडून पदवी, पदव्युत्तर पदवी आदी अभ्यासक्रमांच्या ऑनलाइन सत्र परीक्षा १० एप्रिलपासून सुरू होत आहेत. या बहुपर्यायी, ऑनलाइन आणि प्रॉक्टर्ड पद्धतीची विद्यार्थ्यांना कल्पना येण्यासाठी सराव परीक्षेची सुविधा दिली आहे. त्यानुसार सोमवारपासून सराव परीक्षा सुरू झाली. अभियांत्रिकी आणि विज्ञान शाखांचे १ लाख १० हजार १७ विद्यार्थी परीक्षेला अपेक्षित होते. त्यापैकी ६८ हजार ४७० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. पदवीच्या ५४ हजार १०७, पदव्युत्तरच्या १२ हजार ५२७ आणि पदविकाच्या १ हजार ८३६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचणींना तोंड द्यावे लागले. ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक नोंदला न जाणे, पासवर्ड न मिळणे अशा अडचणींसाठी विद्यापीठाच्या मदत केंद्रांवर संपर्क साधून प्रतिसाद मिळाला नसल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. सराव परीक्षेत आलेल्या अडचणींनुसार प्रणालीत आवश्यक ते बदल केले जातील. जेणेकरून प्रत्यक्ष परीक्षेवेळी विद्यार्थ्यांना अडचणी येणार नाहीत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

Pune Edition
Apr 6, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## SPPU mock test receives mixed student reviews

**Dheeraj Bengrut**
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE :** Around 38 per cent of the students of Savitribai Phule Pune University (SPPU) and its affiliated colleges remained absent on the first day of the mock tests. In a bid to spread awareness about the online examination software to students, the mock tests are going to be held starting from April 5 to 9.

While on its first day, a total of 1,10,017 students from Science and Engineering streams were expected to appear for the exams, of which only 68,470 students appeared which is 62 per cent of the total number of students.

While students who appeared for the mock test today faced some technical issues, some didn't receive their username and password and students faced other issues while giving the online mock test exams.

Madhukar Kulkarni an SPPU student said, "Even after selecting the answer it was not saved in the system, while there was connectivity issue and questions were not loading properly despite having a good internet connection. My timer remained running when I had called to the call centre for getting the solution on my technical issue and no one received my call from the call centre as I called thrice."

> Even after selecting answer it was not saved, while the questions were not loading due to connectivity issues.
>
> **MADHUKAR KULKARNI,** SPPU student

> It was quite a good experience to appear for the mock test examination, there was not much of a problem.
>
> **REKHA MIRASHE,** SPPU student

Last year, from October 12, 2020, SPPU started its final year exams for 3,300 subjects for which 2.5 lakh students enrolled. From the first day onwards both online and offline students faced a lot of issues while appearing for the exam and it even continued in the results.

For the offline exams, 113 centres were identified where physical exams were conducted in Pune, Nashik and Ahmednagar districts. These exams were 50 marks with multiple-choice questions (MCQ) for a one-hour duration.

Now the students have started preparing for the examination which is starting from April 11.

Rekha Mirashe, another student said, "It was quite a good experience to appear for the mock test examination today, there was not much problem."

Hindustan Times
6.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## ...तर नेट, सेट पात्रताधारक विद्यापीठ पदभरतीपासून वंचित

### १ जुलैपासून 'पीएच.डी.'ही अनिवार्य

**देवेश गोंडाणे, लोकसत्ता**



**नागपूर** : केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्रालय आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) अधिसूचनेनुसार, १ जुलै २०२१ पासून विद्यापीठात सहायक प्राध्यापक पदाकरिता नेट, सेट सोबतच पीएच.डी.सुद्धा अनिवार्य करण्यात आली आहे. सध्या राज्यातील संपूर्ण विद्यापीठात जवळपास ५० टक्के म्हणजेच सुमारे १५०० सहायक प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. प्राध्यापक भरतीही बंद आहे. नेट, सेटसह पीएच.डी. पात्रताधारकांची संख्या बोटावर मोजण्याइतकीच आहे. त्यामुळे वेळेत पदभरती न झाल्यास अनेक नेट, सेट पात्रताधारक केवळ पीएच.डी. नसल्याने विद्यापीठांमधील पदभरतीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

'यूजीसी'कडून वारंवार राज्य शासनाला सहायक प्राध्यापकांची पदे भरण्याची सूचना दिली जात आहे. परंतु त्याला राज्य शासनाकडून केराची टोपली दाखवली जात आहे. आर्थिक परिस्थितीचे कारण पुढे करून प्राध्यापकांची पदे भरण्याचे टाळले जात आहे. परंतु, प्राध्यापकांच्या वेतनाचा ५० टक्के वाटा हा यूजीसीकडून दिला जातो. त्यामुळे राज्य शासनावर प्राध्यापकांच्या वेतनाचा पूर्ण भुर्दंड बसत नाही. असे असतानाही प्राध्यापक पदभरती का होत नाही, हा सवाल पात्रताधारक उपस्थित करीत आहेत. याउलट उच्च शिक्षण विभाग व वित्त विभाग मात्र कायमस्वरूपी स्थायी प्राध्यापकांबाबत उदार असल्याचे दिसून येते. राज्य शासनाने नुकताच प्राचार्य पदभरती संदर्भात शासन निर्णय जाहीर करीत प्राचार्य पदभरतीसाठी अनेक निर्बंध रद्द केले आहेत. या शासन निर्णयात नॅक मूल्यांकनासाठी आणि शैक्षणिक कामकाज पार पाडण्यासाठी प्राचार्यपद भरणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मग वर्गात शिकवण्यासाठी प्राध्यापकांची आवश्यकता नाही का, असा सवाल पात्रताधारक करीत आहेत.

> आम्ही सहा वर्षांपासून सहायक प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरण्याची मागणी करीत आहोत. प्रत्येकवेळी शासनाकडून खोटे आश्वासनच मिळाले. नव्या नियमाने अनेकांची पात्रता जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने तत्काळ भरतीचा आदेश काढावा. अन्यथा, आम्हाला राज्यभर उपोषण केल्यावाचून पर्याय राहणार नाही.
>
> – डॉ. रवी महाजन, सचिव, महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटना.

### संघटनांची भूमिकाही संशयास्पद

वरिष्ठ महाविद्यालयांमधील प्राध्यापकांचे नेतृत्व करणाऱ्या एम.फुक्टो, राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ, नुटा, बानुक्टा या संघटना प्राध्यापक पदभरतीविषयी आक्रमक पवित्रा घेताना दिसत नाहीत. केवळ स्थायी प्राध्यापकांचे हित जोपासण्यासाठीच त्या सदैव तत्पर असतात. तसेच या संघटनांच्या वतीने केवळ तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्त्यांची मागणी केली जाते. कारण, बऱ्याच महाविद्यालयात तासिका प्राध्यापकांना स्थायी प्राध्यापकांची सर्व कामे वेठबिगार कामगाराप्रमाणे करावी लागतात. त्यामुळे तासिका नियुक्तीसाठीच या संघटनांचा आग्रह असतो, असा आरोप नवप्राध्यापक संघटनेने केला आहे.

लोकसत्ता Tue, 06 April 2021 https://epaper.loksatta.com/c/!

## Day 1 sees 62% students take SPPU mock test

**Most called the test straightforward; others felt no need to sit through the online process**

PICS MAHENDRA KOLHE

| Salonee Mistry
punemirror.feedback@gmail.com

TWEET @ThePuneMirror

The first day of the Savitribai Phule Pune University's (SPPU) mock examinations held on Monday for the science and engineering streams saw close to 62 per cent students take the test with the rest opting to stay away as "they felt no need for it".

The mock examinations are being held to familiarise students with the online testing system prior to the semester exams. These exams are a run-through of the proctored exam for the first to last years and will continue till April 9.

Of the 1,10,017 students expected to sit for the test, 88,866 were degree students, 18,235 post-graduate students and 2,916 post-graduate diploma students. Only 68,470 students in total attempted the mock exam, making it a percentage turnout of 62.24 per cent.

Engineering student Karan Shingare (21) told *Mirror* that he did not feel the need to give the examination. "The circular sent to us was self-explanatory. Moreover, the questions had nothing to do with my actual syllabus and I didn't feel the need to take the mock test," he said.

He feels these tests are good as long as students do not use it to figure out ways to cheat in the actual online exam. The 50-mark mock examination comprises 60 questions around general knowledge, COVID pandemic and aptitude tests with one successful submission per student.

FILE PHOTO



The tests will familiarise students with the online testing system prior to semester exams

Engineering student Amit Bawankar (21), who attempted the exam, said the experience was moderate. "The website is simple to navigate. The only problem sometimes is the network issues, thus a stable tinternet connection is a must," he told *Mirror*. "I took the exam to figure out the system. It is a safe way to avoid problems later," he added.

The technical venture had its set of complications. Chief examiner, SPPU, Mahesh Kakade, said, "There are over 350 complaints of students not getting passwords, since many had not registered their credentials. We will resolve the issue."

Pune Mirror 6.4.2021

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

## नियमबाह्य नियुक्त्यांमुळे आरक्षणाची पायमल्ली

प्रभात वृत्तसेवा

**यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांना फाटा देत विद्यापीठ फंडातील पैशांची लूट**

**नियुक्त्या रद्द करण्यासह लुट थांबवण्याची विद्यापीठ अधिसभा सदस्यांची मागणी**

**पुणे, दि. ६ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाने गेल्या काही वर्षांत केलेल्या विशेष प्राध्यापकांच्या नियुक्त्या या बेकायदेशीर असून आरक्षणाची पायमल्ली करणारी आहे. यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांना फाटा देत विद्यापीठ फंडातील पैशाची लूट होत आहे. त्यामुळे या नियमबाह्य नियुक्त्या तत्काळ रद्द कराव्यात, अशी मागणी विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी केली.

विद्यापीठाकडे असणाऱ्या सुमारे साडेपाचशे कोटी रुपयांच्या ठेवी गेल्या वर्षात सव्वातीनशे कोटीपर्यंत खाली आल्या आहेत. विद्यापीठाची दरवर्षी तब्बल ६० कोटी रुपये विद्यापीठ फंडातून नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च होतो. विद्यापीठाची आर्थिक परिस्थिती खालावली आहे. त्यामुळे विद्यापीठ फंडातून होणारी पैशांची लूट थांबविणे गरजेचे आहे. विद्यापीठातील पदे भरायची असतील तर ती जाहिरात प्रसिद्ध करून सामाजिक आरक्षणाची अंमलबजावणी करून आणि तरुण व गरजू व्यक्तींना संधी देऊन करणे योग्य ठरेल, असे विद्यापीठ अधिसभा सदस्य शशिकांत तिकोटे, संतोष ढोरे आणि दादाभाऊ सिनलकर, अभिषेक बोके यांनी स्पष्ट केले.

प्रभात Wed, 07 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/

लोकमत

## विद्यापीठ फंडातून केलेल्या नियुक्त्या रद्द करा

### अधिसभा सदस्यांची मागणी : पैशांची होतेय लूट

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाने गेल्या काही वर्षांत केलेल्या विशेष प्राध्यापकांच्या नियुक्त्या या बेकायदेशीर आहे. आरक्षणाची पायमल्ली करणाऱ्या, यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांना फाटा देणाऱ्या आणि विद्यापीठ फंडातील पैशाची लूट करणाऱ्या ठरत आहेत. त्यामुळे या नियुक्त्या तत्काळ रद्द कराव्यात, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली आहे.

विद्यापीठाकडे असणाऱ्या सुमारे साडेपाचशे कोटी रुपयांच्या ठेवी गेल्या ४ वर्षात सव्वा तीनशे कोटींपर्यंत खाली आल्या आहेत. विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार दर वर्षी तब्बल ६० कोटी रुपये विद्यापीठ फंडातून नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च होत आहेत. काही कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या या कोणतीही जाहिरात प्रसिद्ध न करता केल्या आहेत. विद्यापीठाची आर्थिक परिस्थिती खालावली असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यामुळे विद्यापीठ फंडातून केली जाणारी पैशांची लूट थांबविणे गरजेचे आहे.

तसेच यातून होणारी विद्यापीठाची आर्थिक लूट थांबवावी, अशी मागणी विद्यापीठ अधिसभा सदस्य शशिकांत तिकोटे, संतोष ढोरे आणि दादाभाऊ शिनलकर, अभिषेक बोके यांनी केली आहे.

Pune Main
Page No. 2 Apr 07, 2021
Powered by: erelego.com

## 'शारीरिक शिक्षण' परीक्षेबाबत शिक्षकांमध्ये संभ्रम

प्रभात वृत्तसेवा

**राज्य मंडळाकडून लवकरच मार्गदर्शक सूचना जारी होणार**

**पुणे, दि. ६ -** इयत्ता बारावीच्या शारीरिक शिक्षण विषयाची परीक्षा कशी घ्यायची याबाबत कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये संभ्रमावस्था आहे. ती दूर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून लवकरच मार्गदर्शक सूचना जारी होणार आहेत.

दहावी, बारावीच्या परीक्षा यंदा एप्रिल-मेमध्ये होणार असून त्याचे वेळापत्रकही जाहीर झाले आहे. राज्य मंडळाने लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. मात्र, शारीरिक शिक्षण विषयांबाबत प्राचार्य, शिक्षकांपुढे पेच निर्माण झाला आहे.शारीरिक शिक्षण विषयाला ५० गुण असणार आहेत. त्यात २५ गुणांची लेखी आणि २५ गुणांची मैदानी चाचणी घेतली जाते. यंदा करोना निर्बंधामुळे मैदानी चाचणी घेण्याबाबत अडचणी निर्माण झाल्या आहेत. परीक्षा घेतल्यावर त्याचे मूल्यामापन करून गुणदान कसे करायचे याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. राज्य मंडळाने या परीक्षेबाबत मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, अशी मागणीही शिक्षकांकडून होत आहे.

राज्य मंडळाने शिक्षकांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करून मागच्या आठवड्यात युट्युबद्वारे तज्ज्ञांचे मार्गदर्शनही उपलब्ध करून दिले होते. मात्र यावेळी पुरेसे प्रश्न, शंका मांडण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. या प्रशिक्षणातून फारसे काहीच समाधानकारक चित्र पुढे आले नाही, असे शिक्षकांचे म्हणणे आहे. जमावबंदीबरोबरच लॉकडाऊन असल्याने विद्यार्थ्यांना मैदानी चाचणीसाठी शाळा, महाविद्यालयात बोलावणे योग्य ठरणार आहे का? विद्यार्थी उपस्थित राहतील का? असे अनेक प्रश्न शिक्षकांना पडले आहेत. प्रशिक्षणात सुमारे एक हजार शिक्षकांनी सहभाग नोंदविला होता. यात बऱ्याच शिक्षकांनी प्रश्न विचारले. त्यावर तज्ज्ञांकडून उत्तरेही देण्यात आली आहेत. आता एक-दोन दिवसात शारीरिक शिक्षण विषयाची परीक्षा घेण्याबाबत खास सूचना राज्यमंडळाकडून संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यादृष्टीने कामकाज सुरू आहे, असे राज्य मंडळातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

प्रभात Wed, 07 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/59604561

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

## उजळणी, लेखनाचा सराव करा

### दहावी-बारावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून टिप्स

पुणे, ता. ६ : तुम्ही दहावी किंवा बारावी बोर्डाच्या परीक्षेची तयारी करत आहात का! अहो, मग जरा इकडे लक्ष द्या. बोर्डाच्या परीक्षेची तुमची तयारी सध्या अंतिम टप्प्यात असेल बरोबर ना ! मग, या वेळेत तुम्हाला काय करायला हवे, याबाबत खुद्द शिक्षकच तुम्हाला सांगत आहेत.

राज्यात इयत्ता दहावी आणि बारावीत असणारे जवळपास ३० लाखांहून अधिक विद्यार्थी गेल्या वर्षभरापासून बहुतांश ऑनलाइन माध्यमातून अभ्यास करत आहेत. तर काही विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाइन शिक्षण पोचू न शकल्याने त्यांना शिक्षकांनी दिलेल्या ऑफलाइन शिक्षणावर अवलंबून राहावे लागले. मात्र, आता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत एप्रिल-मे २०२१ मध्ये घेण्यात येणारी दहावी-बारावीची परीक्षा काही दिवसांवर आली आहे. त्यामुळे हे विद्यार्थी अंतिम टप्प्यातील तयारी करत आहेत. परीक्षा काही दिवसांवर आली असताना नेमका कसा आणि काय-काय अभ्यास करायचा, याबद्दल शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत.

**पालकांना सूचना**

- परीक्षेचे दडपण मुलांवर टाकू नका.
- घरातील वातावरण प्रसन्न आणि मोकळे ठेवा.
- कोरोनाचा संसर्ग आणि उन्हाचा कडाका वाढत असल्याने मुलांच्या आरोग्याची काळजी घ्या.
- मुलांच्या आहाराकडे विशेष लक्ष द्या.
- परीक्षेच्या काळात मुले तणावमुक्त राहतील, यासाठी त्यांच्याशी सातत्याने संवाद साधा.

**वेळेत प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करा**

परीक्षा जवळ आली असताना अंतिम टप्प्यात विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तक नीट आणि पुन्हा-पुन्हा वाचायला हवे. बोर्डाच्या परीक्षेत प्रश्नपत्रिकेएवजी कृतिपत्रिका असतात. त्यामुळे पाठ्यपुस्तकातील धडा समजून घेऊन, त्यावर विचारलेल्या प्रश्नांवर लिहिणे अपेक्षित असते. त्यामुळे कोणत्याही गाइड किंवा सेल्फ स्टडीपेक्षा पाठ्यपुस्तक वाचले पाहिजे. तसेच, शिक्षण विभागाने दिलेल्या प्रश्नपेढीतील (क्वेश्चन बँक) प्रश्न वेळेत सोडविण्याचा सराव हवा. ही प्रश्नपेढी खूप अभ्यासपूर्ण असल्याने त्याचा विद्यार्थ्यांनी आवर्जून वापर करावा, असे कोथरूडमधील बाल शिक्षण मंदिर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका गीतांजली बोधनकर यांनी सांगितले.

**परीक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांनी अंतिम टप्प्यात लक्ष देऊन आतापर्यंत शिकविलेल्या अभ्यासाची उजळणी करायला हवी. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षभरात अनेक विद्यार्थी शाळेत गेलेले नाहीत. त्यामुळे लिखाणाची सवय सुटली असण्याची शक्यता आहे. त्यामुळे वेळेत लिखाण पूर्ण करण्याचा जास्तीत जास्त सराव करावा. त्याचप्रमाणे दिवसभरात किमान तीन-चार तास तरी नियोजनबद्धपणे अभ्यास करायला हवा. परीक्षा जवळ येईल, तसा हा वेळ वाढवत न्यावा.**

**- रोहिदास भारमळ,**

मुख्याध्यापक, भावे प्रशाला

Sakaal 7.4.2021

## दहावी, बारावी परीक्षांच्या निर्णयाबाबत विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता

प्रभात वृत्तसेवा




**पुणे**, दि. ६ - इयत्ता दहावी, बारावीची परीक्षा नियमित वेळापत्रकानुसार होणार की लांबणीवर पडणार याबाबत शासनाच्या निर्णयाबाबत पालक, विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्य मंडळातर्फे दहावी, बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. त्यानुसार बारावीची परीक्षा २३ एप्रिल ते २१ मे आणि दहावीची २९ एप्रिल ते २० मेदरम्यान होणार आहे. मात्र, राज्यात पुन्हा मिनी लॉकडाऊन जाहीर झाल्याने या परीक्षांचे काय होणार, असा संभ्रम निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी ऑनलाइनद्वारे मंगळवारी बैठक घेतली. त्यात विविध विषयांवर चर्चा झाली. यावेळी अप्पर मुख्य सचिव वंदना कृष्णा, शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी, राज्य मंडळाचे अध्यक्ष दिनकर पाटील, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक दत्तात्रय जगताप, विद्या प्राधिकरणाचे संचालक दिनकर टेमकर आदींनी सहभाग घेतला. बैठकीत चर्चा झाली मात्र अंतिम निर्णय झाला नाही. राज्य मंडळाकडून परीक्षा तयारीची माहिती बैठकीत देण्यात आली. ऑफलाइनद्वारे व ठरलेल्या वेळापत्रकानुसारच परीक्षा घेणेच सोयीचे ठरणार आहे. करोनामुळे काही विद्यार्थ्यांना परीक्षा देता न आल्यास संबंधितांना पुन्हा संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यास केलेला असल्यामुळे परीक्षा लांबणीवर टाकल्यास पुढील सर्व नियोजन कोलमडण्याची शक्यता आहे. याबाबी अधिकाऱ्यांकडून बैठकीत मांडण्यात आल्या. ऑनलाइन परीक्षा आता कोणत्याही परिस्थितीत घेणे शक्य होणार नसल्याचेही स्पष्ट केले.

**नववी, अकरावीबाबत आज निर्णय**

इयत्ता पहिली व आठवीच्या परीक्षा न घेता सरसकट पास करून पुढच्या वर्गात प्रमोट करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानंतर आता इयत्ता नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांचे काय करायचे यावरही बैठकीत चर्चा झाली. या विद्यार्थ्यांनाही सरसकट पास करायचे की वर्षभरातील मूल्यमापनावर निकाल जाहीर करायचा याबाबत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून सविस्तर प्रस्ताव शासनाने मागविला आहे. त्यानुसार तो शासनाला तत्काळ पाठविण्यात येणार आहे. त्यावर शासनाकडून आज निर्णय होण्याची शक्यता आहे.

प्रभात Wed, 07 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/59611614

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

## ९४ हजार विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाइन सराव परीक्षा

**पुणे, दि. ६ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाइन सराव परीक्षेच्या दुसऱ्या दिवशी एकूण ९४ हजार विद्यार्थ्यांनी हजेरी लावली. तांत्रिक अडचणीची किरकोळ अपवाद वगळता ही परीक्षा मंगळवारी सुरळीत झाल्याचा दावा विद्यापीठाने केला आहे. विद्यापीठाची प्रथम वर्ष ते अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. त्यापूर्वी दि. ५ ते ९ एप्रिलदरम्यान सराव परीक्षा घेतली जात आहे. पहिल्याच दिवशी सराव परीक्षा देताना तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले. मात्र, दुसऱ्या दिवशी सराव परीक्षा योग्य पद्धतीने झाली. मंगळवारी वाणिज्य शाखेच्या सराव परीक्षेसाठी १ लाख ४१ हजार ८०८ विद्यार्थी अपेक्षित होते. त्यापैकी एकूण ९४ हजार ०८४ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली. त्यात पदवीचे ८७ हजार ९८५, तर पदव्युत्तरच्या ६ हजार १०२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यापैकी पहिल्या दिवशी पासवर्ड न मिळणे, अन्य कारणांनी परीक्षा चुकलेल्या ६ हजार ५०० विद्यार्थ्यांना मंगळवारी परीक्षा देण्याची संधी मिळाली.

दरम्यान, अजूनही काही विषयांचे वेळापत्रक प्रसिद्ध झालेले नाही, अशी विद्यार्थ्यांची तक्रार आहेत. संपूर्ण वेळापत्रक रात्री उशिरापर्यंत प्रसिद्ध केले जाणार असल्याचे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले. सद्य:स्थितीत सराव परीक्षा सुरळीत होत असल्याने विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

प्रभात Wed, 07 Ap https://ep

## नववी, अकरावीचे सर्व विद्यार्थी पुढील वर्गात?

### अंतर्गत मूल्यमापनाआधारे निकाल जाहीर करण्याचा प्रस्ताव विचाराधीन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश दिल्यानंतर आता नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांनाही पुढील वर्गात प्रवेश देण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाच्या विचाराधीन आहे. अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे या विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्यात येतील. मात्र, विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करून आधीच्याच वर्गात बसवता येणार नाही.

गेल्या वर्षी परीक्षेच्या सुमारास सुरू झालेला करोनाचा प्रादुर्भाव यंदाही परीक्षांच्या तोंडावर (पान २ वर)

### दहावी, बारावीच्या परीक्षेवर मात्र शिक्षण विभाग ठाम

शासनाने लागू केलेले निर्बंध, करोनाचे वाढते रुग्ण यांमुळे दहावी आणि बारावीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात, रद्द करण्यात याव्यात अशा मागण्या पालक करत अहेत. मात्र, ठरलेल्या वेळापत्रकानुसारच परीक्षा घेण्याबाबत शिक्षण विभाग ठाम आहे. या परीक्षांबाबत शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी विभागातील अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्या वेळी विविध पर्यायांबाबत चर्चा करण्यात आली. परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच होणार असून राज्यमंडळाची तयारीही अंतिम टप्प्यात आहे. त्याचप्रमाणे जे विद्यार्थी परीक्षा देऊ शकणार नाहीत, त्यांना जूनमध्ये अजून एक संधी देण्यात येणार आहे, असे विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

लोकसत्ता Wed, 07 April 2021 https://epaper.loksatta.com/c/59617500

## नववी, अकरावीचे सर्व विद्यार्थी पुढील वर्गात?

*(पान १ वरून)* बळावला आहे. त्यामुळे पुन्हा परीक्षांबाबत शिक्षण विभागासमोर पेच निर्माण झाला आहे. पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा रद्द करून त्यांना सरसकट पुढील वर्गात प्रवेश देण्याचा निर्णय विभागाने नुकताच जाहीर केला. त्यानंतर नववी आणि अकरावीच्या वर्गांबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले. या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे सद्य:स्थितीत शक्य नाही. विभागाने यापूर्वी विविध घटकांची मते जाणून घेतली असता या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यास विरोध दर्शवला होता. त्यानुसार आता नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांचे निकाल अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे जाहीर करण्याची परवानगी देण्याचे विभागाच्या विचाराधीन आहे.

गेल्या वर्षीही नववी, अकरावीच्या विद्यार्थ्यांचे निकाल अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे जाहीर करण्यात आले होते. मात्र, त्या वेळी काही शाळांनी विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर अनुत्तीर्ण केले. जे विद्यार्थी अंतर्गत परीक्षा देऊ शकले नव्हते त्यांनाही या निर्णयाचा फटका बसला. त्याचप्रमाणे शुल्क भरले नाही म्हणून शाळा अनुत्तीर्ण करत असल्याच्या तक्रारीही विभागाकडे आल्या होत्या. त्यामुळे यंदा विद्यार्थ्यांचे मूल्यांकन केले तरीही विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करून त्याच वर्गात बसवण्यात येऊ नये, असाही निर्णय घेण्याचे विभागाच्या विचाराधीन आहे.

**अकरावीचे शैक्षणिक वर्ष आताच सुरू**

अकरावीची प्रवेश प्रक्रिया जानेवारीपर्यंत सुरू होती. त्यामुळे या विद्यार्थ्यांना अवघ्या दोन-तीन महिन्यांत परीक्षेला बसवायचे का, असा प्रश्न शिक्षकांनी उपस्थित केला आहे. ऑनलाइन वर्गात अद्याप पन्नास ते साठ टक्केच अभ्यासक्रम पूर्ण झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू ठेवून अभ्यासक्रम पूर्ण करावा आणि त्यानंतर शाळा, महाविद्यालयांना मूल्यांकन करण्याची मुभा द्यावी, असे मत एका कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्यांनी व्यक्त केले.

लोकसत्ता Wed, 07 April 2021 https://epaper.loksatta.com/c/59622838

## *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

# महाविद्यालय यंदासुद्धा 'ऑनलाइन'

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ७ -** करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने महाविद्यालयातील नियमित वर्ग ३० एप्रिलपर्यंत बंदच राहणार आहेत. मात्र, या कालावधीत ऑनलाइन अध्यापन सुरू राहणार आहे.



गेल्या वर्षभरापासून करोनामुळे शाळा, महाविद्यालये बंद आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलंग्रित पुणे, नाशिक, अहमदनगर या जिल्ह्यांमध्ये अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालये आहेत. शासनाने दिलेल्या आदेशानुसार ३१ मार्चपर्यंत महाविद्यालयातील प्रत्यक्ष अध्यापनाचे वर्ग बंद ठेवले होते. आता पुन्हा ही मुदत वाढवली आहे.

**महाविद्यालयातील नियमित वर्ग ३० एप्रिलपर्यंत बंदच**

विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग व संलग्रित महाविद्यालये, परिसंस्था यांना शासनाने तसेच महापलिका आयुक्तांनी दिलेल्या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी लागणार आहे. याबाबत विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाच्या उपकुलसचिवांनी सूचना दिल्या आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाइनच घेण्याचे नियोजन केले आहे. सराव परीक्षाही ऑनलाइन सुरू आहेत.

प्रभात Thu, 08 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/59644709

### दहावी-बारावी परीक्षांतील गुणवंतांच्या पालकांचा पालिकेकडे तगादा

# शैक्षणिक वर्ष संपले, तरी शिष्यवृत्ती मिळेना

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ७ -** शहरातील दहावी-बारावीच्या गुणवंतांना महापालिका शैक्षणिक अर्थसहाय योजनेतील (शिष्यवृत्ती) रकमेचे अजूनही वाटप केलेले नाही. मागील वर्षी करोनामुळे हे अर्ज उशिरा मागवले होते. अर्ज भरण्यासाठी २८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यामुळे अर्ज येण्यास उशीर झाल्यान योजनेची बिले तयार करण्याचे काम सुरू असल्याचे पालिका प्रशासनाने म्हटले आहे.




दहावीतील- १०,५४२ तर बारावीतील गुणवंतांचे ३,३३८ अर्ज आले आहेत.

महापालिकेकडून शहरातील दहावी-बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना दहावीसाठी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक अर्थसहाय योजनेअंतर्गत प्रत्येकी १५ हजार रुपयांचे, तर बारावीसाठी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शैक्षणिक अर्थसहाय योजनेसाठी २५ हजारांची शिष्यवृत्ती दिली जाते. त्यासाठी गुणांची अट असते. दरवर्षी ऑगस्टमध्ये महापालिकेकडून या शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागवण्यात येतात. त्यानंतर डिसेंबर ते जानेवारीपर्यंत मुलांच्या खात्यात 'डीबीटी'द्वारे ती दिली जाते. मात्र, मागचे संपूर्ण वर्षच करोनात गेल्याने महापालिकेने डिसेंबरमध्ये या योजनेसाठी अर्ज मागवले. त्याला मुदतवाढही दिली होती. अकरावीचे प्रवेश १२ वी नंतरचे प्रवेश लांबल्याने ही मुदतवाढ देण्यात आली होती.

> या शिष्यवृत्तीची रक्कम थेट मुलांच्या खात्यात जमा करण्यास १५ एप्रिलपासून सुरूवात केली जाणार आहे. यासाठी जी बिले तयार आहेत, ती लेखापाल विभागाकडून तपासण्यात येत आहेत. त्यांची मान्यता मिळताच तातडीने शिष्यवृत्ती वितरण केले जाईल.
>
> **-रंजना गगे,** उपायुक्त, समाज विकास विभाग, मनपा

प्रभात Thu, 08 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/59644761

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## नववी आणि अकरावीचे विद्यार्थी परीक्षेविना उत्तीर्ण

**मुंबई** : कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे राज्यातील नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांना थेट पुढील वर्षात प्रवेश दिला जाणार आहे. या विद्यार्थ्यांची परीक्षा न घेण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. मात्र, दहावी आणि बारावीची परीक्षा ऑफलाइनच होणार आहे. या परीक्षांच्या वेळापत्रकाबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून पुढील दोन दिवसांत निर्णय घेतला जाणार आहे. याआधी, पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना कोणतीही परीक्षा न घेता पुढच्या वर्गात प्रवेश दिला जाणार आहे, अशी घोषणा शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी केली होती. मात्र, नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेसंदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता. या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतली जाणार असल्याची चर्चा सुरू होती. पण, या सर्व चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षांबाबत काय होणार याबाबत अद्यापही विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रम होते. या परीक्षा ऑफलाईनच होणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

**दहावी, बारावीची परीक्षा ऑफलाइनच**

Kesari 8.4.2021

## नववी, अकरावीचे विद्यार्थीही सरसकट पास

**पुणे, दि. ७ (प्रभात वृत्तसेवा)** - करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या पाठोपाठ आता इयत्ता नववी आणि अकरावीच्या सरसकट सर्व विद्यार्थ्यांना पास करून वर्गोन्नती देण्यात येणार आहे. यावर राज्य शासनाकडून अंतिम शिक्कामोर्तब लवकरच होणार आहे.

राज्यात करोना रुग्णांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. वर्षभरापासून विद्यार्थ्यांच्या शाळा, महाविद्यालये बंदच आहेत. ऑनलाइन पद्धतीने अध्ययन व अध्यापन प्रक्रिया चालू ठेवण्यात आली होती. करोना संक्रमणाची स्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांबाबत संभ्रम निर्माण झाला होता.



पहिली ते आठवीच्या सर्वच विद्यार्थ्यांना पास करून पुढील वर्गात प्रवेश देण्याचा निर्णय शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी जाहीर केला. त्यानंतर नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांबाबत काय निर्णय घ्यायचा याबाबत चर्चा करण्यासाठी शिक्षणमंत्र्यांनी अधिकाऱ्यांची मंगळवारी ऑनलाइन बैठक घेतली. त्यात सर्वांगीण चर्चा झाली. सध्याच्या परिस्थितीत नववी, अकरावीच्या परीक्षा घेणे शक्य नसल्याने या विद्यार्थ्यांना अंतर्गत मूल्यमापन करून सरसकट पास करायचे आहे. मूल्यमापन करताना एकही विद्यार्थी नापास होणार नाही याची खबरदारी घ्यावी लागणार आहे. याबाबत विद्या प्राधिकरणाकडून शासनाकडे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे, अशी माहिती शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांनी दिली आहे.

हा प्रस्ताव मंजूर होणार हे निश्चित असून त्याप्रमाणे नववी, अकरावीच्या विद्यार्थ्यांनाही पुढील वर्गात प्रवेश मिळणार आहे. शासनाकडून मात्र अद्याप अधिकृतपणे हा निर्णयाची घोषणा करण्यात आलेली नाही. मात्र ती लवकरच होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

प्रभात Thu, 08 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/59641051

पुढारी

## 'सेट'चा निकाल जाहीर

### ४ हजार ११४ विद्यार्थी सहा. प्राध्यापक होणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सहायक प्राध्यापकपदासाठी आवश्यक असणाऱ्या राज्य पात्रता परीक्षेचा (सेट) निकाल बुधवारी सायंकाळी जाहीर झाला असून, ६.७३ टक्के उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. उमेदवारांना हा निकाल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ृ.पिळपिश.रल.ळप या वेबसाइटवर पाहता येईल.

पुणे विद्यापीठाकडून महाराष्ट्र आणि गोवा राज्यासाठी २७ डिसेंबर २०२० रोजी सेट परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी एकूण ६१ हजार ११४ उमेदवार प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ४ हजार ११४ विद्यार्थी सहायक प्राध्यापकपदासाठी पात्र झाले आहेत. या उत्तीर्ण उमेदवारांचे प्रमाण ६.७३ टक्के आहे. पात्र उमेदवारांना ई-प्रमाणपत्र १९ एप्रिलपासून डाउनलोड करता येणार आहे.

परीक्षेची उत्तरतालिका अंतिम असून, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार त्याबाबत कोणतीही तक्रार नोंदवता येणार नाही. या निकालाबाबत अधिक माहिती आणि सूचना विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध करण्यात आल्या असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

My Pune Edition
Apr 8, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## दहावी, बारावी परीक्षांच्या पेपरची वेळ बदलावी!

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) - शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील दहावी व बारावीच्या परीक्षा अनुक्रमे २३ एप्रिल व २९ एप्रिलपासून होणार आहेत. दरवर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या या परीक्षा यावर्षी एप्रिल-मे महिन्यात होत आहेत. राज्यभर एप्रिल-मे महिन्यात कडक उन्हाळा असतो. राज्यातील अनेक ठिकाणचे तापमान ४० अंशापेक्षा जास्त असते.

प्रचंड उकाड्यात पेपर लिहिताना शारीरिक त्रास होण्याची शक्यता जास्त आहे. त्याचा विपरित परिणाम विद्यार्थ्यांच्या नंबर गुणांवर होऊ शकतो. अशा परिस्थितीत सकाळी लवकर परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यामुळे बारावी आणि दहावीच्या परीक्षांच्या पेपरची वेळ बदलणेबाबत शिक्षक भारती संघटनेने शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांना पत्र दिल्याची माहिती शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी दिली आहे.

Saamana 8.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

मटा अँकर **शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांचा निर्णय; मार्गदर्शक सूचना लवकरच जाहीर होणार**

## नववी, अकरावीचे विद्यार्थीही जाणार पुढील वर्गात

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

करोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे राज्यातील नववी आणि अकरावीच्या परीक्षा घेणे शक्य नसल्याचे सांगून शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी बुधवारी या दोन्ही इयत्तांतील विद्यार्थ्यांना परीक्षेविना पुढील वर्गात पाठविण्याचा निर्णय घेतला. याबाबत मार्गदर्शक सूचना लवकरच जाहीर केल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मागील आठवड्यात पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर राज्यातील पालक आणि शिक्षक संघटनांकडून नववी आणि अकरावीचा निर्णयही तातडीने घ्यावा, अशी मागणी होत होती. यामुळे राज्यातील शिक्षणतज्ज्ञ व सर्व शिक्षण अधिकारी यांची मंगळवारी एक बैठक घेण्यात आली. यामध्ये इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण झाला असला तरी अकरावीची प्रवेश प्रक्रियाच जानेवारी अखेरपर्यंत सुरू असल्याने त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होऊ शकलेला नाही, असे मत या वेळी मांडण्यात आले. याबाबत बुधवारी झालेल्या बैठकीत या विद्यार्थ्यांना वर्गोन्नती देण्यात येणार असल्याचे ठरविण्यात आले.

करोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यात अकरावीच्या प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अनेक कॉलेजांचे ऑनलाइन वर्ग फेब्रुवारी अखेरपर्यंत सुरू झाले नव्हते. त्यामुळे अनेक कॉलेजांमध्ये अकरावीचा अभ्यासक्रम पूर्ण झालेला नाही. पुढील शैक्षणिक वर्षाची सुरुवात होण्यापूर्वी हा अभ्यासक्रम पूर्ण होणार नाही, अशी भीती विद्यार्थ्यांना वाटत होती. त्यामुळे आता या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश मिळणार असल्याने या निर्णयाचे विद्यार्थी संघटनांकडून स्वागत करण्यात आले. या शैक्षणिक वर्षाच्या काळात राज्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. यासाठी येणाऱ्या कालावधीमध्ये पुढील शैक्षणिक वर्षांमध्ये मागील वर्षातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत कार्यक्रम आखण्यात येईल व त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकडे सरकार विशेष लक्ष देईल, अशी ग्वाही देखील शिक्षणमंत्र्यांनी दिली. राज्यातील प्रत्येक विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेईल यासाठी आपण निश्चितच कटिबद्ध राहू या, असे प्रतिपादन प्रा. वर्षा गायकवाड यांनी केले आहे.



### विद्यार्थ्यांना होणार लाभ

राज्य सरकारने इयत्ता नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. याचा फायदा इयत्ता नववीतील १७ लाख ९७ हजार ६५५, तर अकरावीतील सुमारे १३ लाख २२ हजार ३८६ विद्यार्थ्यांना होणार आहे.

### ग्रामीण विद्यार्थ्यांना हवी ऑफलाइन परीक्षा

मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या शहरी भागातून अनेक कामगार कुटुंबीयांसह स्थलांतर करीत आहेत. यामुळे ग्रामीण भागात पुढील काळात करोनारुग्ण वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणूनच वेळेवर परीक्षा व्हावी, असा सूर काही लोक व्यक्त करीत आहेत. राज्यातील अनेक शाळांमध्ये, खेड्यापाड्यांत संगणक व इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे शहरातील विद्यार्थ्यांबरोबर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची तुलना न करता परीक्षा ऑफलाइन घ्यावी, अशी मागणी अनेक लोकप्रतिनिधी, विद्यार्थी संघटना, पालक संघटना यांच्या प्रतिनिधींनी शिक्षणमंत्री गायकवाड यांच्याकडे केली आहे. याबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे समजते.

Maharashtra Times 8.4.2021

## शिक्षकांसाठी मूक प्रणालीचे अभ्यासक्रम

### एआयसीटीई, सीबीएसई यांचा संयुक्त उपक्रम

सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. ७ : शिक्षकांची अध्यापन कौशल्य विकसित व्हावे, नवनवीन तंत्रज्ञानाची ओळख त्यांना व्हावी, यातून विद्यार्थ्यांपर्यंत हे नवे तंत्रज्ञान पोचावे यासाठी अखिल भारतीय तंत्रज्ञान परिषद (एआयसीटीई) आणि केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) या नियामक संस्था एकत्र आल्या आहेत. यामुळे शिक्षकांना प्रशिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांनाही 'मूक' (मॅसिव्ह ऑनलाइन ओपन कोर्स) प्रणालीद्वारे काही ऑनलाइन अभ्यासक्रम देखील पूर्ण करता येणार आहेत.

तंत्रज्ञानाची प्रगती झपाट्याने होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग यांसारखे तंत्रज्ञान विकसित झाले आहे. त्याची माहिती सध्याच्या विद्यार्थ्यांना मिळाली पाहिजे. परंतु ही माहिती शिक्षकांना असेल, तरच ती विद्यार्थ्यांपर्यंत पोचू शकते. त्यादृष्टीने 'सीबीएसई'च्या शिक्षकांना कालसुसंगत प्रशिक्षण मिळावे, या उद्देशाने 'एआयसीटीई' आणि 'सीबीएसई' यांच्यात आज सामंजस्य करार झाला आहे. त्यानुसार विविध उपक्रम चालविले जाणारा आहेत. त्याचा लाभ शिक्षकांबरोबर विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा रुंदावण्यासाठी उपयोग होणार आहे.




एआयसीटीईचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे याबाबत 'सकाळ'ला सांगितले, की नवीन तंत्रज्ञानासंबंधीचे विषय शिक्षकांना माहीत झाले, तर विद्यार्थ्यांना ते शिकवू शकतात. त्यासाठी त्यासाठी त्याच प्रशिक्षण आवश्यक आहे. ते आम्ही देणार आहोत. तसेच वेगवेगळे व्यावसायिक अभ्यासक्रम आहेत, विविध क्षेत्रातील संधी शिक्षकांना माहिती असणे आवश्यक आहे.

### चांगले विद्यार्थी येतील

नवे तंत्रज्ञान आणि तांत्रिक विषयांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी काही सोपे अभ्यासक्रम एआसीटीई तयार करीत आहे. विद्यार्थ्यांना ते मूक पद्धतीने शिकता येतील. यातून विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी विषयांची गोडी निर्माण होईल, विषयाचे ज्ञान त्यांना होईल. यामुळे अभियांत्रिकी शाखांकडे येणारे विद्यार्थी चांगल्या गुणवत्तेचे येतील, हादेखील या कराराचा उद्देश आहे, असे डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी स्पष्ट केले.

Sakaal 8.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## नववी, अकरावीचे सर्व विद्यार्थी पुढील वर्गात

**मुंबई :** करोनाच्या परिस्थितीचा विचार करून शालेय शिक्षण विभागाने राज्यमंडळाशी संलग्न असणाऱ्या शाळांमधील नववी आणि अकरावीच्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्गात वर्गोन्नती देण्याचा निर्णय घेतला असल्याचे शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी बुधवारी स्पष्ट केले.

महाराष्ट्रातील करोना रुग्णांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. वर्षभरात विद्यार्थ्यांच्या शाळा बंद होत्या. पण शाळांमध्ये ऑनलाइन पद्धतीने अध्ययन व अध्यापन प्रक्रिया चालू होती. या काळात शिक्षकांनी अंतर्गत मूल्यमापनही केले आहे. मात्र, सद्यःस्थितीत परीक्षा घेणे शक्य नसल्याने नववी आणि अकरावीच्या सर्व विद्यार्थ्यांना सरसकट पुढील वर्गात प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे गायकवाड यांच्याकडून सांगण्यात आले.

त्याचबरोबर या शैक्षणिक वर्षात राज्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. ते भरून काढण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणेमार्फत कार्यक्रम आखण्यात येत असून, विद्यार्थी पुढील वर्गात गेले तरी त्यांची आधीच्या वर्गातील अभ्यासक्रमाची उजळणी घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

लोकसत्ता Thu, 08 https:/

## विद्यापीठातील विशेष प्राध्यापकांची नियुक्ती रद्द करा

### नियमांचे पालन करून प्रक्रिया राबवा; अधिसभा सदस्यांची कुलगुरूंकडे मागणी

**पुणे, ता. ७ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांचीच पुन्हा विशेष प्राध्यापक म्हणून नियुक्त्या केल्या जात आहेत. त्या करताना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) नियमांचे पालन होत नाही. शिवाय लाखो रुपये पगारावर खर्च होत असल्याने विद्यापीठ फंडाला गळती लागली आहे. त्यामुळे बेकायदेशीर नियुक्त्या रद्द कराव्यात, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे केली आहे.

पुणे विद्यापीठाकडे असणाऱ्या सुमारे साडेपाचशे कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. गेल्या ४ वर्षात या ठेवी सव्वा तीनशे कोटींपर्यंत खाली आल्या आहेत. राज्य शासनाने भरती थांबविल्याने विद्यापीठातील प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत, त्यामुळे फंडातील रक्कम वापरून प्राध्यापक भरती केली जाते. दरवर्षी ६० कोटी रुपये विद्यापीठ फंडातून नियुक्त केलेल्या प्राध्यापक, कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च होत आहेत. त्यामुळे विद्यापीठ फंडातून केली जाणारा मोठा खर्च थांबविणे गरजेचे आहे, अशी मागणी विद्यापीठ अधिसभा सदस्य शशिकांत तिकोटे संतोष ढोरे आणि दादाभाऊ सिनलकर, अभिषेक बोके यांनी केली आहे.

विद्यापीठातील पदे भरायची असतील तर ती जाहिरात प्रसिद्ध करून, सामाजिक आरक्षणाची अंमलबजावणी करावी. यामध्ये तरुणांना संधी दिली तर त्यांचे भले होईल. गेल्या काही वर्षात विद्यापीठ फंडातून नियुक्त केलेल्या विशेष प्राध्यापकांच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द कराव्यात, अशी मागणी सदस्यांनी केली आहे.

> **सध्या ३२ विशेष प्राध्यापक आहेत, त्यातील १२ जणांना १ लाख, तर इतरांना ५० हजारांपेक्षा जास्त पगार आहे. हे प्राध्यापक नियुक्त करताना यूजीसीच्या नियमांचे पालन होत नाही. जाहिरात देऊन प्राध्यापक भरती केल्यास तरुणांना संधी मिळेल. सेवानिवृत्त प्राध्यापकांना पुन्हा नियुक्त करून लाखो रुपये पगार देणे योग्य नाही.**
> **- शशिकांत तिकोटे,**
> सदस्य, अधिसभा

Sakaal 8.4.2021

## विद्यापीठाविरोधात 'अभाविप'ची मोहीम

**पुणे, ता. ७ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सराव परीक्षा सुरू झालेल्या असताना त्यात विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या विरोधात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे 'वेकअप एसपीपीयू' ही मोहीम सोशल मीडियावर सुरू केली आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून पुणे विद्यापीठ प्रशासन ऑनलाइन परीक्षांचे नियोजन करीत आहे. या सत्राची मुख्य परीक्षा येत्या १० एप्रिलपासून नियोजित आहे आणि त्यापूर्वी सध्या

**पान ६ वर »**

> **कोरोना या महामारीच्या वातावरणात प्रत्यक्ष आंदोलन करणे योग्य नसले, तरीदेखील विद्यापीठाच्या या कारभारामुळे विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची मानसिकता यामुळे निर्माण होत आहे.**
> - शुभम भुतकर, पुणे महानगर मंत्री, अभाविप

## विद्यापीठाविरोधात 'अभाविप'ची मोहीम

**» पान १ वरून**

सराव परीक्षा घेण्यात येत आहेत. ऑनलाइन सराव परीक्षा देत असताना विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी गरजेचे असलेले लॉगइन आयडी, पासवर्ड अनेक विद्यार्थ्यांना अद्यापही प्राप्त झालेला नाही. प्रश्नांची दिलेली उत्तरे सेव्ह होत नाहीत, विद्यापीठाने दिलेल्या तक्रार निवारण कक्षाचा संपर्क क्रमांकावर संपर्क केला असता विद्यापीठ प्रशासन प्रतिसाद देत नाही, या तक्रारी समजून घेण्यासाठी विद्यापीठाकडून कोणतेही यशस्वी प्रयत्न होताना दिसत नाहीत, या सत्राच्या मुख्य परीक्षेसाठी एक आठवड्याहून कमी कालावधी बाकी असताना अद्यापही काही अभ्यासक्रमांचे वेळा पत्रक जाहीर केले गेले नाही.

### प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न

या सर्व बाबींमुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आणि चिंता वाढत आहे. या अनुषंगाने अभाविप पुणे महानगराच्या वतीने सोशल मीडियावर '#WakeUpSPPU' मोहीम चालवली गेली आणि यात अनेक विद्यार्थ्यांनी सामील होऊन विद्यापीठ प्रशासनाच्या विरोधात रोष व्यक्त केला. विद्यार्थ्यांना येत असणाऱ्या समस्यांबाबत सोशल मीडियावर व्यक्त होऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न या मोहिमेतून करण्यात आला.

Sakaal 8.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## कोरोनाकाळातही शैक्षणिक वर्ष पूर्ण : पोखरीयाल

**पुणे, ता. ८ :** जगातील बऱ्याच देशांमधील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत देशात विद्यार्थी आणि शिक्षकांची संख्या मोठी आहे. कोरोना काळातही आपण डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाइन पद्धतीने शिकवणे चालू ठेवले आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष पूर्ण केले.

देशातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ दिले नाही, असे मत केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. रमेश पोखरीयाल 'निशंक' यांनी व्यक्त केले. सिंबायोसिस इंटरनॅशनल अभिमत विद्यापीठ (एसआययू) आणि असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू) यांच्या संयुक्त विद्यमाने आणि ओब्रेल ग्लोबल इंडिया चॅप्टर आणि द वर्ल्ड बँक यांच्या सहकार्याने 'उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण' विषयावर पाचव्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते.

परिषदेत डॉ. पोखरीयाल प्रमुख पाहुणे म्हणून ऑनलाइन उपस्थित होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे सर्वसमावेशक आणि नावीन्यपूर्ण असल्याचे डॉ. पोखरियाल यांनी सांगितले.

या वेळी बोलताना मंत्री डॉ. पोखरीयाल म्हणाले की, "आता आपण केवळ प्रतिभेचा शोध घेणार नाही, तर त्याचबरोबर दर्जेदार शिक्षण देखील देणार आहोत. संशोधन आणि विकास क्षेत्रांत पुढे जात आहोत. आपल्याकडे जगाला देण्यासाठी अनेक अनोख्या गोष्टी आहेत. त्यामुळे आपण 'स्टडी इन इंडिया' हा प्रोग्रॅम अभ्यास सुरू केला आहे.

या प्रसंगी 'सिंबायोसिस'चे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, डॉ. अनिल कुमार, नीना अर्नोल्ड, डॉ. पंकज मित्तल, 'सिंबायोसिस'च्या प्रधान संचालिका डॉ. विद्या येरवडेकर, विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. रजनी गुप्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

Sakaal 9.4.2021

## पुण्यातील अडीच लाख विद्यार्थी थेट दहावी, बारावीत



नववी व अकरावीचे सरसकट विद्यार्थी उत्तीर्णचा लाभ

पुढच्या वर्षी दहावी-बारावी परीक्षार्थ्यांची संख्या वाढणार

नववी, अकरावीचे राज्यातील ३१ लाख विद्यार्थी पुढच्या वर्गात

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ८ -** करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे राज्य सरकारने पहिली ते आठवी इयत्तांबरोबरच नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षाविना उत्तीर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा पुण्यातील इयत्ता नववीच्या १ लाख ४६ हजार २२९, तर अकरावीच्या १ लाख १६ हजार २७३ असे एकूण २ लाख ६२ हजार ५०२ विद्यार्थ्यांना लाभ होणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करता येत नाही. त्यानंतर इयत्ता नववीमध्ये सुद्धा एखादा विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असल्यास त्याची पुन्हा परीक्षा घेता येते. परंतु, अनेक शाळा दहावीचा निकाल चांगला लागावा, यासाठी अभ्यासक्रमात मागे असलेल्या विद्यार्थ्यांना नापास करीत असल्याचे चित्र आहे. त्यात इयत्ता अकरावीला सुद्धा नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. मात्र राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे यावर्षी सर्वच विद्यार्थी थेट दहावी व बारावीत प्रवेश होऊ शकतात. त्यामुळे पुढच्या वर्षी दहावी-बारावी परीक्षार्थी संख्या वाढणार असल्याचे दिसून येत आहे.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे वर्षभर शाळा बंद होत्या. त्यातच इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन करण्यात येत आहे. यंदा मराठा आरक्षणाच्या निर्णयामुळे इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया उशिरा सुरू झाली. मागील आठवड्यापर्यंत इयत्ता अकरावीचे प्रवेश सुरू होते. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा फारसा अभ्यासक्रम शिकवून झालेला नाही. तरी या विद्यार्थ्यांना आता थेट पुढच्या वर्गात जाण्याची मुभा मिळाली आहे. मात्र, दहावी-बारावीचे महत्त्वाचे वर्ष असल्याने त्याचा पाया म्हणून नववी व अकरावीतील काही विषयाची संकल्पना समजण्यासाठी त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असल्याचे काही प्राचार्यांचे म्हणणे आहे.

राज्यातील सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये २०१९-२० या शैक्षणिक वर्षात इयत्ता नववीच्या १७ लाख ९७ हजार ६५५, तर इयत्ता अकरावीच्या १३ लाख २२ हजार ३८६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षातही साधारणपणे एवढ्याच विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यातील तब्बल ३१ लाख २० हजार विद्यार्थी थेट दहावी व बारावीच्या वर्गात जाणार असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

प्रभात Fri, 09 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/59658502

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

## विद्यार्थी परिषदेतर्फे 'वेकअप एसपीपीयू'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाइन सराव परीक्षांमध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याच्या पार्श्वभूमीवर 'अखिल भारतीय विद्यार्थी परिषदे'कडून (अभाविप) 'वेकअप एसपीपीयू' ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेद्वारे विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्यांबाबत सोशल मीडियावर व्यक्त होऊन विद्यापीठ प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



गेल्या तीन महिन्यांपासून विद्यापीठ प्रशासन ऑनलाइन सत्र परीक्षांचे नियोजन करीत आहे. या परीक्षांना १० एप्रिलपासून सुरुवात होणार आहे. त्यापूर्वी सराव परीक्षा घेण्यात येत आहेत. या सराव परीक्षेत विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी लॉग इन आयडी, पासवर्ड प्राप्त झाले नाहीत; तसेच प्रश्नांची दिलेली उत्तरे सेव्ह होत नाहीत. त्याचप्रमाणे विद्यापीठाने दिलेल्या तक्रारनिवारण कक्षाला संपर्क साधला असता, प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नाही. या तक्रारी समजून घेण्यासाठी विद्यापीठाकडून कोणतेही यशस्वी प्रयत्न होताना दिसत नाहीत.

परीक्षा सुरू होण्याच्या काही दिवस शिल्लक असताना अद्याप काही अभ्यासक्रमांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले नाही. या सर्व बाबींमुळे विद्यार्थ्यांचे संभ्रम आणि चिंता वाढत आहे, या अनुषंगाने अभाविप पुणे महानगराच्या वतीने सोशल मीडियावर '#WakeUpSPPU' ही मोहीम चालवली गेली. या मोहिमेत अनेक विद्यार्थ्यांनी सामील होऊन विद्यापीठ प्रशासनाच्या विरोधात रोष व्यक्त केला, असे अभाविप पुणे महानगर मंत्री शुभम भूतकर यांनी सांगितले.

Maharashtra Times 9.4.2021

## दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्जासाठी मुदत

पुणे, ता. ८ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षेला खासगीरीत्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना आता नावनोंदणी अर्ज अतिविलंब शुल्कासह ऑनलाइन पद्धतीने शुक्रवार (ता. ९) ते रविवार (ता. ११) दरम्यान भरता येणार आहे, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली आहे.

राज्य मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खासगीरीत्या फॉर्म नंबर १७ भरून परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. एप्रिल-मे २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी खासगीरीत्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज ऑनलाइन पद्धतीने स्वीकारण्यासाठी २८ नोव्हेंबर २०२० ते १० फेब्रुवारीपर्यंतचा कालावधी निश्चित केला होता. आता रविवारपर्यंत अतिविलंब शुल्कासह खासगीरीत्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे.

**ऑनलाइन अर्ज करण्यासाठी संकेतस्थळ**

- दहावी : http://form17.mh-ssc.ac.in
- बारावी : http://form17.mh-hsc.ac.in

Sakaal 9.4.2021

लोकमत

## परीक्षा ऑफलाइनच घ्या; पण सध्या नको

### मराठी शाळा संस्थाचालक संघाची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : आजच्या परिस्थितीत सरकार घेत असलेले निर्णय व झपाट्याने वाढणारी कोरोना रुग्णांची संख्या पाहता शिक्षण विभागाने दहावी, बारावीच्या ऑफलाइन परीक्षांबाबत घाईने शेवटच्या टप्प्यात निर्णय न घेता त्या पुढे ढकलाव्यात, अशी मागणी मराठी शाळा संस्थाचालक संघाने केली.

त्यात मूल्यमापन व परीक्षेचे स्वरूप शिथिल करून मुक्त वातावरणात परीक्षा घेण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागाने विचार करावा. यामध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचाही अंतर्भाव असावा, असे मत संघाने मांडले. मराठी शाळा संस्थाचालकांची ही भूमिका आपण शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्याकडे निवेदनाच्या स्वरूपात मांडल्याची माहिती मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष प्रकाश परब यांनी दिली.

परीक्षेच्या कार्याचे विकेंद्रीकरण करून स्थानिक पातळीवर विभागावर किंवा जिल्हानिहाय जिथे परीक्षा घेण्यायोग्य परिस्थिती आहे अशा ठिकाणी परीक्षा घेण्यासोबत पेपर तपासणीसुद्धा स्थानिक पातळीवर करता येईल का, असा विचार शिक्षण विभागाने करायला हवा. तसेच परीक्षेचे नियोजन करण्याआधी कोणत्याही वयोगटाचा विचार न करता सर्व शालेय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सरसकट लसीकरण करून विद्यार्थ्यांच्याही लसीकरणासाठी विचार व्हावा, असे मत शाळा संस्थाचालकांनी मांडले.

मराठी शाळा संस्थाचालक संघाची बैठक ७ एप्रिल रोजी ऑनलाइन पद्धतीने पार पडली. त्यात राज्याच्या सहा ते सात जिल्ह्यांतील २५ ते ३० मराठी शाळा संस्थाचालकांनी सहभाग नोंदविला होता.

Pune Main
Page No. 12 Apr 09, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

# विद्यापीठाची उद्यापासून 'परीक्षा'

## तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी 'वॉर रूम' सज्ज; विद्यार्थ्यांवर राहणार लक्ष

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांची सत्र परीक्षा 'ऑनलाइन प्रॉक्टर्ड' पद्धतीने शनिवारपासून (१० एप्रिल) सुरू होणार आहे. पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यातून सुमारे सहा लाख विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. तांत्रिक अडचणीशिवाय त्यांनी परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी विद्यापीठाची 'वॉर रूम' सज्ज झाली आहे.



विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र- कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, डॉ. एम. जी. चासकर यांनी गुरुवारी 'वॉर रूम'ची पाहणी केली.

### विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

- कॅमेरा सुरू होतो का, हे ब्राउझरमध्ये तपासून पाहा. त्यासाठी टेस्टिंग सॉफ्टवेअर वापरा.
- ऑनलाइन परीक्षा सुरू असताना इंटरनेट डिस्कनेक्ट होणार नाही, याची काळजी घ्या.
- पहिल्या १५ मिनिटांत पेपर सबमिट करू नये.
- उत्तरे सोडवताना इंटरनेट कनेक्ट असल्याची खात्री करावी; अन्यथा उत्तरे सेव्ह होणार नाहीत.
- 'प्रॉक्टर्ड मेथड'मध्ये विद्यार्थी गैरप्रकार करताना आढळल्यास त्याला १२ वेळा समज देण्यात येईल. त्यानंतर नियमानुसार परीक्षा बंद होईल.

### 'परीक्षेला घाबरू नका; संपर्क साधा'

'विद्यार्थ्यांनी सत्र व सराव परीक्षा देण्यासाठी sppuexam.in ही वेबसाइट वापरा. परीक्षेत काही तांत्रिक अडचणीमुळे खंड पडल्यास, परीक्षेचा कालावधी वाढवून दिला जाईल. परीक्षेदरम्यान ०२०-७१५३०२०२ या क्रमांकावर संपर्क साधावा,' असे डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

राज्यात करोनाचा संसर्ग पुन्हा वाढत असल्याने विद्यापीठाने सत्र परीक्षा ऑनलाइन घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांना ही परीक्षा घरबसल्या मोबाइल, टॅब, लॅपटॉप, कम्प्युटरवर देता येणार आहे. ऑनलाइन परीक्षेत गैरप्रकार होऊ नये, यासाठी प्रॉक्टर्ड मेथडचा वापर करण्यात येणार आहे. गेल्या सत्र परीक्षेत उद्भवलेल्या तांत्रिक अडचणींची पुनरावृत्ती होऊ नये; तसेच परीक्षेत गोंधळ होऊ नये, यासाठी परीक्षेची जबाबदारी विद्यापीठाच्या एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशनला दिली आहे. एज्युटेक फाउंडेशनकडून प्रथमच ऑनलाइन परीक्षा घेण्यात येत आहे. त्या सुरळीत होण्यासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळात वॉर रूम तयार केली आहे. 'वॉर रूम'मध्ये तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी ७५ कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. पहिल्याच दिवशी ६८ विषयांच्या परीक्षा असून, २६ हजार विद्यार्थी त्यासाठी ऑनलाइन 'लॉग-इन' होणार आहेत.

### वॉर रूमचे विद्यार्थ्यांवर लक्ष

विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षेदरम्यान तांत्रिक अडचण उद्भवल्यास ती सोडविण्यासाठी वॉर रूम कार्यरत असेल. विद्यार्थी त्यांना येणाऱ्या अडचणी 'चॅट बॉक्स'द्वारे मांडू शकतात. त्यावर त्यांना उत्तर दिले जाईल. कॉल सेंटरही कार्यरत असून, त्यावर विद्यार्थ्यांना समस्या सांगता येतील.

### 'सिस्टीममधूनच तक्रार नोंदवा'

सत्र परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना, त्यांचे गुण परीक्षेनंतर ४८ तासांत 'स्टुडंट प्रोफाइल सिस्टीम'मध्ये उपलब्ध करून देण्यात येतील. सिस्टीममध्ये नोंदवलेल्या तक्रारीच ग्राह्य धरण्यात येतील, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. परीक्षेनंतर येणाऱ्या माहितीचा स्क्रीनशॉट विद्यार्थ्यांनी काढून ठेवावा. नोंदवलेला ई-मेल आयडी, संपर्क क्रमांक विद्यार्थ्यांनी ऐन वेळी बदलू नये.

'विद्यार्थ्यांनी वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा द्यावी. करोनामुळे एखाद्या विद्यार्थ्याला परीक्षा देता आली नाही, तर त्याने करोनामुक्त झाल्यावर वैद्यकीय प्रमाणपत्रासह विद्यापीठाशी संपर्क साधावा. त्याची फेरपरीक्षा घेण्याचा प्रयत्न करू,' असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले.

Maharashtra Times 9.4.2021

# Students push for exam postponement

Dheeraj Bengrut

puneletters@htlive.com

PUNE: The online examination of the Savitribai Phule Pune University (SPPU) is to start from April 11. The timetable for some of the subjects has not yet been declared by the examination department. While students are now demanding the immediate release of timetables, there is now an increasing demand to postpone the exams due to the current restrictions in the state.

"We are preparing for the examinations online from April 11, but still there are a number of subjects for which the timetable is not yet declared. Students cannot prepare due to this, so the examination department should immediately declare the timetable," said Kamlakar Shete, student and Pune city vice-president of the Yuvak Kranti Dal.

Exams for all courses will be conducted for 50 marks with multiple-choice questions (MCQ), online. The university's SPPU Edutech Foundation company is going to conduct the exam.

Meanwhile, several students appearing for the exam have either tested positive or are facing some issue due to the new restrictions.

A Twitter trend was driving the demand for postponing the exams. "There are strict restrictions imposed in the state, and the university should postpone the exams," said Mandar Lahane, a student.

Mahesh Kakade, SPPU's director of the board of examination and evaluation, said, "We have declared the timetable of all the courses and subjects under the university. Only some of the courses with the old syllabus are remaining, and that will also be soon declared."

Hindustan Times 9.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

# नियतकालिकांच्या अनुदानात कपात

## जाहिरातींचा ओघही आटला; ३५ ते ४० मासिकांची बिकट स्थिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** पहिल्या टाळेबंदीत पूर्णपणे ठप्प झालेला मराठी नियतकालिकांचा व्यवसाय काही महिन्यांत सुरू झाला खरा; पण अजूनही या व्यवसायावरचे आर्थिक दुष्टचक्र टळलेले नाही. राज्य शासनाच्या 'साहित्य आणि संस्कृती मंडळ'कडून ३५ ते ४० नियतकालिकांना दिल्या जाणाऱ्या अनुदानात कपात करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या अनुदानाचा एकच हप्ता देऊन उर्वरित निधी देण्यास राज्य शासनाने असमर्थता दर्शवली आहे.

राज्यभरातून प्रकाशित होणारी बहुतांशी नियतकालिके सामाजिक बांधिलकी, प्रबोधन, मनोरंजन अशा हेतूने चालवली जातात. नफा कमवणे हा या नियतकालिकांचा हेतू नसल्याने त्यांच्याकडे फारसे आर्थिक पाठबळ नसते. जाहिरातीतून काही प्रमाणात पैसा उभा राहातो. नियतकालिकांचा वाचकवर्ग कमी असल्याने विक्रीतून फारसे उत्पन्न मिळत नाही. अशा स्थितीतील नियतकालिकांना गेल्या वर्षी टाळेबंदीचा मोठा फटका बसला. कार्यालये आणि छपाई बंद झाल्याने छापील अंक निघू शकले नाहीत. काही नियतकालिकांनी ई-अंक काढण्यास सुरूवात केली, परंतु ते सभासदांना मोफत पाठवावे लागले. टाळेबंदीमुळे एकूणच उद्योगविश्व तोट्यात असल्याने नियतकालिकांना जाहिरातीही मिळू शकल्या नाहीत.

पहिली टाळेबंदी हळूहळू शिथिल होताना नियतकालिकांचा व्यवसाय पुन्हा सुरू झाला; पण सरकारी अनुदान कपातीने आर्थिक संकटात भर टाकली आहे. सरकारी अनुदानाची रक्कम फार मोटी नसली तरीही महत्वाची असते; पण करोनामुळे सर्वच क्षेत्रांतील खर्चाला सरकारने कात्री लावलेली असल्याने नियतकालिकांनीही अनुदानाच्या दुसऱ्या हप्त्याची आशा सोडली आहे. 'नियतकालिक चालवण्यासाठी १५ ते १६ लाख रुपये खर्च येतो. सरकारकडून ३५ ते ५० हजार रुपये अनुदान मिळते. गेल्या वर्षी यातील केवळ ११ हजार रुपयेच मिळाले', अशी माहिती 'मराठी विज्ञान परिषद पत्रिका'चे अ. पां. देशपांडे यांनी दिली. 'आरोग्य क्षेत्र वगळता सर्वच क्षेत्रातील अनुदाने कमी झालेली असल्याने नियतकालिकांच्या अनुदानातही कपात झाली. पुढील वर्षी मात्र संपूर्ण अनुदान मिळेल', असे 'मराठी भाषा विभागा'च्या सचिव प्राजक्ता लवंगारे यांनी सांगितले.

**परिस्थिती काय?**

मराठी विज्ञान परिषद पत्रिका मिळून साऱ्याजणी, पालकनीती परिवार, पुरोगामी सत्यशोधक बालविकास, ज्ञानमोचक (त्रैमासिक), वयम, छात्र प्रबोधन अशा साधारण ३५ ते ४० नियतकालिकांना शासनाकडून ३५ ते ५० हजार रुपयांचे अनुदान मिळते. खर्च अधिक, वर्गणीदार कमी आणि इतर अनेक आर्थिक समस्यांवर मात करीत ही नियतकालिके तगून आहेत. अनुदानाची रक्कमही मिळाली नाही तर पुढील काळात हा व्यवहार अवघड होईल.

**वर्गणीदार मिळणे अवघड**

नव्वदोत्तरीच्या दशकात चांगला मजकूर देणारी कित्येक उत्तम नियतकालिके आर्थिक गणित न जुळल्याने बंद पडली. वाचकांचा मनोरंजनासाठी इतर पर्यायांकडे कल वाढला. आज बहुतांश नियतकालिकांना नियमित वर्गणीदार मिळविणे अवघड झाले. हिंदीतील अनेक नियतकालिके वाचकांच्या मोठ्या संख्येमुळे उत्तम निघत आहेत. मराठी वाचकांमध्ये नियतकालिकांची वर्गणी भरण्याची वृत्ती हरवत चालली आहे.

लोकसत्ता Fri, 09 April 2021
https://epaper.loksatta.com/c/59658632

# ६.७३ टक्के उमेदवार सेट परीक्षेत पात्र

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सहायक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेल्या राज्य पात्रता परीक्षेचा (सेट) निकाल जाहीर झाला आहे. परीक्षा दिलेल्यांपैकी ६.७३ टक्के उमेदवार पात्र ठरले आहेत.

महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे डिसेंबरमध्ये सेट परीक्षा घेण्यात आली होती. एकूण ६१ हजार ११४ उमेदवारांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ६.७३ टक्के, ४ हजार ११४ उमेदवार सहायक प्राध्यापक पदासाठी पात्र झाले आहेत. पात्र उमेदवारांना ई-प्रमाणपत्र १९ एप्रिलपासून डाउनलोड करता येईल. परीक्षेची उत्तरतालिका अंतिम असून, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार त्याबाबत कोणतीही तक्रार नोंदवता येणार नाही. उमेदवारांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर निकाल पाहता येईल. अधिक माहिती आणि सूचना संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

लोकसत्ता Fri, (
https

**लोकमत**

# महाविद्यालयात मिळणार लॉगइन-आयडी, पासवर्ड

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या प्रथम सत्राच्या ऑनलाइन परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना लॉगइन- आयडी व पासवर्ड मिळण्यास अडचण निर्माण होऊ नयेत. या उद्देशाने विद्यापीठ प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयाकडून लॉगइन आयडी व पासवर्ड प्राप्त करून घेता येणार आहे.

विद्यापीठाच्या प्रथम सत्रच्या परीक्षा १० एप्रिलपासून सुरू होत आहेत. विद्यार्थ्यांनी लॉगइन आयडी व पासवर्ड मिळवण्यासाठी मोबाइल क्रमांक ईमेल आयडी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. परंतु, विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या मॉक टेस्ट दरम्यान काही विद्यार्थ्यांना लॉगइन आयडी व पासवर्ड मिळत नसल्याचे दिसून आले.

सर्व महाविद्यालयाकडून आपल्या विद्यार्थ्याला परीक्षा देण्यासाठी अडचण येऊ नये, याबाबत काळजी घेतली जाते. त्यामुळे महाविद्यालयांकडे विद्यार्थ्यांचे लॉगइन आयडी व पासवर्ड देण्यात आले आहेत, असे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. संजय चाकणे यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 2 Apr 09, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

लोकमत

१० एप्रिलपासून प्रथम सत्रची परीक्षा : हजारो विद्यार्थ्यांनी मॉक टेस्ट दिलेली नाही

## सराव परीक्षेनंतर आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची आता होणार प्रत्यक्ष 'परीक्षा'

न्यूज अपडेटस्

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे १० एप्रिलपासून प्रथम सत्रची परीक्षा घेतली जाणार आहे. त्यासाठी सध्या विद्यार्थ्यांना परीक्षेचा सराव करण्याची संधी देण्यात आली आहे. परंतु, सरावानंतर आता विद्यार्थ्यांच नाही तर विद्यापीठाला सुद्धा प्रत्यक्ष परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक या जिल्ह्यांमधील साडेपाच लाखाहून अधिक विद्यार्थी प्रथम सत्रची परीक्षा देणार आहेत. त्यासाठी विद्यापीठाने आवश्यक तयारी केली आहे. परंतु, येत्या १० एप्रिलपासून सुरु होणाऱ्या परीक्षा या विद्यापीठाच्या एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन या कंपनीच्या माध्यमातूनच घेतल्या जाणार आहेत.

एवढ्या मोठ्या संख्येने परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याची या कंपनीची पहिलीच वेळ आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षेत झालेल्या गोंधळाची पार्श्वभूमी लक्षात घेता कंपनीसमोर चांगल्या पद्धतीने परीक्षा घेण्याचे मोठे आव्हान आहे.परीक्षा देण्यासाठी कोणत्या तांत्रिक बाबींची पूर्तता करावी लागते. हे जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी मॉक टेस्ट देणे आवश्यक होते. परंतु, गेल्या चार दिवसात हजारो विद्यार्थ्यांनी मॉक टेस्ट दिली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ऐनवेळी परिक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचणी येऊ शकतात. अशा विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी विद्यापीठाच्या कंपनीची दमछाक होऊ शकते, असे तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे. मात्र, विद्यार्थ्यांची परीक्षेसंदर्भातील प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी कंपनीने ७० कर्मचा-यांची नियुक्ती केली आहे.

- गुरुवारी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे १ लाख ६० हजार विद्यार्थी देणार होतो. परंतु, केवळ १ लाख ३२ हजार ६११ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली. शुक्रवारी काही विद्यार्थी सराव परीक्षा देणार आहेत. त्यानंतर दुस-या दिवशी प्रत्यक्ष परीक्षेला सुरुवात होणार आहे.



### किती विद्यार्थी देणार परीक्षा ?

- विज्ञान पदवी : ८८, ८६५
- विज्ञान पदव्युत्तर पदवी : १८, २३५
- अभियांत्रिकी पदवी : १, ६०००
- अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी : २,९१६
- वाणिज्य पदवी : १, ४०, ८१०
- वाणिज्य पदव्युत्तर पदवी : १३,०१८
- कला पदवी : ६८, ६७२
- कला पदव्युत्तर पदवी : १२,६९८
- फार्मसी पदवी : १९,४५८
- फार्मसी पदव्युत्तर पदवी : १,००४२३
- विधी पदवी : १८१
- विधी पदव्युत्तर पदवी : ७५७
- मॅनेजमेंट पदवी : ९६६
- मॅनेजमेंट पदव्युत्तर पदवी : ३३, ५५७

Pune Main
Page No. 2 Apr 09, 2021
Powered by: erelego.com

पुढारी

## दहावी-बारावीला गैरहजर विद्यार्थी जूनच्या परीक्षेला पात्र

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

दहावी आणि बारावी परीक्षा ऑफलाईन होणार असल्याचे शालेय शिक्षण विभागाकडून वारंवार सांगितले जात असले तरी याबाबत सरकारची भूमिका अद्याप स्पष्ट नाही. या उलट कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत गेल्यास एप्रिल आणि मे महिन्यात होणाऱ्या परीक्षेला गॅप घ्यायचा का? असा विचार काही पालकांत सुरू आहे. जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार झालेल्या परीक्षेला विद्यार्थी गैरहजर राहिल्यास तो जूनच्या परीक्षेला पात्र असणार असल्याने ही परीक्षा टाळतील अशी शक्यता आहे.

दहावीला सुमारे १७ लाख आणि बारावीला सुमारे १५ लाख असे मिळून सुमारे ३० लाख विद्यार्थ्यांनी एप्रिल आणि मे मध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी नोंदणी केली आहे. एका परीक्षा केंद्रावर सरासरी ५०० विद्यार्थी आणि केंद्रप्रमुख, पर्यवेक्षक व इतर कर्मचारी तैनात केली जाणार आहे. राज्यभरात कोरोनाचे रुग्ण वाढत असल्याने अशा वातावरणात राज्य मंडळाला ही परीक्षा घेणे मोठे आव्हान असणार आहे.

Pune Edition
Apr 9, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

पुढारी

## दहावी-बारावीचा पाया कच्चा राहणार

### सरसकट उत्तीर्ण धोरणावर शिक्षण क्षेत्रातील सूर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करत पुढील वर्गात प्रवेश देण्याचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे. परंतु त्यामुळे दहावी आणि बारावीचा पाया कच्चा राहण्याचा धोका असल्याचा सूर शिक्षण क्षेत्रात उमटला आहे.

पुढारी वॉच

कोरोनाचा संसर्ग वाढल्याने मार्च २०२० पासून शाळा बंद आहेत. शाळा बंद असल्या तरी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन तर काही ठिकाणी ऑफलाइन शिक्षण सुरू होते. या काळात अनेकांपर्यंत शिक्षण पोचू शकले नाही. अशा परिस्थितीत सरसकट मूल्यमापन करणे योग्य नाही, असे मत मांडत राज्य सरकारने दहावी आणि बारावी वगळता पहिली ते अकरावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करत पुढील वर्षात प्रवेश देण्याचा निर्णय जाहीर केला.

इयत्ता नववीचे विद्यार्थी दहावीला आणि अकरावीचे विद्यार्थी बारावीला जाणार आहेत. त्यामुळे करिअरचा टर्निंग पॉइंट असणाऱ्या या परीक्षा शैक्षणिक पाया भक्कम करणाऱ्या आहेत. मागील वर्षी अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांचे निकाल लावण्यात आले आणि त्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात आला. यंदा विशेषत: नववीच्या काही विद्यार्थ्यांचे पूर्ण वर्ष ऑनलाइन शिक्षणात, तर काही ठिकाणी ऑफलाइन शिक्षणात गेले.

तर अकरावीची प्रवेश प्रक्रिया लांबल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण डिसेंबर-जानेवारीत सुरू झाले. अकरावीचा अभ्यासक्रम अद्याप शिकवून पूर्ण झालेला नाही. अशा वेळी इयत्ता नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन न करताच पुढील वर्गात ढकलणे विद्यार्थ्यांनाच अडचणीचे ठरणार आहे. त्यामुळे शिक्षण आणि योग्य मूल्यमापन करूनच विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करणे आवश्यक असल्याचे मत काही शिक्षकांनी व्यक्त केले आहे.

> कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नववी, अकरावीतील विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. विद्यार्थी पालक व शिक्षक यांच्या दृष्टिकोनातून हा निर्णय स्वागतार्ह असला तरी दहावीचा मूलभूत पाया नववी आणि बारावीचा अकरावी असल्याने भविष्यात त्याचा प्रतिकूल परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणार आहे. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना वैद्यकीय, अभियांत्रिकी व तत्सम शाखेत प्रवेशासाठी नीट, सीईटी, जेईईसारख्या वेगवेगळ्या पात्रता परीक्षा द्याव्या लागतात. त्यासाठी अकरावीचे शैक्षणिक वर्ष महत्त्वाचे मानले जाते. याचा विचार झालेला नाही.
> - **अविनाश ताकवले,** प्राचार्य, पूना नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे

My Pune Edition
Apr 9, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुढारी

## बारावी निवडक विषयांची परीक्षा घेण्याची मागणी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

बारावी बोर्डाच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना सर्व विषयांची परीक्षा द्यायला न लावता फक्त महत्त्वाच्या निवडक विषयांची परीक्षा घ्यावी. महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सरसकट सर्वच विषयाची परीक्षा न घेता इंग्रजीसह विज्ञान विभागासाठी केवळ फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी, मॅथेमॅटिक्स या कोअर विषयांची परीक्षा घ्यावी. वाणिज्य विभागासाठी अकाऊंटस्, अर्थशास्त्र तसेच कला विभागासाठी अर्थशास्त्र, मानसशास्त्र (केवळ पुढील प्रवेशासाठी महत्त्वाच्या अशा विषयांची निवड तज्ज्ञांच्या मार्फत करून) विषयांची परीक्षा घ्यावी.

सर्व विभागाच्या इतर विषयांचे मूल्यांकन महाविद्यालयीन स्तरावर करून त्यांना ग्रेड देण्याची परवानगी देण्यात यावी. अशा पद्धतीने कमी वेळेत केवळ महत्त्वाच्या विषयांची परीक्षा घ्यावी. दोन पेपर्समध्ये पुरेसे दिवस अंतर ठेवून वेळापत्रकाचे नियोजन शक्यतो सकाळच्या सत्रात करण्यात यावे. तसेच सध्याची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन परीक्षा महिनाभर पुढे ढकलावी.

### दहावी-बारावी १७ नंबर अर्ज भरण्यास मुदतवाढ

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेला १७ नंबरचा अर्ज भरून बसणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना शाळांमार्फत ९ ते ११ एप्रिल दरम्यान अतिविलंब शुल्कासह अर्ज भरता येणार आहे. राज्य मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या एप्रिल-मे २०२१ च्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेला खासगीरीत्या बसणाऱ्या विद्यार्थ्यांची नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्याचा कालावधी २८ नोव्हेंबर ते १० फेब्रुवारी होता. केवळ ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

Pune Edition
Apr 10, 2021 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

पुढारी

## नववी, अकरावीच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन शाळास्तरावरच

### वर्गोन्नतीचा शेरा देणे मात्र शाळांवर बंधनकारक; अध्यादेश जारी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**



नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांना वर्गोन्नती देऊन थेट दहावी आणि बारावीत प्रवेश देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यानुसार मुख्याध्यापकांनी विषयशिक्षकांची समिती नेमून शाळेत आयोजिलेल्या चाचण्या, प्रात्यक्षिक परीक्षेचे अंतर्गत मूल्यमापन करून अथवा विषयनिहाय चाचण्या घेतल्या असल्यास त्याआधारे किंवा ट्यूटोरियल्स घरी सोडविण्यासाठी देऊन त्याआधारे विद्यार्थ्यांना गुण देण्याचा निर्णय शाळा आणि ज्युनियर कॉलेजस्तरावर घ्यायचा आहे. परंतु विद्यार्थ्यांना वर्गोन्नती देण्याचा निर्णय बंधनकारक असल्याचे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

शाळा आणि ज्युनियर कॉलेज बंद असल्याने नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊन निकाल कसा लावायचा, असा प्रश्न शैक्षणिक संस्थांना पडला होता. राज्यातील कोरोनाची परिस्थिती लक्षात घेता या विद्यार्थ्यांनाही सरसकट पास करण्याची मागणी शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्याकडे करण्यात आली होती. या मागणीनुसार तसा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार कोरोना परिस्थितीचा विचार करून माध्यमिक शाळा संहितेतील तरतुदीनुसार या विद्यार्थ्यांचे गुणांकन करण्याचा निर्णय मुख्याध्यापकांनी घ्यायचा असल्याच्या सूचना अध्यादेश जारी करून शिक्षण विभागाने दिल्या आहेत. शाळास्तरावरील मूल्यमापनाद्वारे विद्यार्थ्याला विषयनिहाय मिळालेल्या गुणांचा उल्लेख करून प्रगतीपुस्तक तयार करायचे आहे. यामध्ये मुख्याध्यापक आपल्या सोयीच्या कोणत्याही मूल्यमापन तंत्राचा वापर करून निकाल जाहीर करू शकणार आहेत. त्यांना फक्त कोणत्याही विद्यार्थ्याला नापास करता येणार नसल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Apr 10, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

## विद्यापीठाची प्रथम सत्र परीक्षा आजपासून

पुणे, दि. ९ (प्रतिनिधी) - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून घेण्यात येणारी प्रथम सत्र परीक्षा आजपासून (१० एप्रिल) सुरू होत आहे. या परीक्षेआधी घेण्यात आलेल्या सराव परीक्षेला विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला असून, जवळपास ६५ टक्के विद्यार्थ्यांनी ही सराव परीक्षा दिली आहे.

परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहे. पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, नगर आणि नाशिक येथील सर्व संलग्न महाविद्यालयांतील ५ लाख ८० हजार २२४ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. यातील ३ लाख ७४ हजार विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली आहे. विद्यापीठाच्या एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशनतर्फे यंदा पहिल्यांदा



### ६५ टक्के विद्यार्थ्यांनी दिली सराव परीक्षा

ही परीक्षा घेतली जात असून, ही परीक्षा संपूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. नियमित, बॅकलॉग, एटीकेटी अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी एमसीक्यू पद्धतीने ही परीक्षा होणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांचा स्कोअर ४८ तासांत त्यांच्या स्टुडंट प्रोफाईलला दिसणार आहे. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी ८० लोकांचा तांत्रिक गट कार्यरत असणार आहे. विद्यार्थ्यांचा स्कोअर जाहीर झाल्यानंतर ४८ तासांच्या आत विद्यार्थ्यांना काही तक्रार असल्यास स्टुडंट प्रोफाइलला तक्रार नोंदवता येणार आहे.

'एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन'च्या तांत्रिक विभागाचे प्रमुख गजानन अमलापुरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, रोज ८० हजार ते दीड लाख विद्यार्थ्यांची परीक्षा होईल, अशा पद्धतीने परीक्षेचे नियोजन केले असून, ही परीक्षा साधारण ४० ते ४५ दिवस चालणार आहे. एक विद्यार्थी किमान ५ ते ६ विषयांत परीक्षा देणार असून, याप्रमाणे जवळपास ३२ लाख परीक्षा या विद्यापीठाकडून घेण्यात येणार आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात परीक्षा घेणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे एकमेव विद्यापीठ मानले जात आहे.

### अडचण आल्यास येथे संपर्क करा

▮ या परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना काही अडचणी आल्यास त्यांच्यासाठी ०२०- ७१५३०२०२ हा हेल्पलाईन क्रमांक देण्यात आला आहे. याशिवाय विद्यापीठाच्या एक्झाम सेक्शनमध्येच एक चॅट बॉक्सही विद्यार्थ्यांना दिसेल, त्यावर ते त्यांच्या अडचणी सांगू शकतात.

### युजरनेमसाठी कॉलेजशी संपर्क साधा

▮ ज्या विद्यार्थ्यांना अद्यापि युजरनेम आणि पासवर्ड मिळालेला नाही, अशा विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयांशी संपर्क साधावा व युजरनेम व पासवर्ड मिळवावा.

### दिव्यांगांना २० मिनिटे अधिक वेळ

▮ सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे २० मिनिटे अधिक वेळ देण्यात येणार आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांना सोबत मदतनीस घेता येईल.

Saamana 10.4.2021

पुढारी

माझं पुणं

शनिवार, १० एप्रिल २०२१ | पुढारी | ३

## पुस्तक विक्रीत प्रचंड घट



### शाळा, महाविद्यालयांना फटका; वर्षभरापासून उत्पन्नात ७० ते ८० टक्क्यांनी घट

पुणे : प्रसाद जगताप

**कोरोना, लॉकडाउन आणि शाळा-महाविद्यालये बंदमुळे वर्षभरापासून पुस्तक विक्री नाही. विक्रेत्यांच्या उत्पन्नाला फटका बसला... बँकांचे हप्ते थकले... कामगारांचा पगार... लाईट बिल... इतर देणी फेडायची कोठून, घरसंसार चालवायचा कसा, असा प्रश्न शालेय पुस्तक विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना पडला आहे. परिणामी, कोरोनामुळे पुस्तक विक्रेत्यांच्या उत्पन्नात ७० ते ८० टक्क्यांनी घट झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.**

पुढारी वॉच

गेल्या वर्षी मार्च २०२० पासून कोरोनामुळे शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, कंपन्या बंद आहेत. गेल्या दोन महिन्यांपूर्वी पंधरा दिवस शाळा, महाविद्यालये सुरू झाली. त्यामुळे थंडावलेली पुस्तक विक्री पुन्हा जोमाने सुरू झाली होती. परंतु, कोरोनाचा संसर्ग पुन्हा वाढू लागल्याने शाळा, महाविद्यालये पुन्हा बंद करण्यात आली. त्यात शासनाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना थेट पुढील वर्गात पाठविले. त्यामुळे बहुतांश पालकांनी विद्यार्थ्यांकरिता वर्षभरापासून वह्या, पुस्तके व इतर शालेय साहित्याची खरेदी केली नाही. ऑनलाइन अभ्यासक्रमाचा फटकासुद्धा पुस्तक, स्टेशनरी विक्रेत्यांना बसला. ऑनलाइन अभ्यासक्रमामुळे वह्या, पेन, पेन्सिल, पट्टी व अन्य शालेय साहित्याची विक्रीच झालेली नाही. त्यामुळे शाळा सुरू होणार, या आशेवर जमा केलेला माल आता विक्रेत्यांच्या अंगावर पडला आहे.



"कोरोनामुळे शासनाने शाळा कधीच बंद केल्यात. त्यामुळे पालक, विद्यार्थी पुस्तके खरेदीसाठी दुकानांमध्ये फिरकले नाहीत. त्यामुळे आम्हाला वर्षभरात मिळणारे उत्पन्न ७० ते ८० टक्क्यांनी घटले आहे. त्यातच आता पुन्हा लॉकडाउन असल्यामुळे आमचा व्यवसाय कसा चालवायचा, हा प्रश्न आहे. बँकांचे हप्ते, इतरांची देणी द्यायची आहेत. त्यामुळे शासनाने आमचा विचार करून दुकाने सुरू ठेवण्यास परवानगी द्यावी.

**- मंगेश चंद्रात्रे**, पुस्तक विक्रेते



"शाळा सुरू होतील, या आशेवर दुकानांमध्ये विविध शालेय अभ्यासक्रमांची पुस्तके विकत आणली. मात्र, ती घेण्यासाठी कोणीही फिरकलेच नाही. त्यातच काही अभ्यासक्रम बदलल्यामुळे नवी कोरी पुस्तके रद्दीत टाकून द्यावी लागली. आमचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे लॉकडाउन आमच्यासाठी न परवडणारे आहे.

**- विजय देशमुख-मरळ**, अध्यक्ष, जुनी, नवीन पुस्तक विक्रेता आणि स्टेशनरी संघटना



"शाळा, कॉलेज बंदमुळे आमचा व्यवसाय ठप्प झालेला आहे. ऑनलाइन शिक्षणामुळे तर थोडीसुद्धा पुस्तक विक्री झाली नाही. दरवर्षी पुण्यासह बाहेरगावाहून अनेक नागरिक पुस्तके खरेदीसाठी येत असतात. यंदा मात्र तेसुद्धा आले नाहीत.

**- अनिकेत कुंडूर**, पुस्तक विक्रेते



"आमची स्टेशनरी, शालेय साहित्य विक्रीची सहा दुकाने आहेत. शाळा, महाविद्यालये यांसोबतच मोठ-मोठ्या आयटी कंपन्यांना स्टेशनरी पोहचविण्याचे काम आम्ही करतो. यंदाच्या ऑनलाइन शाळा आणि वर्क फ्रॉम होममुळे शालेय साहित्याबरोबर आयटी कंपन्यांना लागणाऱ्या स्टेशनरीचा माल जागेवरच आहे. ते नुकसान कसे भरून काढावे, हाच प्रश्न आहे.

**- दत्तात्रय मदने**, स्टेशनरी विक्रेते



"आम्ही महाविद्यालयीन पुस्तकांची विक्री करतो. कॉलेज बंदमुळे आमचा व्यवसाय ठप्प झाला आहे. सुमारे ६० ते ७० टक्के व्यवसाय झालाच नाही. त्यामुळे सुरक्षा नियमाचे काटेकोर पालन करण्याच्या शर्तीवर पुस्तकांची विक्री सुरू ठेवावी.

**- संकेत राजावाडा**, पुस्तक विक्रेते

My Pune Edition
Apr 10, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

पुढारी

## दहावी-बारावी परीक्षेसंदर्भात सर्व घटकांसोबत चर्चा : शिक्षणमंत्री

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**



कोरोनाच्या संकट काळात विद्यार्थ्यांचा अभ्यास तणावाखाली सुरू आहे याची कल्पना आहे. विद्यार्थ्यांनी मात्र तणाव न घेता आरोग्य जपावे. शालेय शिक्षण विभागामार्फत मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विविध पक्षीय लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी आदींसोबत चर्चा केली जात आहे. त्यानंतर निर्णय जाहीर केला जाईल, असे शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी शुक्रवारी सांगितले.

एमपीएससी परीक्षा पुढे ढकलल्यानंतर दहावी-बारावीचे परीक्षांचे काय, असा प्रश्न पुढे आला आहे. अनेक संघटना तसेच पक्षामार्फत परीक्षा पुढे ढकलाव्यात, अशी मागणी केली जात आहे. मंत्रिमंडळातील सदस्यांनीही परीक्षेबाबत निर्णय घ्यावा, अशा सूचना केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर वर्षा गायकवाड यांनी शुक्रवारी एक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारा व्हिडीओ शेअर करत ही माहिती दिली.

दहावी आणि बारावी परीक्षेविषयी विद्यार्थी व पालकांत अस्वस्थता आहे, याची पूर्ण कल्पना आहे, विद्यार्थ्यांची सुरक्षा हीच महाविकास आघाडीची सर्वप्रथम जबाबदारी आहे. आम्ही परिस्थितीचा आढावा घेत आहोत. यासंदर्भात येत्या काही दिवसांत निर्णय घेतला जाईल त्यामुळे विद्यार्थ्यांनी आरोग्य जपावे व अभ्यास सुरू ठेवावा, असेही त्यांनी सांगितले.

Pune Edition
Apr 10, 2021 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

## सत्र परीक्षेच्या पहिल्या दिवशी ९० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सत्र परीक्षेच्या पहिल्याच दिवशी ९० टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान आलेल्या काही तांत्रिक अडचणी विद्यापीठाच्या वॉर रूमच्या माध्यमातून तातडीने निराकरण करून विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी उपलब्ध करून दिल्याचा दावा विद्यापीठ प्रशासनाने केला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सत्र परीक्षा ऑनलाइन आणि प्रॉक्टर्ड पद्धतीने शनिवारी सुरू झाल्या. पहिल्या दिवशी ७४ विषयांच्या परीक्षेसाठी एकूण २८ हजार १३१ विद्यार्थी अपेक्षित होते. त्यापैकी २५ हजार ३५६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर दोन हजार ७७५ विद्यार्थी अनुपस्थित राहिले. परीक्षा सुरू झाल्यावर संगणकशास्त्र पदवी (बीसीए) अभ्यासक्रमाच्या काही विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचण आली. मात्र ती अडचण सोडवून विद्यार्थ्यांना परीक्षा उपलब्ध करून देण्यात आली. सराव परीक्षा न दिलेल्या विद्यार्थ्यांना कॅमेरा सेटिंगमध्ये अडचणी आल्या. तसेच

> **यूजर आयडी, पासवर्ड, विषय न दिसणे, प्रवेशपत्र माहिती आणि प्रत्यक्ष ॲलॉटमेंट अशा समस्या विद्यार्थ्यांना आल्या. वॉर रूममधील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांकडून माहिती घेऊन परीक्षा उपलब्ध करून दिली.**
>
> – डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सराव परीक्षेला न दिलेल्या विद्यार्थ्यांना जास्त अडचणी जाणवल्या. विद्यार्थ्यांनी परीक्षेचे वेळापत्रक व्यवस्थित न पाहिल्याने त्यांना सर्वांचीच परीक्षा शनिवारपासून असल्याचे वाटले. त्यामुळे परीक्षेची माहिती आणि तांत्रिक अडचणींबाबत सुमारे साडेतीन हजार विद्यार्थ्यांनी संपर्क साधला. प्रणालीतील चॅट बॉक्सवर सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांनी विविध शंका विचारल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिली.

**हेल्पलाइनला अडचण**

तांत्रिक अडचणींबाबत विद्यापीठाच्या हेल्पलाइनवर संपर्क साधल्यास दूरध्वनी उचलला गेला नाही. त्यामुळे तांत्रिक अडचणी न सुटल्याने काही विद्यार्थी परीक्षा देऊ शकले नाहीत.

लोकसत्ता Sun, 11 April 2021
https://epaper.loksatta.com/c/5998

### प्रथम सत्र परीक्षा सुरू; इतर वर्गातील विद्यार्थ्यांकडूनही ऑनलाइनचा प्रयत्न

## वेळापत्रक न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांचा गोंधळ

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १०** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम सत्र परीक्षेच्या पहिल्याच दिवशी तब्बल ९४ टक्के विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. मात्र, वेळापत्रक न पाहता आपलीच परीक्षा सुरू होणार असल्याने अनेक विद्यार्थ्यांनी लॉगीन करून पेपर देण्याचा प्रयत्न केला. पेपर सुरू होत नसल्याने हजारो जणांनी हेल्पलाइनवर संपर्क साधत तक्रारी केल्या. पहिल्या दिवशी सर्व प्रकारच्या तक्रारींसाठी तब्बल साडेतीन हजार विद्यार्थ्यांनी हेल्पलाइनवर कॉल केला तर चॅट बॉक्समध्ये दीड हजार जणांच्या शंकांचे निरसन करण्यात आल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने स्पष्ट केले.

विद्यापीठाने शनिवारी एकूण ७४ विषयांची परीक्षा घेतली. या परीक्षेसाठी २८,१३१ विद्यार्थी अपेक्षित होते. त्यापैकी २५,३५६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. एकूण २,७७५ विद्यार्थी परीक्षेला गैरहजर होते. पहिल्या दिवशी ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी ९०.१४ इतकी होती, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

दरम्यान, परिक्षेच्या पहिल्या दिवशी बीसीएच्या काही विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला. त्याबाबत तक्रारी आल्यानंतर पुढील अर्ध्या तासात या अडचणी दूर करून पेपर सुरू करून देण्यात आल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले. तसेच विद्यापीठाची परीक्षा १० एप्रिलपासून सुरू झाली असली तरी एकाच दिवशी सर्व अभ्यासक्रमांची परीक्षा सुरू होणार नाही, टप्प्याटप्प्याने परीक्षा घेतली जाणार आहे, असे विद्यापीठाने यापूर्वीच स्पष्ट केले होते.

तथापि, शनिवारी सकाळी अनेक विद्यार्थी त्यांची परीक्षा नसतानाही लॉगीन करून बसले होते. परीक्षा सुरू होत नसल्याने अनेक विद्यार्थ्यांनी हेल्पलाइनवर फोन करून चौकशी सुरू केली. दिवसभरात आलेल्या साडेतीन हजार कॉल्सपैकी बरेच कॉल्स यासंदर्भात असल्याने या विद्यार्थ्यांना उत्तरे देताना विद्यापीठाची तारांबळ उडाली. या सर्व विद्यार्थ्यांचे शंकांचे निरसन करण्यात आल्याचे विद्यापीठाचे म्हणणे आहे.



**पुणे : ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी कार्यरत असणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा तांत्रिक गट**

> "युजर आयडी, पासवर्ड तसेच विषय न दिसणे, हॉलतिकीट डेटा अशा तांत्रिक समस्या विद्यार्थ्यांना उद्भवल्या. त्यानंतर परीक्षेसाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या वॉर रुममधील कार्यरत कर्मचाऱ्यांनी जन्मतारीख, आईचे नाव, आधार कार्ड क्रमांक आदी माहिती विचारून परीक्षा उपलब्ध करून दिली.
>
> – महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

### ... ६५ टक्के विद्यार्थ्यांचा सहभाग

ऑनलाइन परीक्षेचा सराव करण्यासाठी ५ ते ८ दरम्यान सराव परीक्षा घेतली. त्यात ६५ टक्के विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ज्या विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली नाही, अशा विद्यार्थ्यांना आज परीक्षा देताना कॅमेरा सेट करता न येणे, प्रश्न सोडविताना अडचणी येणे, सबमीट झाले की नाही हे समजणे अशा अडचणी आल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली.

प्रभात Sun, 11 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/59715542

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## सावित्रीबाई फुले यांचे अल्पचरित्र संशोधन प्रकल्पामुळे उजेडात

### विद्यापीठातर्फे तीन दुर्मीळ पुस्तकांचे पुनर्प्रकाशन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे १९३९मधील अल्पचरित्र एका संशोधन प्रकल्पामुळे उजेडात आले आहे. या दुर्मीळ पुस्तकासह अन्य दोन दुर्मीळ पुस्तकांचे प्रकाशन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा इतिहास विभाग आणि महात्मा फुले अध्यासनातर्फे करण्यात येणार असून, या तीन पुस्तकांमुळे विद्यापीठाच्या पुनर्प्रकाशित पुस्तकांमध्ये भर पडणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. श्रद्धा कुंभोजकर यांच्या संशोधन प्रकल्पातील संशोधक बापूराव घुंगरगांवकर यांना शांताबाई बनकर यांनी १९३९ मध्ये लिहिलेल्या 'समाजभूषण कै. सौ. सावित्रीबाई जोतिराव फुले यांचे अल्पचरित्र' या दुर्मीळ पुस्तकाची प्रत मिळाली आहे. सावित्रीबाई फुले यांचे हे पहिले उपलब्ध चरित्र आहे. तसेच, 'बेळगाव परिसरातील सत्यशोधक चळवळ' आणि 'शेतकऱ्याचा असूड' या आणखी दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त रविवारी (११ एप्रिल) ऑनलाइन कार्यक्रमात सत्यशोधक चळवळीचे अभ्यासक डॉ. बाबा आढाव, प्रा. नागनाथ कोत्तापल्ले आणि उत्तमराव पाटील यांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे.

विद्यापीठाने पुनर्प्रकाशित केलेली ही पुस्तके हा सामाजिक ठेवा आहे. या प्रकाशनाच्या माध्यमातून माफक दरात अनेक चांगली आणि दुर्मीळ पुस्तके उपलब्ध करून देणे हे माझे कर्तव्य मानतो, असे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी सांगितले.



#### सोळा पुस्तकांचे पुनर्प्रकाशन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयाने आतापर्यंत सोळा पुस्तकांचे पुनर्प्रकाशन केले आहे. या सोळा पुस्तकांमध्ये 'पुणे विद्यापीठाचा इतिहास', 'महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास', 'निजाम- पेशवे संबंध १८ वे शतक', 'पोर्तुगेज मराठे संबंध अर्थात पोर्तुगेजांच्या दफ्तरातील मराठ्यांचा इतिहास' अशा पुस्तकांचा समावेश आहे. त्यात आता आणखी तीन पुस्तकांची भर पडणार आहे. पुनर्प्रकाशित पुस्तकांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून पुस्तके ऑनलाइन खरेदी करता येतील, अशी माहिती मुद्रणालयाचे व्यवस्थापक डॉ. दत्तात्रय कुटे यांनी दिली.

लोकसत्ता Sun, 11 April 2021 https://epaper.loksatta.com/c/

## विद्यापीठाच्या मुद्रणालयाकडून निवडक पुस्तकांचे फेरप्रकाशन

**म. जोतीराव फुले जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले यांचे दुर्मिळ अल्पचरित्रही फेरप्रकाशन करणार**

"विद्यापीठाने फेरप्रकाशन केलेली ही पुस्तके हा सामाजिक ठेवा आहे. या प्रकाशनाच्या माध्यमातून माफक दरात अनेक चांगली व दुर्मिळ पुस्तके उपलब्ध करून देणे हे मी विद्यापीठाचा कुलगुरू या नात्याने माझे कर्तव्य समजतो.

– **डॉ. नितीन करमळकर**, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १० -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा इतिहास विभाग आणि महात्मा फुले अध्यासन यांच्या वतीने रविवारी महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले यांचे दुर्मिळ अल्पचरित्र फेरप्रकाशन करण्यात येणार आहे. या बरोबरच अध्यासनातर्फे आणखी दोन पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात येणार आहे. आतापर्यंत विद्यापीठाच्या मुद्रणालयाकडून निवडक १६ पुस्तकांचे फेरप्रकाशन करण्यात आले असून ५०० पेक्षा अधिक पुस्तकांची विक्री करण्यात आली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील इतिहास विभागाच्या प्रमुख श्रद्धा कुंभोजकर यांच्या संशोधन प्रकल्पातील संशोधक बापूराव घुंगरगांवकर यांना शांताबाई बनकर यांनी १९३९ मध्ये लिहिलेल्या 'समाजभूषण कै. सौ. सावित्रीबाई जोतीराव फुले यांचे अल्पचरित्र' या पुस्तकाची प्रत मिळाली आहे. हे सावित्रीबाई फुले यांचे पहिले उपलब्ध चरित्र आहे. या पुस्तकाबरोबरच 'बेळगाव परिसरातील सत्यशोधक चळवळ ' आणि 'शेतकऱ्याचा असूड' या आणखी २ पुस्तकांचे प्रकाशन रविवारी ११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाइन पध्दतीने होणार आहे. हे प्रकाशन सत्यशोधक चळवळीचे अभ्यासक डॉ. बाबा आढाव, प्रा. नागनाथ कोत्तापल्ले आणि उत्तमराव तथा नाना पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

प्रभात Sun, 11 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/59981231

## News Paper Clippings During April 2021

Section: Education

# SPPU conducts first semester papers quite smoothly on day-1

## Varsity Dept Resolves 1.5k Queries Via Chatbox

Ardhra.Nair@timesgroup.com

**STEADY BEGINNING**

- Exams for **74 subjects** were conducted on Saturday
- **28,131 students** registered for the online exam
- **25,356 or 90.14% students** appeared for the exam
- **2,775 students** remained absent



**A FEW HICCUPS**

- Some Bachelor of Computer Application students had technical difficulties at the beginning of the exam. However, the difficulties were resolved in 30 minutes and the students were immediately given the option of re-examination
- Many students did not look at the schedule properly and they thought that all exams were starting from today. Therefore, many people contacted the helpline number with the query
- About 3,500 students contacted the helpline for this, while about 1,500 students resolved various queries on the chatbox

**Pune:** Day-one of the first semester online examinations, conducted by Savitribai Phule Pune University, on Saturday was relatively smooth as compared to the previous online semester examination that was marred by various complaints from students.

The examination department conducted exams for 74 subjects. A total of 28,131 students had registered for the examination while 25,356 appeared on Saturday.

Mahesh Kakade, director of the examination and evaluation department, said the robust work done before the examination, such as carefully mapping each student with the subjects s/he is eligible for along with a helpdesk and an exam war room that monitors the entire process, are why there were fewer student complaints this time.

"We had decided that we will not entertain any student data that comes after March 28 for this examination. So, unlike last year, we had plenty of time to go through the entire data and ensure every student had filled the exam form correctly. A team of 27 coordinators from various faculties were appointed to scrutinise the forms. Once the data was cleaned up, we were able to give it to the agency on time and they also could work on it by ensuring correct question papers were uploaded, verification of the questions, quality of question papers, etc. Hence, pre-examination work could be done well," said Kakade.

During the examinations, the exam department claims to have resolved 1,500 students' queries via chatbox. "There were still some complaints regarding user ID, password, etc, but we had a 35-member helpdesk to put out fires whenever needed. Students too are now aware of the entire process. Lastly, we have given the option of re-examination for students, if there was a huge problem causing them to be unable to write the exam, or whenever the cases are genuine as long as the students register their complaint in 48 hours online through the students' portal," added Kakade.

The Times of India 11.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## विद्यापीठाने तळागाळापर्यंत जाऊन सुरू केलेले काम नेटाने पुढे न्यावे – डॉ. बाबा आढाव

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी) – 'सत्यशोधक चळवळीतील शांताबाई बनकर यांनी १९३९मध्ये लिहिलेले सावित्रीबाई फुले यांचे अल्पचरित्र विद्यापीठाने शोधून ते पुनर्प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला, हे खरोखरच तळागाळापर्यंत जाऊन केलेले काम आहे आणि आता विद्यापीठाने हे काम पुढे न्यावे,' अशी अपेक्षा ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांनी व्यक्त केली.

विद्यापीठाचा इतिहास विभाग आणि महात्मा फुले अध्यासन यांच्या वतीने रविवारी महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले यांचे अल्पचरित्र या पुस्तकाबरोबरच 'बेळगाव परिसरातील सत्यशोधक चळवळ' आणि 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. ऑनलाइन पद्धतीने झालेल्या कार्यक्रमासाठी डॉ. बाबा आढाव यांच्यासह प्रा. नागनाथ कोत्तापल्ले, उत्तमराव तथा नाना पाटील, कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र–कुलगुरू

### सावित्रीबाई फुले यांच्या अल्पचरित्राचे प्रकाशन

डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, इतिहास विभागप्रमुख डॉ. श्रद्धा कुंभोजकर, महात्मा फुले अध्यासनप्रमुख प्रा. विश्वनाथ शिंदे, प्रा. राजा दीक्षित उपस्थित होते.

डॉ. आढाव म्हणाले, केवळ विद्यापीठाला नाव देऊन त्या व्यक्तीचे कार्य पुढे जात नाही, तर ते विचारांच्या आदान–प्रदानातून जाते. विद्यापीठाने सत्यशोधकांच्या कार्याचा मागोवा घेत हे कार्य पुढे नेण्यासाठी प्रयत्न करावेत.

कुलगुरू म्हणाले, अशी पुस्तके ही सामाजिक ठेवा आहे. फुले, शाहू आंबेडकर यांचे विचार व पुरोगामी चळवळ घराघरात पोहोचवण्याचे काम अशा संशोधनांच्या माध्यमातून विद्यापीठ करेल.

प्रा. नागनाथ कोत्तापल्ले म्हणाले, सावित्रीबाईंच्या या पुस्तकातील अनेक संदर्भ हे पुढील काळासाठी महत्त्वाचे मानले जातील.

नाना पाटील यांनी चळवळींचे दस्तऐवज विद्यापीठाने जतन करण्याची आणि त्याचे संशोधन करण्याची कामगिरी सुरू केल्याबद्दल विद्यापीठाला धन्यवाद दिले.

Saamana 12.4.2021

## विद्यार्थ्यांना मिळणार जागतिक ओळख

### कौशल्य अभ्यासक्रम निश्चितीसाठी समितीची नियुक्ती

सकाळ EXCLUSIVE

मीनाक्षी गुरव : सकाळ वृत्तसेवा

**"कौशल्य विद्यापीठात शिकणारा विद्यार्थी कौशल्याने परिपूर्ण असावा, यादृष्टीने अभ्यासक्रम ठरविला जाईल. त्यासाठी देशातील विविध औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींचा आणि तज्ज्ञांचा सल्ला घेतला जाईल. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय विद्यापीठे, संस्था यांच्याशी सामंजस्य करार करण्याचा विचार आहे.**

**– डॉ. राजेंद्र जगदाळे,** अध्यक्ष,
कौशल्य विद्यापीठातंर्गत कौशल्य अभ्यासक्रम निश्चिती समिती

पुणे, ता. ११ : औद्योगिक क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाच्या गरजा ओळखून महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठातंर्गत विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी विविध अभ्यासक्रमांची आखणी सुरू आहे. मात्र, ती होत असताना विद्यापीठातून विविध कौशल्य आत्मसात केलेल्या विद्यार्थ्यांना जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठातंर्गत अभ्यासक्रम निश्चितीसाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र जगदाळे यांनी 'सकाळ'ला दिली.

युवक-युवतींना एकात्मिक आणि समग्र स्वरूपाचे कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध व्हावे, तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील कौशल्यावर आधारित उच्च शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करून, त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, या उद्देशाने 'महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ' स्थापन करण्यात येत आहे. या संदर्भात 'महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम २०२१' २३ मार्च २०२१ रोजी राजपत्र प्रसिद्ध झाले आहे. विद्यापीठाचा प्रथम परिनियमांचा आणि अध्यादेशांचा मसुदा तयार करण्यासाठी आणि विद्यापीठांतर्गत सुरू करावयाचे कौशल्य अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाने तज्ज्ञ समिती नेमली आहे. पुण्यातील सायन्स अँण्ड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक डॉ. राजेंद्र जगदाळे यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या या समितीत आठ सदस्यांचा समावेश आहे. समितीला अभ्यासक्रमाबाबतचा अहवाल दोन महिन्यांत सादर करावा लागणार आहे.

#### समितीत असणारे सदस्य

मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय खोले, डॉ. राजेंद्र वेळूकर, आयआयटी (मुंबई) प्राध्यापक कवी आर्या, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एम. एम. साळुंखे, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँण्ड अँग्रिकल्चरचे महासंचालक प्रशांत गिरबने, हेल्थकेअर तज्ज्ञ समीर जोशी, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या सह सचिव डॉ. सुवर्णा खरात.

#### अशी होईल अभ्यासक्रम निश्चिती

- बारावीनंतरचे प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम
- उद्योगाच्या गरजा लक्षात घेऊन, कौशल्य विकसित होण्यावर भर
- केवळ पदवी नव्हे तर 'प्रोफेशनल' पदवी देणारे हे विद्यापीठ असेल
- आयटी, फूड प्रोसेसिंग, इलेक्ट्रिक व्हेईकल, सायबर सिक्युरिटी, टेक्नॉलॉजी, अशी विविध नवीन कौशल्ये देण्यावर भर
- प्रत्येक क्षेत्रनिहाय (सेक्टर) स्वतंत्र अभ्यासक्रम

Sakaal 12.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## सोशल मीडियावर परीक्षेची चर्चा

**पुणे, ता. ११ :** दहावी-बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, असे शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी शुक्रवारी जाहीर केले. दरम्यान, बोर्डाची परीक्षा पुढे ढकलावी, परीक्षा रद्द करावी यांसह विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून योग्य निर्णय घ्यावा, अशा आशयांच्या 'पोस्ट' करत 'नेटिझन्स'नी सोशल मीडियावर परीक्षेवर चर्चा घडवून आणली. तथापि, या चर्चेमुळे परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी आणि पालक संभ्रमात असल्याचे दिसून आले.

'परीक्षा रद्द करा', 'परीक्षा पुढे ढकला', असे हॅशटॅग वापरून सोशल मीडियावर दहावी-बारावीच्या परीक्षेवर चर्चा होत आहे. याबाबत पालक गजानन देऊस्कर म्हणाले, ''दहावीच्या परीक्षेसाठी मुलांनी वर्षभर नियमित अभ्यास केला आहे. त्यासाठी खूप मेहनत घेतली आहे. त्यामुळे बोर्डाची परीक्षा झालीच पाहिजे आणि ती देखील ऑफलाइनच होणे आवश्यक आहे. परीक्षेदरम्यान कोरोनाचा संसर्ग वाढू नये, यासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. त्यावर सकारात्मक चर्चा होणे आवश्यक आहे.''

बारावीत असलेल्या प्रांजलीचे वडील बाबासाहेब सोनावणे म्हणाले, ''प्रांजलीसारखे लाखो विद्यार्थी वर्षभरापासून परीक्षेची तयारी करत आहेत. त्यासाठी त्यांचा नियमित अभ्यास सुरू आहे. नियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा जवळ आल्याने विद्यार्थ्यांची तयारी अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे परीक्षा होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य ही निश्चितच प्राथमिकता आहे. परंतु त्यादृष्टीने योग्य काळजी घेण्यावर भर दिला पाहिजे.''

देवांग सोनावणे यांनी दहावी-बारावीची परीक्षा रद्द करावी आणि विद्यार्थ्यांना पास करावे, अशी मागणी केली आहे. सरकारने येत्या दोन दिवसांत परीक्षेबाबत निर्णय जाहीर करावा, अशीही मागणी काही पालक करत आहेत.

Sakaal 12.4.2021

## दहावी-बारावीच्या परीक्षांचे काय?

### परीक्षा पुढे ढकलण्याची चर्चा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्य सरकार येत्या काही दिवसांत नव्याने लॉकडाउन लावण्याचा विचार करीत आहे. त्यामुळे राज्य मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या लेखी ऑनलाइन परीक्षा वेळेवर सुरू होतील का, असा प्रश्न विद्यार्थी-पालकांकडून उपस्थित करण्यात आला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) पदभरती परीक्षा पुढे ढकल्यामुळे दहावी आणि बारावीच्या परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी पुढे आली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाइन घेण्याची तयारी सुरू आहे. मात्र, गेल्या दहा दिवसांत राज्यात करोनाचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. पालक, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांच्या आरोग्याचा विचार करता शालेय शिक्षण विभागाकडून या परीक्षा पुढे ढकलण्यात येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. बारावीची परीक्षा २३ एप्रिल, तर दहावीची परीक्षा २९ एप्रिलपासून सुरू होणार आहे. या काळात लॉकडाउन जाहीर झाल्यास विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या दोन्ही परीक्षांच्या आयोजनाबाबत विद्यार्थी-पालकांच्या मनातील संभ्रम दूर करण्याची मागणी पालकांनी केली आहे. दरम्यान, दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या नियोजनाबाबत शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची नुकतीच ऑनलाइन बैठक घेतली. या बैठकीत अधिकारी, पालक, लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते.

### शिक्षणमंत्र्यांच्या नावे बनावट पोस्ट व्हायरल

दहावी-बारावीच्या परीक्षा रद्द होण्यासाठी शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्या ट्विटर हँडलवरील पोस्टचा फोटो काढून, त्यामध्ये फेरफार करण्याचा प्रकार समोर आला आहे. दहावी-बारावीच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या असून, विद्यार्थ्यांना असाइनमेंट शाळेत द्याव्या लागतील, अशी बनावट पोस्ट तयार करण्यात आली आहे. या चुकीच्या बनावट पोस्टची वर्षा गायकवाड यांनी गंभीर दखल घेऊन, विद्यार्थी-पालकांनी अधिकृत ट्विटर हँडलच्या माहितीवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले आहे.

Maharashtra Times 12.4.2021

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

## सत्यशोधकांच्या कार्याचा मागोवा घ्या

म. टा. प्रतिनिधी, पुणे

### डॉ. बाबा आढाव यांची अपेक्षा

'केवळ विद्यापीठाला नाव देऊन, पुतळे उभारून त्या व्यक्तीचे कार्य पुढे जात नाही, तर ते विचारांच्या आदान-प्रदानातून जाते. विद्यापीठाने सत्यशोधकांच्या कार्याचा मागोवा घेऊन हे कार्य पुढे नेण्यासाठी प्रयत्न करावेत,' अशी अपेक्षा ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांनी रविवारी व्यक्त केली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा इतिहास विभाग आणि महात्मा फुले अध्यासन यांच्या वतीने रविवारी महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले यांचे अल्पचरित्र या पुस्तकाबरोबरच 'बेळगाव परिसरातील सत्यशोधक चळवळ' आणि 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकांचे ऑनलाइन कार्यक्रमात प्रकाशन करण्यात आले. या वेळी डॉ. आढाव बोलत होते. प्रा. नागनाथ कोत्तापल्ले, उत्तमराव पाटील, डॉ. नितीन करमळकर, डॉ. एन. एस. उमराणी, डॉ. प्रफुल्ल पवार, डॉ. श्रद्धा कुंभोजकर, प्रा. विश्वनाथ शिंदे, प्रा. राजा दीक्षित आदी उपस्थित होते.

डॉ. आढाव म्हणाले, 'सत्यशोधक चळवळीतील शांताबाई बनकर यांनी १९३९ मध्ये लिहिलेले सावित्रीबाई फुले यांचे अल्पचरित्र विद्यापीठाने शोधून ते पुनर्प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला, हे खरोखरच तळागाळापर्यंत जाऊन केलेले काम आहे. विद्यापीठाने संशोधनाचे काम आणखी पुढे न्यावे.'

> "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची ही पुस्तके सामाजिक ठेवा आहेत. फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार व पुरोगामी चळवळ घराघरांत पोहोचविण्याचे काम अशा संशोधनांच्या माध्यमातून विद्यापीठ करील.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 12.4.2021

## कौशल्य अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी तज्ज्ञ समिती

पुणे, दि. ११ - महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकरिता प्रथम परिनियम व अध्यादेश यांचा मसुदा तयार करण्यासाठी व विद्यापीठात सुरू करावयाचे कौशल्य अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी तज्ज्ञ समिती गठीत केली आहे. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत दिली आहे.

समिती अध्यक्षपदी सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक राजेंद्र जगदाळे, सदस्य सचिव म्हणून सहसचिव डॉ. सुवर्णा खरात यांचा समावेश आहे. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. विजय खोले, डॉ.राजेंद्र वेळूकर, मुंबईतील आयआयटीतील प्रा. कवी आर्या, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.एम.एम.साळुंके, मराठ चेंबर ऑफ कॉमर्सचे प्रशांत गिलबानी, हेल्थकेअर तज्ज्ञ समीर जोशी यांचा आहे. समितीच्या अध्यक्षांना आवश्यकतेनुसार तज्ञांना आमंत्रित करण्याचे अधिकारही दिले आहेत.

प्रभात Mon, 12 April 20 https://epaper.e

लोकमत

## नववी, अकरावीसाठी हवा फाउंडेशन कोर्स

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने इयत्ता नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्याचा निर्णय घेतला. मात्र, पुढील वर्गात प्रवेश देणे आणि अभ्यासक्रम पूर्ण करून घेणे या स्वतंत्र बाबी आहेत. विद्यार्थ्यांच्या काही मूलभूत संकल्पना त्या-त्या वर्गात स्पष्ट होणे गरजेचे आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांसाठी फाउंडेशन कोर्स तयार करण्याची आवश्यकता आहे, असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

कोरोना महामारीमुळे मागील पूर्ण वर्ष शाळा बंद आहेत. परंतु, नववीच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन केले. तर अकरावीची प्रवेश प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू झाली. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा अकरावीचा फारसा अभ्यासक्रम शिकवून झालेला नाही. नववीमध्ये दहावीच्या अभ्यासक्रमासाठी पूरक असणाऱ्या संकल्पना विद्यार्थ्यांना स्पष्ट होणे गरजेचे आहे. तसेच इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांना सुद्धा बारावीत जाण्यापूर्वी विज्ञान व वाणिज्य विषयातील काही संकल्पनांची माहिती होणे आवश्यक असते. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे महत्त्वाचे आहे, असे शिक्षण तज्ज्ञ डॉ. अ. ल. देशमुख व डॉ. वसंत काळपांडे यांनी सांगितले.

कोरोना महामारीमुळे मागील पूर्ण वर्ष शाळा बंद आहेत. त्यामुळे इतरही वर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे.

Pune Main
Page No. 2 Apr 12, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

पुढारी

## दहावी-बारावी परीक्षांचा निर्णय जाहीर करा

### विद्यार्थी, पालकांची मागणी; लॉकडाउनच्या धर्तीवर संभ्रम वाढला

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकार नव्याने लॉकडाउनचा विचार करीत आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या लेखी ऑफलाइन परीक्षा वेळेवर सुरू होणार का, याबाबत संभ्रम असून राज्य शासनाने परीक्षांबाबतचे स्पष्ट धोरण तयार करून निर्णय जाहीर करावा, अशी मागणी विद्यार्थी आणि पालकांकडून करण्यात येत आहे.

मंडळाकडून दहावी आणि बारावीच्या परीक्षा वेळापत्रकाप्रमाणे घेण्याची तयारी सुरू आहे. मात्र, राज्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढली आहे. यात पालक, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी असे परीक्षा प्रक्रियेतील महत्त्वाचे घटकदेखील आहेत. बारावीची परीक्षा २३ एप्रिलपासून तर, दहावीची परीक्षा २९ एप्रिलपासून सुरू होणार आहे. त्यातच १४ दिवसांचा कडक लॉकडाउन जाहीर होण्याची शक्यता आहे, त्यामुळे परीक्षा वेळेत सुरू होणार की पुढे ढकलणार, याबाबत विद्यार्थी-पालकांच्या मनात संभ्रम आहे. त्यामुळे राज्य मंडळ आणि शालेय शिक्षण विभागाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी पालकांनी केली आहे.

### परीक्षा पुढे ढकलण्याच्या मागणीला जोर-

परीक्षांच्या नियोजनाबाबत शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या नुकत्याच घेतलेल्या ऑनलाइन बैठकीत अधिकारी, पालक, लोकप्रतिनिधी आदी सहभागी होते. या वेळी अनेकांनी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांचे लसीकरण करण्यासोबतच परीक्षा पुढे ढकलण्याची विनंती केली, तर काहींनी परीक्षा जूनच्या अखेरीस घेण्यात याव्यात, असे मत मांडले.

### अधिकृत ट्विटर हँडलच्या माहितीवर विश्वास ठेवा

दहावी- बारावीच्या परीक्षा रद्द होण्यासाठी शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्या ट्विटर हँडलवरील पोस्टचा फोटो काढून, त्याला मॉर्फ करण्याचा प्रकार समोर आला आहे. दहावी-बारावीच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या असून, विद्यार्थ्यांना असाईनमेंट शाळेत द्याव्या लागतील, अशी बनावट पोस्ट तयार करण्यात आली आहे. याची गायकवाड यांनी दखल घेतली असून अधिकृत ट्विटर हँडलच्या माहितीवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले आहे.

### वैद्यकीय परीक्षा पुढे ढकला

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

एमबीबीएसच्या दुस-या आणि तिस-या वर्षातील वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात, अशी मागणी राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केली आहे. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी या परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात, अशी मागणी या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे केली आहे.

**एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांची मागणी**

यापूर्वी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी विद्यापीठाने हिवाळ्यातील २०२० च्या होणा-या परीक्षा आतापर्यंत एप्रिल महिन्यापर्यंत तीन वेळा पुढे ढकलल्या आहेत. मात्र, अनेक एमबीबीएसचे विद्यार्थी पॉझिटिव्ह आले आहेत. परीक्षा सर्व काळजी घेऊन घेता येईल. मात्र, विद्यार्थी वसतिगृहात राहून त्याद्वारे नियम पाळले जाऊ शकत नाहीत. कारण, एकाच रूमध्ये ३ ते ४ विद्यार्थी राहतात. तसेच मेसमधील जेवण हे एकमेकांसोबत घेतात, त्यामुळे सोशल डिस्टन्सिंग पाळले जाऊ शकत नाही. तसेच, विद्यार्थी परीक्षेमुळे काही लक्षणे असली तरीही तपासणी करत नाहीत आणि ही साखळी तशीच राहते. या परीक्षेसाठी इतर राज्यांतून किंवा इतर जिल्हयांतून येणारे विद्यार्थी कोरोनाचे वाहक असू शकतात आणि त्यांची चाचणी केली तर परीक्षेबाबत काय निर्णय होणार याबाबत निश्चित धोरण नाही. यापेक्षा या परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात व परीक्षेत पास करण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे

Pune Edition
Apr 12, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

लोकमत

## शारीरिक शिक्षणाची परीक्षा मैदानावर घेणे धोकादायक

### शिक्षक-पालकांना चिंता : यंदा फक्त लेखी परीक्षा घेऊन ग्रेड देण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्य शिक्षण मंडळाकडून बारावीच्या विद्यार्थ्यांच्या अंतिम परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले. पण 'आरोग्य व शारीरिक शिक्षण' विषयाच्या परीक्षेबाबत शिक्षक, पालक यांच्यात संभ्रम आहे. अचानक तीन दिवसांपूर्वी सांगितले की, शारीरिक शिक्षण विषयाची प्रात्याक्षिक परीक्षा घ्यावी? पण विद्यार्थी महाविद्यालयातील मैदानावर आले तर गर्दी होणार? एका महाविद्यालयात हजार-हजार विद्यार्थी असून, त्यांची मैदानावर परीक्षा कशी घेणार? या प्रश्नांनी मुख्याध्यापक आणि या विषयाचे प्राध्यापक संभ्रमात आहेत. प्रात्याक्षिक परीक्षा न घेता फक्त लेखी परीक्षा घ्यावी? आणि ग्रेड पध्दतीने गुण देण्यात याव्यात. असा पर्याय सुचविण्यात आला आहे.

शारीरिक शिक्षण विषयासाठी एकूण ५० गुण आहेत. त्यात २५ गुणांची लेखी आणि २५ गुणांची मैदानी चाचणी घेतली जाते. या विषयाची परीक्षा घेण्यासाठी शारीरिक शिक्षकांची नुकतीच झूम मिटिंग घेण्यात आली.

त्यामध्ये शारीरिक शिक्षकांना परीक्षेबाबत मार्गदर्शन केले. प्रशिक्षणातून फारसे काहीच समाधानकारक चित्र पढे आले नाही. असे शिक्षकांचे म्हणणे आहे. मैदानावर परीक्षा घ्यायची कशी ? याबाबत काहीच माहिती दिली नाही, अशी तक्रार शिक्षकांची आहे.

### हजारोंची परीक्षा कशी घेणार?

१ कोरोनाच्या काळात मैदानावर विद्यार्थी बोलावून परीक्षा घेणार कशी ? कारण एकत्र आले की गर्दी होऊ शकते. त्यातून संसर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२ एका महाविद्यालयात २ हजार विद्यार्थी शारीरिक शिक्षणाची परीक्षा देणार आहेत.

३ आता त्यांचे पंधरा-पंधरा जणांचे गट करून परीक्षा घेतली, तर त्याला किती दिवस लागतील. एकूणच हा पर्याय धोकादायक आहे, अशी प्रतिक्रिया प्राध्यापकांची आहे.

### कडक निर्बंधात परीक्षा घ्यावी का?

- कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे राज्यात ३० एप्रिलपर्यंत कडक निर्बंध लादले आहेत. त्यामुळे या महिन्यात सुरु होणाऱ्या परीक्षांबाबतही काय निर्णय होणार? याकडे विद्यार्थ्यांसह पालकांचे लक्ष लागले आहे.
- त्यातच, दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घ्यायच्या की नाही, याबाबतही सरकार विचार करत आहे. त्या पार्श्वभूमीवर मध्येच या शारीरिक शिक्षण विषयावर परीक्षा घ्यावी, असे परिपत्रक आले आहे.
- त्यामुळे शिक्षक, पालकांमध्ये संभ्रम आहे. एमपीएससी परीक्षाही पुढे ढकलली, मग शारीरिक शिक्षणाची मैदानावर कशाला, असा सवालही उपस्थित होत आहे.

### मैदानाऐवजी लेखीच परीक्षा घ्या

सध्याच्या काळात विद्यार्थ्यांना मैदानावर बोलवून परीक्षा घेणे धोकादायक ठरु शकते. याचा शासनाने गंभीरपणे विचार करावा आणि शारीरिक शिक्षण या विषयासाठी सध्याच्या परिस्थितीत प्रात्यक्षिक परीक्षा न घेता फक्त लेखी परीक्षा घेऊन यंदाच्या वर्षी ग्रेड देण्यात याव्यात, असा पर्याय काही शिक्षकांनी सुचविला आहे. तसेच मैदानावर परीक्षा घेण्याला पालकांचा देखील विरोध आहे.

Hello Pune
Page No. 4 Apr 12, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

पुढारी

## आरोग्य, शारीरिक शिक्षण परीक्षेबाबत अधिसूचना जारी

### १० जूनपर्यंत परीक्षांचे आयोजन करून त्याचे मूल्यांकन विभागीय मंडळाकडे सादर करावे लागणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील इयत्ता दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांची आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाची परीक्षा घेण्याबाबत राज्य मंडळाकडून मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आलेल्या आहेत. येत्या १० जूनपर्यंत शाळा, कनिष्ठ महाविद्यालयस्तरावर या परीक्षांचे आयोजन करून त्याचे मूल्यांकन विभागीय मंडळाकडे सादर करावे लागणार आहे.

राज्य मंडळाने दहावी, बारावीच्या लेखी परीक्षांचे वेळपत्रक जाहीर केलेले आहे. मात्र कोरोनाचा प्रादुर्भाव असताना आरोग्य व शारीरिक विषयाच्या परीक्षेबाबतही विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्यात संभ्रम निर्माण झाला होता. या परीक्षा कधी व कशा घ्यायच्या, त्यांचे मूल्यांकन कसे करायचे, याबाबत शिक्षकांसमोरही अनेक प्रश्न उभे राहिले होते.

राज्य मंडळाकडून अखेर उशिरा का होईना, पण आरोग्य व शारीरिक विषयाच्या परीक्षेबाबत स्वतंत्र मार्गदर्शक सूचना काढण्यात आलेल्या आहेत. त्या राज्यातील विभागीय मंडळाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. दहावीसाठी दोन्ही सत्रांत परीक्षा न घेता एकाच म्हणजे द्वितीय सत्रात परीक्षा घ्यावी लागणार आहे. प्रात्यक्षिक व लेखनकार्य प्रत्येकी ५० गुणांची परीक्षा घेऊन मिळालेल्या १०० गुणांपैकी प्रचलित पद्धतीनुसार श्रेणी देण्यात येणार आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक परीक्षा न घेता लेखनकार्य पूर्ण करून घ्यावे लागणार आहे.

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी लेखी परीक्षेसाठी २५ व प्रात्यक्षिक परीक्षेसाठी २५ अशा ५० गुणांची परीक्षा होणार आहे. आरोग्याधिष्ठित, कौशल्याधिष्ठित शारीरिक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता, कोणत्याही एका सांघिक खेळाची निवड करून क्रीडाकौशल्य सादरीकरण करणे, योग व प्राणायाम, दोन आसने विविध क्रीडा स्पर्धेतील सहभाग व तासिका उपस्थिती, पुस्तक लेखनकार्य यावर परीक्षा घ्यावी लागणार आहे.

कमीत कमी विद्यार्थ्यांच्या बॅचेस करून शारीरिक अंतर ठेवून गटागटाने प्रात्यक्षिक परीक्षा घ्याव्या लागणार आहेत. एकत्रित साहित्याचा वापर टाळून वैयक्तिक स्वरूपाच्या क्षमता प्रात्यक्षिके घेण्यात यावीत. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणारे शक्य होईल ते साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे परिपत्रकात नमूद करण्यात आलेले आहे.

Pune Edition
Apr 12, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

---

प्रभात पुणे, सोमवार, दि. १२ एप्रिल २०२१ || ५

## पुणे विद्यापीठ सेवक पतपेढीत आर्थिक गैरव्यवहार?

**प्रभात वृत्तसेवा**



**पुणे, दि. ११ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सेवक सहकारी पतपेढीमध्ये गैरव्यवहार होऊनही चौकशी होत नसल्याच्या कारणावरून एका संचालकांनी राजीनामा दिला आहे. त्यामुळे विद्यापीठ सेवक पतपेढीत आर्थिक अनियमिततेचा विषय आता चव्हाट्यावर आला आहे. दरम्यान, याप्रकरणी पतपेढीचे पदसिद्ध अध्यक्ष असलेले विद्यापीठाच्या कुलसचिवांनी तक्रारीवरून खुलासा मागविला आहे.

पुणे विद्यापीठात सुमारे ३० वर्षांपासून सेवकांची पतपेढी आहे. वर्षाला सहा कोटींपेक्षा जास्त रकमेची उलाढाल होते. पतपेढीतून कर्ज उचललेल्या कर्मचाऱ्यांनी हप्ते भरले आहेत. पण त्याच्या नोंदी दुसऱ्यांच्या खात्यावर दाखवल्या जात आहेत. तसेच ज्या कर्मचाऱ्यांना कर्जमुक्त झाल्याचे प्रमाणपत्र दिले आहे, पण त्यांच्या खात्यावर अजूनही थकबाकी दर्शवली जात आहे. पतपेढीत जवळपास ४० संशयास्पद खाते आहेत. त्यामध्ये आर्थिक अनियमितता दिसून येत आहे. या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी पतपेढीचे पदसिद्ध अध्यक्ष कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांच्यासह सर्वांकडे करण्यात आली. मात्र, तक्रारींची दखल घेतली जात नसल्याचे संतोष मदने या संचालकांचे म्हणणे आहे. पतपेढीचे अध्यक्ष प्रफुल्ल पवार यांनी पतपेढीमध्ये आर्थिक अनियमितता असल्याची तक्रारीवरून पतपेढीकडून खुलासा मागविल्याचे सांगितले.

प्रभात Mon, 12 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/59733911

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

## उच्च शिक्षण अपूर्ण राहिलेल्यांनाही आता पदवी मिळवण्याची संधी

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून नियमात बदल

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** काही ना काही कारणाने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करू न शकलेल्या विद्यार्थ्यांना आता त्यांचे अपुरे राहिलेले शिक्षण पूर्ण करता येणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नियमावलीत काही महत्त्वपूर्ण बदल करत जुन्या अभ्यासक्रम, विषयांना समकक्षता दिली असून, त्यानुसार २०१६-१७पूर्वीचे विद्यार्थी आताच्या अभ्यासक्रमाचे विषय घेऊन, त्याची परीक्षा देऊन पदवी मिळवू शकतात.

उच्च शिक्षणात पदवी किंवा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आर्थिक-कौटुंबिक अशा काही अडचणींमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागते. संबंधित विद्यार्थ्याला काही वर्षांनी पुन्हा राहिलेले शिक्षण पूर्ण करायची इच्छा झाल्यास तोपर्यंत अभ्यासक्रम बदललेला असतो. त्यामुळे पूर्वीच्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना नव्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देण्याची मुभा नसल्याने अनेकांना पदवीपासून वंचित राहावे लागते. मात्र ही उणीव आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दूर केली आहे. विद्यापीठाच्या विद्या परिषदेने जुन्या विद्यार्थ्यांना नव्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देऊन पदवी मिळवण्याची सुविधा प्राप्त करून देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी नियमांत बदलही करण्यात आला आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, की २०१६-१७ पूर्वीच्या जुन्या पॅटर्नला समकक्षता देण्याचा निर्णय विद्यापीठाच्या विद्या परिषदेने घेतला. परीक्षा व मूल्यमापन विभागाने त्याची कार्यपद्धती ठरवली आहे. त्यानुसार संबंधित जुन्या विद्यार्थ्यांना सध्याच्या अभ्यासक्रमानुसार विषय घेऊन परीक्षा देण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना त्यांचे राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळेल.

**नव्या शैक्षणिक धोरणातही तरतूद**

सुमारे पाच टक्क्यांच्या आसपास विद्यार्थी शिक्षणातून बाहेर (ड्रॉपआऊट्स) जातात. त्यांना शिक्षण पूर्ण करायची इच्छा असल्यास आता संधी मिळू शकेल. तसेच विद्यार्थ्यांना पदवी पूर्ण केल्याचे मानसिक समाधान, सामाजिक आणि आर्थिक स्थैर्यही मिळेल. नव्या शैक्षणिक धोरणात 'मल्टिपल एंट्री मल्टिपल एक्झिट'ची तरतूद करण्यात आली आहे. त्या धर्तीवरच जुन्या विद्यार्थ्यांना पुन्हा प्रवाहात येता येईल. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असेही डॉ. काकडे यांनी नमूद केले.

लोकसत्ता Wed, 14 April 2021 https://epaper.loksatta.com/c/59770573

## पुणे विद्यापीठाचे पुन्हा 'वर्क फ्रॉम होम'

### करोना प्रतिबंधक नियम : प्रशासकीय उपस्थितीही निम्म्यावर

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. १४ - करोना प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग १५ ते ३० एप्रिलदरम्यान बंद ठेवण्यात येणार आहेत. कर्मचाऱ्यांसाठी 'वर्क फ्रॉम होम'ला प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रशासकीय कार्यालयांचे कामकाज रोटेशन पद्धतीने सुरू राहणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यालयातील शिक्षक, अधिकारी, सेवक यांच्या उपस्थितीवर प्रशासनाने मर्यादित कालावधीसाठी निर्बंध आणले आहेत. सर्व प्रशासकीय कार्यालयांची तातडीची व महत्त्वाची कामे सुरू राहण्याच्या दृष्टीने ५० टक्के उपस्थितीप्रमाणे सेवकांना कार्यालयात बोलावून कामकाज करून घ्यावे लागणार आहे. रजेवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा यात समावेश करण्यात येणार नाही. प्रतिबंधित क्षेत्रात निवास असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना कार्यालयीन कामकाजाकरिता बोलावू नये, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

परीक्षा व परीक्षेसंबंधी इतर कामकाज हे अत्यावश्यक स्वरूपाचे असल्याने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत आवश्यकतेनुसार आदेश निर्गमित करण्याचे अधिकार परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकांना देण्यात आले आहेत. सुरक्षा विभाग, आरोग्य केंद्र, स्थावर व गृहव्यवस्थापन विभाग ही कार्यालये अत्यावश्यक सेवेत येत असल्याने आवश्यकतेनुसार पूर्ण क्षमतेनुसार सुरू राहणार आहेत. विद्यापीठाच्या सर्व प्रवेशद्वारातून केवळ विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी, विद्यापीठातील रहिवाशी यांना विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र पाहूनच प्रवेश दिला जाणार आहे, असे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी परिपत्रकात नमूद केले आहे.

प्रभात Thu, 15 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/59796836

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

पुढारी

# सत्र परीक्षेत ९० टक्के उपस्थिती

## शैक्षणिक विभाग बंद; तरीही परीक्षा सुरळीत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुणे शहरात कडक निर्बंध असतानाच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग येत्या ३० एप्रिलपर्यंत बंद आहेत. मात्र, याचा कोणताही अडथळा विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या ऑनलाइन सत्र परीक्षांवर झालेला नाही.

परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ९० टक्क्यांपेक्षा अधिक असून विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या सूक्ष्म नियोजनामुळे आठवडाभरापासून सुरू असणारी परीक्षा यशस्वीपणे पार पडत असल्याचे दिसून येत आहे.

विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असणाऱ्या पुण्यासह, नाशिक आणि नगर जिल्ह्यात बाधितांची संख्या मोठी आहे. त्यातच आता विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग बंद असून, विद्यापीठात केवळ ठराविक व्यक्तींनाच ओळखपत्राच्या आधारे प्रवेश दिला जात आहे. त्यामुळे सत्र परीक्षा पूर्ण होणार की नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, गेल्यावर्षी ऑनलाइन परीक्षेत उद्भवलेल्या अडचणींतून विद्यापीठ प्रशासनाला अनुभव मिळाला. या अनुभवाच्या आधारावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाने यंदाच्या सत्र परीक्षांसाठी नियोजनबद्ध तयारी केली आहे. त्याचाच परिणाम आता सत्र परीक्षांवर जाणवू लागला आहे.

गेल्या शनिवारीपासून विद्यार्थ्यांची घरबसल्या प्रॉक्टर्ड मेथडने सत्र परीक्षा सुरू आहे. या सात दिवसांत विद्यार्थ्यांना किरकोळ तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला असून, त्यादेखील विद्यापीठाच्या वॉर रुमच्या माध्यमातून तातडीने सोडविण्यात येत आहेत. त्यामुळे गेल्या परीक्षेच्या तुलनेत यंदा विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींचा त्रास सहन करावा लागत नसल्याचे चित्र आहे.

### शुक्रवारी ९४.९७ टक्के उपस्थिती

शुक्रवारी दोन्ही सत्रांत झालेल्या परीक्षेला १ लाख ४२ हजार ५४० विद्यार्थी उपस्थित राहण्याची अपेक्षा होती. प्रत्यक्षात १ लाख ३५ हजार ३६४ विद्यार्थी उपस्थित राहिले. उपस्थितीचा टक्का जवळपास ९४.९७ टक्के असल्याचे दिसून आले.

My Pune Edition
Apr 17, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# 'एनसीसी'चा अभ्यासक्रमात समावेश करा

## विद्यापीठ अनुदान आयोगाकडे एनसीसीच्या मुख्यालयाचा प्रस्ताव

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठांनी 'नॅशनल कॅडेट कॉर्पचा'चा (एनसीसी) अभ्यासक्रमात समावेश करावा व एनसीसीला पर्यायी विषय म्हणून मान्यता देण्यात यावी, असा प्रस्ताव एनसीसीच्या मुख्यालयाने विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीकडे दाखल केला आहे.

या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी यूजीसीने सर्व विद्यापीठांच्या सूचना मागविल्या असून, लवकरात लवकर यासंदर्भातील आपले मत यूजीसीकडे दाखल करावे, अशा सूचना करण्यात आल्या आहेत. या प्रस्तावामुळे 'एनसीसी'ला पर्यायी विषय म्हणून मान्यता मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

देशात प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'एनसीसी'मध्ये दाखल होऊन शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी सैनिकी प्रशिक्षणाचे धडे घेतात. देशातील सुरक्षा दलांमध्ये जाऊ इच्छिणाऱ्या तरुणांसाठी एनसीसी ही पहिली पायरी ठरते. त्यामुळे एनसीसीला विषय म्हणून अभ्यासक्रमामध्ये मान्यता मिळावी, असा प्रस्ताव एनसीसीच्या मुख्यालयाकडून दाखल करण्यात आला आहे.

महाविद्यालयांमध्ये एनसीसीचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना 'सी-सर्टिफिकेट' (प्रमाणपत्र) मिळते. लष्कर भरतीमध्ये त्याची दखल घेतली जाते. देशभरात लाखो विद्यार्थी एनसीसीमध्ये सहभागी होतात.

महाविद्यालयीन स्तरावर तीन वर्षांचे प्रशिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना हे प्रमाणपत्र दिले जाते, परंतु याचा अभ्यासक्रमामध्ये समावेश नसल्याने त्याचे गुण विद्यार्थ्यांना मिळत नाहीत. ज्याप्रमाणे शारीरिक शिक्षण हा विषय म्हणून विद्यार्थ्यांना शिकवला जातो, त्याचप्रमाणे एनसीसीदेखील असावे, अशी मांडणी एनसीसी मुख्यालयाकडून करण्यात आली आहे.

महाविद्यालयीन स्तरावर तीन वर्षे विद्यार्थी एनसीसीचे प्रशिक्षण घेतात. या काळात महाविद्यालयाचे तास वगळून अतिरिक्त वेळेत हे प्रशिक्षण दिले जाते. विद्यार्थी घेत असलेल्या मेहनतीला न्याय मिळावा आणि विद्यापीठ स्तरावर त्याची दखल घेतली जावी, यासाठी एनसीसी हा पर्यायी विषय म्हणून मान्य करावा, असा प्रस्ताव यूजीसीकडे देण्यात आला आहे. या प्रस्तावात एनसीसीच्या गुणांकनाबद्दल आणि अभ्यासक्रमाबद्दल सखोल माहिती देण्यात आली आहे. प्रस्तावासंदर्भात सर्व विद्यापीठांनी त्यांच्या राज्यातील एनसीसीच्या मुख्यालयाशी संपर्क करण्याच्या सूचनाही यूजीसीकडून देण्यात आल्या आहेत.

Pune Edition
Apr 17, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

# सेवानिवृत्त प्राध्यापक नियुक्ती रद्द करावी

## विद्यापीठाकडे अधिसभा सदस्यांची मागणी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १६ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची आर्थिक स्थिती योग्य नसतानाही विद्यापीठ प्रशासनाकडून विभागातून सेवानिवृत्त झालेल्या काही प्राध्यापकांना विद्यापीठ फंडातून नियुक्त करण्याचा सर्रास प्रकार सुरू आहे. सेट-नेट, पीएचडी झालेले उमेदवार अध्यानाच्या प्रतीक्षेत असतानाही सुमारे ५० हजार रुपये मानधन देऊन सेवानिवृत्त प्राध्यापकांची नियुक्ती रद्द करावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांतून होत आहे.

विद्यापीठातील प्राध्यापकांनी लाखो रुपये वेतन घेऊन काम केले आहे. तसेच बहुतांश सर्व प्राध्यापकांना निवृत्ती वेतन सुरू आहे. तरीही विद्यापीठाने या प्राध्यापकांना मानधन दिले आहे. विद्यापीठ फंडातून नियुक्त केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर दरवर्षी तब्बल ६० कोटी रुपये एवढा निधी खर्च होतो. त्यामुळे विद्यापीठाने हा खर्च कमी करण्यासाठी सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या नियुक्त्या रद्द करणे उचित ठरेल. जवळपास ३० हून अधिक सेवानिवृत्त प्राध्यापक कार्यरत असून, त्याबाबत विद्यापीठ प्रशासनने तत्काळ धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे अधिसभा सदस्य शशिकांत तिकोटे यांनी सांगितले. विद्यापीठाने अनेक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियुक्त करून एक प्रकारे विद्यापीठाच्या निधीचा चुकीच्या ठिकाणी वापर सुरू ठेवला आहे. कोरोना काळात ऑफलाइन वर्ग भरवले जात नाहीत, असेही तिकोटे यांनी कुलगुरूंना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

प्रभात Sat, 17 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/59844558

विद्यापीठाच्या संकेतस्थळात तांत्रिक अडचणी; प्राध्यापक त्रस्त

# अंतर्गत गुण भरताना तांत्रिक अडचणी



> अंतर्गत गुण भरताना अडचणी येत असल्याने मुदतवाढ दिली होती. अद्यापही अडचणी येत असतील तर पुन्हा मुदतवाढ देऊ. सॉफ्टवेअरमध्ये त्रुटी आहेत का याची चौकशी करून प्राध्यापकांचा त्रास कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.
> – **महेश काकडे**, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, विद्यापीठ

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १६ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची प्रथम सत्र परीक्षा सुरू झाली आहे. मात्र, त्याचवेळी महाविद्यालयातर्फे अंतर्गत मुल्यांकनाचे गुण विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भरण्यासाठी प्राध्यापक तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. गुण भरताना सॉफ्टवेअर अचानक बंद होणे, भरलेले गुण सेव्ह न होणे, पुन्हा सुरूवातीपासून काम करावे लागत आहे. यामुळे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापक त्रस्त आहेत.

पुणे विद्यापीठाने ऑनलाइन प्रथम सत्र परिक्षा सुरू झाली आहे. त्याच सोबत मार्च महिन्यापासून महाविद्यालयांकडून अंतर्गत गुण परीक्षा विभागाने ऑनलाइन मागविले होते. त्यासाठी १० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आलेली होती. पण अद्याप अनेक विषयांचे गुण भरले गेलेले नसल्याने व महाविद्यालयांना येत असलेल्या अडचणींमुळे यासाठी २० एप्रिलपर्यंतची मुदतवाढ दिली आहे. तरीही प्राध्यापकांसमोरील अडचणी संपलेल्या नाहीत.

दरम्यान, मला पदवीच्या तिन्ही वर्षांचा डेटा भरायचा आहे. ५०० पेक्षा जास्त विद्यार्थी माझ्याकडे आहेत. पण सॉफ्टवेअर अतिशय मंद आहेत, काम करताना अचानक लॉगआउट होत आहे. त्यामुळे सॉफ्टवेअरमध्ये भरलेली माहिती सेव्ह होत नाही. गेल्या चार पाच वर्षापासून हेच सॉफ्टवेअर आम्ही वापरत आहोत. पण त्यात सुधारणा केली जात नसल्याने प्रचंड त्रास होत असल्याचे एका प्राध्यापकाने सांगितले. गुण भरताना अडचणी येत असल्याबद्दल प्राचार्यांकडे तक्रार केली तर ते याच्याशी महाविद्यालयाचा संबंध नाही, तुम्ही परीक्षा विभागाची बोलून वेळेत काम पूर्ण करा असे सांगतात. परीक्षा विभागातही कोणीही ऐकून घेत नाही. एका प्राध्यापकाकडे २००-३०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे काम आहे. हे काम गतीने आणि चांगल्या पद्धतीने झाले तर चुका होणार नाही, अशी मागणी प्राध्यापकांतून होत आहे.

प्रभात Sat, 17 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/59889808

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

## SPPU exams see good turnout, students happy with tech revamp

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE** : Despite the rising Covid-19 cases in Maharashtra, the percentage of students appearing for the Savitribai Phule Pune University's (SPPU) first semester online examination has not been impacted at this time. In fact, since the exams began on April 10, there has been an increasing graph of students appearing for the exams.

Students say, in comparison to last year, there are fewer technical issues or glitches this year. On the first day of the exams on April 10, a total of 25,356 students appeared for the exam on various subjects from across the departments. While today on April 16, a total of 1,35,364 students appeared with a total attendance percentage of 94.97 per cent. The first semester examination is being held online for students from first to last year of all courses. The exam is conducted of 50 marks with multiple-choice questions (MCQ) method in online mode. The university's own SPPU Edutech Foundation company is conducting the exam.

"In comparison to last year's experience with technical issues and problems faced by students, it's been better this year. Students are happy about the management done by the university to conduct the exams in online mode. I will still suggest improving the helpline number management system in terms of getting a quick response, said Kamlakar Shete, an SPPU student.

Indrakumar Shinde, another student said, "I am appearing for the second-year commerce exams, and it was a good experience for me. When I login for the examination, the system is smooth and we can easily appear, give the answers and submit the exam in time." Last year from October 12, 2020, SPPU started its final year exams for 3,300 subjects for which 2.5 lakh students enrolled.From the first day onwards both online and offline students faced a lot of issues while appearing for the exam and it even continued in the results. For the offline exams, 113 centres were identified where physical exams were conducted in Pune, Nashik and Ahmednagar districts. These exams were 50 marks with multiple-choice questions (MCQ) for one-hour duration.

Mahesh Kakade, SPPU's director of the board of examination and evaluation said, "The current first semester exams are going on smoothly and our helpline numbers and staff are working hard to solve any issues faced by students. We hope that the first semester online exams are carried out well."

> In comparison to last year's experience with technical issues and problems faced by students, it's been better this year. Students are happy about the management done by the university
>
> **KAMLAKAR SHETE**, SPPU student

> The current first semester exams are going on smoothly and our helpline numbers and staff are working hard to solve any issues faced by students. We hope that the online exams are carried out well.
>
> **MAHESH KAKADE**, SPPU director of exam and evaluation

**HIGH TURNOUT**

**April 15**
Expected – **43,068**
Appeared – **39,483**
Absent – **3,585**

**April 16**
Expected – **1,42,540**
Appeared – **1,35,364**
Absent – **7,176**

Hindustan Times 17.4.2021

## महाविद्यालये राहणार ३० एप्रिलपर्यंत बंद

**पुणे, ता. १७ :** कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने राज्य सरकारने पंधरा दिवस संचारबंदी जाहीर केली आहे. यामुळे महाविद्यालयांमधून दिले जाणारे प्रत्यक्ष शिक्षण बंद करून केवळ ऑनलाइन वर्ग घेतले जावेत, असे आदेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिले आहेत. त्यानुसार महाविद्यालये ३० एप्रिलपर्यंत बंद असतील.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात लॉकडाउन लागू करण्यात आला होता. त्या वेळी सरकारने सर्व विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांना अध्यापनाचे नियमित वर्ग बंद ठेवण्याचे आदेश मागील वर्षी मार्च महिन्यात दिले होते. त्यानंतर लॉकडाउन शिथिल झाल्यानंतर पुणे विद्यापीठाने पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालये सुरू करण्यासाठी आदेश दिले होते. पुण्यात फेब्रुवारी महिन्यात पुन्हा कोरोनाचा संसर्ग वाढू लागल्याने महापालिकेने शाळा, महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय घेतला. पण नगर व नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये थेट शिक्षण सुरू होते. राज्य सरकारने संचारबंदीचे आदेश काढल्यानंतर महाविद्यालयांना नियमित वर्ग पूर्णतः बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाचे पालन करून काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने स्पष्ट केले आहे.

### कामकाजाबाबत परिपत्रक

विद्यापीठ प्रशासनानेदेखील विद्यापीठाच्या कामकाजासाठी परिपत्रक काढले आहे. त्यामध्ये अत्यावश्यक विभाग वगळता सर्व शैक्षणिक विभाग येत्या ३० एप्रिलपर्यंत बंद करण्यात येणार आहेत. सध्या परीक्षा सुरू असल्याने परीक्षा विभागासंदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार परीक्षा संचालकांना देण्यात आलेले आहेत.

Sakaal 18.4.2021

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

## सीए, आयसीडब्ल्यूए पदवी एकसमान

### विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता; 'सीएस'साठीदेखील निर्णय लागू

पुणे, ता. १७ : तुम्ही सनदी लेखापाल (सीए) किंवा सीएस झाला असाल किंवा तुमचे आयसीडब्ल्यूए झाले असेल, तर तुमच्यासाठी एक आनंदाची बाब आहे. त्यामुळे जरा इकडे लक्ष द्या..! आता सीए, सीएस आणि आयसीडब्ल्यूए या पात्रता आणि एखाद्या विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी मिळविणे हे आता एकसमान असणार आहे. याला विद्यापीठ अनुदान आयोगाने नुकतीच मान्यता दिली आहे.

सीए, सीएस आणि आयसीडब्ल्यूए या पात्रतेला पदव्युत्तर पदवी या पात्रतेचा समान दर्जा मिळण्यासाठी द इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया, द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया आणि द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया यांच्यातर्फे विद्यापीठ अनुदान आयोगाला विनंती करण्यात आली होती. आयोगामार्फत १८ फेब्रुवारी २०२१ रोजी झालेल्या बैठकीत याला नुकतीच मान्यता देण्यात आली. त्यानुसार 'सीए, सीएस आणि आयसीडब्ल्यूए या पात्रता एखाद्या पदव्युत्तर पदवी समान असतील, असे आयोगाचे सचिव रजनीश जैन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

देशभरात तीन लाख दहा हजारांहून अधिक सनदी लेखापाल असून दरवर्षी जवळपास सात ते दहा हजार विद्यार्थी सीए होतात. तर देशभरात एक लाखांहून अधिक आयसीडब्ल्यूए, तर ६० हजारांहून अधिक सीएस आहेत. आयोगाच्या या निर्णयाचा फायदा या पात्रता असणाऱ्या सगळ्यांना होणार आहे.

> विद्यापीठ अनुदान आयोगाचा हा निर्णय स्वागतार्ह आहे. त्यामुळे सीए, सीएस, आयसीडब्ल्यूए क्षेत्रात काम करणाऱ्यांना पीएच.डी.च्या माध्यमातून संशोधन करता येणार आहे. तसेच अध्यापन क्षेत्रातही प्रवेश करता येणार आहे.
>
> - **समीर लड्डा**, अध्यक्ष, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (पुणे शाखा)

> या निर्णयाचा कंपनी सेक्रेटरी या क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे. एखाद्या विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याला विद्यापीठातून पीएच.डी. करण्याचा मार्ग मोकळा होता. आता सीएस झालेल्यांसाठीदेखील हा मार्ग खुला होणार आहे.
>
> - **हृषीकेश वाघ**, सदस्य, पश्चिम विभाग, कौन्सिल ऑफ द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया

> सीए पात्रतेला या निर्णयामुळे देशात आणि जगभरात एक ओळख मिळणार आहे. अनेक वर्षांपासून सनदी लेखापाल हे प्रस्थापित होते. परंतु आता अधिकृतरीत्या त्याला पदव्युत्तर पदवीप्रमाणे दर्जा मिळाला आहे. यामुळे सीए झालेल्या पीएच.डी. करणे सोईस्कर होणार आहे.
>
> - **अभिषेक धामणे**, माजी अध्यक्ष, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (पुणे शाखा)

Sakaal 18.4.2021

## विद्यापीठ शुल्क हिस्सा भरावाच लागणार

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे महाविद्यालयांना मुदतवाढ

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १७** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सलंग्रित महाविद्यालयात विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठ हिस्सा ऑनलाइन पद्धतीने भरण्यासाठी विद्यापीठाने मुदतवाढ दिली आहे. आता महाविद्यलायांना शुल्कातील विद्यापीठ हिस्सा भरण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

विद्यार्थी सुरक्षा विमा, विद्यार्थी कल्याण निधी, विद्यार्थी आरोग्य सेवा योजना, आपत्कालीन निधी, विद्यापीठ क्रीडा मंडळ व शारीरिक शिक्षण मंडळ निधी, नोंदणी शुल्क, संगणक शुल्क व विकास निधीतील विद्यापीठ हिस्सा भरण्यासाठी यापूर्वीच महाविद्यालयांना सूचित केले होते. त्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि, काही महाविद्यालय व संस्थांनी शुल्काची रक्कम अद्यापही भरलेली नाही.

त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने पुन्हा एकदा नव्याने परिपत्रक प्रसिद्ध करीत शुल्कातील विद्यापीठ हिस्सा भरण्याचे आवाहन केले आहे. सर्वांनी ऑनलाइन पद्धतीने चलन भरणे आवश्यक आहे. निधीबाबत माहिती भरण्याची ऑनलाइन प्रक्रिया 'बीओडी' पोर्टल अंतर्गत दिली आहे. बीओडी लॉग-इनमध्ये प्रो-रेटा ऑनलाइन ही लिंक वापरून ही माहिती भरावेत, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

प्रभात Sun, 18 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/59889435

## *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

लोकमत

# परीक्षा रद्द केल्याने प्रवेश प्रक्रियेवर परिणाम

## सीबीएसईच्या विद्यार्थ्यांची समस्या; पुढे प्रवेश कसा मिळणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशनने (सीबीएसई) इयत्ता दहावीच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला.त्यावर एसएससी बोर्डाच्या परीक्षांयाबाबतसुद्धा तज्ज्ञांशी चर्चा केली जाईल, असे शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी स्पष्ट केले. मात्र, परीक्षा रद्द केल्याने पुढील प्रवेश प्रक्रियेवर परिणाम होणार आहे. त्यामुळे याबाबत आताच विचार करण्याची आवश्यकता असल्याचे तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

विद्यार्थी व पालकांच्या दृष्टीने इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षांना वेगळेच स्थान आहे. तसेच परीक्षा न घेता विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करणे उचित नाही. इयत्ता दहावीच्या गुणांवर आयटीआय पॉलिटेक्निक आणि इयत्ता अकरावीमध्ये प्रवेश दिला जातो. परीक्षाच झाल्या नाहीत, तर या अभ्यासक्रमांना प्रवेश कसा द्यायचा? असा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घेण्यापूर्वी त्या निर्णयामुळे निर्माण होणा-या समस्यांचा विचार करणे गरजेचे आहे, असेही शिक्षणतज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रवेशपूर्व परीक्षा घेतल्या जातात. या प्रवेश पूर्व परीक्षांमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारेच विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. इयत्ता दहावीच्या परीक्षा घेतल्या गेल्या नाहीत तर पुढील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी दहावीच्या विद्यार्थ्यांना सुद्धा प्रवेश पूर्व परीक्षा द्यावी लागू शकते. मात्र, प्रवेशपूर्व परीक्षा घेण्याऐवजी दहावीची लेखी परीक्षा घेणेच उचित ठरेल, अशी चर्चा शिक्षण वर्तुळात केली जात आहे.

> राज्य शासनाने सध्या केवळ परीक्षा पुढे ढकल्या आहेत. त्या रद्द केल्या नाहीत. त्यामुळे याबाबत आताच भाष्य करणे योग्य ठरणार नाही. परंतु, सीबीएससी बोर्डाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षा रद्द केल्यामुळे निश्चितच त्यांना पुढील अभ्यासक्रमाच्या प्रवेश याबाबत अडचणी येऊ शकतात. या विद्यार्थ्यांना प्रवेशपूर्व परीक्षांना सामोरे जावे लागू शकते.
>
> - **एन. के. जरग**, माजी संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य



> राज्य शासन एसएससी बोर्डाच्या परीक्षांबाबत काय निर्णय घेणार याबाबत वाट पाहावी लागणार आहे. परंतु, सीबीएसई प्रमाणे दहावीच्या परीक्षा रद्द झाल्या तर पुढील अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात. कदाचित दहावीनंतरच्या सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षांच्या पर्यायचा विचार करावा लागेल.
>
> - **गंगाधर म्हमाणे**, माजी संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य

Pune Main
Page No. 2 Apr 18, 2021
Powered by: erelego.com

# दहावी, बारावीच्या विशेष परीक्षाही रद्द

## विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आता दोनच संधी मिळणार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १७** - राज्य शासनाने इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. त्यामुळे आता या विद्यार्थ्यांना नियमित व पुरवणी परीक्षा अशा दोनच संधी मिळणार आहेत. राज्य मंडळाकडून परीक्षाचे सुधारित वेळापत्रक काही दिवसात जाहीर करण्यात येणार आहे. दरम्यान करोनाच्या प्रादुर्भावामुळे परीक्षेला गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जूनमध्ये नियोजित करण्यात आलेली विशेष परीक्षा रद्द होणार आहे.

दहावीची परीक्षा २९ एप्रिल ते २० मे तर बारावीची परीक्षा २३ एप्रिल ते २१ मे या कालावधीत होणार होती. याबाबतचे वेळापत्रकही राज्य मंडळाने जाहीर केले होते. मात्र, करोनामुळे परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी पालक व इतर संघटनांकडून करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर दहावी आणि बारावीच्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी जाहीरही केला आहे.



करोनाच्या संकटात परीक्षा होणार असल्याने कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी नियमित परीक्षेनंतर आणि पुरवणी परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना परीक्षेची आणखी एक संधी उपलब्ध करून देण्यासाठी जूनमध्ये विशेष परीक्षा घेण्याचे राज्य मंडळाने ठरवले होते.

आता नियमित परीक्षाच पुढे ढकलण्यात आल्याने परीक्षेसाठी उपलब्ध असलेला वेळ कमी झाला आहे. त्यामुळे अतिरिक्त संधी देणारी विशेष परीक्षा राज्य मंडळाला घेता येणार नाही, असे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष दिनकर पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

प्रभात Sun, 18 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/59852318

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

## ऑनलाइन परीक्षेतील त्रुटी दूर करणार

### विद्यापीठाचा पुढाकार; तातडीची बैठक घेत चर्चा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १७ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शुक्रवारी झालेल्या ऑनलाइन परीक्षेत आकृत्याच गायब झाल्याचा प्रकार समोर आला होता. त्यानंतर विद्यापीठाने तांत्रिक त्रुटी करण्यासाठी पुढाकार घेत आज बैठक घेतली. त्यात पुन्हा एकदा सर्व प्रश्नपत्रिका तपासल्या जाणार असल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली.

विद्यापीठातर्फे शुक्रवारी घेण्यात आलेल्या परीक्षेतील अभियांत्रिकीच्या पेपरमध्ये आठ प्रश्नांमधील आकृत्या दिसत नसल्याने विद्यार्थ्यांना प्रश्न सोडविता आले नव्हते. सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांना याचा फटका बसला. यापार्श्वभूमीवर आज विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर यांनी बैठक घेऊन यातील त्रुटी दूर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

यासंदर्भात डॉ. चासकर म्हणाले की, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेच्या बहुतांश विषयांच्या परीक्षेत आकृत्यांवर आधारित प्रश्न आहेत. यापुढे अशा समस्या निर्माण होऊ नये यासाठी आज बैठक घेऊन तांत्रिक त्रुटी दूर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यापुढे अशा अडचणी येणार नसल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, विद्यापीठातर्फे शनिवारी ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. त्या तीन सत्रांमध्ये १ लाख ३४ हजार ३८४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. आज झालेल्या परीक्षेत जवळपास ९५.४३ टक्के विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले.

**विद्यार्थ्यांनी वेळेत लॉगीन करावे...**

ऑनलाइन परीक्षेसाठी लॉगीन करताना येणाऱ्या अडचणींसह, पेपर सबमीट करणे, कॅमेरा सुरू न होणे अशा अडचणी सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना हेल्पलाइन व चॅटबॉक्सची मदत होत आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांना लगेच उत्तर मिळत असल्याने परीक्षेतील अडचणी कमी झाल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी ठरलेल्या वेळेत लॉगीन करावे, उशीर करू नये, असेही विद्यापीठाने सूचित केले आहे.

प्रभात Sun, 18 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/59889329



## नियमित वर्ग पूर्णतः बंदच

### पुणे विद्यापीठाचे महाविद्यालयांना आदेश

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १७ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना राज्य शासनाच्या सुधारित आदेशानुसार नियमित वर्ग ३० एप्रिलपर्यंत पूर्णतः बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे करोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने दिलेल्या सूचनेनुसार महाविद्यालयांना नियमित वर्ग सुरू करता येणार नसल्याचे विद्यापीठाने महाविद्यालयांना कळवले आहे.

करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासनाने सर्व विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांना अध्यापनाचे नियमित वर्ग बंद ठेवण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर विद्यापीठ प्रशासनानेही तशा सूचना दिल्या होत्या. तथापि, करोनाची वाढती संख्या लक्षात घेता राज्य शासनाने नव्याने आदेश जारी केले आहेत.

त्यात महाविद्यालयांना नियमित वर्ग पूर्णतः बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार राज्य शासनाच्या आदेशाचे पालन करून काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, असे विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, विद्यापीठातील अत्यावश्यक विभाग वगळता सर्व शैक्षणिक विभाग येत्या ३० तारखेपर्यंत बंद करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे कोणत्याही कामासाठी विद्यापीठात येऊ नका, असेही विद्यापीठाने म्हटले आहे. मात्र, विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांना ऑनलाइन कामकाज पूर्वीप्रमाणे सुरू ठेवणे आवश्यक असल्याचे विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

प्रभात Sun, 18 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/598

## पीएच.डी.च्या रिक्त जागा किती?

### विद्यापीठाच्या आदेशानंतरही माहिती देण्यास मार्गदर्शकांची दिरंगाई

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १८ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएच. डी. अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया सुरू करावयाची आहे. त्यापूर्वी मान्यताप्राप्त मार्गदर्शकांना (गाइड) रिक्त जागांची माहिती अद्ययावत करण्याच्या सूचना विद्यापीठाने दिली होती. मात्र, त्यानंतही अजूनही रिक्त माहिती देण्यास मार्गदर्शकांकडून दिरंगाई होत असल्याचे दिसून येत आहे.




पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथील मार्गदर्शकांनी आपल्याकडे संशोधन करत असलेल्या विद्यार्थ्यांची माहितीही दि. १५ एप्रिलपर्यंत संशोधन केंद्रामार्फत सादर करावीत, असे सूचित केले होते. मात्र, या मुदतीतही काही मार्गदर्शकांनी रिक्त जागांची माहिती अद्ययावत केलेली नाही. त्यामुळे पुन्हा एकदा विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने नव्याने परिपत्रक प्रसिद्ध करीत रिक्त माहिती सादर करण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठी २६ एप्रिलपर्यंत मुदत वाढवण्यात आली आहे. यापुढे आता मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

मार्गदर्शकांना विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर अद्ययावत करणे बंधनकारक आहे. त्यामुळे ज्या मार्गदर्शकांना सन २०२१ मध्ये विद्यार्थी घ्यावयाचे नसतील, त्यांनीही नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. दरम्यान, मार्गदर्शकांनी वेळेत माहिती सादर न केल्यास पीएच.डी. प्रवेशप्रक्रियेसाठी रिक्त जागा विचारात घेतले जाणार नाहीत, असेही विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रभात Mon, 19 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/59888447

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

**लोकमत**

# नेट परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सहायक प्राध्यापक पदासाठी अनिवार्य असलेली आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) मार्फत घेतली जाणारी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) परीक्षा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुढे ढकलावी, अशी मागणी केली जात आहे. येत्या २ मे महिन्यापासून ही परीक्षा देशभरात घेतली जाणार असून विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून इतर परीक्षेप्रमाणे या परीक्षांबाबत योग्य निर्णय घ्यावा, अशी विनंती विद्यार्थ्यांनी केली आहे.

देशभरातील लाखो उमेदवार ऑनलाइन पद्धतीने ही परीक्षा देणार आहेत. येत्या २ ते १७ मे या कालावधीत ही परीक्षा घेण्यात येणार आहे. मात्र, कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने महाराष्ट्रासह अनेक राज्याने कठोर निर्बंध घातले आहेत. कोरोनाची साखळी रोखण्यासाठी सर्व प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे राज्य शासनाने एमपीएससी, वैद्यकीय परीक्षा आणि दहावी, बारावी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे सीबीएसईने बारावीच्या आणि नीट ही वैद्यकीय अभ्यासक्रमाची परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. त्यामुळे नेट परीक्षासुद्धा पुढे ढकलावी, अशी मागणी केली जात आहे.

> कोरोना रुग्णांची संख्या वाढत असल्याने राज्य शासनाने निर्बंध लादले आहेत. या परिस्थितीत अमेदवारांना परीक्षा देणे शक्य होणार नाही. त्यामुळे नेट परीक्षा पुढे ढकलावी.
>
> - **कमलाकर शेटे,** उपाध्यक्ष युक्रांद, पुणे शहर

Pune Main
Page No. 2 Apr 18, 2021
Powered by: erelego.com

**लोकमत**

# परीक्षेशिवाय मूल्यमापन अशक्य; अंतर्गत मूल्यमापनाबाबत शंका

## सीबीएससीचे देशातील विद्यार्थी १९ लाख : एसएससीचे विद्यार्थी १६ लाख

इन डेप्थ स्टोरी

**पुणे :** सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशनच्या (सीबीएसई) देशभरातील दहावीच्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे १९ लाख आहे. महाराष्ट्रातील एकट्या एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांची संख्या तब्बल १६ लाख आहे. तसेच सीबीएसई बोर्डाला प्रवेश घेणारा वर्ग हा वेगळा आहे. तो एसएससी बोर्डाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा खूप कमी आहे. त्यामुळे केवळ एका राज्यातील १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना कोणत्याही मूल्यमापनाशिवाय म्हणजेच परीक्षेविनी उत्तीर्ण करणे उचित ठरणार नाही, असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सीबीएसई बोर्डाच्या दहावीच्या परीक्षा रद्द केल्या. परंतु, अजमेर, भुवनेश्वर, पंचकूला, दिल्ली ईस्ट, गोहाटी, चेन्नई ,पटना, प्रयागराज, त्रिवेंद्रम, देहरादून, चंदीगड, पुणे, बेंगलोर, भोपाल आणि दिल्ली वेस्ट या विभागांतून २०२० मध्ये दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १९ लाख ४ हजार ७७२ एवढी होती. त्यात सीबीएसई बोर्डाच्या पुणे विभागातून केवळ ७६ हजार १७९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती.

सीबीएसई बोर्डाच्या तुलनेत एसएससी बोर्डाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असून एकूण सीबीएसई बोर्डाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या तुलनेत केवळ ३ लाखांनी कमी आहे. शैक्षणिक वर्ष २०२१ मध्ये एसएससी बोर्डाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १६ लाख २०६ एवढी आहे, तर एसएससी बोर्डाच्या पुणे विभागातून एकूण २ लाख ७१ हजार ५०३ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

सीबीएसई बोर्डाने अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्याचे घोषित केले आहे. परंतु, एसएससी बोर्डाच्या अंतर्गत मूल्यमापनाच्या पद्धतीबाबत अनेक शंका उपस्थित केल्या जातात. त्यामुळेच दोन वर्षांपूर्वी राज्य शासनाने अंतर्गत 'गुणदान' बंद केले होते. परिणामी परीक्षा न घेता एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे उचित होणार नाही. त्यामुळे कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर दहावी-बारावीच्या लेखी परीक्षा घ्याव्यात, असे मत शिक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

> दहावी-बारावीचे वर्ष विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी महत्त्वाचे असते. त्यामुळे परीक्षा घेऊनच या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे उचित ठरेल. सध्या मूल्यमापनाची वेगळी पद्धत आपल्याकडे उपलब्ध नाही.त्यामुळे कोरोनाबाबाच्या परिस्थितीचा आढावा घेत आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन या परीक्षा घेणे अपेक्षित आहे.
>
> - **डॉ. शकुंतला काळे,** माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ



> विद्यार्थ्यांचे करिअर दहावी बारावीच्या परीक्षांवर अवलंबून आहे. भावनेच्या किंवा परिस्थितीच्या आहारी जाऊन परीक्षा रद्दचा निर्णय घेतला तर भविष्यात या विद्यार्थ्यांना त्रास होऊ शकतो. सध्या परिस्थिती फार भयानक आहे; हे वास्तव अमान्य करता येणार नाही. परंतु, परीक्षा या संबंधित विद्यार्थ्यांच्या शाळेमध्येच घेता येऊ शकतात. परीक्षा सुरू असताना तेथे एक शासकीय निरीक्षक उपस्थित असावा. कोरोनाबाबतची सर्व काळजी घेऊन परीक्षा आयोजित केल्या तर त्या सुरळीतपणे पार पाडता येऊ शकतात.
>
> - **डॉ. सुनील मगर,** माजी संचालक, बालभारती

Pune Main
Page No. 2 Apr 19, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

लोकमत

## विद्यापीठाने रविवारी घेतल्या प्रथम सत्राच्या परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्रथम सत्राच्या परीक्षा उशिरा सुरू झाल्या. त्यामुळे रविवारीसुद्धा परीक्षा घेतल्या जाणार असल्याचे विद्यापीठाने सुरुवातीला जाहीर केले होते. त्यानुसार रविवारी (दि. १८) १ लाख ३९ हजार ९७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठातर्फे पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांतील प्रथम सत्राच्या परीक्षा सुरू करण्यात आल्या असून, विद्यापीठाने रविवारी पहिल्यांदा परीक्षा घेतल्या. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे ११ एप्रिल रोजी परीक्षा घेतली जाणार होती. त्यामुळे विद्यापीठातर्फे मागील रविवारी परीक्षेचे आयोजन करण्यात आले नाही. मात्र, या रविवारी १ लाख ४५ हजार ६१५ विद्यार्थी परीक्षा देणार होते. प्रत्यक्षात १ लाख ३९ हजार ९७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. सकाळच्या सत्रात ५२ हजार, दुपारच्या सत्रात २७ हजार, तर सायंकाळच्या सत्रात ५८ हजार विद्यार्थ्यांनी विद्यापीठाची परीक्षा दिली, असे विद्यापीठातर्फे कळविण्यात आले आहे.



Hello Pune
Page No. 1 Apr 19, 2021
Powered by: erelego.com

# अर्धे शिक्षण होणार पूर्ण

## उच्च शिक्षण अपुरे राहिलेल्या विद्यार्थ्यांबाबतच्या नियमांत बदल

म. टा. प्रतिनिधी, पुणे

उच्च शिक्षण पूर्ण करू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिली आहे. विद्यापीठ आयोगाच्या अधिसूचनेनुसार (यूजीसी) पुणे विद्यापीठाने नियमावलीत काही महत्त्वाचा बदल केले आहेत. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पूर्वीचे विद्यार्थी आताच्या अभ्यासक्रमाचे विषय घेऊन त्याची परीक्षा देऊ शकतात. या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर त्यांना अभ्यासक्रमाची पदवी मिळू शकतात.

उच्च शिक्षणात पदवी किंवा पदव्युत्तर पदवी घेणाऱ्या काही विद्यार्थ्यांना आर्थिक-कौटुंबिक, शारीरिक अडचणींमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागते. काही वर्षांनी पुन्हा राहिलेले शिक्षण पूर्ण करायची इच्छा झाल्यास तोपर्यंत अभ्यासक्रम बदललेला असतो. त्यामुळे पूर्वीच्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना नव्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देण्याची मुभा नसल्याने अनेकांना पदवीपासून वंचित राहावे लागते. अशा परिस्थितीत पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करू न शकलेल्या विद्यार्थ्यांना आता त्यांचे राहिलेले शिक्षण पूर्ण करता येणार आहे. याबाबत 'यूजीसी'ने अधिसूचना प्रसिद्ध करून विद्यापीठांना अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याची अंमलबजावणी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून करण्यात येत आहे.

विद्यापीठाच्या विद्या परिषदेने जुन्या विद्यार्थ्यांना नव्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देऊन पदवी मिळवण्याची सुविधा प्राप्त करून देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी नियमांत बदलही करण्यात आला आहे. 'शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पूर्वीच्या जुन्या पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना समकक्षता देण्याचा निर्णय विद्यापीठाच्या विद्या परिषदेने घेतला. संबंधित विद्यार्थ्यांना सध्याच्या अभ्यासक्रमानुसार विषय घेऊन परीक्षा देण्याची मुभा आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळेल,' असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.



### मल्टिपल एंट्री मल्टिपल एक्झिटची सुविधा

'आपल्या देशात सुमारे पाच टक्क्यांच्या आसपास विद्यार्थी शिक्षणातून बाहेर (ड्रॉप आउट) जातात. त्यांना शिक्षण पूर्ण करायची इच्छा असल्यास आता संधी मिळू शकेल. पदवी पूर्ण केल्याचे मानसिक समाधान, सामाजिक आणि आर्थिक स्थैर्य मिळेल. नव्या शैक्षणिक धोरणातही 'मल्टिपल एंट्री मल्टिपल एक्झिट'ची सुविधा देण्यात आली आहेत. त्या धर्तीवरच जुन्या विद्यार्थ्यांना पुन्हा प्रवाहात येता येईल. पुणे विद्यापीठाच्या आगामी सत्र परीक्षांपासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल,' असेही डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

Maharashtra Times 19.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

# विद्यार्थ्यांसह पालकांची 'परीक्षा'

## बोर्डाच्या परीक्षेंबाबत संभ्रम

पुणे, ता. १८ : ''कोरोनाच्या वाढत्या संसर्गामुळे गेल्या एक वर्षापासून विद्यार्थी घरात बसून अभ्यास करत आहेत. साहजिकच आई म्हणून त्यांच्याकडे जास्त लक्ष द्यावे लागत आहे. आता राज्य मंडळाच्या दहावीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आणि सीबीएसईच्या दहावीच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या. या निर्णयामुळे 'त्यांची परीक्षा होणार नाही, मग आमची होणार!' असे प्रश्न मुलगा विचारू लागलाय. त्याला परीक्षेचे महत्त्व, केलेल्या अभ्यासाचे मूल्यमापन होणे का गरजेचे आहे, हे समजवावे लागतंय'', असा अनुभव सांगत गृहिणी असलेल्या सुनैना थोरात यांनी बोर्डाच्या परीक्षेबाबत चिंता व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचा निर्णय सोमवारी जाहीर केला. त्यापाठोपाठ केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावीच्या परीक्षा रद्द आणि बारावीच्या परीक्षाबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असे बुधवारी स्पष्ट केले. यानंतर मात्र दहावी-बारावीच्या परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा गोंधळ आणखीच वाढला. सीबीएसईच्या दहावीच्या परीक्षा रद्द आणि राज्य मंडळाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या, या निर्णयामुळे पुढील शैक्षणिक वर्षात अकरावी, पदविका अभ्यासक्रम, आयटीआय अशा विविध प्रवेश प्रक्रिया कोणत्या आधारावर राबविल्या जातील. तर बारावीबाबत सीबीएसईचा निर्णय अजूनही होणार असला तरी, आभियांत्रिकी, वैद्यकीय त्याशिवाय विविध पदवी, पदविका अशा अभ्यासक्रमाची गुणवत्तेवर आधारित होणारी प्रवेश प्रक्रिया कशी होणार?, असे अनेक प्रश्न विद्यार्थी आणि पालकांच्या मनात उपस्थित होत आहेत.

> बोर्डाच्या परीक्षेची ८० टक्के तयारी झाली आहे. परंतु कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय योग्य आहे. परंतु कोणत्याही परिस्थितीत परीक्षा रद्द करू नयेत. कारण त्यातूनच आपला किती अभ्यास झाला आहे, हे कळणार आहे.
>
> – ज्ञानेश्वर नागरगोजे, विद्यार्थी, बारावी, विज्ञान शाखा

> दहावी-बारावीच्या परीक्षेवर मुलांचे पुढील शिक्षण अवलंबून आहे. परंतु सीबीएसईने दहावीच्या परीक्षा रद्द केल्या, तर राज्य मंडळाने त्या पुढे ढकलल्या. अशात दहावीनंतर अकरावीचे प्रवेश कसे होणार, हे पाहायला हवे. सर्व विचार करूनच निर्णय घ्यावा.
>
> – नरेश गोफणे, पालक

## 'पुढील प्रवेशासाठी पेपर होणे गरजेचेच'

विद्यार्थ्यांच्या करिअरचा शैक्षणिकदृष्ट्या विचार करता, दहावी-बारावी बोर्डाच्या परीक्षा ऑफलाइनच होणे आवश्यक आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा रद्द करण्याऐवजी त्या पुढे ढकलले योग्य आहे. परंतु बोर्डाच्या परीक्षा झाल्या पाहिजेत. त्यावर विद्यार्थ्यांचे पुढील प्रवेश अवलंबून आहे, अशी मते मांडत शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी बोर्डाच्या परीक्षा झाल्याच पाहिजे, असे मत ठामपणे मांडले.

शिक्षणतज्ज्ञ डॉ. अ. ल. देशमुख म्हणाले,''विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करून, शैक्षणिक दृष्टिकोनातून बोर्डाच्या परीक्षेबाबत निर्णय घेणे गरजेचे आहे. तसेच परीक्षा ऑफलाइन घेणे महत्वाचे आहे. राज्य सरकारने लाखो विद्यार्थ्यांच्या करिअरचा विचार करून, 'परीक्षा होतील आणि ऑफलाइनच होतील' हे ठामपणे सांगायला हवे. अन्यथा परीक्षा न झाल्यास विद्यार्थ्यांवर परीक्षा न देता उत्तीर्ण झालेले म्हणून ठपका बसेल. त्याशिवाय परीक्षा न घेतल्यास पुढील प्रवेश प्रक्रिया करता येणार नाहीत. कोरोनाच्या संकट काळातही परीक्षा घेण्यासाठी ठरावीक असा 'महाराष्ट्र पॅटर्न' करायला हवा.''

सिटी इंटरनॅशनलच्या संचालिका डॉ. दीपाली सवाई म्हणाल्या, ''बोर्डाच्या विशेष करून दहावी-बारावीच्या गुणपत्रिका आयुष्यभर महत्त्वाच्या असतात. कोरोनाच्या वाढत्या संसर्ग आणि विद्यार्थ्यांचे आरोग्य पाहता परीक्षा पुढे ढकलण्यात काहीच गैर नाही. पण त्या रद्द करणे योग्य नाही. निदान बोर्डाच्या परीक्षा देण्याचा पर्याय विद्यार्थ्यांसमोर ठेवायला हवा. दहावी-बारावीची गुणपत्रिका त्यावर पुढील प्रवेश अवलंबून असतात. बारावीच्या गुणपत्रिकेवर उच्च शिक्षण आणि अनेक नोकऱ्या अवलंबून असतात. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची इच्छा आहे, त्यांना तरी परीक्षेची संधी द्यायला हवी. सीईटी, जेईई, नीट अशा विविध परीक्षा आणि पुढील प्रवेश प्रक्रियेसाठी या परीक्षांना महत्त्व आहे. त्यामुळे परीक्षा पुढे ढकलणे योग्य आहे, पण रद्द करणे अयोग्य ठरेल.''

विद्यार्थ्यांची बोर्डाच्या परीक्षेची तयारी झालेली असून, त्यांनाही परीक्षा हवी असल्याचे पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष हरिश्चंद्र गायकवाड यांनी सांगितले. ते म्हणाले,''राज्य सरकार, तसेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) आणि अन्य राज्यातील शिक्षण मंडळे बारावीच्या परीक्षा रद्द न करण्याच्या तयारीत आहेत. मग बारावीच्या परीक्षा होत असतील, तर दहावीच्या परीक्षा होणे आणि त्याही ऑफलाइन होणे गरजेचे आहे. परीक्षा कधी, किती गुणांच्या घ्यायच्या याबद्दल मतांतरे होतील. पण परीक्षा होणे गरजेचे आहे.''

Sakaal 19.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## दीडशे कॉपीबहाद्दर विद्यापीठाच्या 'नजरेत'

### ग्रुप करून ऑनलाइन परीक्षा; सोशल मीडियाद्वारे उत्तरांची अदानप्रदान



**प्रॉक्टर्ड यंत्रणेमुळे गैरप्रकार करणाऱ्यांना पकडले**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १९** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्रथम सत्राची परीक्षा घेतली जात असून यादरम्यान सुमारे दीडशे विद्यार्थी गैरप्रकार करत असल्याचे आढळून आले. विद्यापीठाच्या ऑनलाइन परीक्षा होत असल्या तरी गैरप्रकार होणार नाही, यासाठी परीक्षा विभागाने पाऊल उचलले आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांची ऑनलाइन परीक्षा घेतली जात आहे. गेल्या तीन ते चार दिवसांपासून दररोज सुमारे एक लाखाहून अधिक विद्यार्थी परीक्षा देत आहेत. परीक्षेत प्रॉक्टर्ड पद्धतीचा अवलंब होत आहे. त्यामुळे परीक्षेदरम्यान गैरप्रकार करणारे विद्यार्थी विद्यापीठाच्या यंत्रणेतून सुटत नाहीत.

> ऑनलाइन परीक्षेदरम्यान सुमारे दीडशे विद्यार्थी कॉपी करताना आढळून आले. विद्यापीठाच्या इमेज प्रॉक्टर्ड यंत्रणेतून त्यांना पकडले. त्यांना विद्यापीठाच्या तक्रार समितीसमोर उभे केले जाणार आहे. ऑनलाइन पद्धतीने परीक्षा सुरू असल्या तरी गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर विद्यापीठाचे लक्ष आहे.
>
> – **महेश काकडे,** संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विद्यापीठाच्या परीक्षा १० एप्रिलपासून सुरू झाल्या असून आतापर्यंत गैरप्रकार करणाऱ्या सुमारे दीडशे विद्यार्थ्यांना विद्यापीठाने पकडले आहे. एकाच दिवशी ७४ विद्यार्थी कॉपी करताना प्रॉक्टर्ड यंत्रणेने शोधले. त्यात अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे काही विद्यार्थी ग्रुप करून ऑनलाइन परीक्षा देताना आढळून आले. तसेच काही विद्यार्थी सोशल मीडियाच्या माध्यमातून इतर विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे पाठवत होते.

प्रभात Tue, 20 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/59912020

लोकमत

## एनसीसी हा वैकल्पिक विषय होणार

### क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** नवीन शिक्षण धोरणात निवड आधारित श्रेयांक पद्धतीचा पुरस्कार करण्यात आला असल्याने विद्यार्थ्यांना विषय निवडीचा अधिकार असणार आहे. त्यामुळे एनसीसी हा वैकल्पिक विषय होण्यास कोणतीही तांत्रिक अडचण येणार नसल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी सांगितले.

ते म्हणाले, वैकल्पिक विषय झाल्याने विद्यार्थी एनसीसीकडे वळतील, असा विश्वास असून. शिस्त, देशप्रेम शिकविणाऱ्या या अभ्यासक्रमाचा विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होऊ शकेल. त्यांना नोकरीसाठीच्या विविध सरकारी योजनांचा लाभही घेता येऊ शकेल.

एनसीसीच्या परेडचा सराव, कॅम्पला जायचे या सर्वांतून अभ्यासाला वेळ कसा काढायचा, असा प्रश्न अनेक विद्यार्थ्यांना पडतो आणि इच्छा असूनही ते एनसीसीच्या वाटेला जात नाहीत. मात्र आता वैकल्पिक विषयाचा दर्जा मिळणार आहे. इतकेच नव्हे, तर या विषयाला सहा सत्रांमध्ये २४ क्रेडिट देण्यात येणार आहेत. याचबरोबर या विद्यार्थ्यांना एनसीसीचे 'बी' आणि 'सी' प्रमाणपत्रही मिळविता येणार आहे. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील सर्व विद्यापीठांना कार्यवाही करण्याची सूचना केली असल्याचे त्यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 8 Apr 20, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## ग्लोबल टीचर रणजितसिंह डिसले यांच्या नावे इटलीत शिष्यवृत्ती

लोकसत्ता प्रतिनिधी



**सोलापूर :** ग्लोबल टीचर पुरस्कार मिळवणारे पहिले भारतीय शिक्षक रणजितसिंह डिसले यांच्या नावाने इटलीतील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप दिली जाणार आहे. 'कालो मझोने– रणजित डिसले स्कॉलरशिप' या नावाने ४०० युरोची ही शिष्यवृत्ती (प्रत्येकी ३६ हजार रुपये) इटलीच्या सॅमनिटे राज्यातील दहा विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे. विद्यपीठस्तरावरील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाणार असून याकरिता संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रस्ताव पाठवायचे आहेत. 'बेनव्हेंटो' शहराचे महापौर, कॅम्पानिया प्रांताचे शिक्षण अधिकारी या पात्र विद्यार्थ्यांची निवड करणार असून पुढील दहा वर्षे शंभर विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. स्वतः रणजितसिंह डिसले यांनी याबाबतची माहिती दिली.

युनेस्को आणि लंडनस्थित 'वार्की फाउंडेशन' यांच्यावतीने सोलापूर जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक असलेले रणजितसिंह डिसले यांना गेल्या ३ डिसेंबर रोजी 'ग्लोबल टीचर पुरस्कार' जाहीर झाला होता. तब्बल सात कोटी रुपयांचा (एक दशलक्ष अमेरिकी डॉलर) हा पुरस्कार मिळविणारे डिसले गुरूजी हे पहिलेच भारतीय शिक्षक आहेत.

मिळालेल्या या पुरस्काराच्या रकमेतील साडेतीन कोटींची रक्कम डिसले गुरूजी यांनी नऊ देशांतील शिक्षकांना वाटून दिली होती. इटलीचे शिक्षक कार्लो मझुने हे त्यापैकी एक होत.

लोकसत्ता Tue, 20 April 2021
https://epaper.loksatta.com/c/59905130

## जुन्या अभ्यासक्रमाचे विषय घेऊन द्या परीक्षा

### २०१६-१७ पूर्वीच्या विद्यार्थ्यांसाठी निर्णय : पदवीही मिळणार

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १९ -** विद्यार्थ्यांना मुदतीत उच्च शिक्षण, अथवा पदवी अथवा पदव्युत्तरचा एखादा विषय किंवा वर्ष पूर्ण करता आले नाही, अशांना शिक्षण पूर्ण करता येणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पूर्वीचे विद्यार्थी आताच्या अभ्यासक्रमाचे विषय घेऊन त्याची परीक्षा देऊ शकतात. या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर त्यांना पदवीही प्राप्त मिळणार आहे.

काही विद्यार्थ्यांना आर्थिक-कौटुंबिक, शारीरिक अडचणींमुळे उच्च शिक्षण अर्धवट सोडावे लागते. राहिलेले शिक्षण पूर्ण करायची



इच्छा झाल्यास तोपर्यंत अभ्यासक्रम बदललेला असतो. त्यामुळे जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना नव्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देण्याची मुभा नसल्याने अनेकांना पदवीपासून वंचित राहावे लागते. अशा परिस्थितीत या विद्यार्थ्यांना आता त्यांचे राहिलेले शिक्षण पूर्ण करता येणार आहे. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) अधिसूचना प्रसिद्ध केली होती. त्यानुसार विद्यापीठांना अंमलबजावणी करण्याच्या सूचना यूजीसीने दिल्या होत्या.

देशात सुमारे पाच टक्क्यांच्या आसपास विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर जातात. आता या विद्यार्थ्यांना पदवी पूर्ण केल्याचे मानसिक समाधान, सामाजिक आणि आर्थिक स्थैर्य मिळेल. नव्या शैक्षणिक धोरणातही 'मल्टिपल एंट्री मल्टिपल एक्झिट'ची सुविधा देण्यात आली आहेत. त्या धर्तीवरच जुन्या विद्यार्थ्यांना पुन्हा प्रवाहात येता येईल. पुणे विद्यापीठाच्या आगामी सत्र परीक्षांपासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे, असे पुणे विद्यापीठाने म्हटले आहे.

**असा आहे नियम**

विद्यापीठाच्या विद्या परिषदेने जुन्या विद्यार्थ्यांना नव्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देऊन पदवी मिळवण्याची सुविधा प्राप्त करून देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी नियमांत बदलही करण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पूर्वीच्या जुन्या पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना समकक्षता देण्याचा निर्णय विद्यापीठाच्या विद्या परिषदेने घेतला. संबंधित जुन्या विद्यार्थ्यांना सध्याच्या अभ्यासक्रमानुसार विषय घेऊन परीक्षा देण्याची मुभा देण्यात आली आहे.

प्रभात Tue, 20 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/59906801

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाइन

### उच्च तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत : अठरा वर्षांवरील विद्यार्थ्यांचे लसीकरण होणार

सकाळ वृत्तसेवा



उदय सामंत

मुंबई, ता. २२: राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा सध्याच्या परिस्थितीत ऑफलाइन घेणे शक्य नाही, त्यामुळे त्या ऑनलाइन घेतल्या जातील आणि १८ ते २५ वर्षे वयोगटातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे लसीकरण केले जाईल, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आज मुंबईत पत्रकारांशी बोलताना दिली.

राज्यात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता अठरा वर्षापेक्षा अधिक वय असणाऱ्या सर्वांना १ मे पासून लस दिली जाणार असून, याच पार्श्वभूमीवर विद्यापीठ व महाविद्यालयातील तब्बल ३६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे लसीकरण केले जाईल, असेही त्यांनी सांगितले. राज्यातील विद्यापीठ आणि वरिष्ठ महाविद्यालयांत किती विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, याचा आढावाही घेण्यात आला असून त्याप्रमाणे हे लसीकरण केले जाणार असल्याचे सामंत म्हणाले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सामंत यांनी आज राज्यातील अकृषि विद्यापीठांच्या सर्व कुलगुरूंसोबत परीक्षांबाबत दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. यावेळी, सर्वच विद्यापीठांना यापुढे आपल्या परीक्षा या ऑनलाइन पद्धतीने घ्याव्यात अशा सूचना देण्यात आल्या असल्याचे त्यांनी नमूद केले. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता अठरा वर्षांवरील विद्यार्थ्यांना लस मिळणे आवश्यक असून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची पूर्ण काळजी घेऊन हे लसीकरण करण्यात येणार आहे. यासाठी आरोग्य यंत्रणेशी चर्चा करून पुढील निर्णय घेण्यात येणार आहे.

#### पंधरा दिवसांत निर्णय

यंदाचे शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्यात येणार असून, याबाबत येत्या १५ दिवसांत निर्णय घेण्यात येईल. सर्व परीक्षा घेत असताना एकही विद्यार्थी कोरोनाबाधित होणार नाही, याची विशेष काळजी घेण्यात येईल. विद्यार्थ्यांचे आरोग्य हे सर्वांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे, असेही सामंत यांनी सांगितले.

#### तांत्रिक अडचणीची काळजी घ्या

राज्यातील सर्व विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व वर्षांच्या, सर्व सेमिस्टरच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने पार पडणार आहेत. या परीक्षा घेताना कोणत्याही तांत्रिक अडचणी निर्माण होणार नाहीत, तसेच कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची काळजी सर्व कुलगुरू, आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाचालकांनी घ्यावी, असे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने सूचित करण्यात आले आहे

Sakaal 23.4.2021

## अकरावीसाठी वेगळी प्रवेश परीक्षा?

### शिक्षण वर्तुळात चर्चा; दहावीच्या मूल्यांकनासाठी मार्गदर्शक सूचनांची प्रतीक्षा

पुणे, ता. २२ : दहावीची परीक्षा रद्द झाली, पण आता पुढील प्रवेशाचे काय, अकरावीचे प्रवेश कोणत्या आधारावर होणार, या प्रवेशासाठी वेगळी परीक्षा घेतली जाणार का, दहावीच्या विद्यार्थ्यांचे मूल्यांकन कसे होणार... अशा विविध विषयांवर सध्या शिक्षण वर्तुळात चर्चा होत आहे.

दहावीच्या विद्यार्थ्यांचे शालांतर्गत मूल्यांकन असल्यामुळे अकरावी प्रवेशासाठी वेगळी परीक्षा घ्यावी, असे काही तज्ज्ञांनी सुचविले आहे, तर परीक्षा रद्द झाल्याने अंतर्गत मूल्यांकन काटेकोर कसे करता येईल, यावर भर दिला पाहिजे, असे काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

#### प्रवेश चाचणी घ्यावी

बालभारती आणि राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सदस्या डॉ. जयश्री अत्रे म्हणाल्या की, अकरावीचे प्रवेश हे अंतर्गत मूल्यमापनाच्या गुणांवर देऊ नयेत. अकरावीमध्ये कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा किंवा कोणते महाविद्यालय निवडावे, हे विद्यार्थ्यांनी शाळेतील शिक्षक, पालक, नातेवाईक, समुपदेशक यांच्याशी चर्चा करून पात्रतेची निश्चिती करावी. विद्यार्थ्यांची दहावीच्या अभ्यासक्रमावर व मूलभूत संकल्पनांवर ऑनलाइन प्रवेश चाचणी घ्यावी.

#### मूल्यांकन काटेकोर व्हावे

पुणे जिल्हा मुख्याध्यापक महासंघाचे प्रवक्ते महेंद्र गणपुले म्हणाले, "दहावीच्या विद्यार्थ्यांचे मूल्यांकन कसे करायचे, याबाबतचे चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, सर्व स्तरांतून येणाऱ्या सूचनांचा एकत्रित विचार करून राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मूल्यमापन कसे करायचे, याबाबत मार्गदर्शक सूचना येणे आवश्यक आहे."

#### अन्य बोर्डाचे अनुकरण नको

शिक्षणतज्ञ हेरंब कुलकर्णी म्हणाले, "दहावीची परीक्षा रद्द करताना सर्व बोर्डामुळे हा निर्णय घेतल्याचे एक कारण दिले जात आहे. पण मागील वर्षी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) घेतलेल्या दहावीच्या परीक्षेला देशातून १८ लाख ८९ हजार विद्यार्थी बसले होते. आयसीएसईच्या बोर्डाच्या परीक्षेला एक लाख ९६ हजार विद्यार्थी बसले होते. तर महाराष्ट्रात बोर्डाच्या परीक्षेसाठी १५ लाख ७५ हजार विद्यार्थी बसले होते. अशावेळी आपण सीबीएसई, आयसीएसईच्या निर्णयाचे अनुकरण करू नये."

#### शिक्षणाबाबत कृती आराखडा तयार करावा

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे समन्वयक प्रा. मुकुंद आंधळकर म्हणाले, की शैक्षणिक वर्ष २०२०-२१ हे राज्याच्या शैक्षणिक इतिहासात सर्वात कमकुवत ठरले आहे. ऑनलाइन शिक्षण दिल्याने त्याचे मूल्यमापन न झाल्याने त्याचे यश लक्षात घेता येत नाही. त्यामुळे सरकारने आता पुढील नियोजन योग्यप्रकारे करणे गरजेचे आहे. आगामी शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना कसे उत्तम शिक्षण देता येईल, मागे राहिलेला अभ्यासक्रम भरून कसा काढता येईल, याबाबत कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

Sakaal 23.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## गुणांबाबतच्या तक्रारींसाठी ७२ तासांची मुदत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाइन सत्र परीक्षेत गुणांबाबतची तक्रार आता विद्यार्थ्यांना ७२ तासांत स्टुडंट प्रोफाइलमधून नोंदविता येणार आहे. परीक्षेत मिळालेल्या गुणांबाबतची तक्रार नोंदवण्याच्या प्रणालीत तांत्रिक अडचण येत असल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली होती. त्यानंतर परीक्षा व मूल्यमापन मंडळाने हा निर्णय घेतला आहे.

पुणे विद्यापीठाकडून ऑनलाइन प्रॉक्टर्ड पद्धतीने सत्र परीक्षा घेण्यात येत आहे. या परीक्षेत प्रत्येक विषयाच्या परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना मिळालेले गुण त्यांच्या लॉग-इनमध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या गुणांबाबत तक्रार असल्यास स्टुडंट प्रोफाइल प्रणालीद्वारे ४८ तासांत तक्रार नोंदवण्याची सूचना विद्यापीठाने दिली आहे. प्रणालीशिवाय अन्य पद्धतीने तक्रार नोंदवल्यास ती स्वीकारली जाणार नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. मात्र, प्रणालीत तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने दिलेल्या मुदतीत तक्रार नोंदवता येत नसल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली होती. विद्यापीठाच्या प्रणालीमध्ये परीक्षा झाल्यानंतर गुण दिसत नाहीत. अनेक विद्यार्थ्यांना ही अडचण येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना विद्यापीठाने दिलेल्या ४८ तासांच्या मुदतीत त्यांची तक्रार मांडता येत नाही. विद्यापीठाने याबाबतीत लक्ष घालून ही तांत्रिक अडचण दूर करावी आणि तक्रार नोंदवण्याची मुदत वाढवावी, अशी मागणी 'युक्रांद'च्या कमलाकर शेटे यांनी केली होती.

> **"परीक्षेच्या प्रणालीमध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. मात्र, आता ती दूर करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना आता त्यांच्या गुणांबाबतच्या तक्रारी प्रणालीद्वारे नोंदवता येतील. तक्रार नोंदवण्याची मुदत ४८ तासांवरून वाढवून ७२ तास केली आहे.**
>
> **- डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Maharashtra Times 23.4.2021

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत केवळ आश्वासन
## विद्यार्थी अद्यापही गुणांच्या प्रतीक्षेत

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २२ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांची ऑनलाइन परीक्षा होत आहे. मात्र, जसजसे पेपर होतील, त्यानंतर दोन दिवसांत त्याचे गुण उपलब्ध करून दिले जाणार असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने स्पष्ट केले होते. मात्र, पेपर होऊन चार दिवस झाले तरी अजूनही पेपरचे गुण प्राप्त झाले नसल्याची तक्रार विद्यार्थ्यांकडून होत आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने ऑनलाइन परीक्षा सुरू होण्यापूर्वी मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केली होती. त्यात विद्यार्थी ज्या दिवशी एखाद्या अभ्यासक्रमाच्या विषयाचा पेपर देतील, त्यानंतर दोन दिवसांत त्या पेपरला किती गुण मिळाले आहेत, त्याची माहिती प्रसिद्ध केले जाणार असल्याचे नमूद केले होते. मात्र, आता परीक्षा होऊन



चार-पाच दिवस होत असले तरी अद्यापही विद्यार्थ्यांना गुणांची माहिती उपलब्ध झाली नसल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

यावर्षी विद्यापीठाने प्रात्यक्षिकच्या दोन्ही सत्राच्या परीक्षा ऑनलाइन घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रात्यक्षिकचे गुण प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थ्यांचा पूर्ण निकाल जाहीर करता येणार नाही. त्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन परीक्षेत विद्यार्थ्यांना किती गुण पडले आहेत, त्याची माहिती दिली जाईल.

**पेपरच्या दोन दिवसांत उपलब्ध करण्याच्या आश्वासनानंतरही कार्यवाही नाही**

मात्र, एकत्रित निकाल दिला जाणार नसल्याचे यापूर्वीच स्पष्ट केले आहे. यंदा निकाल मिळत नसला तरी प्रत्येक पेपरला किती गुण पडले आहेत, त्याची माहिती विद्यार्थ्यांना प्राप्त होणार होती. मात्र अजूनही विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून ही प्रक्रिया सुरू करण्यात आली नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

यासंदर्भात युक्रांदचे उपाध्यक्ष कमलाकर शेटे यांनी विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांचे गुण तत्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी केली. त्यानुसार विद्यापीठाकडून कार्यवाही सुरू करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

प्रभात Fri, 23 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/59969194

## 'जलसंपदा'च्या विकास कामांमध्ये आता विद्यार्थी-प्राध्यापकांना संधी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील विकास आणि संशोधनात्मक कामांसाठी आता राज्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला जाणार आहे. स्थानिक पातळीवरील प्रश्नांबाबत अभियांत्रिकी आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थी-प्राध्यापकांच्या माध्यमातून संशोधन करून उपाय शोधून विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार असून, त्यासाठी आयआयटी, एनआयटी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये आदी शैक्षणिक संस्थांची मदत घेतली जाणार आहे.

महाविद्यालये, तंत्रनिकेतन संस्था, संशोधन संस्थातील संशोधन लोकाभिमुख करण्यासाठी उन्नत महाराष्ट्र योजनेला राज्य शासनाने मान्यता दिली आहे. उन्नत महाराष्ट्र योजनेअंतर्गत जलसंपदा विभागाद्वारे राबवले जाणारे सिंचन प्रकल्प, कालवे, पाणीपुरवठा वाहिन्या, उपसा सिंचन योजना आदींची अंमलबजावणी, देखभाल-दुरुस्ती, येणाऱ्या अडचणींवर उच्च तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शैक्षणिक, संशोधन संस्थांची मदत घेतली जाणार आहे. जलसंपदा विभागाच्या स्थापत्य, विद्युत आणि यांत्रिकी अभियांत्रिकीशी निगडित सुरू असलेल्या कामांची गुणवत्ता वाढवण्यासाठीच्या उपाययोजना, स्थानिक अडचणींवर तंत्रज्ञानाच्या साह्याने उपाय शोधण्यासाठी नामांकित शिक्षण संस्थांतील विद्यार्थी-प्राध्यापकांची मदत घेतली जाईल.

संस्थांची निवड करण्यासाठी कार्यपद्धती ठरवण्यात आली आहे. संस्थांतील अभ्यासक्रमांची स्वायत्तता, संशोधन क्षमता, पूर्वानुभव, विविध विद्याशाखांमधील उपलब्ध प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, प्रयोगशाळा असे काही निकष ठरवण्यात आले आहेत. प्राध्यापक-विद्यार्थ्यांकडून कामे करून घेताना त्यांना त्याचा आर्थिक मोबदलाही दिला जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**कामाचे स्वरूप**

शैक्षणिक संस्थांना विकास कामांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी कामाचे स्वरूपही ठरवण्यात आले आहे. त्यानुसार सर्वेक्षण, विदा (डेटा) संकलन, विदा विश्लेषण, डिजिटायझेशन, परीक्षण, अडचणींची माहिती संकलित करून त्याचे विश्लेषण, व्यवहार्यता पडताळणी, नकाशे तयार करणे अशा स्वरूपाची कामे शैक्षणिक संस्थांना दिली जातील.

> "राज्यातील शासकीय महाविद्यालयांना काही विभागांची कामे करण्याची मुभा आहे. आता जलसंपदाच्या विकास कामांमध्ये विद्यार्थी-प्राध्यापकांना सहभागी करून घेण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. या कामांतून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळेल. स्थानिक पातळीवर जाऊन माहिती संकलन, अभ्यास-संशोधन करून काही नावीन्यपूर्ण उपाय, नवसंकल्पना शोधता येतील. या कामातील अनुभवातून विद्यार्थी नवउद्यमी सुरू करू शकतील. विद्यार्थी, महाविद्यालयांसाठी उपयुक्त असा हा निर्णय आहे.
>
> - डॉ. भारतकुमार आहुजा, संचालक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे

लोकसत्ता Fri, 23 April 2021 https://epaper.loksatta.com/c/59973119

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

पुढारी

## सर्व १३ विद्यापीठांच्या परीक्षा आजपासून ऑनलाइन होणार

### उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची घोषणा

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कृषी वगळता अन्य १३ विद्यापीठांच्या परीक्षा उद्यापासून केवळ ऑनलाइन पद्धतीने घेतल्या जातील, असे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी जाहीर केले आहे.




या विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन आणि ऑफलाइन असे पर्याय देऊन विद्यापीठांना त्यासंदर्भात निर्णय घेण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार काही विद्यापीठांनी ऑनलाइन परीक्षा सुरूदेखील केल्या होत्या. मात्र, आता सर्वच्या सर्व १३ अकृषी विद्यापीठांना ऑनलाइन परीक्षा घेण्याच्या सूचना राज्य सरकारने दिल्या आहेत.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ६ लाख ५० हजार विद्यार्थ्यांना दिलासा**

नव्या निर्बंधांमुळे विद्यार्थ्यांना घराबाहेर पडणे कठीण झाल्याने हा निर्णय सर्वानुमते घेण्यात आल्याचे सामंत यांनी सांगितले. या परीक्षा घेताना विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्याची पूर्तता करण्याच्या सूचना सर्व १३ विद्यापीठांच्या कुलगुरूंना केली असून या परीक्षांमधून कोणतेही विद्यार्थी वंचित राहणार नाहीत, **पान २ वर**

Pune Edition
Apr 23, 2021 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

## सर्व १३ विद्यापीठांच्या परीक्षा आजपासून ऑनलाईन होणार

याची दक्षता या विद्यापीठांना घेण्यास सांगण्यात आल्याचे सामंत म्हणाले.

**आजपासूनच ऑनलाईन परीक्षा**

हा निर्णय शुक्रवारपासूनच लागू होईल, असे सामंत यांनी सांगितले. सर्वच विद्यापीठांमध्ये परीक्षा सुरू असून काही ठिकाणी अपवादात्मक परिस्थितीत ऑफलाईन परीक्षा घेण्यात आल्या आहेत. मात्र, उद्यापासून त्या शक्य नसल्यामुळे सर्वच कुलगुरूंनी सरकारला विनंती केल्यानुसार आजच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आलेला आहे. कोणत्याही विद्यार्थी किंवा विद्यार्थिनीचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची काळजी विद्यापीठांनी घ्यायची आहे. या परीक्षांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय अशा सर्वच वर्गांच्या परीक्षांचा समावेश असेल, अशी माहिती त्यांनी दिली.

**३७ लाख विद्यार्थ्यांना होणार फायदा**

राज्यातील विद्यापीठात १८ ते २५ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची संख्या ३७लाख इतकी आहे. ज्यामध्ये गोंडवाना विद्यापीठ८४हजार, रामटेक विद्यापीठ १७ हजार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर ३ लाख ६ हजार, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ४ लाख ५० हजार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ १ लाख ६५ हजार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ६ लाख ५० हजार, मुंबई विद्यापीठ ७ लाख १० हजार, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर २ लाख ५७ हजार, कवी बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ १ लाख १५ हजार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ १ लाख ७० हजार, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ २ लाख २०, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ २ लाख ५० हजार, एसएनडीटी विद्यापीठ ४५ हजार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे ५५ हजार आणि कला संचालनालय ६ हजार असे एकूण ३७ लाख इतकी विद्यार्थी संख्या आहे.

## शिष्यवृत्ती अर्जासाठी अखेरची संधी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २४ -** समाजकल्याण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यास ३० एप्रिलपर्यंत अखेरची मुदतवाढ देण्यात आली आहे. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज विविधस्तरावर प्रलंबित राहिल्याने ही मुदतवाढ देण्यात आली आहे. यानंतर मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे उच्च शिक्षण संचालनालयाने स्पष्ट केले आहे.

महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परीक्षा

**३० एप्रिलपर्यंत शेवटची मुदतवाढ**

फी, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, निर्वाहभत्ता या योजना राबविल्या जातात. यासाठी विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावा लागतो. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी भरल्या जाणाऱ्या अर्जांपैकी अनेक अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ३० मार्चवरून ही मुदत ३० एप्रिलपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे ३० एप्रिलपर्यंत समाजकल्याण विभागाकडे शिष्यवृत्ती अर्ज जमा करावे लागणार आहेत. त्यानंतर हे अर्ज जमा करून घेतले जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरील प्रोफाइलवर लॉगइन करून आपल्या अर्जाची स्थिती तपासावी. आधार खाते बँक अकाऊंटशी संलग्न नसल्यास ते संलग्न करावे, अशा सूचना विद्यार्थ्यांना दिल्या आहेत.

दरम्यान, विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज महाविद्यालय तसेच विभागीय स्तरावर दररोज निकाली काढण्याची सूचना दिल्या आहेत. अर्ज प्रलंबित राहून विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास ज्यास्तरावर अर्ज प्रलंबित आहे. त्यानुसार उच्च शिक्षण सहसंचालक, विद्यापीठाचे कुलसचिव व महाविद्यालयांचे प्राचार्य जबाबदार राहणार असल्याचे उच्च शिक्षण संचालनालयाने नमूद केले.

प्रभात Sun, 25 April 2021
https://epaper.eprabhat.net/c/60022066

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## 'गुणा'त्मक निर्णय; आता प्रवेशाची 'चाचणी'

धनंजय बिजले

यंदा दहावीची परीक्षा होणार की नाही, याबाबत गेले काही महिने उलटसुलट चर्चा झडत होत्या. त्या ताणातच राज्यातील सुमारे सतरा लाख विद्यार्थी परीक्षांची तयारी करत होते. परीक्षार्थींप्रमाणेच त्यांच्या पालकांवरही अनामिक ताण होता. अखेर राज्य शासनाने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय जाहीर केल्याने लाखो विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. आता अकरावीच्या प्रवेशाचा मुद्दा राहिलेला असला, तरी त्याचा फार काही बाऊ करण्याची गरज नाही.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने सर्वत्र हाहाकार माजविला असताना परीक्षा घेणे शक्यच नव्हते. सध्या शासकीय यंत्रणांवर कोरोनाचा मुकाबला करताना प्रचंड ताण आहे. अशा काळात परीक्षा घेणे म्हणजे सर्व यंत्रणांच्या अडचणीत भर टाकण्यासारखे होते. तसेच 'सीबीएसई' आणि 'आयसीएसई' या अन्य परीक्षा मंडळांनी दहावीच्या परीक्षा रद्द केल्या आहेत. त्यामुळे त्या बोर्डाचे विद्यार्थी परीक्षा न देता अकरावीत जाणार आणि 'एसएससी' बोर्डाच्या विद्यार्थ्यांना त्यासाठी परीक्षा द्यावी लागणार, अशी विसंगत स्थिती निर्माण झाली असती. शिवाय 'एसएससी' बोर्डाची परीक्षार्थींची संख्या तब्बल सतरा लाख इतकी प्रचंड असल्याने त्यांचा व पालकांच्या आरोग्याचा प्रश्न होता. त्यामुळे नाइलाजाने का होईना; पण परीक्षा रद्द करण्याचा व्यवहार्य व योग्य निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.



### पुन्हा शाळांचीच कसोटी

परीक्षा होणार म्हणून मुलांनी वर्षभर तसाही घरी अभ्यास केलेलाच आहे. त्यांचे ऑनलाइन व काही प्रमाणात ऑफलाईन क्लासेसही झाले आहेत. त्यामुळे मुलांचे तशा अर्थाने फारसे शैक्षणिक नुकसान होणार नाही. फक्त त्यांची परीक्षा होणार नाही. आता त्यांना अंतर्गत मूल्यांकनाच्या आधारे पुढच्या वर्गात पाठविण्यात येणार आहे. याबाबतचा निर्णय पुढील काही दिवसांत होईल. मात्र, खरे तर यंदाची अभूतपूर्व परिस्थिती पाहता सर्वच मुलांना सरसकट उत्तीर्ण करण्यास काहीच हरकत नाही. त्यामुळे कोणत्याच विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

पान ३ वर »

## 'गुणा'त्मक निर्णय ; आता प्रवेशाची 'चाचणी'

» पान १ वरून

अंतर्गत मूल्यांकन करताना पुन्हा शाळांचीच कसोटी लागणार आहे. शिवाय गेल्या काही वर्षांत दहावीवरील विद्यार्थ्यांचा ताण कमी करण्याचे धोरण अवलंबिले जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणातही दहावीचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न आहे. त्याची सुरुवात यंदापासून करण्याची संधी यानिमित्ताने चालून आलेली आहे.

### आता प्रश्न अकरावी प्रवेशाचा

आता प्रश्न दहावीचा नसून अकरावी प्रवेशाचा आहे. काही मोजक्या नामांकित महाविद्यालयांतील कट ऑफ अगदी ९० ते ९५ टक्क्यांपर्यंत जातो. तेथे कसा प्रवेश द्यायचा हा मुद्दा सध्या चर्चिला जात आहे; पण खरे पाहिल्यास अकरावी प्रवेशाचाही फार बाऊ करण्याची गरज नाही. कारण जेथे जागा कमी आहेत आणि प्रवेशासाठी प्रचंड संख्येने अर्ज आले आहेत अशा महाविद्यालयांपुरतीच ही समस्या उद्भवणार आहे. संपूर्ण राज्याचा विचार केल्यास ग्रामीण; तसेच निमशहरी भागात ही समस्या नाही. तेथे सर्वांनाच प्रवेश मिळतो. शिवाय ज्या शाळांत बारावीपर्यंत शिक्षणाची सोय आहे तेथे प्रवेशाचा फारसा प्रश्नच उद्भवत नाही. पुण्यापुरते बोलायचे झाल्यास शहरातील ९० टक्के महाविद्यालयांत सहज प्रवेश मिळतो. शहरात हातावर मोजता येतील इतक्या नामांकित महाविद्यालयांपुरताच हा प्रश्न मर्यादित आहे. त्यामुळे त्यासाठी काय करायचे यावर मार्ग काढावा लागणार आहे. त्या दृष्टीने याकडे पाहण्याची गरज आहे.

सध्या पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये अकरावीची सुमारे ३०४ महाविद्यालये आहेत. तेथे अकरावीसाठी एकूण सुमारे एक लाख दहा हजार जागा आहेत. तेथे प्रवेश घेण्यासाठी सर्वसाधारणपणे ८० ते ८५ हजार मुले अर्ज करतात. म्हणजे दरवर्षी अकरावीसाठी प्रत्यक्ष जागांपेक्षा अर्जांची संख्या कमीच असते. पुण्यात साधारणपणे २० ते ३० महाविद्यालयांत प्रवेशासाठी झुंबड उडते आणि तेथेच प्रवेश मिळावा यासाठी हुशार विद्यार्थी व त्यांचे पालक कमालीचे आग्रही असतात. केवळ अशा महाविद्यालयातील प्रवेशासाठीच स्कॉलरशिपप्रमाणे एकच संयुक्त प्रवेश परीक्षा घ्यावी. म्हणजे जेथे मागणी जास्त आहे तेथे परीक्षा घेण्याचा पर्याय योग्य ठरणार आहे. त्यासाठी दहावीच्या अभ्यासक्रमावर आधारित बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा घेता येईल. त्यामुळे अशा परीक्षेसाठी फार कमी मुले बसतील. त्यांचा निकालही लवकर लागेल. त्यामुळे अकरावी प्रवेशासाठी सरसकट सर्वच मुलांना परीक्षा देण्यासाठी वेठीस धरण्याची काहीच गरज नाही. नाहीतर दहावीची परीक्षा रद्द आणि अकरावीसाठी सर्वांची प्रवेश परीक्षा असा अजब प्रकार घडेल. त्यामुळे यावर्षी केवळ गुणांसाठी स्पर्धा करण्याचा मोह टाळून व्यावहारिक दृष्टीने विचार करून विद्यार्थी, पालक व शिक्षक सर्वांवरचा ताण दूर करणारा निर्णय राज्य शासनाने त्वरित घेतला पाहिजे.

Sakaal 25.4.2021

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

लोकमत

तक्रारींची संख्या घटली : प्रक्रियेत सुधारणा

## विद्यापीठाच्या प्रथम सत्र परीक्षेची गाडी रुळावर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्रथम सत्राच्या परीक्षा घेतल्या जात असून, गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये बऱ्याच सुधारणा झाल्याचे दिसून येत आहे. परीक्षेसंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारींची संख्यासुद्धा एक ते दीड टक्क्यांपर्यंत आली आहे. गेल्या आठवडाभरापासून दररोज एक लाखापेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षा देत आहेत. त्यामुळे विद्यापीठाची परीक्षेची गाडी रुळावर आली असल्याचे बोलले जात आहे.

पुणे विद्यापीठातर्फे पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील सुमारे साडेपाच लाख विद्यार्थ्यांची परीक्षा १० एप्रिलपासून घेतली जात आहे. परीक्षा सुरू होऊन पंधरा दिवस झाले असून आत्तापर्यंत एकूण ११ लाख विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे विविध विषयाचे ऑनलाइन पेपर सोडवले. सुरुवातीला तीन दिवस विद्यार्थ्यांना परीक्षा दिल्यानंतर ४८ तासांच्या आत निकाल मिळू शकला नाही. निकाल जाहीर केल्यानंतर एकाच दिवशी सुमारे साडेचार लाख विद्यार्थ्यांनी संकेतस्थळाला भेट दिल्याने सर्व्हर डाऊन झाला होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना निकालास संदर्भातील तक्रारी नोंदविता आल्या नाहीत. परंतु विद्यापीठाने २५ एप्रिलपर्यंत तक्रार करण्यासाठी मुदतवाढ दिली. तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना काही आकृत्या दिसू शकल्या नाहीत. या घटना वगळता विद्यापीठाची परीक्षा आत्तापर्यंत सुरळीतपणे सुरू आहे.

### विद्यार्थ्यांची आकडेवारी

| दिनांक | परीक्षार्थी | परीक्षा दिलेले विद्यार्थी |
|---|---|---|
| १५/४/२१ | ४३,०६८ | ३९,४८३ |
| १६/४/२१ | १,४२,५४० | १,३५,३६४ |
| १७/४/२१ | १,४१,३८४ | १,३४,९१९ |
| १८/४/२१ | १,४५,६१४ | १,३९,०१७ |
| १९/४/२१ | १,४७,८७६ | १,४२,६८७ |
| २०/४/२ | ११,५८,६१९ | १,५४,७८३ |
| २२/४/२१ | १,२६,६१८ | १,२१,३०४ |
| २३/४/२१ | १,२४,३११ | १,१९,७६० |
| २४/४/२१ | ८८,४६५ | ८२,३९३ |



परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन या कंपनीच्या माध्यमातून परीक्षा योग्य पद्धतीने घेणे शक्य झाले असल्याचे दिसून येत आहे. तीन जिल्ह्यांमधील सुमारे साडेपाच लाख विद्यार्थी सहा ते आठ विषयांची परीक्षा देणार आहेत. त्यामुळे तब्बल ३५ लाख विद्यार्थी विद्यापीठाची परीक्षा देणार आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे म्हणाले की, विद्यापीठाने सुरुवातीपासूनच परीक्षा घेण्यासंदर्भात नियोजनबद्ध कार्यक्रम तयार केला. परीक्षा अर्ज स्वीकारण्यापासून प्राप्त अर्जांचा डेटा तयार होऊन हॉल तिकीट तयार होण्यापर्यंतची प्रक्रिया निश्चित कालावधीत पूर्ण करण्यात आली.

Pune Main
Page No. 2 Apr 25, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

पुढारी

## सात लाख विद्यार्थ्यांचे लसीकरण करावे लागणार

### पुणे विद्यापीठ उचलणार सकारात्मक पाऊल

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील १८ पेक्षा अधिक वय असणाऱ्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठामार्फत लसीकरण करण्याचा विचार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. त्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ९०० महाविद्यालयातील सात लाख विद्यार्थ्यांचे लसीकरण करावे लागणार असून, त्यासाठी विद्यापीठ सकारात्मक पाऊल उचलणार असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली आहे.

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता राज्यातील १८ पेक्षा अधिक वय असणाऱ्या सर्व नागरिकांना दिनांक १ मे २०२१ पासून लस दिली जाणार असून यामध्ये विद्यापीठ व महाविद्यालयातील सुमारे ३६ लाख ८७० विद्यार्थ्यांचे लसीकरण होणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील अकृषि विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय परीक्षांबाबत सामंत यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून बैठक झाली. त्यात हा निर्णय घेण्यात आला. यंदा शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्यात येणार असून याबाबत येत्या १५ दिवसात निर्णय घेण्यात येणार असल्याचे देखील सामंत यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे महाविद्यालये सुरु करायची असतील तर विद्यार्थ्यांचे लसीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे.

यासंदर्भात डॉ. करमळकर म्हणाले, विद्यापीठ विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यासाठी तयार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांना सांगितले आहे. लसीकरण पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यातील विविध महाविद्यालयात करणार असून त्यासाठी वेगवेगळी केंद्र तयार करणार आहे. केंद्रावर विद्यार्थ्यांची गर्दी न करता विद्यार्थ्यांचे बॅचमध्ये विभाजन करून लसीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

My Pune Edition
Apr 25, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

लोकमत

## परीक्षा झालेल्या नसताना मागविले प्रॅक्टिकलचे गुण

### प्राचार्य गोंधळले : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा अजब कारभार?

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांकडून येत्या ३० एप्रिलपर्यंत प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण मागविले आहेत. विद्यापीठाने प्राचार्यांना याबाबत ई-मेल पाठविला आहे. मात्र, प्रॅक्टिकल परीक्षाच झालेल्या नसताना गुण कसे द्यायचे ? असा प्रश्न महाविद्यालयांकडून उपस्थित केला जात आहे. तर विद्यापीठाने केवळ अंतर्गत परीक्षांचे गुण मागविले आहेत. प्रात्यक्षिक परीक्षांचे नाही, असे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुमारे वर्षभरापासून महाविद्यालय बंद आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेता आल्या नाहीत. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या पहिल्या सत्राची परीक्षा सुरू आहे. आणखी काही दिवस चालणार आहे. त्यातच कोरोनामुळे वर्ष संपल्यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण विद्यापीठाने महाविद्यालयांकडून घ्यावेत, असा निर्णय विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला तरीही विद्यापीठाने महाविद्यालयांना असा ई-मेल का पाठवला, यावरून गोंधळ निर्माण झाला आहे.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण ऑनलाइन पद्धतीने भरून द्यावेत,अशा सूचना विद्यापीठाने दिल्या आहेत. त्यानुसार बहुतेक महाविद्यालयांनी ऑनलाइन पद्धतीने गुण भरण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. परंतु, कोरोनामुळे विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेणे शक्य झाले नाही. तसेच येत्या ३० एप्रिलपर्यंत लॉकडाऊन असल्याने विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेता येणार नाहीत. तरीही विद्यापीठाने ३० एप्रिलपर्यंत विद्यार्थ्यांचे गुण मागविल्याने महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.



प्रात्यक्षिक परीक्षा झालेल्या नसताना विद्यापीठाने या परीक्षांचे गुण मागविणे चुकीचे आहे. तसेच महाविद्यालयांकडून वर्षाअखेरीस प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण घ्यावेत, असा निर्णय परीक्षा मंडळाच्या बैठकीत झालेला असताना त्याची अंमलबजावणी होत नसल्याने पुन्हा परीक्षा मंडळाची बैठक बोलावावी, अशी आग्रही मागणी मी विद्यापीठाकडे करणार आहे.

**- डॉ. संजय चाकणे, व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण पाठविण्यास संदर्भात विद्यापीठाने पाठविलेल्या पत्रामुळे महाविद्यालयांमध्ये गोंधळ निर्माण झालेला आहे. कोरोनाच्या परिस्थितीमुळे अनेकांना प्रात्यक्षिक परीक्षा घेता आल्या नाहीत. काही निवडक महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक परीक्षा घेतल्या म्हणजे सर्वांनी घेतल्या, असा अर्थ काढता येत नाही. त्यामुळे विद्यापीठाने या पत्राच्या पुनर्विचार करावा.

**- डॉ. संजय खरात, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, गणेश खिंड**

विद्यापीठाने महाविद्यालयांकडून केवळ अंतर्गत परीक्षांचे गुण ऑनलाइन पद्धतीने मागविले आहेत. प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण महाविद्यालयांकडून मागविले नाहीत. प्रात्यक्षिक परीक्षांच्या गुणांची लिंक सुद्धा बंद ठेवण्यात आलेली आहे.

**- महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

Pune Main
Page No. 2 Apr 26, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

२६ एप्रिल २०२१ महाराष्ट्र टाइम्स

पुणे

# अंतिम वर्षाच्या परीक्षा जूनमध्ये

## ऑगस्टमध्ये निकाल जाहीर करण्याचे विद्यापीठाचे नियोजन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

उच्च शिक्षणाच्या संधींसाठी विद्यार्थ्यांना उशीर होऊ नये, यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाइन सत्र परीक्षा जूनमध्ये घेण्याचे नियोजन केले आहे. या परीक्षेचा संपूर्ण निकाल ऑगस्ट महिन्यात जाहीर करून विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक कागदपत्रे तातडीने देण्यात येणार आहेत. त्यामुळे अंतिम वर्षाला असणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी काही दिवसांपूर्वी विद्यापीठांच्या सत्र परीक्षांबाबत राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंची ऑनलाइन बैठक घेतली. या बैठकीत पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या सत्र परीक्षांच्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परराज्यात किंवा परदेशात उच्च शिक्षण, संशोधनासाठी कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी या परीक्षा प्राधान्याने घेण्यात येणार आहे. त्यानंतर उर्वरित वर्षांच्या परीक्षा घेणार असल्याचे विद्यापीठाकडून सांगण्यात आले.

पुणे विद्यापीठाकडून साधारण १० ते १५ मे या कालावधीत अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. विद्यार्थ्यांना साधारण ३१ मेपर्यंत ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरता येणार आहे. त्यानंतर १५ जूनपासून अंतिम वर्षाला असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येतील. या परीक्षांचा निकाल ३१ जुलैपासून जाहीर होण्यास सुरुवात होईल. कोणतीही अडचण उद्‌भवली नाही, तर संपूर्ण अभ्यासक्रमांचे निकाल १५ ऑगस्टपर्यंत जाहीर होतील. त्यानंतर विद्यार्थ्यांना तातडीने गुणपत्रिका; तसेच इतर शैक्षणिक दाखले उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत ऑनलाइन अर्ज भरल्यास परीक्षांचे आयोजन वेळेत होईल. विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेत सहकार्य केल्यास प्रवेशपत्र देण्यापासून ते वेळापत्रकापर्यंतच्या सर्व प्रक्रिया वेळेत होतील. त्यामुळे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या आयोजनाबाबत काळजी करू नये.
>
> – डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

> पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाला असणारे विद्यार्थी उच्च शिक्षण घेतात. त्यासाठी या सर्व विद्यार्थ्यांच्या सत्र परीक्षा प्राधान्याने घेऊन त्यांचा निकाल तातडीने जाहीर करण्यासाठी विद्यापीठाचे प्रयत्न सुरू आहेत. या सत्र परीक्षा लवकर झाल्या, तर उर्वरित परीक्षांचे नियोजन योग्य करता येईल.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची चिंता

अंतिम वर्षाच्या परीक्षा लवकर घेण्याची मागणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे



> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षा जून महिन्यात घेऊन परीक्षांचा निकाल लवकर जाहीर करण्याची आवश्यकता आहे. निकालाला उशीर झाल्यास, परराज्यातील नामांकित संस्था, परदेशात शिक्षणासाठी

### आगामी सत्र परीक्षांचे संभाव्य नियोजन

- एकूण विद्यार्थी : ६ लाख
- परीक्षांचे विषय : ५ हजार
- परीक्षांची सुरुवात : १५ जून
- निकाल तयार करणे : १५ ते ३१ जुलै
- निकाल प्रसिद्ध करणे : ३१ जुलै ते १५ ऑगस्ट

Maharashtra Times 26.4.2021

## *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

लोकमत

# विद्यापीठ कायदा सुधार समितीने मागितली मुदतवाढ

## अद्याप अहवाल तयार नाही : सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखालील समिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठ कायद्यात कोणते बदल करावेत, ऑनलाइन परीक्षासंदर्भात कोणती तरतूद करावी, इतर विद्यापीठांमधील चांगल्या गोष्टींचा समावेश त्यात कसा करावा आदी बाबींचा अभ्यास उच्च शिक्षण विभागातर्फे स्थापन करण्यात आलेल्या समित्यातर्फे केला जात आहे. मात्र,या समित्याचा अहवाल अद्याप पूर्ण झाला नाही. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखालील समितीसह इतर समित्यांना तीन महिन्यांची मुदतवाढ द्यावी, अशी विनंती शासनाकडे करण्यात आली आहे.

विद्यापीठ कायद्यातील सुधारण्यासाठी स्थापन केलेल्या समित्यांना राज्य शासनाकडे मुदतवाढीबाबत पत्रव्यवहार केला आहे, असे राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ.धनराज माने यांनी सांगितले. सर्व घटकांकडून प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींचा विचार करून लवकरच अहवाल पूर्ण केला जाईल, असे सुखदेव थोरात यांनी स्पष्ट केले.

शिक्षण क्षेत्रातील बदलते प्रवाह व नवीन शैक्षणिक धोरण आणि यांना अनुसरून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांची समिती उच्चशिक्षण विभागाने स्थापन केली. या समितीमध्ये विविध विद्यापीठांच्या आजी- माजी कुलगुरूंसह कायदे अभ्यासक व शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या तज्ज्ञ प्राध्यापकांचा समावेश करण्यात आला आहे. तंत्रशिक्षण संचालक डॉ. अभय वाघ हे सदस्य, तर उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने हे या समितीचे सदस्य सचिव आहेत. विद्यापीठ कायद्यातील सुधारणांच्या दृष्टीने शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर सेवक, विविध संघटना यांच्याकडून सूचना स्वीकारण्यात आल्या. राज्यातील सर्व कृषी महाविद्यालयांमध्ये समितीच्या सदस्यांनी प्रत्यक्ष जाऊन चर्चा केली.

कोरोनामुळे सर्व विद्यापीठांना ऑनलाइन परीक्षा घ्याव्या लागल्या. मात्र, विद्यापीठ कायद्यात ऑनलाइन परीक्षासंदर्भात कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे विद्यापीठ कायद्यात बदल करताना ऑनलाइन परीक्षांचा अंतर्भाव केला जाणार आहे. विद्यापीठ कायद्यात सुधारणा करताना विद्यापीठ अनुदान आयोगाची नियमावली व मार्गदर्शक तत्त्वे यांचाही विचार होणार आहे. शासनातर्फे स्थापन करण्यात आलेल्या समितीबरोबरच उपसमित्यांच्या बैठकासुद्धा होणार आहेत. त्यातील काही समित्यांचे काम पूर्ण झाले असून कोरोनामुळे इतर समित्यांना काम करणे शक्य झाले नाही. त्यामुळे या समित्यांना मुदतवाढ द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

Pune Main
Page No. 2 Apr 27, 2021
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

# वैद्यकीय, आरोग्य क्षेत्रातील संशोधन, अभ्यासाला चालना

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, नाशिकचे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वैद्यकीय, आरोग्यविषयक संशोधनाला आता चालना मिळू शकणार आहे. वैद्यकीय, आरोग्य क्षेत्राशी संबंधित माहिती, अभ्यासाची देवाणघेवाण करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि नाशिकचे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांनी सामंजस्य करार केला आहे.

सामंजस्य करारावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, नवोपक्रम व नवसंशोधन व साहचर्य विभागाच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, आरोग्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. आरती नगरकर, आरोग्य विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. के. डी. चव्हाण, अधिष्ठाता डॉ. सचिन मुंबरे, डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. डी. जी. बागल आदी उपस्थित होते. सामंजस्य कराराद्वारे दोन्ही विद्यापीठांना एकत्रित संशोधन प्रकल्प, आरोग्य विषयक सर्वेक्षण, अभ्यास, नव्या अभ्यासक्रमांची निर्मिती करणे शक्य होणार आहे. तसेच प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी यांच्या प्रशिक्षण कार्यशाळाही घेता येतील.

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सुरू होणारी रेण्विय निदान प्रयोगशाळा, अभ्यासक्रमासाठी वैद्यकीय सहकार्याची आवश्यकता आहे. तसेच येत्या काळात विद्यार्थ्यांना निमवैद्यकीय प्रशिक्षण देता येईल. तसेच आरोग्य विषयक अभ्यास, संशोधन या सामंजस्य कराराद्वारे करता येईल. करोना संबंधित काही अभ्यास करण्याचाही प्रयत्न आहे. एकत्रित काम करण्यातून काही नवे मार्ग सापडू शकतील.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Wed, 28 April 2021
https://epaper.loksatta.com/c/60093981

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

लोकमत

# अकरावी प्रवेशाचा संभ्रम कायम

## शिक्षण मंत्र्यांची प्राचार्यांशी चर्चा : प्रवेशपूर्व परीक्षेची शक्यता

न्यूज अपडेटस्

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर इयत्ता दहावीच्या विद्यार्थांची परीक्षा रद्द करण्यात आली. त्यामुळे अकरावीची प्रवेश प्रक्रिया कशी राबवावी, असा प्रश्न सर्वांसमोर उभा राहिला आहे. मात्र, त्यासाठी प्रवेश पूर्व परीक्षा घेण्याच्या पर्यायाचा विचार केला जात आहे. परंतु , अद्याप त्यावर अंतिम निर्णय न झाल्याने अकरावी प्रवेश प्रक्रियाचा संभ्रम कायम आहे.

कोरोना काळात विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देत सीबीएसई, एसएससी व इतर काही राज्यातील शिक्षण मंडळांनी इयत्ता दहावीच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. तसेच सध्या दहावीच्या विद्यार्थांचा निकाल अंतर्गत गुणांच्या आधारे प्रसिद्ध करण्याबाबत चर्चा केली जात आहे. त्याचप्रमाणे इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी कोणते गुण ग्राह्य धरावेत, याचाही विचार केला जात आहे. त्यासाठीच राज्याच्या शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी राज्यातील प्रमुख शहरांमधील नामांकित महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी यासंदर्भात संवाद साधला. त्यात फर्ग्युसन महाविद्यालय, गरवारे महाविद्यालय, कलमाडी हायस्कूल आदी शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मात्र, चर्चेतून समोर आलेल्या कोणत्याही मुद्द्यांवर एकमत झाले नाही. त्यामुळे इयत्ता दहावीच्या निकालाबरोबरच अकरावी प्रवेश प्रक्रियेबाबतचा संभ्रम कायम आहे. गेल्या काही वर्षांपासून बहुतांश सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षा घेतली जाते. त्यातच दरवर्षी अकरावी प्रवेश प्रक्रिया वरून गोंधळ निर्माण होतो. त्यामुळे नामांकित महाविद्यालयांतील अकरावी प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षेचा पर्यायच उचित ठरेल, असे मत शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

### अकरावी प्रवेशासाठी हे आहेत पर्याय

- आठवी व नववीमध्ये विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे त्यांना अकरावीमध्ये प्रवेश द्यावा.
- राज्य मंडळाकडून जाहीर केल्या जाणाऱ्या निकालाच्या आधारे प्रवेश द्यावा.
- अकरावी प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षा घ्यावी, असे मुद्दे या चर्चेतून समोर आले.



Pune Main
Page No. 2 Apr 28, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

# परीक्षा विभागाने प्रात्यक्षिक गुणांबाबत स्पष्टता द्यावी

## कुलगुरूंच्या सूचना : परिपत्रक प्रसिद्ध करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने संलग्न महाविद्यालयांना प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण येत्या ३० एप्रिलपर्यंत ऑनलाइन पद्धतीने जमा करण्याबाबत ई-मेलद्वारे कळविले. परंतु, परीक्षा झालेल्या नसताना गुण कसे भरायचे यावरून महाविद्यालय स्तरावर गोंधळाची स्थिती निर्माण झाली. मात्र, परीक्षा विभागाने याबाबत स्पष्टता देणारे परिपत्रक प्रसिद्ध करावे, अशा सूचना विद्यापीठाचे कुलगुरू नितीन करमळकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

महाविद्यालय बंद असल्याने विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेता आल्या नाहीत. परीक्षा झालेल्या नसताना सर्व संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांना प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण जमा करण्याबाबत ई-मेलद्वारे सूचना पाठविल्या. परीक्षा मंडळाच्या बैठकीत वर्षाअखेरीस प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण जमा संदर्भात निर्णय घेतलला असताना महाविद्यालयांना या पद्धतीचा ई-मेल कसा पाठविला. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठात्यांनी प्रात्यक्षिक परीक्षांबाबत योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता आहे, अशी अपेक्षा संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडून व्यक्त केली जात आहे. कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत आणखी काही महिने सुधारणा झाली नाही; तर प्रात्यक्षिक परीक्षा कशा द्याव्यात व त्यांचे गुण कसे द्यावेत, विद्यार्थी व शिक्षकांमध्येसुद्धा याबाबत गोंधळाचे वातावरण आहे.

> प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण पाठविण्यासंदर्भात निर्माण झालेल्या गोंधळ दूर व्हावा आणि त्यात स्पष्टता यावी, यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने सविस्तर परिपत्रक प्रसिद्ध करावे, अशा सूचना संबंधितांना दिल्या आहेत.
>
> **- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

Pune Main
Page No. 2 Apr 28, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

## 37 varsities get UGC nod to offer fully online courses

Hemali.Chhapia
@timesgroup.com

**Mumbai:** In a first big step towards opening up the higher education space, 37 universities in India will offer fully online programmes with an unlimited student intake capacity.

From an array of undergraduate programmes in commerce and public policy to full-time MBA and MCA courses, these online programmes would also be the gateway to attract foreign students whose numbers have remained abysmally low, and dipped further due to Covid. Up until now, the University Grants Commission had permitted only Open and Distance Learning (ODL) education, but has now opened up to the idea of fully online courses too.

Of those institutions that made the cut to offer online programmes, 13 are state universities, 17 are deemed universities, 4 are private and three central universities. Institutes with a NAAC score of at least 3.26 or a rank in the top 100 in university category of NIRF (National Institutional Ranking Framework) in at least two of the last three cycles can open their doors to international students too.

"These insitutes can also start 13 programmes, three undergraduate and 10 postgraduate online courses without any kind of UGC permission," said a senior UGC officer. Maharashtra has four deemed universities that will offer online programmes — Narsee Monjee Institute of Management Studies, DY Patil Vidyapeeth, Bharti Vidyapeeth and Symbiosis International. Across India, most universities have opted to start the online business programmes, both undergraduate and MBA. In terms of popularity, next come programmes in computer application followed by courses in humanities. "We can now assess students 100% via proctored online method," said Rajiv Shah, director and CEO, NMIMS (online). The pandemic saw a huge jump in online registration for the MBA programme from 20,000 pre-Covid to 35,000 candidates who signed up last year.

In case of other universities, under ODL, the course is delivered through learner support centres and study material, and at approved off-campus centres of deemed and private universities. In case of online programmes, delivery is 100% on Swayam or on an approved learning platform. "Learners enrolled for a programme under ODL/online mode shall be eligible for mobility from one mode to another," read the regulations.

### JUST A CLICK AWAY

**State Universities:** Andhra University, Kuvempu University, University of Jammu, University of Mysore, Devi Ahilya Viswavidyalaya, Guru Nanak Dev University, Anna University, Bharathidasan University, Madurai Kamraj University, Periyar University, Alagappa University



**Central Universities:** Jawaharlal Nehru University, Mizoram University, Aligarh Muslim University

The Times of India 29.4.2021

## सत्र परीक्षा घेताना विद्यापीठाचीच परीक्षा

### मनुष्यबळ मर्यादेमुळे परीक्षेचे नियोजन करताना कसरत

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोना संसर्गाच्या काळात ऑनलाइन पद्धतीने सत्र परीक्षा घेताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचीच परीक्षा होत आहे. काही कर्मचारी करोनाबाधित झाले असून, मनुष्यबळ मर्यादेमुळे परीक्षेचे नियोजन करताना परीक्षा विभागाला कसरत करावी लागत आहे. मात्र विनाअडथळा परीक्षा घेण्याचा परीक्षा विभाग कसोशीने प्रयत्न करत आहे.

विद्यापीठाची सत्र परीक्षा १० एप्रिलपासून ऑनलाइन पद्धतीने सुरू झाली आहे. विद्यापीठाचा परीक्षा विभाग विद्यापीठाच्याच एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन या कंपनीमार्फत ही परीक्षा घेत आहे. जवळपास सहा लाख विद्यार्थी ही परीक्षा देत आहेत. मात्र करोना संसर्गामुळे लागू केलेले नियम, बाधित होणारे कर्मचारी, मनुष्यबळावर येणारा ताण अशा आव्हानांना तोंड देत परीक्षा विभाग परीक्षा घेत आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षाही ऑनलाइन पद्धतीने झाल्या होत्या. मात्र त्यावेळच्या परिस्थितीपेक्षा सध्या जास्त कठीण परिस्थिती निर्माण झाली आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, की परीक्षा अत्यावश्यक सेवेचा भाग असल्याने उपस्थितीबाबत मुभा आहे. मात्र संसर्ग टाळण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करणे शक्य होत नाही. त्यातच काही कर्मचारी करोनाबाधित झाले, काही कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय करोनाबाधित झाल्याने संबंधितांना विलगीकरणात राहावे लागले. तीन कर्मचाऱ्यांचे करोनाने निधन झाल्याने अन्य कर्मचाऱ्यांमध्ये भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे परीक्षांचे कामकाज काही कर्मचाऱ्यांना घरी राहून करावे लागते. त्यामुळे परीक्षेदरम्यान कोणतीही अडचण उद्भवू नये याची अधिक दक्षता घ्यावी लागते. अंतिम वर्ष परीक्षांपेक्षा सध्याचा काळ अधिक आव्हानात्मक आहे. मात्र विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ न देता परीक्षा पार पाडण्याचा प्रयत्न पूर्ण क्षमतेने केला जात आहे.

परीक्षेचे कामकाज करत असतानाच परीक्षा विभागाकडून दुय्यम प्रमाणपत्रे, ट्रान्सस्क्रिप्ट, गुणपत्रके विद्यार्थ्यांच्या मागणीप्रमाणे देण्यात येत आहेत. त्यामुळे परीक्षा आणि नियमित कामकाज अशा दोन्ही स्तरांवरील कामकाज करावे लागत आहे, असेही डॉ. काकडे यांनी नमूद केले.

> परीक्षांचे नियोजन अतिशय काटेकोर केले आहे. कमीत कमी उपस्थिती परीक्षा विभागात राहील याची दक्षता घेण्यात आली आहे. कॉल सेंटरच्या कर्मचाऱ्यांचे पूर्णपणे घरातून काम होत आहे. शक्य तो काम घरी राहूनच करण्याला प्राधान्य आहे. त्यामुळे आव्हानात्मक परिस्थितीत काम सुरु आहे.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### ९ हजारहून अधिक अनुपस्थितीच्या तक्रारी

परीक्षेतील अडचणींबाबत विद्यापीठाकडे सुमारे १३ हजार तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यापैकी सुमारे ९ हजार तक्रारी परीक्षेला लॉग्इन न झाल्याने अनुपस्थिती लागल्यासंदर्भातील आहेत. या तक्रारी तपासून विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी दिली जाणार असल्याचे डॉ. काकडे यांनी नमूद केले.

लोकसत्ता Thu, 29 April 2021
https://epaper.loksatta.com/c/60104741

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

लोकमत

# प्रात्यक्षिक परीक्षांबाबत विद्यापीठ आज घेणार निर्णय

## प्रॅक्टिकल गुणांचा विषय : अभ्यास मंडळांच्या सदस्यांबरोबर बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनामुळे महाविद्यालये बंद ठेवण्यात आली. त्यामुळे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना महाविद्यालयात जाऊन प्रत्यक्ष प्रॅक्टिकल करणे शक्य झाले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकलचे गुण कसे द्यावेत, असा प्रश्न आता विद्यापीठासमोर उभा राहिला आहे. त्यामुळे गुरुवारी सर्व अभ्यास मंडळाच्या सदस्यांची बैठक बोलावून त्यात याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्राच्या परीक्षा विद्यापीठातर्फे घेतल्या जात आहेत. सेमिस्टर पॅटर्न असल्यामुळे प्रत्येक सत्राच्या प्रॅक्टिकल परीक्षांचे गुण निकालासाठी ग्राह्य धरले जातात. परंतु, कोरोनामुळे प्रॅक्टिकल घेणे शक्य झाले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकलचे गुण कसे द्यावेत, याबाबतचा पेच निर्माण झाला आहे. वर्षाखेरीस प्रॅक्टिकलचे गुण विद्यापीठाकडे महाविद्यालयांनी जमा करावेत, अशा स्वरूपाचा निर्णय विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. परंतु, प्रॅक्टिकल परीक्षा झालेल्या नसताना विद्यापीठाने सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना प्रॅक्टिकलचे गुण ऑनलाइन पद्धतीने जमा करण्याबाबत सुचना दिल्या. त्यामुळे एकच गोंधळ निर्माण झाला होता.

कोरोनामुळे सध्या ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घ्याव्या लागत आहेत. प्रथम सत्राच्या परीक्षा संपल्यावर काही दिवसांच्या कालावधीनंतर द्वितीय सत्राच्या परीक्षा सुरू कराव्या लागणार आहेत. तसेच कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सुधारणा झाली नाही तर प्रॅक्टिकल परीक्षांचे गुण कसे द्यावेत? याबाबत निर्णय घ्यावा लागणार आहे. त्यासाठीच विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अभ्यास मंडळाच्या सदस्यांची बैठक बोलविण्यात आली आहे.



विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखे अंतर्गत येणाऱ्या सर्व अभ्यास मंडळाच्या सदस्यांची गुरुवारी बैठक बोलावण्यात आहे. त्यात विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा कशा घ्याव्यात व त्यांना गुण कोणत्या पद्धतीने द्यावे याबाबत चर्चा करून निर्णय घेतला जाईल.

**- डॉ. एम. जी. चासकर, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

Pune Main
Page No. 2 Apr 29, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2021

Section: Education

# बारावी परीक्षेची उत्सुकता

## विद्यार्थ्यांना वेळापत्रकाची प्रतीक्षा; पालक शिक्षकांत गोंधळ

**पुणे**, ता. २९ : कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे एप्रिल-मेमध्ये होणाऱ्या बारावीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. बारावीची परीक्षा मे अखेरीस होईल, असे सांगण्यात आले होते. मात्र, आता एप्रिल संपत आला, तरीही बारावीच्या परीक्षेबाबत अनिश्चितता कायम आहे. परीक्षेचे वेळापत्रक अद्याप जाहीर न झाल्याने विद्यार्थी, पालक आणि शिक्षक गोंधळात पडले आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेचे वेळापत्रक अद्याप जाहीर न झाल्याने हा संभ्रम वाढत आहे. यापूर्वी २३ एप्रिल ते २१ मे २०२१ दरम्यान ही परीक्षा घेण्याचे वेळापत्रक जाहीर केले होते. मात्र, राज्यात कोरोनाचा संसर्ग वाढत असल्याने बारावीची परीक्षा पुढे ढकलण्यात आली. आता ही परीक्षा मे अखेरीस होईल, असे शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी २० एप्रिल रोजी जाहीर केले होते. बोर्डाच्या बारावीच्या परीक्षेसाठी यंदा जवळपास १४ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

बारावीनंतरच्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी बारावीचे गुण आणि प्रवेश परीक्षेचे गुण दोन्ही महत्वाचे असतात. त्यामुळे बारावीची परीक्षा ही होणे गरजेचे आहे, अशी मागणी होत आहे. मात्र, राज्य सरकार असो वा बोर्ड यांनी बारावीची परीक्षा होणार की नाही, होणार असेल तर ती कशा पद्धतीने होणार, कधी होणार, याबाबत कोणतीही माहिती अद्याप दिलेली नाही. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. बारावीच्या परीक्षेबाबत शिक्षणाधिकाऱ्यांकडे वारंवार विचारणा केली जात असतानाही, कोणतेही सकारात्मक उत्तर मिळत नसल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

### लवकरच निर्णय जाहीर

बारावीच्या परीक्षेबाबत शालेय शिक्षण विभाग, राज्य शिक्षण मंडळ यांच्यात वारंवार बैठका होत आहेत. राज्य शिक्षण मंडळामार्फत परीक्षेचे नियोजन करण्यात येते, परीक्षा घेतली जाते, निकाल लावले जातात. परंतु परीक्षा घ्यायची की नाही, हा निर्णय मात्र राज्य सरकार घेईल. त्यामुळे बारावीच्या परीक्षेबाबतचा निर्णयदेखील राज्य सरकारमार्फत जाहीर करण्यात येईल. राज्य सरकारमार्फत आलेल्या आदेशाचे पालन मंडळाच्यावतीने करण्यात येईल, असे अधिकृत सूत्रांनी नाव न घेण्याच्या अटीवरून सांगितले.

Sakaal 30.4.2021

**पुढारी**

# परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत भरता येणार १२ वीचा परीक्षा अर्ज

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी गेल्या वर्षीप्रमाणे यंदादेखील विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्याच्या आदल्या दिवशीपर्यंत अर्ज करता येणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांना मंडळाने नमूद केलेल्या विलंब शुल्कानुसार विभागीय मंडळामार्फत कार्यवाही करता येईल, अशी माहिती मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली आहे.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे इयत्ता बारावीच्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. त्यानुसार विभागीय मंडळांनी २३ एप्रिलपासून पुढे परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत प्रतिविद्यार्थी ८ हजार २५० रुपये शुल्क घेऊन परीक्षेसाठी प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही करायची आहे, असे डॉ. भोसले यांनी सांगितले.

१२वी साठी अशा पद्धतीने अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फारच कमी असते. विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याबाबत सविस्तर सूचना मंडळाच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. वेबसाईटवर दिलेल्या माहितीनुसार कार्यवाही करावी, अशी माहिती डॉ. भोसले यांनी दिली. दरम्यान, परीक्षेच्या सुधारित वेळापत्रकाची अद्याप माहिती देण्यात न आल्याने विद्यार्थ्यांना प्रतीक्षाच करावी लागणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

Pune Edition
Apr 30, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

## पुणे विद्यापीठाच्या कक्षा रुंदावणार

### आरोग्य विज्ञान विद्यापीठाबरोबर सामंजस्य करार

पुणे, ता. २९ : सध्याच्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य क्षेत्रातील माहितीची, ज्ञानाची आणि अभ्यासाची अधिकाधिक देवाण-घेवाण होऊन त्यात भरीव काम व्हावे यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून आरोग्य क्षेत्रातील अभ्यासाच्या संधी वाढविण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठ यांच्यात याबाबत सामंजस्य करार झाला आहे. करारानुसार दोन्ही विद्यापीठांमधील प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांना ज्ञानाची, अभ्यासाची देवाण घेवाण करणे शक्य होणार आहे. करारावर स्वाक्षऱ्या करताना पुणे विद्यापीठ आणि विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, नवोपक्रम व नवसंशोधन व साहचर्य विभागाच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, आरोग्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. आरती नगरकर, आरोग्य विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. के. डी. चव्हाण, अधिष्ठाता डॉ. सचिन मुंबरे, डॉ. श्रीकांत देशमुख आदी उपस्थित होते.

> **सध्याच्या काळात आरोग्य क्षेत्रात एकमेकांच्या सहकार्याने काम करण्याची खूप गरज आहे. यातूनच नवे मार्ग मिळू शकतील. अशा कराराच्या माध्यमातून आरोग्य क्षेत्रात योगदान देण्याचा दोन्ही विद्यापीठांचा प्रयत्न आहे.**
> **- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ**

Sakaal 30.4.2021

## विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या प्रॅक्टिकल परीक्षाही ऑनलाइन

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. २९ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अंतर्गत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रॅक्टिकल परीक्षाही ऑनलाइन पद्धतीनेच घेण्याचा निर्णय विद्यापीठाच्या अभ्यास मंडळामध्ये घेण्यात आला. या निर्णयावर येत्या विद्या परिषदेची बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात येणार आहे.

करोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या लेखी परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येत आहे. तसेच करोनाचा प्रादुर्भाव कायम असल्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन प्रॅक्टिकल करता येत नाहीत. त्याचप्रमाणे महाविद्यालयांकडे सुद्धा उपलब्ध तंत्रज्ञानाला मर्यादा आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रॅक्टिकल परीक्षा कशा घ्याव्यात, असा प्रश्न निर्माण होत आहे.

यासंदर्भात गुरूवारी विज्ञान शाखेच्या सर्व विषयांच्या अभ्यास मंडळांच्या अध्यक्षांची बैठक घेण्यात आली. त्यात पहिल्या व दुसऱ्या सत्राच्या प्रत्येकी दहा ‘प्रॅक्टिकल्स’चे व्हिडिओ तयार करण्याचे निश्चित झाले. तसेच विद्यार्थ्यांचे पुढील दीड ते दोन महिन्यांत ऑनलाइन पद्धतीनेच प्रात्यक्षिक घेऊन आणि त्यांचे मूल्यांकन करून गुण देण्याचा निर्णय घेण्यात आला.

याबाबत विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. जी. चासकर म्हणले, सर्व विषयाच्या अभ्यास मंडळांकडून पुढील आठ दिवसांमध्ये प्रॅक्टिकलचे व्हिडिओ तयार केले जाणार आहेत. तसेच पंधरा दिवसांच्या आत सर्व व्हिडिओ महाविद्यालय व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. सध्या लॉकडाऊनचा कालावधी वाढविण्यात आला आहे. त्यामुळे पुढील दीड दोन महिन्यांमध्ये महाविद्यालये सुरू होतील, असे वाटत नाही. त्यामुळे ऑनलाइन पद्धतीने प्रॅक्टिकल घेऊनच विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले जाणार आहे.

प्रभात Fri, 30 April 2021 https://epaper.eprabhat.net/c/60131555

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Education

# 'पदव्युत्तर'च्या परीक्षांना 'मुहूर्त'

## विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदव्युत्तर पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षा जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. या परीक्षा ऑनलाइन होणार आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांचे वर्ष वाया जाणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

विद्यापीठाकडून नुकत्याच राज्यशास्त्र विभाग, डिफेन्स स्टडीज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टडीज विभागाच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. याप्रमाणेच मे महिन्यामध्ये विद्यापीठातील प्रत्येक विभागाशी संलग्न असलेल्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. विद्यापीठ आणि विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्ये या विषयांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने या परीक्षा देता येणार आहेत.

गेल्या वर्षीही करोनाचा प्रादुर्भाव असल्याने विद्यापीठाला या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घ्याव्या लागल्या होत्या. तेव्हा पहिल्यांदाच ऑनलाइ परीक्षा घेण्यात आल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. यंदा परीक्षांपूर्वी विद्यापीठाने सराव परीक्षा घेतल्या होत्या. याच काळात करोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने परीक्षांच्या कालावधीबाबतीत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, आता परीक्षांची वेळापत्रके जाहीर व्हायला सुरुवात झाल्याने हा संभ्रम दूर झाला आहे. विद्यार्थ्यांना 'मुडल' या ऑनलाइन प्रणालीद्वारे परीक्षा देता येणार असून, परीक्षांचा कालावधी एक ते दोन तासांचा असणार आहे. बहुपर्यायी प्रश्न पद्धतीने ही परीक्षा घेतली जाणार आहे.



> शेवटच्या वर्षाच्या कोणत्याही विद्यार्थ्याचे वर्ष वाया जाऊ नये, असा आमचा प्रयत्न आहे. सर्व विभागांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेणार आहोत. विद्यार्थ्यांना याच वर्षी पदव्युत्तर पदवी मिळेल, यावर विद्यापीठ प्रशासन ठाम आहे. सराव परीक्षांना मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास कोणतीही अडचण येईल, असे वाटत नाही.
>
> – महेश काकडे, परीक्षा नियंत्रक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### परफॉर्मिंग आर्ट्सच्या परीक्षांचे काय?

विद्यापीठात असलेल्या आणि विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्ये नृत्य, संगीत, गायन, वादन, नाट्य अशा अनेक परफॉर्मिंग आर्ट्सचे पदव्युत्तर पदवीचे अभ्यासक्रम शिकवले जातात. या अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचे अधिकाधिक मूल्यमापन सादरीकरणावर अवलंबून असते. अशा कोर्सेसचे काय होणार, त्याच्या परीक्षा कशा घेणार हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. करोनाचा प्रादुर्भाव ओसरल्यानंतरच या परीक्षा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

Maharashtra Times 30.4.2021

# News Paper Clippings During April 2021

Section: Education



# 14K SPPU students face issues in online tests, want re-exams

## Submit grievances citing problems like log in and missing questions; exam head says cases to be reviewed individually

Salonee Mistry
salonee@punemirror.com
TWEET @Salonee_mirror





The university (R) said that various reasons were given by the 14,000 students concerned out of which 8,900 were recorded absent by the system



**"My team is going through the issues individually to ensure genuine cases get another attempt. The system records every activity with time-stamps so that we know for certain what happened**

– Mahesh Kakade, SPPU exam chief

Close to 14,000 students of the Savitribai Phule Pune University (SPPU) have registered grievances with the examination department during the ongoing year-end examinations for various streams citing reasons such as inability to log in, internet issues as well as missing and even wrong questions in the test paper. The examination department chief has said there was no glitch in the system and all cases will be considered individually.

On conditions of anonymity, a third-year student told *Mirror* that he lodged a grievance with the university after failing to log into the system for one of the exams. "I tried several times, but there seemed to be an error message. I could not give the exam and have notified the university. Hopefully, they will consider and allow me to write the paper again," the student said.

Another third-year student claimed facing a technical issue and told *Mirror* he should be given a second attempt. "I was disadvantaged as I could not see some of the questions, even the extra ones that are there to help us. I have filed a grievance," the student said.

SPPU chief of examination Mahesh Kakade said that of the 14,000 grievances received, around 8,900 belong to those recorded absent. The university system monitors students during the exam, records data at every step with time stamps, thus recording what a student does from the minute they login to logging off.

He said, "We have received many grievances. My team is going through them individually to ensure genuine cases get another attempt. The system records every activity with time-stamps so that we know for certain what happened with reference to each of the students lodging a complaint."

He said various reasons were given by the concerned 14,000 students out of which 8,900 were recorded absent by the system. He said some are genuine cases. "A student from the Arts stream, as per our record, attempted the exam, filled in the answers and clicked some other icon instead of submitting. This is a genuine mistake and we can consider his situation. I have asked my team for an overall report. We will take a decision at the earliest on how to proceed further," Kakade added.

The university has said that after analysis, students with genuine issues will get another attempt. This will be also in the online mode and details will be notified soon. Questions for the re-examination will be picked at random by the system from the multiple questions fed in, and those that have already appeared will be omitted.

Pune Mirror 30.4.2021

# *News Paper Clippings During April 2021*

Section: Work of Appreciation

## पुणे विद्यापीठातर्फे आज रक्तदान शिबिर

**पुणे, दि. ११ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना, नाम फाउंडेशन, शिवम प्रतिष्ठान, निर्मला गजानन प्रतिष्ठान आणि प्रादेशिक रक्तपेढी, ससून रुग्णालय यांच्या वतीने दि.१२ एप्रिल रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत विद्यापीठाच्या सेवक विहार येथे रक्तदान महाअभियान आयोजित करण्यात आले आहे. करोनाच्या काळात उद्‌भवलेल्या रक्ताच्या तुडवड्याच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम आयोजिण्यात आला आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी संलग्नित महाविद्यालयांना केले आहे.

प्रभात Mon, 1 https:

## विद्यापीठात 'बांबू पार्क'ची उभारणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पाच एकरांमध्ये बांबू पार्कची उभारणी करण्यात येणार आहे. 'गॅरट मोशन टेक्नॉलॉजी' या कंपनीने सामाजिक उत्तरदायित्वाच्या निधीअंतर्गत ६८ लाख ८५ हजारांचा निधी त्यासाठी उपलब्ध करून दिला आहे.

बांबू पार्कच्या उभारणीबाबतचा सामंजस्य करार सोमवारी करण्यात आला. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, युनायटेड फॉर नेशनचे संचालक सुमेध बडवे आदी या वेळी उपस्थित होते. बांबू पार्क प्रकल्पाची अंमलबजावणी 'गॅरट मोशन टेक्नॉलॉजी' ही कंपनी 'युनायटेड फॉर नेशन' या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विद्यापीठात करणार आहे.

या प्रकल्पाअंतर्गत विद्यापीठातील शिवाजी पुतळा परिसराच्या मागच्या बाजूला जवळपास ५ एकरांमध्ये सुमारे दोन हजार बांबूची लागवड करण्यात येईल. या प्रकल्पाचा विद्यापीठातील बांबू केंद्राला उपयोग होणार आहे.

> " विद्यापीठात बांबू पार्क पहिल्यांदाच उभारले जात आहे. पर्यावरणीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्याबरोबरच विद्यापीठाला अर्थार्जन करणे हा या बांबू पार्क उभारण्याचा हेतू आहे.
>
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Tue, 20 April 2021 https://epaper.loksatta.com/c/59906696

## विद्यापीठात लसीकरण सुरू

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रात गुरुवारी कोव्हिड प्रतिबंधक लसीकरणाला सुरुवात झाली. पुणे विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रात लसीकरण केंद्र सुरू करावे, अशी मागणी विद्यापीठाने पालिकेकडे केली होती. त्यानुसार पालिकेने दोन दिवसांपूर्वी या लसीकरण केंद्राला मान्यता दिली.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी गुरुवारी या केंद्राचे उद्‌घाटन केले. 'कोव्हिशील्ड' लसीचे १०० डोस केंद्राकडे उपलब्ध झाल्यावर विद्यापीठाने प्रत्यक्ष लस देण्यास सुरुवात केली आहे. पुणे विद्यापीठाच्या वित्त विभागातील कर्मचारी प्रफुल्ल खेडकर यांना गुरुवारी लशीचा पहिला डोस देण्यात आला. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत दुधगावकर आणि आरोग्य केंद्रातील कर्मचारी या वेळी उपस्थित होते.




डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले, 'दोन दिवसांपूर्वी लसीकरणासाठी नोंदणी सुरू केली आहे. सुरुवातीला विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनाच लस देणार आहोत. सरकारी नियमानुसार ४५ वयापुढील व्यक्तींनाच लस देण्यात येणार आहे.'

डॉ. प्रफुल्ल पवार म्हणाले, 'विद्यापीठातील दिव्यांग, परीक्षा विभाग कर्मचारी, सफाई कर्मचारी, वाहनचालक, सुरक्षा कर्मचारी अशा अत्यावश्यक सेवा बजावणाऱ्या सेवकांना प्राधान्याने लस देत आहोत.'

> **" गेल्या वर्षभरात कोव्हिडच्या लढ्यात संशोधन केंद्र, सिरो सर्वेक्षण, विद्यार्थी स्वयंसेवक, रक्तदान आदी उपक्रमांच्या माध्यमातून विद्यापीठाचा कायमच सक्रिय सहभाग आतापर्यंत राहिला आहे. इथून पुढेही लसीकरण केंद्राच्या माध्यमातून तो सुरू राहील. विद्यापीठातील सर्वांनी या लसीकरण प्रक्रियेत सहभागी व्हावे.**
>
> **- डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 30.4.2021

## *News Paper Clippings During April 2021*

Section: Miscellaneous

# उलगडणार माधवराव पेशव्यांची कारकीर्द

### पुण्यातील इतिहास अभ्यासकांनी साकारले संदर्भ चरित्र

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**



पानिपताच्या पराभवानंतर मराठी साम्राज्याची पताका पुन्हा एकदा अखंड भारतावर फडकवणाऱ्या थोरले माधवराव पेशवे यांचे संदर्भ चरित्र वाचकांसमोर आले आहे. अनेकांना केवळ प्रेमकथेतून कळणाऱ्या माधवरावांचे समग्र चरित्र संदर्भांसहीत साकारण्याचे काम पुण्यातील दोन इतिहास अभ्यासकांनी केले असून, पाडव्याच्या दिवशी या पुस्तकाचे लोकार्पण केले जाणार आहे.

गुरुप्रसाद कानिटकर आणि पराग पिंपळखरे या दोन इतिहास अभ्यासकांनी हे चरित्र साकारले आहे. माधवराव पेशवे यांच्यावर रणजित देसाई यांनी 'स्वामी' या नावाची कादंबरी साकारली होती. त्यानंतर माधवराव पेशवे यांच्यावर फारसे लेखन झालेले नाही. त्यांच्या आयुष्याशी संबंधित उपलब्ध असलेले अनेक संदर्भही विखुरलेले आहेत. ते एकत्र करून त्या संदर्भांवर आणि तत्कालीन इतिहासकारांनी लिहिलेल्या नोंदीवरून या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली असल्याचे पुस्तकाचे लेखक कानिटकर यांनी सांगितले. या चरित्रासाठी मराठी, इंग्रजी, फारसी आणि पोर्तुगीज साधनांपैकी बहुतांश प्रकाशित साधनांचा वापर केला आहे. या चरित्रातून पानिपताच्या तिसऱ्या युद्धानंतरच्या कालखंडातील भारतातील सर्वांत मोठ्या साम्राज्याच्या शासकाच्या कारकिर्दीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. पानिपतात झालेल्या मराठ्यांच्या पराभवानंतर लगेचच मराठ्यांनी आपले गेलेले प्रांत परत मिळवण्याच्या दृष्टीने हालचाली केल्या. मराठ्यांचे चार प्रमुख धुरंधर सेनानी महादजी शिंदे, तुकोजी होळकर, विसाजी कृष्ण (बिनीवाले) व रामचंद्र गणेश (कानडे) यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी आपल्या प्रतिष्ठेचे जे पुनरुज्जीवन केले, त्यामध्ये माधवराव पेशवे यांचा मोलाचा वाटा होता.

या काळात त्यांच्या आयुष्यात घडलेल्या अनेक घटनांचा वेध संदर्भांच्या आधारे या चरित्रातून घेण्यात आला आहे.

या चरित्राचे लेखन करताना सुमारे शंभरहून अधिक संदर्भग्रंथांचा वापर करून त्यातील माधवरावांचे संदर्भ एकत्रित करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे इंग्रजी, पोर्तुगीज, फारसी अशा परकीय भाषांमध्येही माधवराव पेशवे यांच्या संदर्भात विपुल लेखन झाले असून, अद्याप मराठी वाचकांना परिचित नसलेले अनेक संदर्भ या चरित्रातून वाचकांसमोर येणार आहेत.

> **"थोरले माधवराव पेशवे यांच्या कारकिर्दीतील घटनांना आधार असलेले संदर्भयुक्त चरित्र आजपर्यंत प्रकाशित झाले नव्हते. माधवरावांच्या आयुष्यातील घटनांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न आम्ही या चरित्रातून केला आहे. इतिहासात काही व्यक्ती शूर असल्या तरी त्या आजूबाजूच्या परिस्थितीमुळे कालांतराने विस्मरणात जातात. माधवराव पेशवे यांच्याबाबतीत असेच काहीसे म्हणावे लागेल. त्यांच्या कारकिर्दीला न्याय देण्यासाठी आम्ही हा प्रयत्न केला असून, प्रशासक म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतला आहे.**
>
> – गुरुप्रसाद कानिटकर, लेखक, इतिहास अभ्यासक

Maharashtra Times 11.4.2021

## *News Paper Clippings During April 2021*

Section: Miscellaneous

# विद्यापीठाची प्रयोगशाळा अजूनही 'निगेटिव्ह'

## प्रशासनाची तयारी पूर्ण, मान्यतेची प्रतीक्षा; कोरोनाचे ४०० नमुने तपासण्याची क्षमता

सकाळ EXCLUSIVE

ब्रिजमोहन पाटील : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १९ : कोरोनाच्या पहिल्या लाटेतच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कोविड निदानासाठी प्रयोगशाळा उभारण्याचा निर्णय झाला. त्यानंतर आता दुसऱ्या लाटेचा हाहाकार माजला असताना अजूनही प्रयोगशाळेत एकही चाचणी झाली नाही. विद्यापीठाकडून सर्व तयारी झाल्याचे सांगण्यात येत असले, तरीही प्रयोगशाळेला कोरोना निदानासाठी अजून अंतिम मान्यता मिळाली नाही.

गेल्या वर्षी मार्च महिन्यात राज्यात कोरोनाची साथ सुरू झाली. त्यावेळी केवळ राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेमध्ये (एनआयव्ही) कोरोना नमुन्यांची चाचणी होत होती. राज्यात चाचणी करणारी ही एकमेव संस्था असल्याने येथे ताण निर्माण झाला होता. त्यानंतर पुण्यामध्ये ससून रुग्णालय आणि आयसर या संस्थेमध्ये कोरोना चाचणी करण्यास परवानगी देण्यात आली. तसेच खासगी प्रयोगशाळांनाही परवानगी मिळाली. त्याचवेळी राज्यातील विद्यापीठांमध्ये कोरोनासह विविध साथरोगांच्या नमुन्यांची चाचणी व्हावी, त्यावर संशोधन व्हावे यासाठी राज्यपातळीवर चर्चा सुरू झाली. त्यासाठी पुणे विद्यापीठाने तयारीदेखील दर्शविली होती. त्यानंतर राज्य सरकारने विद्यापीठाला प्रयोगशाळा सुरू करण्यासाठी परवानगीही दिली होती.

विद्यापीठात सध्या असलेल्या प्रयोगशाळा या साथ रोगांचे निदान व संशोधन करण्याच्या क्षमतेच्या नाहीत. त्यासाठी बायोलॉजिकल सेफ्टी लेव्हल तीन (बीएसएल) या स्तरावरील आण्विक निनाद आणि संशोधन केंद्र (सेंटर फॉर मॉलीक्युलर डायग्नॉस्टिक अँड रिसर्च) उभारण्यात आले. या प्रयोगशाळेसाठी सुमारे दीड कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला. फेब्रुवारी महिन्यात या प्रयोगशाळेचे उद्‌घाटनदेखील झाले.

शहरात सध्या कोरोनाची दुसरी लाट आली आहे. 'आरटीपीसीआर' चाचण्यांचा अहवाल प्राप्त होण्यासाठी दोन ते तीन दिवसांचा कालावधी लागत आहे. तसेच शहरात रोज २० हजारांपेक्षा जास्त नमुने घेतले जात असल्याने त्याचा ताण अन्य प्रयोगशाळांवर येत आहे. विद्यापीठाच्या प्रयोगशाळेत रोज ४०० ते ५०० चाचण्यांची क्षमता आहे; पण अद्याप अंतिम मान्यता मिळाली नसल्याने या ठिकाणी चाचण्या होत नाही. याबाबत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

### सर्व प्रकारच्या साथरोगांचे निदान शक्य

पुणे विद्यापीठाने उभारलेल्या प्रयोगशाळेला मान्यता मिळाल्यानंतर तेथे कोविड नव्हे, तर इतर सर्व प्रकारच्या साथरोगांचे निदान होऊ शकणार आहे. तसेच त्यावर संशोधनही शक्य आहे. याचा विद्यार्थी आणि प्राध्यापकांना फायदा होईल. अशा प्रकारे विद्यापीठात उभारलेली ही एकमेव प्रयोगशाळा असणार आहे.

**"विद्यापीठाने उभारलेल्या प्रयोगशाळेत यंत्रसामग्री, मनुष्यबळ याची सर्व तयारी झाली आहे, पण काही परवानगी मिळाल्या नसल्याने तेथील चाचणीचे काम अद्याप सुरू झाले नाही. पुढील १० ते १५ दिवसांत परवानगी येण्याची शक्यता आहे.**

**- डॉ. एन. एस. उमराणी, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

Sakaal 20.4.2021

# *Condolence Messages*



अतिशय दु:खद बातमी. आपल्या महाविद्यालयाचे माजी प्रबंधक **श्री.रविंद्र पंढरीनाथ काळे** यांचे अल्पशा आजाराने दि.०२ एप्रिल २०२१ रोजी दु:खद निधन झाले. मॉडर्न महाविद्यालयातील सर्व सहकारी कर्मचारी त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहेत. मॉडर्न महाविद्यालयातील सर्व कर्मचार्यांच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो ही प्रार्थना.






कळविण्यास अत्यंत दु:ख होत आहे की मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर चे माजी प्रबंधक **श्री.एस.वाय.कुलकर्णी** यांचे वृद्धापकाळाने दि.१० एप्रिल २०२१ रोजी निधन झाले. महाविद्यालयाचे सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहेत. महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचार्यांच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

## *Upcoming Events*

# *May 2021*

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 *Mahatma Basweshwar Jayanti*  | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 *Anti Terrorism Day* | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 *Swantantrayveer Savarkar Jayanti*  | 29 |
| 30 | 31 *Ahilyadevi Holkar Jayanti*  | | | | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.*

***Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.***